म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय का. वाङ्मय
दा. क्र. १३०५
IRBK-0106397
IRBK-0106397

# हरिण बालक

[ The Yearling ]

अनुवादक

**भा. रा. भागवत**

श्री ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २९५५९
१७३९
नों. दि. २१७९
IRBK-0106397
IRBK-0106397

किंमत १॥ रु

लाखाणी बुक डेपो, मुंबई नं. ४

प्रकाशक:
बाबूभाई लाखाणी,
लाखाणी बुक डेपो, मुंबई ४

प्रथमावृत्ति
१९५७

मुद्रक:
शि. गो. भावे, मॅनेजिंग डायरेक्टर,
विमा मुद्रक आणि प्रकाशक लिमिटेड.
मुद्रणस्थळ: विमा छापखाना, सातारा.

---

Marathi Translation of THE YEARLING (abridged)
by Marjorie Kinnan Rawlings;
Publishers; Charles Scribner's Sons, New York.
Copyright 1947 by Marjorie Kinnan Rawlings.
Published by permission of copyright owner.

वनश्री नजरेखालून घालतां यावी -- प्रत्येक झाडन् झाड, झुडूपन् झुडूप त्याच्या ओळखीचें होतें, इतरांपेक्षां वेगळें होतें, तें पुन्हा बघायला मिळावें म्हणून ज्योडी सावकाश चालायला लागला. शेवटीं तो त्या मॅग्नोलियाच्या झाडापाशीं येऊन पोंचला. यात्र झाडावर त्यानें रानमांजराचें तोंड कोरलें होतें. हें झाड या ठिकाणीं उगवावें याचा अर्थ पाणी कुठेंतरी जवळपासच होतें. कुठेंही झालें तरी, माती म्हणजे माती आणि पाऊस म्हणजे पाऊस; असें असतांना राठ गवताच्या कुरणांत देवदार वृक्ष वाढावेत आणि प्रत्येक ओहोळ, तळें आणि नदी यांच्या कांठांवर मॅग्नोलियाचीं झाडें वाढावीत हा एक त्याला चमत्कारच वाटे.

रस्त्याच्या पूर्व बाजूला वीस फूट खोल उतरण होती. आणि खालीं एक झरा होता. या उतरणीवर मॅग्नोलिया, लॉबलोली बे, मधुर चवीचा गोंद, आणि राखी रंगाचे अॅशवृक्ष यांची दाट झाडी होती. त्यांच्या गर्द छायेंतून थंडगार अशा काळोखांतून ज्योडी झऱ्याकडे गेला. त्याला कसलीतरी तीव्र हुरहुर वाटूं लागली. ज्योडीची ही जमतीदार गुप्त जागा होती.

वाळूंतून कुठून तो झरा निघाला होता कुणास ठाऊक! पण त्याचें बुदबुद करणारें पाणी कसें विहिरीच्या पाण्यासारखें स्वच्छ होतें. जमिनींतून जिथून पाणी निघत असेल त्या ठिकाणीं एक भोंवरा बनलेला होता. त्यांत वाळूचे कण खळखळा उडत होते. या ओहोळाच्या पलीकडे जास्त चढणीच्या जागीं मूळच्या झऱ्याचें पाणी बुदबुद करीत बाहेर पडत होतें. आणि पांढऱ्या चुनखडी कातळांतून वाट काढीत काढीत टेकडीच्या खालीं मोठ्या वेगानें पडत होतें. खालीं त्या पाण्याचा डोह बनला होता. हा डोह जॉर्ज सरोवराला मिळालेला होता. जॉर्ज सरोवर म्हणजे सेंट जॉन्स नदीचाच एक भाग. ही प्रचंड नदी उत्तरेकडे वाहत जाऊन समुद्राला मिळायची. जिथून महासागर सुरू होई तिथली शोभा पाहत बसायला ज्योडीला केवढा हर्ष वाटायचा. दुसऱ्या सुद्धा अनेक गोष्टींचे उगम असतात, प्रारंभ असतात; पण महासागराच्या प्रारंभाचें हें खरें रहस्य म्हणजे ज्योडीचें जणूं स्वतःचें गोड गुपित होतें. तो आपल्याशींच खूष होऊन म्हणे, "माझ्याशिवाय आणि इथल्या रानटी प्राण्यांशिवाय, तहानेनें कासावीस झालेल्या पक्ष्यांशिवाय दुसरं कुणी कुणी सुद्धां या जागेकडे येत नाहीं."

एवढी पायपीट करून आल्यामुळें त्याला उबल्यासारखें वाटत होतें. त्या काळोखी दरडीनें जणूं आपले थंडगार हात त्याच्या अंगावरून फिरवून त्याला गारवा

दिला. आपल्या घट्ट निळ्या विजारीचे कांठ त्यानें वर दुमडून घेतले आणि मळकया उघड्या पायांनीं तो झऱ्याच्या उथळ पाण्यांत उतरला.

ज्योडीच्या डोक्यावर पर्णराजींनीं आच्छादन केलें होतें. वाऱ्याच्या झुळकीनें तें थोडें दूर झालें. सूर्याचें ऊन्ह फटींतून आंत आलें आणि त्याच्या डोक्यावर नि खांद्यावर पसरलें. आपले निर्दावलेले पाय कितीही थंड असोत, डोक्याला ऊब मिळाली हें छान झालें! वाऱ्याची झुळूक पुन्हा विरून गेली. ऊन्ह त्याच्याजवळ येईना. तसाच पाणी तुडवीत तो पलीकडच्या कांठावर गेला. या ठिकाणीं झाडी जरा विरळ होती. एका गिड्ड्या ताडाच्या झुडपाला त्याचें अंग घसटलें. त्याला आठवण झाली कीं आपला चाकू आपल्या खिशांत सुखरूप आहे. कित्ती कित्ती दिवसांपूर्वी- नाताळांतच- त्यानें पाणचक्की करायचें ठरविलें होतें.

आतापर्यंत त्यानें एकट्यानें कधींही पाणचक्की बनवली नव्हती. हटो मंडळी होती ना? त्यांच्या आजीबाईचा ऑलिव्हर ज्योडीला नेहमीं पाणचक्की करून देई. पण तो आपल्या खलाशी कामावरून घरीं आलेला असे तेव्हां. ज्योडी मन लावून काम करायला लागला. पाणचक्कीचें चाक नीट सफाईनें फिरावें म्हणून ताडाचें पान बरोबर कोणत्या कोनांत बसवलें पाहिजे हें आठवण्याचा तो सारखा प्रयत्न करीत होता. आणि त्यामुळें त्याच्या कपाळावर सारख्या आंठ्या चढत होत्या.

• • •

पाणी टीचभरच खोल होतें, पण प्रवाह जोराचा होता. पाणचक्कीचे छोटे ताडपत्री पंखे पुनःपुन्हा खालींवर खालींवर फिरत होते. चक्की काम देऊं लागली होती.

ज्योडीनें एक दीर्घ श्वास घेतला. तिथल्या गवताळ रेतीवर तो पालथा पडला आणि गतीच्या जादूंत रंगून गेला. पंखा वर जातो आहे, ढकलला जातो आहे, पलीकडे पडतो आहे, पुन्हा खालून वर जातो आहे, ढकलला जाऊन पुन्हा खालीं पडतो आहे- पाणचक्कीच्या या हालचालींत केवढी मोहिनी भरलेली होती! उन्हाची एक तिरीप त्याच्या अंगावर पडली होती. ऊबदार बारीक रेपेसारखी, ठिगळें लावलेल्या पांघरुणासारखी. वाळूंत पुरलेल्या आणि उन्हांत न्हाऊन निघालेल्या पाणचक्कीची हालचाल तो आळसटपणें पाहत होता. त्या हालचालीनें ज्योडीला भारल्यासारखें झाले होतें. चक्कीचे पंखे पाण्यावर फडफड करीत तशी इकडे याच्या पापण्यांची उघडझाप व्हायची. चक्कीवरून ओघळणारे रुपेरी थेंब एकत्र यायचे आणि आकाशांतून तुटणाऱ्या ताऱ्यासारखें त्यांचें पुसट धूसर शेपूट

बनायचें. पांढऱ्या गोंड्याच्या नीलवर्ण आकाशानें ज्योडीच्या अंगावर पांघरूण घातलें. तो झोपला.

ज्योडी उठला त्या वेळीं सूर्य निघून गेला होता. छायाप्रकाशांचा खेळ संपला होता. सृष्टि सौम्य करड्या वर्णाची बनली होती. आणि धबधब्यांतून उडणाऱ्या तुषारांप्रमाणें पिठोरी धूसर दहिंवरांत आपण गुरफटून पडलों आहोंत असें ज्योडीला आढळलें. त्या दहिंवरानें ज्योडीच्या अंगाला गुदगुल्या झाल्या. त्यांत ऊबही होती आणि गारवाही होता. ज्योडी कुशीवर वळला आणि उताणा पडून राहिला. एखाद्या कोंवळ्या रोपाप्रमाणें तो हवेंतले सूक्ष्म जलकण शोषून घेत होता. शेवटीं त्याचें तोंड जेव्हां ओलेंचिंब झालें आणि शर्टही छातीला ओला लागूं लागला तेव्हां कुठें ही स्वारी आपलें घरटें सोडून निघाली. जातां जातां वाटेंत तो एकदम थांबला. हा झोपलेला असतांना कुठूनतरी एक हरीण झऱ्यावरचें पाणी प्यायला आलें होतें. पूर्वेकडच्या कांठावर नुकतींच उमटलेलीं पावलें दिसत होतीं. टोंकदार आणि स्पष्ट असे ते ठसे होते. म्हणजे हरिणीचीं पावलें असावींत. ज्योडी झोपला होता तो तिला दिसला नसेल. ती झऱ्यापर्यंत आली, पोटभर पाणी प्याली आणि तेवढ्यांत त्याचा वास तिला आला असणार. कारण एकदम घाबरून जाऊन ती मागें वळली होती. वाळूमध्यें पावलांचा जो एकच गोंधळ उडालेला दिसत होता त्यावरून हें स्पष्ट होत होतें.

आणखी कांहीं माग लागतो का म्हणून तो पाहूं लागला. झऱ्याच्या कांठावरून खारींनीं वरखालीं पुष्कळ धावपळ केलेली होती. पण खारी काय, नेहमींच धीट असायच्या. एक रकून ऊर्फ भालूजी या बाजूनें फेरी मारून गेले होते. तीक्ष्ण नखाचे हात असावेत तशीं त्याचीं तीं पावलें. पण हे गृहस्थ केव्हां येऊन गेले असतील तें ज्योडीला नक्की समजेना. एखादें रानटी श्वापद केव्हां येऊन गेलें असेल त्याची नक्की वेळ फक्त ज्योडीचे बाबाच सांगूं शकत. हरिणी मात्र नक्कीच येऊन गेली होती. आणि ती घाबरली होती हेंही नक्की. ज्योडी पुन्हा एकदा पाणचक्कीकडे वळला. ती इतक्या संथपणें फिरत होती कीं जणूं कांहीं पहिल्यापासून ती तिथेंच होती. तिचे ताडपत्री पंखे, खरें म्हणजे, किती फुसके होते! पण त्या उथळ पाण्याशीं झगडत आपल्या शक्तीचा केवढा देखावा त्यांनीं मांडला होता! पावसाच्या बारीक धारेमुळें ते पंखे चकचक करीत होते.

ज्योडीनें आकाशाकडे पाहिलें. त्या करड्या वातावरणांत त्याला दिवसाची

नक्की वेळ सांगतां आली नसती. आपण किती वेळ झोपलों होतों याचीही त्याला कल्पना नव्हती. झऱ्याच्या पश्चिम कांठावरून तो उड्या मारीत पुढें गेला. या ठिकाणीं फताड्या गालवेरींचे ताटवे अखंड पसरले होते. पुढें जावें कीं इथेंच थांबावें तें ज्योडीला नक्की ठरवितां येईना. तो तिथेंच घोटाळत उभा राहिला. इतक्यांत जेवढ्या हळुवारपणें पावसाची रिपरिप सुरू झाली होती तेवढ्याच हळुवारपणें ती थांबली. नैऋत्य दिशेकडून वाऱ्याची एक मंदशी झुळूक आली. सूर्य पुन्हा ढगाबाहेर आला. ढग लोळत लोळत एकत्र आले. आणि त्यांचे जणूं कांहीं, पिसांचे प्रचंड गठ्ठे बनले. पूर्व दिशेला इंद्रधनुष्याची कमान उभी राहिली. ती इतकी सुरेख आणि बहुरंगी होती कीं तिच्याकडे पाहतां पाहतां आपली छाती फुटून जाणार असें ज्योडीला वाटूं लागलें. माती कशी फिकट हिरव्या रंगाची दिसत होती! इतकेंच काय, हवादेखील दृश्य बनली होती असें म्हटलें तरी चालेल! पावसानें धुतलेल्या सूर्यप्रकाशामुळें हवेला सोनेरी रंग आला होता. सगळ्या झाडांवरून, गवतावरून आणि झुडुपांवरून पावसाच्या थेंबांनीं अशी बरसात केली होती कीं त्यामुळें सगळीकडे लखलख दिसत होतें.

त्या ओढ्यांतला झरा जसा कुणालाही न जुमानतां खळखळून वर येत होता, तसा निर्बंध आनंदाचा एक झरा ज्योडीच्या मनांत उफाळला होता. त्यानें आपले हात वर उचलले आणि खांद्यापाशीं धरले. एखाद्या पाणकोंबडीचे पंख असतात ना, तसे! वाटेंतच थांबून तो आपल्याच भोवतीं गरगर फिरूं लागला. आणखी आणखी जोरानें गरगर फिरायला लागला. इतक्या जोरानें कीं शेवटीं त्याला चक्कर आली आणि तो जमिनीवर पडला. मग तिथेंच गवतावर तो पडून राहिला. एप्रिलचें स्वच्छ निळें आकाश आणि कापसासारखे दिसणारे त्यांतले शुभ्र मेघ त्याच्या डोक्यावरून जणूं गरगर गरगर फिरत होते. बाळ ज्योडी, सृष्टिमाता, वनश्री आणि आकाश सारीं जणूं गिरगिर माता करीत होतीं. शेवटीं एकदाचें हें गरगर फिरणें थांबलें. डोकें मोकळें झाल्यासारखें वाटायला लागलें. आणि ज्योडी उठून उभा राहिला. अजूनही हलकें वाटत होतें, चक्कर येतच होती.पण आपल्यांतलें कांहीं तरी मोकळें झालें आहे असें त्याला वाटत होतें. आतां हा एप्रिलमधला का दिवस असेना, आपण दुसऱ्या कोणत्याही दिवसाइतका मजेंत तो पार पाडूं अशी त्याला उमेद वाटत होती.

• • •

ज्योडी मागें वळला आणि उड्या मारीत घराकडे निघाला. ओलाव्यामुळें देवदार सुगंधी बनले होते. तो गंध ज्योडीनें दीर्घ श्वास घेऊन आंत ओढून घेतला. मघाशीं त्याच्या पायाला लुबकणारी मोकळी वाळू आतां पावसामुळें घट्ट बनली होती. घरीं परत जातांना वाटचाल आरामाची होती. ज्योडी पटांगणांत येऊन पोचला त्या वेळीं सूर्य जवळजवळ मावळायला आला होता. आपले बाबा अजून ग्राहाम्सव्हिलहून परतले नसतील अशी त्याला आशा वाटत होती. आत्तां पहिल्यानेंच त्याच्या मनांत असा विचार आला होता कीं बाबा घरीं नसतांना आपण असे निघून आलों हें बरें केलें नाहीं. आईला जळणासाठीं लाकडें हवीं असलीं तर ती रागावली नसेल का? आपले बाबासुद्धा जराशी मान हालवतील आणि म्हणतील, 'हें बघ बाळ-' इतक्यांत म्हाताऱ्या सीझरचें फिस्कारणें त्याला ऐकू आलें. आणि त्याला कळलें कीं बाबा आपल्या आधींच आले आहेत.

लाकडांच्या ढिगाऱ्याजवळ पेनी बॅक्स्टर उभा होता. आजही त्यानें आपला लग्नांतला तलम लोकरीचा कोट घातला होता. चर्चमध्यें किंवा व्यापारासाठीं चार लोकांत जावें लागे तेव्हां हा कोट आपल्या प्रतिष्ठितपणाचें लक्षण म्हणून घालण्याची त्याची पद्धत होती. आत्तां आपला हा उत्तम कोट घालून तो ज्योडीचें काम करीत होता. ज्योडी धावतच त्याच्याकडे गेला.

"पा, थांबा ना! मी नेतों तीं लाकडं."

आपण जो आत्तां अपराध केला होता त्याच्यावर आपल्या या तत्परतेमुळें पांघरूण घालतां येईल अशी त्याला आशा होती. ज्योडीला पाहून त्याचे वडील ताठ उभे राहिले.

"मला वाटलं तूं गेलास तो गेलासच." पेनी म्हणाला.

"पा, मी दरडींत गेलों होतों."

"वा, काय झकास दिवस काढलास पण दरडींत जायला—किंवा कुठेंही जायला!" पेनी म्हणाला. "इतक्या लांब जायचं कुठून आलं तुझ्या डोक्यांत?"

आपल्याला दरडींत जाण्याची कां बुद्धि झाली तेंसुद्धा ज्योडीला आठवेना. जणूं कांहीं या गोष्टीला एक वर्ष लोटलें होतें. त्यानें आपला टिकाव ज्या क्षणीं खालीं ठेवला तेव्हांपर्यंतच्या सर्व गोष्टी त्याला पुन्हा आठवाव्या लागल्या.

"हं! हं!" तो म्हणाला. आतां त्याच्या लक्षांत आलें. "मी मधमाशांचा पाठलाग करायला म्हणून निघालों होतों. त्यांचं झाड मला शोधायचं होतं."

" मग सांपडलं ? "

ज्योडी नुसताच शून्य दृष्टीनें पाहत राहिला. " अरेच्या ! मी तें सगळं आत्तांपर्यंत विसरूनच गेलों होतों. "

पक्ष्यांची शिकार करणारा कुत्रा शेतांतल्या उंदरांमागें धावतांना अचानक सांपडला म्हणजे त्याची जशी स्थिति होते तशी ज्योडीची झाली. आपण अगदीं वावळट आहों असें त्याला वाटूं लागलें. मेंढरासारखी निर्बुद्ध मुद्रा करून त्यानें वडिलांकडे पाहिलें. वडिलांचे फिक्ट निळे डोळे चमचम करीत होते.

" सांग पाहूं ज्यो, खरं सांग. " पेनी म्हणाला. " उगीच उडवाउडवी करूं नकोस. तुला भटकायला जायला मधमाशांचं झाड हें छानसं निमित्त मिळालं. खरं ना ! "

ज्योडीनें दांत विचकले. " तें आधीच होतं माझ्या डोक्यांत. " त्यानें कबूल केलें. " मधमाशांच्या झाडाची कल्पना मागाहून सुचली. "

" मला वाटलंच ! ग्राहाम्सव्हिलला मी गाडी घेऊन चाललों होतों तेव्हां स्वतःशींच म्हटलं, तो पाहा ज्योडी, खोदकाम करतो आहे. पण फार वेळ असणार आहे थोडाच तो उकरत ! वसंत ऋतूंतला आजच्यासारखा छानदार दिवस ! मी त्याच्यासारखा लहान मुलगा असतों तर आज काय केलं असतं ? आणि मग माझं मलाच वाटलं, मी भटकायला गेलों असतों ! कुठें वाटेल तिकडे, वाट फुटेल तिकडे. "

लहानग्या ज्योडीला एकदम अंगांत ऊन आल्यासारखें वाटलें. ती ऊन जवळजवळ क्षितिजाला टेकलेल्या सोनेरी सूर्याची खास नव्हती. त्यानें मान डोलावली आणि म्हटलें, " हो, माझ्या अगदीं तसंच मनांत आलं. "

" पण हें बघ, " मान उडवून घराकडे निर्देश करीत पेनी म्हणाला. " तुझ्या आईला किनई हें भटकणं पसंत नाहीं. पुरुषाला भटकणं किती आवडतं हें बायकांना सारा जन्म गेला तरी कळत नाहीं, बघ. तूं इथें घराच्या जवळ नव्हतास याचा मीं मात्र पत्ता लागूं दिलेला नाहीं हो. तिनें विचारलं, ज्योडी कुठें आहे ? मी म्हणालों, अंः, असेल इथेंच कुठेंतरी जवळपास. "

असें म्हणून त्यानें एक डोळा मिचकावला. ज्योडीनेंही डोळा मिचकावून त्याला प्रत्युत्तर केलें.

"शांततारक्षण करायचं असेल तर पुरुषांनीं एकजुटीनं राहायला हवं. आतां असं कर... हीं बरीचशीं लाकडं तूंच घेऊन जा आंत आईकडे."

ज्योडीनें हातांवर लाकडें लादून घेतलीं आणि तो लगबगीनें घराकडे गेला. त्याची आई शेकोटीजवळ गुडघे टेकून बसली होती. मसाल्याचा खमंग वास त्याच्या नाकांत भरला: आणि त्याला भुकेनें कासावीस करून सोडलें.

"राताळ्याचं पोन केलं आहे का ग, मा ?"

"हो. राताळ्याचं पोन केलंय्. आतां आणखी वेळ लावूं नका तुम्ही दोघे. इकडे जा, तिकडे जा, लोकांच्या घरीं जा, हें बस झालं आतां! जेवण अगदीं तयार आहे."

ज्योडीनें खोक्यांत लाकडें टाकलीं आणि तो धावत धावत गोठ्याकडे गेला. त्याचे बाबा ट्रिक्सीचें दूध काढीत होते.

"मा म्हणते आहे कीं आटपा आणि चला लौकर — सीझरला मी घालूं का खायला ?"

"त्याला घातलं मीं. त्या बापड्याला जें कांहीं देण्यासारखं होतं तें मीं दिलं." पेनी एका तिपाईवर बसून दूध काढीत होता तो उठून उभा राहिला आणि म्हणाला, "हें दूध घेऊन जा घरांत. आणि भोपळा संभाळून ने. कुठेंतरी अडखळून काल सांडलंस तसं सांडूं नकोस हं! ट्रिक्सी, झालं हं!"

तो गाईपासून दूर झाला आणि मुलाच्या मागोमाग घरांत शिरला. पाण्याच्या कट्ट्याजवळ उभें राहून दोघांनीं हात-तोंड धुतलें, आणि सैंपाकघराच्या दाराबाहेर दांडीला टॉवेल गुंडाळलेला होता त्याला पुसलें.

मा टेबलापाशीं त्यांची वाटच पाहत बसली होती; त्यांच्या बशांतून अन्न वाढीत होती. त्या लांबट चिंचोळ्या टेबलाच्या एका टोकाला ती बसली होती. आणि आपल्या लठ्ठ शरीरामुळें तिनें ती सबंध जागा अडवली होती. ज्योडी आणि त्याचे बाबा तिच्या दोन बाजूंना बसले. अध्यक्षस्थानावर मानें बसावें ही त्या दोघांनाही अगदीं स्वाभाविक गोष्ट वाटत होती!

ज्योडीला आतां कांहीं ऐकूं येईना; आणि पुढ्यांतल्या बशीशिवाय कांहीं दिसेना. साऱ्या जन्मांत त्याला एवढी भूक कधीं लागली नव्हती. नुकत्याच मागें पडलेल्या शुष्क हिंवाळ्यांत आणि रेंगाळणाऱ्या वसंत ऋतूंत बॅक्स्टर मंडळींच्या घरीं खायला जेमतेमच मिळत होतें—गुरांना काय किंवा माणसांना तरी काय!

आणि आतां आज आईनें असा झकास सैंपाक केला होता कीं पाद्रीबुवासुद्धा खूष व्हावेत ! एकीकडे त्याला आणखी बिस्किटें खायची इच्छा झाली होती तर दुसरीकडे त्याचें मन रताळ्याच्या 'पोन'कडे ओढ घेत होतें. पूर्वानुभवानें पोळलेलें तें मन त्याला सांगत होतें कीं, 'आत्तांच तूं बिस्किटं खाल्लींस तर पोन खायला तुझ्या पोटांत जागाच राहणार नाहीं !' दोहोंतून कशाची निवड करायची तें स्पष्टच होतें.

" मा ! " तो म्हणाला, " माझं पोन मीं आत्तांच घेतलं तर काय होईल ? "

जेवतां जेवतां मा मध्येंच थांबली. तिनें ज्योडीसाठीं पोनचा एक भला-मोठ्ठा तुकडा मोठ्या कौशल्यानें कापून काढला. त्या मसालेदार आणि स्वादिष्ट पक्वान्नावर ज्योडीची स्वारी लगेच तुटून पडली.

" तें पोन करायला किती वेळ लागला आहे मला ! " मानें कुरकुर केली, " आणि तूं आपला मी दम खायच्या आंत त्याचा फडशा उडवतो आहेस. "

" मी भरभर खातों आहें खरा, " ज्योडीनें कबूल केलें, " पण मा, कित्ती कित्ती वेळ त्याची चव माझ्या तोंडांत राहील. "

जेवण आटोपलें. ज्योडीचें पोट भरलें. त्याचे वडील नेहमीं चिमणीसारखे थोडेसेंच खायचे. पण त्यांनींसुद्धा आज दुसऱ्यांदा वाढून घेतलें.

मा बॅक्स्टरनें एक निःश्वास सोडला.

" मला कोणी आतां एखादी मेणबत्ती लावून देईल, " ती म्हणाली, " तर मी हें बशा विसळण्याचं काम उरकून टाकीन. आणि मग कदाचित् मला स्वस्थ बसून थोडी विश्रांति घ्यायला मिळेल. "

ज्योडी आपल्या जागेवरून उठला. त्यानें एक मेणबत्ती पेटवली. तिची पिवळी वात थरथर हालत असतांना ज्योडीनें पूर्वेकडच्या खिडकींतून बाहेर पाहिलें. क्षितिजावर चंद्राचें पूर्णबिंब वर येत होतें.

त्याचे बाबाही खिडकीजवळ आले व दोघे मिळून तें दृश्य पाहूं लागले.

" बेटा, हें पाहिल्यावर तुला कसली आठवण होते ? एप्रिल महिन्यांत पौर्णिमेच्या दिवशीं आपण काय करायचं म्हणालों होतों तें आठवतं का तुला ? "

" मला नाहीं आठवत. "

काय असेल तें असो, ऋतुमान कसें आणि केव्हां बदले याचा ज्योडीला

१०७७५ २५.१०.९१

पत्ताच लागत नसे. या गोष्टी नीट लक्षांत ठेवायच्या म्हणजे अगूं कांहीं आपल्या बाबांच्याइतकें वयानें मोठेंच व्हायला पाहिजे कीं काय ! नों. दि.

"मीं तुला जें सांगितलं तें तूं विसरला तर नाहींस ? बेटा, हिंवाळ्यांत आपल्या गुहेमध्यें स्वस्थ झोपून राहिलेलीं अस्वलं एप्रिलच्या पौर्णिमेला बाहेर पडतात. होय ना ?"

"हां, हां ! लपूछपू अस्वल म्हणतां होय ? हो, तुम्हीं सांगितलं होतंत खरं कीं तें बाहेर येईल तेव्हां आपण त्याच्यासाठीं दबा धरून बसूं म्हणून. मग कधीं जायचं हो, पा ?"

"एवढं शेत उकरण्याचं काम झालं कीं जाऊं आणि मग अगोदर अस्वलाच्या खुणा कुठें दिसतात का पाहूं."

"पण पा, त्याच्या शिकारीला आपण आधीं कुठून सुरवात करूं हो ?"

"मला वाटतं, अगोदर दरडींतल्या झऱ्याकडे जावं हें उत्तम ! अस्वल बाहेर आलं आहे का, पाणी प्यायला येऊन गेलं आहे का, हें आधीं बघावं."

ज्योडी म्हणाला, "पा, काल एक मोठी हरणी पाणी प्यायला येऊन गेली. मी त्या वेळीं झोपलेला होतों. पा, मीं एक पाणचक्की केली. किती झकास फिरते ती."

मा बॅक्स्टरच्या भांडीं विसळण्याचा आवाज एकाएकीं थांबला.

"अरे लुच्च्या पळपुट्या !" ती म्हणाली. "तूं दूर गेला होतास हें आत्तांच कळतंय् मला. पावसांत मातीचा रस्ता जसा गुळगुळीत बनतो तसा बनलाहेस तूं अलीकडे."

ज्योडी खो खो करून हसायला लागला.

"अग मा, मीं तुझी गंमत केली. मधून मधून एकाद वेळेला तुझी अशी गंमत करायलाच हवी. नाहीं का ग, मा ?"

"माझी तूं गंमत केलीस काय ? आणि मी आपली इथें शेगडीपाशीं उभी राहून रताळ्याचं पोन करतें आहें. त्याचा कांहीं विचार ?"

ती खरोखर रागावलेली नव्हती. तिचे ओठ दुमडलेले त्याला चक्क दिसले. ते सरळ करण्याचा प्रयत्न तिनें केला पण तें जमलें नाहीं.

"मा हसते आहे ! मा हसते आहे ! माणूस रागावलेलं असलं कीं हसत नाहीं कांहीं !"

तो उडी मारून तिच्या पाठीमागें धावला आणि तिच्या एप्रनचे बंद त्यानें सोडले. एप्रन घसरून खालीं जमिनीवर पडला. मार्चे अवजड शरीर कसें झटकन् फिरलें. तिनें ज्योडीच्या कानशिलांत लगावली, पण तिचें मारणें पिसासारखें हलकें नि खेळकरपणाचें होतें. दुपारीं जसा ज्योडीला एक प्रकारचा उन्माद चढला होता तसेंच त्याचें आत्तांही झालें. माळावरच्या खुरट्या गवतांत तो जसा गरगरा फिरला होता तसा आत्तांही फिरायला लागला.

"बशा पाडशील हं टेबलावरच्या." ती म्हणाली. "आणि मग कळेल कोण रागावलं आहे तें."

"मी काय करूं ग! मला असंच गरगरतंय्!"

"झिंगला आहेस तूं! नुसता झिंगला आहेस." ती म्हणाली.

ती म्हणाली तें अगदीं खरें होतें. एप्रिलच्या वातावरणानें ज्योडी झिंगला होता. वासंतिक उन्मादानें त्याला गरगरत होतें. लेम फॉरेस्टर जसा शनिवारीं रात्रीं दारू पिऊन तर्र व्हायचा तसें ज्योडीला झालें होतें. सूर्यप्रकाश, हवा आणि पावसाची धूसर झिमझिम या सर्वांच्या जालीम मिश्रणाचा कैफ चढून त्याचें डोकें गरगरत होतें. त्यानें केलेली पाणचक्की, हरिणीचें आगमन, त्याच्या गैरहजेरीवर बाबांनीं घातलेलें पांघरूण, आईनें त्याच्यासाठीं मुद्दाम शिजवलेलें पोन, आईचें तें हसणें, या सगळ्यांमुळें त्याला नशा चढल्यासारखी झाली होती. त्या आरामशीर लाकडी घरकुलांत पसरलेला मेणबत्तीचा प्रकाश आणि घराभोंवतीं पसरलेलें चांदणें हीं त्याच्या हृदयाला भिडलीं होतीं. तो निजायला गेला तेव्हां ताप आल्यासारखी त्याची स्थिति झाली होती. त्याला झोप येईना. त्या दिवसाच्या आनंदाचा तीव्र ठसा त्याच्या मनावर उमटला होता. यामुळेंच त्याच्या आयुष्यांत जेव्हां जेव्हां पुनरपि एप्रिल महिना येई, हिरवळ उगवे, जिव्हाग्रावर पावसाची चव खेळे, तेव्हां तेव्हां एक जुनी जखम जणूं कांहीं उलते आहे आणि कशाची तरी हुरहूर आपल्याला लागते आहे, पण कशाची तें मात्र आठवत नाहीं, असा चमत्कारिक अनुभव त्याला यायचा.

रात्रींच्या प्रकाशांतून रातकिड्यांची* शीळ त्याला ऐकूं आली आणि एकाएकीं निद्रेनें त्याला घेरलें.

* Whip-Poor-Will.

— २ —

आपल्या निद्रिस्त पत्नीच्या प्रशस्त देहाजवळ पेनी बॅक्स्टर जागरण करीत होता. पौर्णिमेच्या रात्रीं त्याचें नेहमीं असेंच व्हायचें. त्याचा डोळ्याला डोळा लागत नसे. त्याला पुष्कळदा वाटे, इतका चकचकीत प्रकाश पडलेला आहे तो कशासाठीं ? माणसांनीं घरीं बसून राहू नये, आपापल्या शेतांत जाऊन खपावें, म्हणून तर नाहीं ? त्याला कितीदा तरी अशी इच्छा होई कीं खाटेवरून उतरून बाहेर पळ काढावा आणि एखाद्या ओकवृक्षाचीं लाकडें तोडावींत किंवा ज्योडीनें अर्ध्यावर सोडलेलें खोदकाम पुरें करावें.

" खरं म्हणजे याबद्दल त्याला मीं चांगलं फटकारायला हवं होतं " तो आपल्याशींच म्हणाला.

त्याच्या लहानपणीं तो असा काम सोडून मासा मारीत बसला असता तर त्याला चांगलाच चोप मिळाला असता. बाबांनीं त्याला खायला घातलें नसतें; ती पाणचक्की मोडून टाकण्यासाटीं त्याला त्यांनीं आल्या पावलीं परत धाडलें असतें.

" पण त्याबरोबर हेंही खरं — " तो आपल्याशींच म्हणाला, " कीं पोराची जात आहे. बाळपण असं किती टिकणार ? "

मागच्या अनेक वर्षांवरून तो एकदा नजर फिरवूं लागला आणि त्याला एकदम असें वाटलें कीं आपल्या वांट्याला बाळपण आलेलेंच नाहीं ! त्याचे स्वतःचे वडील मुळीं धर्मोपदेशक होते. बायबलाच्या जुन्या करारांत ईश्वराचें वर्णन केलेलं असतें तसे — अत्यंत कठोर ! त्यांची उपजीविका मात्र प्रवचनांवर होत नसे. व्हॉल्यूशियाच्या जवळपास त्यांची लहानशी शेतीवाडी होती, तिच्यावरच त्यांचा निर्वाह चाले. त्यांच्या कुटुंबाचा पसारा बराच वाढलेला होता. कुटुंबांतल्या मंडळींना त्यांनीं लिहावाचायला शिकवलें होतें, धर्मग्रंथांची माहिती दिली होती हें खरें. पण अगदीं लहानपणापासून — म्हणजे जग डुगुडुगु चालायला येऊं लागतांच, बियांची गोणी घेऊन वडिलांच्या मागें वाफ्यांमधून हीं सर्व मुलें चाललेलीं होतीं. एवढ्या लहानपणापासून त्यांनीं शेतकाम इतकें केलें होतें कीं त्यांचीं कोंवळीं हाडें त्यामुळें दुमलीं होतीं. आणि त्यांचीं वाढतीं बोटें बधिर बनलीं होतीं. त्यांना पोटाला जेमतेमच मिळायचें — त्यामुळें नेहमीं जंत होत. पेनी वयांत आला तरी

एखाद्या पोरासारखा दिसायचा. पाय किरटे, खांदे बारीक. वर फासळयांपासून ते खालीं कंबरेपर्यंत हाडन् हाड मोजून घ्यावें. नाजुक हाडांचा अखंड सांपळा! फॉरेस्टर मंडळींत एकदा हा उभा राहिला, तेव्हां असा भास झाला कीं राक्षसी ओक वृक्षांमध्यें हें अशचें रोपटें कुठून आलें कुणास ठाऊक!

लेन फॉरेस्टरनें खालीं वाकून त्याच्याकडे पाहिलें. "काय रे पिटुकल्या – पेनीच्या तुकड्या! नाणं ठीक आहे म्हणा — बद्दू नाहीं. पण लहान किती? — वा रे चिंगुला पेनी बॅक्स्टर!"

तेव्हांपासून तेंच नांव त्याला चिकटलें होतें. मत देतांना तो मारे 'एझरा ईझेकियल बॅक्स्टर' म्हणून सही करायचा खरा, पण कर भरतेवेळीं त्याचें नांव 'पेनी बॅक्स्टर' मांडलें जाई, आणि त्याबद्दल तो कधीं तक्रारही करीत नसे. पण तो होता मात्र चांगला, अगदीं तांब्यासारखा खणखणीत. आणि तांब्याला जसा मऊपणा असतो ना, तसा या पेनीच्याही स्वभावांत थोडाफार मऊपणा होता.

ज्या नदीच्या कांठीं तो राहत असे तिचें पात्र खोल आणि शांत होतें. त्यांत होड्या–मचवे भरपूर असत. लाकूड पोखरून केलेलीं होडकीं असत; सपाट तळाच्या मोठ्या नौका असत. अडगळ वाहून नेणारे तराफे असत; मालवाहू आणि उतारूंचीं जहाजें असत. त्या भागांत राहणारे लोक म्हणत, "नेहमींची साधी, सरळ राहणी सोडून आपल्या नवरीला फ्लॉरिडाच्या रानांत अगदीं आंत-पर्यंत घेऊन जाणाऱ्या या माणसाला काय म्हणावं! तिथल्या गवतांत अस्वलं, लांडगे नि चित्ते किती वावरत असतात! एक तर हा भलताच शूर प्राणी असावा किंवा त्याचं डोकं ठिकाणावर नसावं!" फॉरेस्टर मंडळी इकडे राहायला आली हें एक वेळ समजण्यासारखें होतें. कारण त्यांच्याकडचीं सगळीं माणसें आडदांड अन् भांडायला वखवखलेलीं. अशा माणसांना त्या परगण्यांतलें मिळेल तेवढें क्षेत्र हवेंच होतें. त्यांना जेवढा कमी अडथळा होईल तेवढा हवाच होता. पण– पेनी बॅक्स्टरला अडथळाच कोण करणार?

खरें म्हणजे अडथळयाची बाबत नव्हती. पण त्या काळच्या शहरांतून अन् खेड्यांतून जिथें जिथें लोक एकमेकांच्या जवळ जवळ शेती करीत, तिथें लोकांचीं मनें आणि कृत्यें आणि त्यांचा जमीनजुमला यांची गुंतागुंत होण्याचा अनेकदा प्रसंग येई. त्यांच्या व्यक्तिगत प्रवृत्तीवर पुष्कळदा घाला येत असे. संकटकाळांत स्नेहभाव आणि परस्परसाहाय्य यांची वाण पडत नसे हें खरें; पण कुरबुर आणि

एकमेकांकडे डोळ्यांत तेल घालून पाहण्याची वृत्ति हीं चालूच असत. प्रत्येकाला दुसऱ्याबद्दल संशय वाटे. वडिलांनीं दिलेल्या निष्ठुर वागणुकींतून तो जो बाहेर पडला तो एका वेगळ्याच जगांत प्रविष्ट झाला. हें जगही कठोर असलें तरी तो कठोरपणा तितका सरळ सीधा नव्हता. हें जग तितकें प्रामाणिक नव्हतें. आणि त्यामुळेंच त्याला जास्त बिचकल्यासारखें वाटत होतें.

तसें म्हटलें तर आतांपर्यंत त्याच्या अंगावर कमी का ओरखडे उठले होते? अवतींभवतीं पसरलेलें खुरट्या गवताचें प्रचंड आणि निस्तब्ध रान आपल्या नीरवतेची मोहिनी घालून त्याला जणूं जवळ बोलावीत असे. त्या भागांत उदरंभरण म्हणजे केवढें कठीण कर्म! जिन्नस विकत आणायचे किंवा आपला माल बाजारांत नेऊन विकायचा म्हणजे केवढीं लांबलांब अंतरें तुडवावीं लागत! पण – एवढें मात्र खरें कीं त्या रानांतली ती मोकळी बखळ त्यानें स्वतःला राहण्यासाठीं म्हणून जी निवडली होती ती अगदीं खास खास त्याचीच होती. ...ी विशेष जिव्हाळा त्या बखळीबद्दल पेनीला वाटायचा. अस्वलें, लांडगे नि रानमांजरें यांनीं त्याच्या घरच्या जनावरांवर हल्ले केले तर तें तो समजूं शके. पण—आतां जें मानवी क्रौर्य त्याला दिसत होतें त्याचा त्याला अनुभव नव्हता.

वयाच्या तिशींत त्यानें एका धष्टपुष्ट मुलीशीं लग्न केलें होतें. त्याच वेळीं ती शरीरानें याच्या दुप्पट होती. तिला या गृहस्थानें लगेच बैलगाडींत घातलें, बिऱ्हाड थाटायला अगदीं आवश्यक तेवढें जुजबी सामान गाडींत भरलें आणि मग रानांतल्या त्या मोकळ्या जागेकडे सहकुटुंब प्रयाण केलें. तिथें त्यानें स्वतःच्या हातांनीं एक लाकडी खोपट बांधलें होतें. रेताड जमिनींत इतस्ततः पाइन ऊर्फ देवदाराचीं टोकेरी झाडें डोकीं काढीत होतीं; त्या सगळ्या पसाऱ्यांतून आपल्यासाठीं जमिनीची निवड त्यानें शक्य तेवढ्या शहाणपणानें केलेली होती. तिथून चार मैलांवर सुरक्षित जागीं फॉरेस्टर मंडळी राहत असत. त्यांच्याकडून देवदाराच्या एका बेटांतली मध्यभागची ही जमीन त्यानें विकत घेतली होती. या जागेला 'बेट' नांव उगाच दिलेलें नव्हतें. रखरखीत जंगलांतील उंच पठारावरची ही झाडी म्हणजे खरोखर एक बेटच होतें. जणूं कांहीं सभोंवार खुरट्या रानाचा जो महासागर तरळत होता त्यांत एवढीच काय ती 'जमीन' वर डोकें काढीत होती.

या ठिकाणीं अडचण एकच होती. ती म्हणजे पाण्याची टंचाई. पाण्याची

पातळी जमिनींत इतक्या खोलवर होती कीं विहिरी खोदणें भयंकर खर्चाचें झालें असतें. विटा आणि चुना अधिक स्वस्त होईपर्यंत 'बॅक्स्टर बेटां'तल्या रहिवाशांना पाण्याची सोय दुसरीकडूनच करणें भाग होतें. त्या शंभर एकर जमिनीच्या पश्चिम हद्दीजवळ एक मोठें थोरलें विवर होतें, त्यांतून हीं माणसें पाणी आणीत. असलीं विवरें म्हणजे फ्लॉरिडाच्या त्या चुनखडी प्रांतांत नेहमीं आढळणारा एक चमत्कार होता. या भागांतून भुयारी नद्या वाहत असत. बुदबुद करीत वर येणारे आणि एकदम लहानशा डबक्याचा आकार घेणारे, कुठेंतरी वाहून लुप्त होणारे झरे म्हणजे या भुयारी नद्यांचीच संतति होय. कधीं कधीं जमिनीच्या पृष्ठाचा एखादा पातळ पापुद्रा कोसळून खालीं पडायचा आणि खालच्या बाजूला एखादी मोठी गुहा दृष्टीला पडायची. तींत पाणी वाहत असायचें किंवा नसायचें. पण कडेच्या उंच कपारींमधून शुद्ध गाळीव पाणी रात्रंदिवस झिरपत यायचें आणि खालीं त्याचा डोह तयार व्हायचा. पेनीला माळरानांतली दरिद्री जमीन विकण्याचा फॉरेस्टरांनीं घाट घातला होता. पण पेनीजवळ पुरेसे पैसे होते; आणि आपल्याला बेटच हवें असा त्यानें आग्रह धरला होता.

त्यानें त्यांना चक्क बोलून दाखवलें होतें, "माळरान! शिकारीच्या दृष्टीनें चांगलं असेल तें. सगळीं रानटीं श्वापदं तिथें मिळतील — कोल्हे नि हरणं नि चित्ते नि साप! माझ्या लेकरांना कसा वाढवूं मी तिथें?"

तें ऐकून फॉरेस्टर मंडळींनीं आपल्या मांड्या थोपटल्या होत्या आणि त्यांच्या दाढीआडून प्रचंड हास्याचे फवारे निघाले होते.

लेम फॉरेस्टर ओरडला होता, "एका पेनीच्या अर्ध्या पेनी किती? ठीक-ठीक! तूं अगदीं कोल्ह्याचा बाप शोभतोस खरा!"

त्याचे ते शब्द, इतकीं वर्षं लोटल्यानंतर अजूनही पेनीच्या कानांत घुमत होते.

आतां तो कुशीवर वळला तो किती जपून — बायको जागी होऊं नये म्हणून काळजी घेत. लांबलचक पानांच्या देवदारांच्या गर्द झाडींतून हिंडत असतांना त्यानें भावी पिढीचीं किती स्वप्नें पाहिलीं होतीं — आपल्या मुलांमुलीं-साठीं केवढ्या योजना आंखल्या होत्या! आणि अपेक्षेप्रमाणें कुटुंबाचा पसारा वाढत गेलाही होता.

पेनी बॅक्स्टरच्या बायकोची शरीरयष्टीच अशी होती कीं हिला खूप मुलं

होणार हें कोणींही ओळखलें असतें. त्याप्रमाणें मुलें झालीं; पण सगळीं नाजुक प्रकृतीचीं. जितक्या झटपट झालीं, जवळजवळ तितक्याच झटपट मरण पावलीं. कांहीं ना कांहीं आजार होऊन मेलीं. काळ्या कुळकुळीत ओकवृक्षांच्या राईंत एका मोकळ्या जागेमध्यें पेनीनें त्यांचें एकामागून एक दफन केलें.

आणि मग त्या जागेचा एकाकीपणा त्याला थोडाबहुत भेडसावूं लागला. त्याच्या बायकोचें पण मुलें होण्याचें वय जात चाललें. अशा वेळीं अकस्मात् ज्योडी बॅक्स्टरचा जन्म झाला आणि हें पोर जगलेंही चांगलें. दोन वर्षांचं होऊन डुगुडुगु चालायला लागल्यावर पेनीची स्वारी युद्धावर गेली. त्यानें बायकोला नि मुलाला नदीपर्यंत आपल्याबरोबर नेलें. तिथं मुलाची वृद्ध आजी – हटो आड-नांवाची बाई–राहत होती, तिच्याकडे त्यांना ठेवलें. कांहीं महिने त्याला मोहिमेवर जावें लागणार होतें, तेवढ्या काळापुरती ही व्यवस्था होती. चार वर्षांनीं तो परत आला तेव्हां वाढत्या वयोमानाचीं चिन्हें त्याच्या शरीरावर दिसत होतीं, बायकोला नि मुलाला उचलून तो पुन्हा आपल्या माळरानाकडे परत आला होता. तिथल्या शांत नि एकान्तिक जीवनाबद्दल त्याला एक प्रकारची कृतज्ञता वाटूं लागली.

ज्योडीची आई आपल्या या सर्वांत धाकट्या मुलाकडे अंमळ निर्विकार वृत्तीनेंच पाहत होती. जणूं कांहीं तिच्या जवळचें सारें प्रेम, माया नि आस्था त्या पहिल्या मुलांना देऊन टाकल्यामुळें आतां आटून गेलीं होतीं ! पण मुलाकडे पाहिलें कीं 'पेनीच्या पोटांत मात्र तिडीक उठे. मुलाबरोबर तो केवळ बापाच्या भूमिकेवरून वागत नव्हता. तो आपल्यांतलें आणखीही कांहींतरी त्याला देत असे. पांखरें नि प्राणी, फुलें नि वृक्ष, वारा, पाऊस, सूर्य, चंद्र या सृष्टिचमत्कारांकडे आपलें लेकरूं कसे डोळे विस्फारून आणि श्वास रोधून बघत बसतें तें त्यानें पाहिलें होतें. आपण स्वतः नेहमीं असेच वागत होतों हें त्याला आठवत होतें. आणि एप्रिल महिन्यांतल्या एखाद्या मंदमधुर दिवशीं पोरगा कुठेंतरी सटकला आणि पोरांना शोभेसे उद्योग करूं लागला तर तें तो समजूं शकत असे. मुलाला पडणारी मोहिनी त्याला कळत होती. आणि त्याला हेंही कळत होतें कीं ही मोहिनी अल्पकाळच टिकणारी आहे.

" झाडूंद्यात त्याला जरा दुगाण्या ! " तो आपल्याशीं म्हणायचा. " जायचं असेल तिकडे जाऊं दे ! पवनचक्क्या करायच्या आहेत ? करूं दे. हेही दिवस जातील, आणि मग असल्या गोष्टींकडे तो ढुंकूनसुद्धा पाहायचा नाहीं. "

## — ३ —

ज्योडीनें मोठ्या नाखुषीनें आपले डोळे उघडले. त्याच्या छोट्या शयन-गृहाच्या पूर्वेकडल्या खिडकींतून बाहेरचा सूर्यप्रकाश दिसत होता. बिछान्यांत लोळायला तर गंमत वाटत होती; पण नव्या दिवसाचा नित्यक्रम तिकडे बोलावीत होताच. अशा स्थितींत मनाला होणारी वेदना सोशीत तो क्षणभर तसाच पडून राहिला यांत नवल नाहीं. नंतर आपल्या घरट्याबाहेर उडी मारून, खालीं पसर-लेल्या हरणाच्या कातड्यावर तो उभा राहिला. त्याचा चोळणा तिथें जवळच लटकत होता आणि सदराही चांगला घालण्यासारख्या स्थितींत होता, उलटापालटा झालेला नव्हता एवढें बरें झालें. त्यानें पटापट कपडे चढवले आणि मग त्याला झोपेबिपेची कांहीं जरूर उरली नाहीं.

दक्षिण बाजूला त्या काळ्या देवदारांच्या पलीकडून त्याला ज्यूलियाचा घंटे-सारखा खणखणीत आवाज ऐकूं आला. कशानें तरी क्षुब्ध होऊन ती भुंकत होती. आपले बाबा तिला कांहींतरी हुकूम सोडीत आहेत असेंही त्याला आवाजावरून वाटलें. आईनें तीव्र स्वरांत हाक मारून त्याला थांबवण्याच्या आधींच तो पळाला. आईनें देखील कुत्रीचें भुंकणें ऐकलें होतें. मुलाच्या मागोमाग ती दारापर्यंत आली आणि त्याला हाका मारूं लागली.

" तुझे पा नि तूं फार वेळ बाहेर राहूं नका, बरं का ? नाहीं तर जाल त्या वेडपट कुत्रीच्या मागें ! तुम्हीं दोघांनीं जंगलांत भटकत राहायचं नि मीं इकडे न्याहारीसाठीं खोळंबून बसायचं याला माझी मुळींच तयारी नाहीं. सांगून ठेवतें !"

आतां त्याला म्हातान्या ज्यूलियाचें ओरडणें ऐकूं येत नव्हतें किंवा वडील काय म्हणताहेत तेंही समजत नव्हतें. त्याला आतां एकाच जबरदस्त भीतीनें पछाडलें होतें. कोण आपल्या मळ्यांत घुसला होता तो एव्हांना पळाला तर नसेल ? आणि आपले बाबा नी कुत्री त्याच्या मागोमाग एव्हांना दूर तर गेली नसतील ? त्यानें एकदम त्या काळ्या कुळकुळीत देवदार वनांत धूम ठोकली आणि ज्या दिशेनें आवाज आले होते तिकडे तो धावत निघाला.

थोड्याच वेळांत अगदीं जवळून त्याला वडिलांचे शब्द ऐकूं आले—

" आस्ते, बेटा – आस्ते ! व्हायचं तें होऊन गेलंय्. आतां सावकाश आलास तरी तें बघायला मिळेल. "

ज्योडी खाडकन् उभा राहिला. पाहतो तों आपले वडील बेट्सीच्या विशीर्ण खंडित प्रेताकडे नजर रोखून उभे आहेत. बेट्सी हें त्यांच्या काळ्या बहुप्रसू डुकरीचें नांव.

" मीं त्याला ओरडून दरडावलं तें त्यानें ऐकलं असणार. म्हणून पळाला!" पेनी म्हणाला, " पोरा नीट डोळे उघडून बघ बरं! मला जें दिसतंय् तें तुला दिसतं का, पाहा!"

ती छिन्नविच्छिन्न डुकरी पाहून ज्योडीला मळमळायला लागलें. पण त्याचे वडील त्या मेलेल्या प्राण्याच्या पलीकडे कुठें तरी बघत होते. म्हातारी ज्यूलिया पण आपलें तिखट नाक वर करून त्याच बाजूला बघत होती. ज्योडी चार पावलें चालून गेला आणि त्यानें तिथल्या रेतीचें नीट निरीक्षण केलें. अगदीं शंकाच नको! तिथें ज्या पावलांच्या खुणा उमटलेल्या होत्या त्या दिसतांच ज्योडीच्या अंगांतलें रक्त सळसळूं लागलें. अजस्र अस्वलाचीं पावलें होतीं तीं. आणि त्यांपैकीं पुढचें उजवें पाऊल खूप मोठें–चांगलें हॅटच्या कोकीएवढें प्रचंड तर होतेंच, पण शिवाय त्याच्या पांच बोटांपैकीं एकाचा पत्ता नव्हता.

" नक्की तोच लेकाचा– स्लूफूट!"

पेनीनें मान डोलावली.

" तूं त्याचा माग बरोबर लक्षांत ठेवलास! मला अभिमान वाटतो तुझा."

दोघेही खालीं वाकले आणि त्यांनीं त्या खुणा नीट तपासल्या. हा प्राणी कुठून आला असेल आणि कुठें गेला असेल याचा ते अंदाज काढूं लागले.

" शत्रूच्या गोटांत शिरून लढणं म्हणतात ना, तें हें!" पेनी उद्गारला.

" कुत्र्यांपैकीं कुणींच त्याला अडवलं नाहीं!—पा, मला वाटतं मी झोपेंत असणार. कारण, मला कांहींसुद्धां ऐकूं आलं नाहीं."

" कुणींच त्याला अडवलं नाहीं. वाऱ्याची दिशा त्याला हवी तशी होती.* आपण काय करतों आहों याची त्याला कल्पना नव्हती असं समजूं नकोस! एखाद्या सावलीसारखा तो रात्रीचा आला, आपलं अघोर कर्म केलन् आणि दिवस उगवायच्या आंत पसार झाला!"

ज्योडीच्या पाठींतून जणूं कसली तरी शिरशिरी गेली. सावली, अं? होय.

* त्यामुळें त्याचा वास कुत्र्यांना आला नसणार! —अनु०

ती सावली कशी असेल याचें एक चित्रच त्याच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. मोठी थोरली, काळीकुट्ट ! जसा कांहीं एखादा हालता चालता तबेला, गोठा ! आला, आला — त्या गरीब बिचाऱ्या निजलेल्या डुकरीला पकडायला आला — लांब लांब नखें असलेल्या आपल्या जाडजूड पंज्याची एकच झेप टाकलीन् त्यानें —

" आणि पुन्हां –" पेनी बोट दाखवीत म्हणाला, " तें पाहिलंस ? घासभर देखील मांस त्यानें खाल्लं नसेल ! म्हणजे त्याचं जेवण आधींच झालेलं असणार. तुला माहीत आहेच कीं हिंवाळ्यांत अस्वल एखादी जागा शोधून काढून तिथें तण्णावून देतं आणि मग तिथून तें बाहेर पडतं, तेव्हां त्याचं पोट अगदीं खपाटीला गेलेलं असतं.—मला अस्वलाचा तिटकारा वाटतो तो एवढ्या-साठींच ! आपल्याला जरुरीपुरती शिकार मारून ती खाणारे प्राणी मी समजूं शकतों. आपल्याचसारखे ते ! त्यांतल्या त्यांत दुसऱ्याशीं चांगलं वागतां येईल तेवढं ते वागतात. पण जो प्राणी—त्यांत मनुष्यही आलाच—केवळ हत्त्येसाठीं हत्त्या करतो ना—मी म्हणतों याचा पडताळा तुला अस्वलाच्या तोंडाकडे पाहिल्या-वर येईल. पश्चात्तापाचं चिन्ह त्याच्या चेहऱ्यावर कधींही दिसायचं नाहीं ।"

ज्योडीला वाटलें, बेट्सीच्या मरणाचें आपल्याला किती दुःख वाटायला पाहिजे ! पण त्याच्या मनांत नुसता क्षोभ उसळला होता. ही निष्कारण केलेली हत्त्या — आणि ती देखील सुरक्षित बॅक्स्टर बेटांत !— त्याला अतिशय जाणवली होती. त्या गलेलठ्ठ अस्वलाला आतां ज्योडीच्या रूपानें शत्रु निर्माण झाला होता. या भागांत राहणाऱ्या लोकांचीं जनावरें मारणारा हा राक्षस गेलीं पांच वर्षें सर्वांच्या हातांवर तुरी देत असे, बघा !

ज्योडीनें डुकरीचा एक मागचा पाय धरला, पेनीने दुसरा धरला आणि तिला फरपटत घराकडे नेलें. ज्यूलिया जरा नाखुषीनें पण त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून आलीच. अस्वलांचा माग काढणारी जातिवंत शिकारी कुत्री ती ! तिला हें समजत नव्हतें कीं ताबडतोब पाठलाग करायचा सोडून हीं माणसें वेळ कां घालवताहेत ?

मा बॅक्स्टर त्यांची वाट पाहत फाटकाशीं उभी होती.

" किती हांका मारल्या तुम्हांला ! " तिनें ओरडून त्यांचें स्वागत केलं. " आणि इतका वेळ भटकून तें काय फरपटत आणलंत ?- अग बाई ! माझी डुकरी कीं काय ? "

तिनें उद्वेगानें वर आकाशाकडे हात केले. पेनी आणि ज्योडी फाटकांतून

आंत शिरले, घराच्या पिछाडीला गेले. ती पण त्यांच्या मागोमाग आक्रोश करीत आली.

पेनी म्हणाला, " आपण हें मांस वरच्या आडव्या फळीला टांगून ठेवूं, बेटा. म्हणजे ज्यूलिया तिथपर्यंत पोचूं शकणार नाहीं."

मा बॅक्स्टर म्हणाली, " माझ्याशीं बोलतां कां थोडे? मला एवढं तरी सांगा, -- ही मेली कशी? तिच्या अगदीं चिंधड्या होईपर्यंत मला कळलं कसं नाहीं?"

" स्लूफूटनें केलन् हें, मा!" ज्योडी म्हणाला. " त्याबद्दल शंकाच नाहीं. आम्हीं पावलं उमटलेलीं पाहिलीं."

सर्व मंडळी घरांत शिरली. त्या गडबडींत ज्योडी अगोदर सैंपाकघरांत गेला. न्याहारीचा वास त्याला सतावत होता. माच्या तें लक्षांत आलें. तिचा कितीही मनस्ताप झालेला असला तरी आपला मुलगा काय करतो आहे इकडे तिचें लक्ष होतें.

" चल, ये इकडे आधीं!" ती ओरडली. " आपले घाणेरडे हात धू पाहूं."

पाण्याच्या कट्ट्याजवळ त्याचे वडील उभे होते. ज्योडीही त्यांच्याजवळ जाऊन उभा राहिला. टेबलावर न्याहारीचे पदार्थ मांडलेले होते. मा बॅक्स्टर बसली. क्षोभामुळें तिचें अंग थरथर कांपत होतें. तिनें कांहीं खाल्लें नाहीं. ज्योडीनें आपली ताटली भरून घेतली. असडी धान्य, मांसाचा रस, गरम केका आणि ताक त्यानें आपल्यासाठीं वाढून घेतलें.

" कांहीं असो!" ज्योडी म्हणाला. " आतां आपल्याला कांहीं दिवस मांस तरी खायला मिळेल."

मा त्याच्याकडे वळली.

" आत्तां मांस खा आणि हिंवाळ्यांत बसा हांका मारीत!"

पेनी म्हणाला, " मी फॉरेस्टर मंडळींना विचारून बघतों. त्यांनीं एखादी डुकरी दिली तर बरंच."

" तर-तर! आणि त्या दुष्टांचं ऋण घेतों डोक्यावर!" तिनें पुन्हां रडायला सुरुवात केली. " तें नतद्रष्ट अस्वल! माझ्या तावडींत तर सांपडूं दे—"

" मला भेटलं तर निरोप सांगीन मी." पेनी हळूच म्हणाला. तोंडांत तोबरा भरलेला होताच.

ज्योडी खो खो हंसत सुटला.

"करा — थट्टा करा माझी!" ती चिडून म्हणाली.

ज्योडीनें तिच्या लठ्ठ दंडावर एक थापटी मारली. "ए, मा! आत्तांच माझ्या मनांत एक जमतीचा विचार आला. तुझी नि स्लूफूटची जर जुंपली तर काय होईल ग?"

"मी पैज मारून सांगतों" पेनी म्हणाला, "मा जिंकेल."

## — ४ —

पेनीनें आपली ताटली लोटून दिली. आणि तो उठून उभा राहिला.

"चल, बेटा! दिवसभराचं काम आहे आपल्यापुढें."

ज्योडीच्या पोटांत धस्स झालें. बाप रे! खोदकाम —

"संभव आहे, कीं आजच आपण त्या अस्वलाची गांठ घेऊं शकूं!"

आहा! एकदम ढगाआडून सूर्य बाहेर आला जसा कांहीं!

"चल माझी छऱ्यांची पिशवी आण. माझं पावडरीचं शिंगही घेऊन ये. —आणि चकमकीचं शिंग पण!"

ज्योडी ताडकन् उठला आणि या सर्व जिनसा आणायला गेला.

"पाहा, पाहा कसा धांवतोय् तो!" त्याची आई म्हणाली. "जमीन खणतांना पाह्यलं तर एखाद्याला वाटेल ही गोगलगाय तर नाहीं. पण तेंच शिकारीचं नांव काढा कीं निघालाच मुंगसासारखा सुरंकन्!"

ती सैंपाकघरांतल्या कपाटापाशीं गेली आणि जेलीचे जे थोडे प्याले शिल्लक राहिले होते ते तिनें बाहेर काढले. खाल्लेल्या केकांचे जे पापुद्रे शिल्लक राहिले होते त्यांवर तिनें जेली ओतली आणि मग ते तुकडे एका फडक्यांत बांधून ती शिदोरी पेनीच्या थैल्यांत टाकून दिली. रताळ्याचें पोन जें उरलें होतें त्यांतला एक तुकडा तिनें स्वतःसाठीं काढून ठेवला आणि बाकीचें कागदांत गुंडाळून तेंही थैल्यांत टाकलें. मग पुन्हा एकवार स्वतःसाठीं ठेवलेल्या तुकड्याकडे तिनें पाहिलें आणि पटकन् तोही उचलून पिशवींत टाकला.

"हें कांहीं भरपूर जेवण आहे असं नाहीं" ती म्हणाली. "तुम्ही-कदाचित् लवकर यालही परत."

"पण आम्ही अगदीं दिसेपर्यंत आम्हांला शोधीत बसूं नकोस, बरं का!"

• • •

पेनीची बंदूक जुन्या पद्धतीची होती – नळीच्या तोंडांतून गोळ्या भरण्याची. ती बंदूक ज्यूलियाला दिसली मात्र, तिनें एक हर्षयुक्त किंकाळी फोडली. तिच्या जोडीला लगेच रिपही धांवत आला. नवीनच आणलेला पर्क– त्यानें नुसती मूर्खासारखी शेपटी हलवली. त्याला कांहीं समजेना नि उमजेना. पेनीनें सर्व कुत्र्यांना पाळीपाळीनें थोपटलें.

"आत्तां मारे उड्या मारतांहां" तो म्हणाला. "दिवस बुडायच्या वेळेला पाहूं तुमची काय गत होते ती!"

निघाले दोघे पावलांचा मागोवा घेत. काळ्या देवदारांच्या झाडींतून दक्षिण दिशेकडे त्यांना जावें लागलें. आदल्या दिवशीं दुपारीं पाऊस पडून गेला होता; त्यामुळें त्या मोटाड दबदबीत पावलांच्या आकृत्या रेतींत कशा स्पष्ट दिसत होत्या. म्हातारी ज्यूलिया पुढें चालली – अगदीं निश्चित पावलें टाकीत. बुलडॉग रिप मुकाट्यानें तिच्या मागोमाग चालला. तिनें कुठें वास घेतला कीं यानेंही हुंगायचें. ती थांबली कीं हाही थांबायचा. नवें आणलेलें पिल्लू एकदा या बाजूला तर एकदा त्या बाजूला धांव मारीत होतें. एकदा त्याच्या अगदीं नाकाखालून एक ससा पळाला, तेव्हां त्याला पकडण्यासाठीं काय पिसाटासारखा धांवलाय् म्हणतां! ज्योडीनें त्याला शीळ वाजवून बोलावलें.

"जाऊं दे रे त्याला!" पेनी म्हणाला. "आपण एकटे पडलों आहों असं एकदा त्याच्या लक्षांत आलं कीं आपसूक परत येईल."

ज्यूलियाबाईनीं तेवढ्यांत एक किरटी कर्कश किंकाळी फोडली आणि आपल्या खांद्यावरून मागें वळून पाहिलें.

"इथून त्यानें दिशा बदललेली दिसते, बरं का? काय अक्कल आहे त्याची! पेनी म्हणाला. "बहुतकरून त्या करवती गवताच्या डबक्यांकडे गेला असणार! पण तसा जरी त्याचा डाव असला तरी आपण हें वळण घेऊन त्याला गाठूं अन् चकित करूं."

आपल्या वडिलांच्या मृगयाकौशल्याचें रहस्य आत्तां कुठें ज्योडीला थोडें-फार कळलें. त्याच्या मनांत आलें, आपल्या बाबांच्या जागीं एखादा फॉरेस्टर असता तर त्यानें, मेलेली डुकरी दिसतांक्षणीं खूफूटच्या मागें धाव मारली असती.

खूप आरडाओरडा, बोंबाबोंब करून त्यांनीं शिकार सुरू केली असती, कुत्र्यांचा कळप त्यांनीं ' छू ' करून सोडला असता – साऱ्या रानांत त्या आवाजाचे पडसाद उठले असते ! कुत्र्यांना भडकवण्याची त्यांना संवयच होती. आणि मग एवढें झाल्यावर त्या हुशार, मुरब्बी अस्वलाला त्यांच्या आगमनाची पुरेपूर वार्ता मिळाली नसती तरच नवल ! त्याच्या बाबांचें तसें नव्हतें. या माणसांना एक शिकार मिळेपर्यंत बाबांना दहा मिळालेल्या असत. बाबा दिसण्यांत लहानसर असले तरी याबद्दलची त्यांची कीर्ति मोठी होती.

ज्योडी म्हणाला, " पा ! एखादा प्राणी आतां काय करणार आहे हें तुम्हांला कसं बरोबर ओळखतां येतं ! "

" ओळखलं पाहिजेच. जंगलांतला प्राणी माणसापेक्षां चपळ असतो. त्याची ताकदही जास्त असते. पण माणसांत असा कोणता गुण आहे, कीं जो अस्वलांत नसतो ? अक्कल ! अस्वलाला तो पळण्यांत मागें टाकणार नाहीं हें खरं. पण डोकं लढवण्यांत जर त्यानें अस्वलावर मात केली नाहीं तर त्याला अगदींच बुद्दू शिकारी म्हटलं पाहिजे. "

आतां देवदाराचीं झाडें जास्त विरळ प्रमाणांत दिसूं लागलीं. आणि मग दक्षिणेला नि पश्चिमेला खूप रुंद नि विशाल अशी सपाट जमीन दिसूं लागली. पहिल्यानें तें गवताचें कुरण वाटायचें. पण हेंच तें ' करवती गवत ' ( saw grass ) बरं का ? गुडघाभर पाण्यांत हें गवत वाढलेलें असायचें. त्याचीं करवतीसारखीं दंतुर तीक्ष्ण पातीं एकमेकांत इतकीं दाटीवाटीनें मिसळून गेलीं होतीं कीं हा सारा पसारा एकाच वनस्पतीचा आहे कीं काय असा भास होई. म्हाताऱ्या ज्यूलियानें सरळ जाऊन त्यांत बुडी मारली आणि तळ्याच्या मध्य-भागांतून ती अगदीं माहीतगार माणसारखी पाणी कांपूं लागली.

" फायरप्लँट खाल्लंय त्यानें ! " पेनी पुटपुटला.

' फायरप्लँट 'चीं पानें विस्तवासारखीं चकचकणारीं असतात — सपाट अन् बाणाच्या आकाराचीं. त्यांच्या टोकांवरून दांतांनीं कुरतडल्याच्या खुणा दिसत होत्या. कांहीं पानें तर टोकांपासून दांतांनीं सपशेल तोडून काढलेलीं होतीं.

" हा पाला म्हणजे त्याचं वासंतिक टॉनिक आहे ! वसंत ऋतु सुरू होऊन अस्वल बाहेर पडलं कीं पहिल्यानें या झाडाकडे धांवतं. " बोलत बोलत पेनी झाडाजवळ वाकला आणि एका पिंगट बनत चाललेल्या पानाला त्यानें स्पर्श केला.

" मला तर वाटतं, रात्रींसुद्धां तो इथें येऊन गेला असणार.– म्हणूनच तर त्याला भूक लागली ती, बिचाऱ्या बेट्सीचे लचके तोडायची ! "

कुत्रीदेखील थोडा वेळ थांबली. या ठिकाणीं वास पायांखालीं मिळत नव्हता. घासकडबा नि गवताचीं पातीं यांना वास येत होता; कारण अस्वलानें आपल्या अंगावरची उग्र वासाची लोकर गवताला घासली असणार. ज्यूलियानें आपलें लांब नाक एका ' बुलरश 'च्या फांदीवर टेकलें आणि ती समोरच्या निःस्तब्ध जागेकडे एकटक पाहूं लागली. मग तिला एकदम दिशा उमगली असणार. कारण तिनें एकदम दक्षिणेकडे झेप टाकली आणि पाण्यांतून डुचमळत पण शक्य तेवढ्या द्रुतगतीनें ती धांवत सुटली.

आतां मात्र पेनीला निश्चितपणें बोलतां आलें.

" त्याचं खाणं संपलंय् बरं का रे ? ज्यूलिया म्हणते कीं बुवाजी घरीं गेले !"

जरा उंचवट्याच्या जागीं चढून त्यानें कुत्रीवर नजर ठेवली.

" हं – अश्शी ! ज्यूलिया, पकड त्याला ! "

सकाळीं घेतलेला मागोवा म्हणजे आरामाची कामगिरी होती. मजेशीर भटकंती होती ती. त्याला कांहीं शिकार म्हणतां येणार नाहीं. आतां मात्र खाडीच्या कांठचें तें बन त्यांच्या डोक्यांवर सांवटासारखें झांकळून आलें होतें. गर्द झाडींतून ज्योरी पक्षी एकदम बावरल्यासारखे पंखांची फडफड करीत बाहेर उडत होते. पायांखालची जमीन मऊ आणि काळी होती. आणि दोन्ही बाजूंच्या झाडोऱ्यांत एकसारखी खसबस अन् सळसळ होत होती.

पुढें झाडी विरळ होत चालली. जमीन एकदम सखल बनली आणि मग तिचें दलदलींत रूपांतर झालें. अकस्मात् ज्यूलिया दबा धरल्यासारखी उभी राहिली आणि तें पाहून पेनीनें तिच्या बाजूला धांव मारली.

" ओढा — ओढा ! "

—खाडी ! तो ओरडला. " ओढ्याकडे जाण्याचा बेत आहे त्याचा. "

तो पाणथळ दलदलीचा प्रदेश एकदम आवाजानें भरून गेला. लहान झाडें खालीं कोसळलीं. अस्वलराज म्हणजे वाटेंत जो जो अडथळा येईल तो कापून काढणारें काळेंकुट्ट वातचक्रच होतें जणूं ! कुत्रीं भुंकत होतीं, दबा धरीत होतीं. ज्योडीच्या कानांत कसला तरी धडधडाट चालला होता — बरोबर ! त्याच्या छातींतली धडधड होती ती ! मध्येंच एक बांबूची वेल आडवी आली आणि पाय

अडखळून तो पडला. पण तसाच पुन्हां उभा राहिला. वल्हें जसें पाणी घुसळत जातें तसे पेनीचे गिड्डे पाय जमीन तुडवीत चालले होते. स्लूफूटला कुत्र्यांनीं रोखून धरण्यावांचून तो पलीकडचा ज्यूनिपर ओढा गांठणार अशीं लक्षणें दिसत होतीं.

ओढ्याच्या कांठाजवळ एकाएकीं थोडी खुली जागा दिसूं लागली. ज्योडीनें पाहिलें तों एक अवाढव्य, काळी, बेढब आकृति त्या मोकळ्या जागेंतून सपाट्यानें चालली आहे. पेनी थांबला आणि त्यानें आपली बंदूक वर केली. त्याच क्षणीं एक लहानशी पिंगट आकृति तीरासारखी वेगानें आली आणि त्या केंसाळ डोक्यावर तिनें धडक मारली. शत्रूला झोंबायला आलेली ती वृद्ध ज्यूलियाच होती. एक उडी घेऊन ती मागें हटली. आणि मागें हटली त्याच क्षणीं पुन्हां शत्रूवर तुटून पडली. रिपही धांवत तिच्या बाजूला आला. स्लूफूटनें एक गिरकी घेतली आणि रिपला रट्टा हाणला. ज्यूलियानें शत्रूच्या कुशीवर हल्ला चढवला. पेनी बंदूक मारायचा थांबला होता–कुत्र्यांमुळें त्याला गोळी झाडण्याचा धीर होत नव्हता.

एकाएकीं स्लूफूट जागच्या जागीं उभा राहिला —वरकरणीं तरी त्याचें लक्ष उडाल्यासारखें दिसलें. गोंधळल्यासारखा होऊन तो सुस्तपणें, अनिश्चितपणें, मागें-पुढें डुलत उभा राहिला. कुत्रीं क्षणमात्र मागें हटलीं. तो क्षण गोळी झाडायला उत्कृष्ट होता. पेनीनें बंदूक झटकन् खांद्याकडे नेली आणि चाप ओढला. नुसताच 'फुस्' असा वायबार झाला. पुन्हां त्यानें बार भरला आणि पुन्हां चाप ओढला. त्याच्या कपाळावर घर्मबिंदु उभे राहिले. पुनश्च—चापाचा फुसकाच बार ऐकूं आला. आणि मग तें काळेंकुट्ट वातचक्र मोकाट सुटलें. प्रचंड गर्जना करून कुत्र्यांच्या अंगावर तें इतक्या वेगानें तुटून पडलें कीं त्याची कल्पनासुद्धां करवणार नाहीं. पांढरे सुळे नि वाकडीं नखें म्हणजे या झंझावातांतले विजेचे चमकारेच होते जणूं! दांत विचकून गुरगुरत, गिरक्या घेत आणि दांत–ओठ कराकरा चावीत अस्वलराज चौफेर तडाखे हाणीत होते. कुत्र्यांनींही तितकेंच चापल्य दाखवलें. ज्यूलियानें त्याच्या पिछाडीकडून त्याला हुलकावण्या दाखवल्या आणि तिचा समाचार घेण्यासाठीं तो गर्रकन् फिरतांच रिपनें त्याच्या केंसाळ नरड्यावर झडप घातली.

ज्योडी भ्याला. इतका कीं त्याचीं सारीं गात्रें बधिर पडलीं. त्याला एवढें दिसलें कीं आपल्या बाबांनीं पुन्हां एकवार बंदूक सज्ज केली आहे आणि ओणवे

होऊन चापावर बोट ठेवून ते अगदीं तयारींत उभे आहेत. ज्यूलियानें हळूच वाट काढीत अस्वलाची उजवी बगल गांठली. त्यानें एकदम गिरकी घेतली, पण तिच्या बाजूला नाहीं; डाव्या बगलेवर बुलडॉग आलेला होता तिकडे तो वळला. त्यानें त्याला कुशीवर पकडलें आणि बाजूच्या झुडपांत भिरकावून दिलें. पेनीनें पुन्हां एकदा चाप ओढला. तेव्हां जो स्फोट झाला त्याचाही आवाज फुसका होता आणि त्या आवाजाबरोबरच पेनी मागच्या मागें कोसळला. याचें कारण बंदूक मागें उडाली होती.

ज्योडी धांवत आपल्या वडिलांकडे गेला. पेनी एव्हांना उठून उभा राहिला होता. त्याच्या चेहऱ्याची उजवी बाजू पावडरीमुळें काळी झाली होती. स्लूफूटनें गर्रकन् वळून ज्यूलियाला धरलें आणि मुठी वळलेल्या पंजांनीं तिला छातीशीं दाबलें. ती तीव्र सुरांत ओरडली. रिपनें अस्वलाच्या पाठीकडून झेप टाकली आणि त्याच्या कातडींत आपले दांत रोवले.

ज्योडी किंचाळला, " बापरे ! तो ज्यूलियाचा जीव घेतोय् ! "

पेनी बेचैन होऊन त्या धुमश्चक्रींत घुसला. त्यानें बंदुकीची नळी अस्वलाच्या बरगड्यांत रोवली. ज्यूलियाला एवढ्या यातना होत होत्या, तरी अस्वलाचें काळें नरडें तिनें घट्ट पकडलें होतें. स्लूफूट दांत फिसकारून किंचाळला आणि एकदम मागें वळून खाडीच्या कांठावरून पाण्यांत उतरला. खोल पाण्यांत गेला. तरी दोन्ही कुत्र्यांनीं त्याच्या अंगावरची पकड सोडली नाहीं. स्लूफूट पिसाटासारखा पोहत होता. आपलें नाकाड वर काढून तो पोहत होता आणि त्या नाकाडाखालीं ज्यूलियाचें डोकें तेवढें पाण्यावर दिसत होतें. रिप मोठ्या ऐटींत त्याच्या धिप्पाड पाठीवर स्वार झाला होता. दूरचा कांठ गांठून स्लूफूट धडपडत किनाऱ्यावर चढला. ज्यूलियानें आपली पकड ढिली केली आणि ती मलूल होऊन चिखलांत पडली. अस्वलानें दाट जंगलांत पोबारा केला. क्षणभरच रिप त्याच्याबरोबर होता. मग, गोंधळून जाऊन तोही खालीं पडला. त्यानें ज्यूलियाजवळ जाऊन हुंगल्यासारखें केलें; पाण्याच्या पलीकडे नजर फेकून हुंगल्यासारखें केलें.

दूर कुठंतरी गवतांत धाड्दिशीं कांहींतरी पडल्याचा आवाज ऐकूं आला आणि मग सारें शांत झालें.

• • •

पेनी दुरून ओरडला, " रिप ! इकडे ये—! ज्यूलिया ! कुठें आहेस तूं ?— इकडे ये ! "

तिकडे रिपनें आपलें थोटकें शेपूट हलवलें, पण तो जागचा हलला नाहीं. पेनीनें आपलें शिकारीचें शिंग ओठांना लावलें आणि त्याला धीर देण्यासाठीं तो तें फुंकूं लागला. ज्योडीनें पाहिलें — ज्यूलिया डोकें वर उचलते आहे. पण नाहीं ! पुन्हां तिची मान खालीं पडली.

पेनी म्हणाला, " तिला उचलून आणलं पाहिजे. "

त्यानें आपले बूट काढून घेतले आणि तो कांठावरून हळूच खालीं पाण्यांत उतरला. जोरजोरानें पाणी कापीत तो पुढें गेला. किनाऱ्यापासून थोडे यार्ड अंतरावर तो एका प्रवाहांत सांपडला आणि तीव्र वेगानें ओंडक्यासारखा ओढ्यांतून वाहत गेला. प्रवाहाला तोंड देण्यासाठीं आणि दूर सटकण्यासाठीं त्यानें खूप धडपड केली. शेवटीं एकदाचा बऱ्याच अंतरावर खालीं वाहत जाऊन तो कांठाला लागलेला ज्योडीला दिसला. कसाबसा धडपडत तो उभा राहिला आणि आपल्या डोळ्यांतलें पाणी त्यानें पुसलें आणि पुन्हां किनाऱ्यावरून धांवत आपल्या कुत्र्यांजवळ गेला. ज्यूलियाला नीट तपासून पाहण्यासाठीं तो खालीं वाकला. तिला त्यानें एका हातांत उचलून कुशीशीं धरलें. या वेळीं ओढ्यांत प्रवेश करण्यापूर्वी कांहीं अंतर तो कांठावरूनच चालत गेला. आंत उतरल्यावर आपल्या मोकळ्या हातानें त्यानें पाणी कापायला सुरुवात केली. तेव्हां प्रवाहाबरोबर तो उचलला जाऊन ज्योडीच्या जवळजवळ पायांपाशीं जाऊन पडला. रिप त्याच्या मागोमाग पायांनीं पाणी तोडीत आला, कांठावर चढला आणि त्यानें आपलें अंग झाडलें. पेनीनें म्हाताऱ्या ज्यूलियाला हलक्या हातांनीं खालीं ठेवलें.

" चांगलीच दुखावलेली दिसते " तो म्हणाला.

त्यानें आपला शर्ट अंगांतून काढला. आणि त्यांत कुत्रीला गुंडाळून घेतलें. शर्टाच्या बाह्या एकत्र बांधून त्यानें त्याचा झोळणा तयार केला आणि तो आपल्या पाठीवर लटकावून दिला.

" आतां मात्र ठरलं, " तो म्हणाला. " कांहीं झालं तरी मला नवी बंदूक घेतलीच पाहिजे ! "

त्याच्या गालावर पावडरीनें जिथें भाजलें होतें त्या जागेवर एव्हांना फोड आला होता.

" काय बिघडलं, पा ? "

" जवळ जवळ सारंच बिघडलं. सिलिंडरवर हॅमर नीट आपटत नाहीं. सैल पडला आहे. मला माहीत होतं म्हणा. हॅमर चढवायचा म्हणजे दोनतीन वेळां ताणावा लागायचा. पण आत्तां बंदूक बॅकफायर झाली ना ? त्याचा अर्थ हा कीं मेनस्प्रिंग ढिली झाली आहे. — ठीक आहे ! चल, जाऊं या आपण. ही भिकार बंदूक धरतोस का तूं ? "

आणि चालली मिरवणूक पुन्हां दलदलींतून घराकडे. पेनी उत्तर दिशेनें आणि मग पश्चिम दिशेनें वाट काढीत चालला होता.

" आतां तें अस्वल सांपडेपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाहीं ! " तो म्हणाला. " मला फक्त नवी बंदूक द्या आणि थोडी सवड द्या ! "

एकाएकीं ज्योडीला कसेंसेंच झालें. त्याचे वडील जें निस्त्राण मुटकुळें हातांत धरून नेत होतें तें त्याला बघवेना. त्यांच्या उघड्या, काटकोळ्या हातावरून रक्ताचे ओघळ गळत होते.

" मला पुढें जावंसं वाटतं, पा ! "

पेनीनें मागें वळून त्याच्याकडे पाहिलें.

" बस्स का ? हा प्रकार बघून मळमळतंय म्हणून वाटतं ? "

" पा ! मी पुढें जाऊन तुमच्यासाठीं वाट काढतों. "

" ठीक आहे. जा पुढें !— आणि हें बघ, ज्योडी ! ही पिशवी तुझ्याजवळ ठेव. त्यांतला पाव खा थोडा.— हं, चाव एक तुकडा म्हणजे बरं वाटेल ! "

ज्योडीनें पिशवींत हात घालून चाचपडलें आणि पॅनकेकची पुडी बाहेर काढली. ब्रायरबेरीची जेली जिभेला किती झोंबली अन् थंड वाटली ! ती इतकी रुचकर लागावी याचीच त्याला लाज वाटली पाहा ! बऱ्याच केका त्यानें गपागप खाल्ल्या. बापांनाही थोडी केक दिली.

" शिदोरी आणली म्हणून किती बरें झालं ! " पेनी म्हणाला.

बाजूच्या झुडपांत कुणीतरी कण्हल्याचा आवाज आला. एक लहानशी आकृति अंग चोरून घाबऱ्या घाबऱ्या त्यांच्या मागें येत होती. पर्क होता तो. ज्योडीनें रागारागानें त्याला एक लाथ दिली.

पेनी म्हणाला, " त्याच्याकडे लक्ष देऊं नकोस. मला शंका होतीच या

स्वारीबद्दल ! — पोरा, कांहीं कुत्रे किनई, खास अस्वलांकरतांच असतात. पण कांहीं कुत्र्यांना अस्वलांत बिलकुल गम्य नसतं ! ”

बॅक्स्टर बेटांतले उंच देवदार वृक्ष दृष्टीच्या टप्प्यांत आले तेव्हां दुपार संपायला आली होती. पूर्वेकडच्या रेताड रस्त्यानें हें लटांबर खालीं उतरलें आणि बखळींत आलें. घराच्या निरुंद ओसरींत मा बॅक्स्टर डुलत बसली होती. तिच्या मांडीवर शिवणकामाचा ढिगारा होता.

“ मेलेलं कुत्रं तेवढं आणलंत होय ? आणि अस्वल ? ” तिनें गर्जना केली.

“ अजून मेलेलं नाहीं. पाणी आण थोडं — आणि चिंध्या आण. आपली मोठी सुई नि दोरा पण घेऊन ये. ”

मा लगेच मदत करायला उठली. प्रसंग ओढवला कीं आपल्या आईचा भला मोठा देह किती चपळतेनें कामाला लागतो, तिचे हात किती झटपट सेवा करूं लागतात हें ज्योडीला माहीत होतें तरी त्याला नेहमीच त्याबद्दल अचंबा वाटे. पेनीनें म्हाताऱ्या ज्यूलियाला ओसरींत जमिनीवर ठेवलें. ती कण्हायला लागली. ज्योडी तिचें डोकें थोपटायला खालीं वाकला तेव्हां तिनें त्याच्याकडे पाहून दांत दाखवले. ज्योडी विमनस्कपणें आपल्या आईच्या मागें गेला. ती एक जुनें एप्रन फाडून त्याच्या चिंध्या करीत होती.

“ पाणी आण पाहूं तूं ” तिनें ज्योडीला सांगितलें आणि ज्योडी धावत किटलीजवळ गेला.

पेनी पुन्हा ओसरींत आला. त्यानें हातांत मावतील तेवढ्या क्रोकस गवताच्या गोण्या आपल्याबरोबर आणल्या होत्या; त्यांचा त्यानें ज्यूलियासाठीं बिछाना तयार केला. मा बॅक्स्टरनें शस्त्रक्रियेची सामुग्री आणली. पेनीनं आपला रक्तानें चिंब भिजलेला शर्ट कुत्रीच्या अंगापासून सोडवला आणि तिच्या खोल जखमा धुवायला सुरवात केली. म्हाताऱ्या ज्यूलियानें जरासुद्धा कांकूं केलें नाहीं. अस्वलांचीं नखें म्हणजे काय याचा तिला पूर्वीं अनुभव आलेला होता. दोन सर्वांत खोल जखमा होत्या त्या पेनीनें शिवल्या आणि सर्व जखमांमधून देवदाराच्या डिंकाचें मलम चोळलें. तेव्हां ती एकदांच ओरडली; पण मग गप्प बसली. आणि तो काम करीत असतां तिनें पुन्हा हूं कीं चूं केलें नाहीं.

“ एक बरगडी मोडली आहे ” पेनी म्हणाला, “ त्या बाबतींत मला कांहींच करतां येणार नाहीं. पण ही जगली वांचली तर बरगडीसुद्धा पुन्हा सांधेल. ”

## — ५ —

न्याहारीच्या वेळीं पेनी म्हणाला, " हं: ! म्हणजे आतां एकतर कसंही करून नव्या बंदुकीचा सौदा करायला हवा, किंवा – अशीं संकटं ओढवून घ्यायचीं !"

म्हाताऱ्या ज्यूलियाला पुष्कळ बरें वाटत होतं. तिच्या जखमा साफ होत्या; सूजबीज नव्हती. रक्तस्रावामुळें ती भयंकर थकली होती; तिला आतां फक्त झोप हवी होती. पेनीनें तिच्यापुढें धरलेल्या भोपळ्यांतून तिनें थोडेंसें दूध प्राशन केलें होतें.

" नवी बंदूक आणायची म्हणतां, ती कशी काय आणणार आहां तुम्ही ?" मा बॅक्स्टरनें विचारलें. " कर भरण्यापुरतेसुद्धा पैसे नाहींत !"

" सौदा करायचा, म्हणालों ना ?"

" सौदा ! सौदा करायला आहे काय तुमच्याजवळ ?"

" तें नवं आणलेलं कुत्रं. फॉरेस्टर मंडळी कुत्र्यांच्या बाबतींत किती पागल आहेत तें माझ्याइतकंच तुलाही माहीत आहे."

" एझरा बॅक्स्टर ! फॉरेस्टर मंडळीशीं व्यापार करायला तूं गेलास, तर अंगांतल्या पाटलोणीनिशीं घरीं परतलास तरी पुष्कळ होईल !"

" हं ! तें कांहीं असो. मी नि ज्योडी आज तिकडे जातां आहोंत एवढं खरं.'

पेनी इतक्या दृढपणें बोलला कीं, एवढी मोठी त्याची बायको पण तिचा विरोध वाऱ्यासारखा उडून गेला. तिनें एक निःश्वास सोडला.

" ठीक आहे. जा मला इथें टाकून ! नसेना का कुणी लाकडं तोडायला -- पाणी आणायला ! मी करतेंच आहें सगळं ! आणि करतां करतां वाटेंत कांहीं होऊन पडलें तरी तुम्हांला काय म्हणा त्याचं ? — जा ! त्यालाही न्या."

" तुला लाकडांशिवाय अन् पाण्याशिवाय तशीच टाकून गेलोंय् का मी कधीं ?"

ज्योडी काळजीपूर्वक ऐकूं लागला. त्याला खायचें सुचेना. त्यालाही वाटूं लागलें कीं फॉरेस्टर मंडळींकडे जावें.

" ज्योडीनें आतां मोठ्या माणसांत मिसळलं पाहिजे. त्यांची रीतभात उचलली पाहिजे," पेनी म्हणाला.

" वा ! त्याची सुरवात करायला फॉरेस्टर मंडळी बेश शोधून काढलीत !

यांच्याकडे जर यानें शिक्षण घेतलन् तर — मध्यरात्रीसारखं काळंकुट्ट काळीज तयार होईल याचं !"

"कसं वागूं नये हें तर शिकतां येईल ? कांहीं असलं तरी आम्ही तिकडे जाणार."

पेनी टेबलाजवळून उठला.

"मी जाऊन पाणी आणतों. ज्योडी, तूं जा बरं — लाकूड तोडून आण एखादं."

ज्योडी लगबगीनें लाकडांच्या राशीकडे गेला. त्या लठ्ठ ओंडक्यांवर मारलेल्या कुऱ्हाडीच्या एकेका घावाबरोबर ज्योडी जणूं अंतर तोडीत होता आणि फॉरेस्टर मंडळींच्या जवळ चालला होता — आणि आपल्या मित्राच्या, फॉडर-विंगच्या जवळ ! त्यानें भरपूर लाकडें तोडून तीं सैंपाकघरांत नेलीं आणि त्यांनीं आईचें सर्पणाचें खोके भरून टाकलें. त्याचे बाबा विवरापाशीं गेले होते, ते पाणी घेऊन अजून आले नव्हते. ज्योडी गडबडीनें गोठ्याकडे गेला आणि त्यानें घोड्यावर जीन चढवलें. त्याच वेळीं पश्चिम बाजूकडून त्याचे बाबा वाळूच्या रस्त्यावरून येत असलेले त्याला दिसले. बैलाचें जूं त्यांनीं मानेवर घेतलें होतें आणि त्याच्या दोन्ही टोकांना पाण्यानें तुडुंब भरलेलीं दोन लाकडी बकेटें लटकत होतीं. तो जड भारा खालीं उतरायला त्यांना सोपें जावें म्हणून ज्योडी पुढें धावला.

"सीझरवर जीन चढवलं, पा" तो म्हणाला.

"आणि लाकडंही पेटलीं असणार, खरं ना ?" पेनी हस्तिदंती दाखवीत म्हणाला. "अच्छा ? मला आतां माझा बाजारचा कोट तेवढा चढवला पाहिजे. तूं रिपला बांधून ठेव अन् माझी बंदूक आण, कीं निघालोंच आपण !"

घोड्याचें जीन फॉरेस्टर मंडळींकडूनच विकत आणलेलें होतें. त्यांचे सर्वांचेच पुठ्ठे मोठे, त्यामुळें त्यांना तें लहान पडे. पण पेनी अन् ज्योडी दोघेही त्याच्यावर आरामांत बसत.

"तूं पुढें बैस, पोरा" पेनी म्हणाला. "पण जर का लेका अंगानें फार वाढत चाललास् तर तुला मागें बसावं लागणार आहे. कारण मग मला पुढचं दिसणार कसं ? चलो, पर्क ! उठाव पैर !"

पर्क त्यांच्या मागोमाग चालायला लागला. मध्येंच थांबून त्यानें एकदा खांद्यावरून मागें पाहिलें.

पेनी म्हणाला, " पाहून घे बाबा ! तुझं हें शेवटचं दर्शन ठरो ! "

सीझरला चांगली विश्रांति मिळाली होती. तो 'पद्डक पद्डक' करीत चालला होता. त्याची वृद्ध पाठ चांगली धिप्पाड रूंद होती. खोगीर चांगलें प्रशस्त होतें. ज्योडीला त्यांत झुलत्या खुर्चीसारखा आराम वाटत होता. पायांखालची रेताड वाट म्हणजे उन्हानें चकाकणारी नि पर्णराजीनें झाकळलेली एक मेखला होती. पश्चिमेकडे गेल्यावर पाण्याच्या त्या विवरापाशीं रस्त्याला दोन फाटे फुटले. एक फाटा बॅक्स्टर बेटांतूनच पुढें चालला. दुसरा उत्तरेकडे वळला. लंबाड्या पानांच्या पुराणकालीन देवदार वृक्षांवर फार फार पूर्वी मारलेल्या कुऱ्हाडीच्या खुणा या उत्तरेकडच्या मार्गावर जिकडे तिकडे झळकत होत्या.

ज्योडीनें विचारलें, " या खुणा कुणीं केलेल्या ? तुम्हीं कीं फॉरेस्टरनीं ? "

" अरे बाबा ! या खुणा फार जुन्या आहेत. फॉरेस्टर मंडळींची किंवा माझी नांवनिशाणी नव्हती तेव्हांचे घाव आहेत हे, बाळ ! यांतले कांहीं घाव इतके खोल गेलेले आहेत आणि हीं पाइनचीं झाडं इतक्या मंद गतीनें वाढतात, कीं यांतल्या कांहीं खुणा स्पॅनिश लोकांच्या कुऱ्हाडींनीं केल्या असल्या तर त्यांत मला नवल वाटणार नाहीं. तुझ्या मास्तरांनीं गेल्या वर्षी इतिहास शिकवलाच नाहीं, का रे ? — बाळ, हा रस्ता स्पॅनिश लोकांनीं केलेला आहे. आत्तां आपण जी वाट मागें टाकतों आहों तोच स्पॅनिश लोकांचा मार्ग. फलॉरिडा प्रांतांतून थेट आरपार जातो हा ! फोर्ट बटलर किल्ल्यापाशीं हा मार्ग वळतो. दक्षिणेकडचा रस्ता टॅम्पाकडे जातो. त्याला 'ड्रगून ट्रेल'* म्हणतात. हा इथला भाग म्हणजे 'ब्लॅक बेअर'. "

ज्योडीनें आपले मोठाले डोळे वडिलांकडे वळवले.

" बेअर " नांव त्यांनीं दिलंय् ? — म्हणजे पा, स्पॅनियर्ड लोकांना पण अस्वलं भेटत असत ? "

" माझी खात्री आहे, भेटतच असणार. त्यांना इंजनां† लोकांशीं लढावं लागायचं. आणि अस्वलांशीं नि चित्त्याशीं लढावं लागायचं. आपल्याच सारखं. फक्त इंजन आतां नाहींत. "

* सैनिक पथ.

† रेड इंडियन.



२६५५९ ... १५३२ क्रमांक नों. दि.

ज्योडीनें डोळे ताणून इतस्ततः पाहिलें.

" आतां या बाजूला अजून स्पॅनियर्ड आहेत का हो, पा ? "

" नाहीं बेटा. आमच्या आजोबांच्या पिढींतल्या सुद्धा कुण्णीं स्पॅनियर्ड पाहिलेला नाहीं. ते लोक महासागर ओलांडून आले आणि व्यापार करीत, लढाया देत, फ्लॉरिडा पार करून गेले. ते शेवटीं कुठें गेले हें कुणालाच माहीत नाहीं. "

आतां खुरट्या गवताच्या गर्द रानांत त्यांनीं प्रवेश केला. हें रान अतिशय दाटीवाटीनें वाढलेलें होतें आणि मोठ्या झाडाची छाया फारच क्वचित् मिळत होती. पण पुढें रस्ता रुंद झाला, रान संपलें आणि पलीकडे उंच झाडांचीं माथीं दिसूं लागलीं. फॉरेस्टर बेटाची खूण होती ती !

पेनी घोड्यावरून उतरला. त्यानें कुत्र्याला उचलून घेतलें आणि पुन्हां घोड्यावर चढला.

ज्योडीनें विचारलें, " त्याला उचललंत कशाला ? "

" उगीच. "

लवकरच थंडगार नि खोल अशा एका दरडींत त्यांनीं प्रवेश केला. दोन्ही बाजूंनीं ताडाचीं झाडें नि ओकवृक्ष यांनीं कमानी केल्या होत्या. रस्ता वाकड्या वाकड्या वळणांनीं गेलेला होता. आणि एका प्रचंड ओक वृक्षाखालीं फॉरेस्टर मंडळींचें लाकडी खोपट दिसायलाही लागलें होतें.

पेनी म्हणाला, " फॉडरविंगला त्रास द्यायचा नाहीं, बरं का ? "

" मी कधींच त्याला त्रास देत नाहीं. तो माझा दोस्त आहे. "

" मग बरं आहे. दुसरेपणचं मूल आहे. जरा विचित्र जन्मलं यांत त्याचा दोष नाहीं. "

' माझा तो जानीदोस्त आहे,– ऑलिव्हरच्या खालोखाल. "

अकस्मात् स्फोट झाल्याप्रमाणें त्या जंगलांतली शांतता भंग पावली. लाकडी खोपटांत गडबड उडाली. इकडून तिकडे खुर्च्या फेकल्याचा आवाज ऐकूं आला. कांहींतरी मोठीथोरली वस्तु आपटली, कांचा फुटल्या, लाकडी भुईवर जड पावलें दणादण आपटलीं आणि पुरुष फॉरेस्टरांचे आवाज भिंतींवर आदळले. या सगळ्या कोलाहलावर ताण करणारा कोणातरी बाईचा आवाज किंचाळला. दरवाजा सताड उघडला आणि कुत्र्यांचें एक लेंढार बाहेर आलें. मा फॉरेस्टर हातांतला झाडू त्यांच्यावर उगारून उभी राहिली आणि कुत्रीं आपल्या बचावासाठीं पळत सुटलीं.

पेनीनें ओरडून विचारलें, “ काय ? आम्ही उतरलों तर चालेल ना आतां ? कीं अजून धोका आहे ? ”

फॉरेस्टर मंडळींनी बॅक्स्टरद्वयाच्या स्वागतार्थ पुन्हां ओरडा केला आणि त्यांतच कुत्र्यांना हुकूम सोडले. मा फॉरेस्टरनें आपलें सुती एप्रन दोन्ही हातांनीं उचलून निशाणासारखें हालवलें. त्यांनीं स्वागतार्थ ठोकलेल्या आरोळ्यांतच कुत्र्यांना दिलेलीं फर्मानें इतकीं मिसळून गेलीं होतीं कीं ज्योडीला फार अस्वस्थ वाटलें. या स्वागताचा अर्थच त्याला नीटसा कळेना.

“ उतरा – उतरा ! या ना आंत. — जातां कीं नाहीं चोरांनो तुम्ही ? बेकन चोरूनच्या चोरून वर गमज्या करताहेत ! — हिः थू ! — हं, काय ? कसं काय ? — होतां कीं नाहीं चालते ? ”

कुत्रीं जंगलांत पसार झालीं आणि ज्योडीनें घोड्यावरून खालीं उडी टाकली. आपल्या जवळच्या छोट्या कुत्र्याला हळुवारपणें संभाळीत पेनी खालीं उतरला. फॉरेस्टर मंडळींनीं त्याच्याकडे पाहून स्मित केलें.

पलीकडे, खोपटाच्या पायऱ्या उतरून फॉडरविंग आपल्याकडे लगबगीनें येत असलेला ज्योडीला दिसला. पाठीवर कुबड आलेलें त्याचें वेडेंवाकडें शरीर कसें बसें झटक्यांमागून झटके देत चालत होतें. जसा कांहीं एखादा घायाळ गोरिलाच चालला आहे ! फॉडरविंगनें आपली टेकायची काठी उचलली आणि ज्योडीकडे पाहत हालवली. ज्योडी त्याला भेटायला धावला. फॉडरविंगचा चेहरा सतेज दिसत होता.

त्यानें एकदम आरोळी ठोकली, “ ज्योडी ! ”

दोघे समोरासमोर उभे राहिले. गोंधळल्यासारखे पण प्रसन्न !

ज्योडीला एका विलक्षण आनंदाची अनुभूति झाली. दुसऱ्या कुणाच्याही सहवासांत त्याला हा आनंद वाटला नसता. आपल्या मित्राच्या शरीरांत त्याला बेढब, अस्वाभाविक असें कांहीं वाटत नव्हतें. एखाद्या सरड्याचे किंवा पोसमचें शरीर कधीं बेढब वाटतें का ? नाहीं. तसेंच हें. मोठीं माणसें सांगत कीं फॉडरविंगला अक्कल नाहीं. ज्योडी तें ऐकून घ्यायचा. ‘ फॉडरविंग ’ हें नांव या सर्वांत धाकट्या फॉरेस्टरनें आपलें आपण पाडून घेतलें होतें. त्यानें केला तसला प्रकार आपण कधीं केला नसता, तितपत अक्कल आपल्याला आहे हें मात्र ज्योडी जाणून होता. तो प्रकार असा – छोट्या फॉरेस्टरच्या डोक्यांत एक खूळ भरलें होतें. आपण जर

हलकें नि वायुवत् असें कांहीं तरी आपल्या अंगाला जोडलें तर उडूं शकूं – आंगणांत जें कोठार आहे त्याच्या छपरावर लोंबणाऱ्या झाडाच्या फांदीवरून उड्डाण करूं शकूं – एखाद्या पक्षाप्रमाणें हलूचकन्! अशी कांहीं तरी त्याची कल्पना होती. आणि त्याप्रमाणें एक दिवस आपल्या दोन्ही दंडांना गुरांच्या कडब्याची (Fodder) मोठमोठीं चोचकीं (हेच त्याचे पंख – Wings) बांधून स्वारीनें उडी मारली होती. दैवी चमत्कारानें तो वांचला होता; पण या पराक्रमामुळें त्याच्या उपजत कुबडाच्या भरीला मोडलेल्या बरगड्यांची देणगी त्याला मिळाली होती. अगदींच चक्रमपणा केलान् हें तर खरेंच. आणि तरी ज्योडीला मनांतून असें वाटायचें कीं असें कांहीं तरी केलें तर जमणार नाहीं असें नाहीं. त्याच्या स्वतःच्या डोक्यांत निराळीच युक्ति घोळत होती. ती म्हणजे पतंग – खूप मोठे पतंग! या पांगळ्या पोराला आकाशांत उडायची तळमळ व्हावी यांतलें इंगित ज्योडी थोडें फार समजूं शकत होता. जमिनीशीं जणूं बांधल्यागत असलेल्या, वेड्यावाकड्या नि सतरा जागीं अडखळणाऱ्या आपल्या देहापासून मोकळें व्हावें, हलकें व्हावें ही त्याची आतुरता ज्योडी समजूं शकत होता.

तो म्हणाला, "ए!"

फॉडरविंग म्हणाला, "माझ्याजवळ एक कून बाळ आहे."

त्याच्याजवळ नेहमींच कसलेंतरी नवें बाळ असायचें.

"चल, आपण पाहूं या जाऊन."

फॉडरविंगनें त्याला खोपटाच्या पिछाडीला नेलें. तिथें खोक्यांचा नि पिंजऱ्यांचा एक मोठा संग्रहच होता. त्याचे विविध नमुन्यांचे पक्षी नि प्राणी त्यांत सांठवलेले होते. हे नमुने नेहमींच बदलत असत.

"माझा गरुड होता ना? तो मेला!" फॉडरविंगनें सांगितलें. "तो फारच जंगली! पिंजऱ्यांत राहायला तयारच नव्हता."

कोल्ह्याचें तोंड असलेली एक खार होती. ती सारखी वर खालीं धावत होती.

"तुला हवी असली तर देईन" फॉडरविंग म्हणाला. "मला आणतां येईल दुसरी."

ज्योडीच्या आशा उंचावल्या आणि एकदम कोसळल्या.

"मा मला कांहीं पाळूं देत नाहीं."

त्याचें हृदय मात्र भरून येत होतें. त्या खारीसाठीं तळमळत होतें.

" हें बघ तें कून.—ये, इकडे ये, रॅकेट ! "

बारीक चिरफळ्यांमधून एक काळें नाक बाहेर आलें. चिमुकला काळा पंजा बाहेर आला. जसा कांहीं तान्ह्या बाळाचा हात. फॉडरविंगनें एक फळी वर उचलली आणि रकूनला बाहेर काढलें. तें त्याच्या हाताला बिलगलें आणि 'चिर्र्र्' असा विचित्र आवाज काढूं लागलें.

" धर कीं तूं.—चावणार नाही ! "

ज्योडीनें तें पिल्लूं आपल्या छातीशीं धरलें. त्याला वाटलें, अहाहा! इतकी छान वस्तु आपण कधीं पाहिलेली नाहीं; इतका छान स्पर्श आपण कधीं अनुभवलेला नाहीं. त्याची करड्या रंगाची लोकर किती मऊ होती ! रात्रींच्या वेळीं वरून घाल · · आईचा फ्लॅनेलचा झगा जसा मऊ लागे, तशी !

रकूननें त्याच्या अंगाला तोंड लावून गुदगुल्या केल्या आणि तें पुन्हा एकदां ओरडलें.

" त्याला साखरेचा बोळा हवाय्" फॉडरविंगनें आईच्या थाटांत सांगितलें. " चल, त्याला आपण घरांत नेऊं या. "

— ६ —

ज्योडीच्या हातांमध्यें आंग गुंडाळून घेऊन रकूनचें पिल्लूं उताणें पडलें होतें आणि आपल्या पुढच्या पायांनीं साखरेचा कापडी बोळा त्यानें पकडला होता. हर्षभरानें त्यानें आपले डोळे मिटून घेतले.

शेकोटीच्या पलीकडून पा फॉरेस्टर कांहींतरी बोलले. आतांपर्यंत ते इतके गप्प बसले होते कीं ज्योडीनें त्यांना पाहिलें नव्हतें.

" मी लहान होतों तेव्हां माझ्याजवळ पण एक कून होतं " फॉरेस्टरबाबा बोलत होते. " दोन वर्षांचं असूनही तें इतकं गरीब होतं कीं जसं कांहीं एखादं मांजरच. मग एक दिवस माझ्या पोटरीचा त्यानें लचका तोडलान्!— हें पण मोठं झालं कीं चावणार. कूनचा स्वभावच असतो तो. "

मा फॉरेस्टर घरांत आली आणि आपल्या भांड्यांकुंड्यांकडे वळली. तिच्या मुलांची फलटण तिच्या मागोमाग होतीच. बक अन् मिलव्हील, गॅबी अन् पॅक,

आर्च अन् लेम. या पहाडी पुरुषांना जन्म देऊन पोसणाऱ्या फॉरेस्टर पतिपत्नींकडे ज्योडीनें कुतूहलानें पाहिलें. किती शुष्क सुरकुतलेलीं दिसत होतीं दोघें! मुलगे सगळे दिसायला सारखेच होते म्हणा ना — फक्त गॅबी इतरांपेक्षां जरा ठेंगणा होता.

पेनी बॅक्स्टर आंत आला आणि या मंडळींत लुप्त झाला. आपले बाबा अजूनही तें कवडीकिमतीचें कुत्रें फार जपूनें हातांत मिरवताहेत हें पाहून ज्योडीला आश्चर्य वाटलें.

पेनी पलीकडच्या बाजूला गेला.

"काय मि. फॉरेस्टर! कसं काय? तुमची भेट झाल्यामुळें धन्य र्यांत तब्येत कशी आहे?" गळ्या

"चांगली फक्कड आहे. आतां आमचे दिवस भरत आले समजूं लक्षांत घेतलं, तर आहे ही तब्येत ठीकच म्हटली पाहिजे. खरं सांग सतरा एव्हांना सगळा ग्रंथ आटपून मी स्वर्गाची वाट धरायला हवी होती ी त्याची सारखा आजचं उद्यांवर ढकलतों आहें झालं! हा ओळखीचा म जाववत नसावं!"

मा फॉरेस्टर म्हणाली, "बसा ना, मि. बॅक्स्टर."

पेनीनें एक झुलती खुर्ची पुढें ओढली आणि तो बसला.

लेम फॉरेस्टरनें पलीकडून विचारलें, "तुमचं कुत्रं लंगडतंय् का?"

"छे छे! तें कधींच लंगडल्याचं मला ठाऊक नाहीं. तुमचे ते ब्लडहाऊंड टपलेत ना एकेक — त्यांच्या जबड्यांपासून याला दूर ठेवावं म्हणतों, एवढंच."

"फार किमती आहे?" लेमनें विचारलें.

"हा? — छे छे! मोठीशी ठेव आहे असं नका समजूं. किंवा मी इथून जायला निघालों कीं त्याला अडवून ठेवायची कारवाई पण करूं नका. चोरण्याच्या लायकीचा माल नाहीं!"

"इतका वेकार आहे म्हणतोस, पण तूं तर त्याला अगदीं डोळ्यांत तेल घालून जपतो आहेस!"

"हं. जपतोंय्."

"त्याला अस्वलावर सोडला होता कधीं?"

"अस्वलावर सोडला होता."

लेम जवळ आला. जोरजोरानें निःश्वास टाकीत त्यानें विचारलें, "माग चांगला काढतो का? अस्वलाला रोखून धरतो?"

"छे रे! बेकार आहे तो. अस्वलाच्या शिकारीसाठीं मीं आजपर्यंत एवढीं कुत्रीं पाळलीं आणि त्यांच्या मागें हिंडलों; पण इतकं बेकार कुत्रं दुसरं पाहिलं नाहीं."

लेम म्हणाला, "स्वतःच्या कुत्र्याबद्दल कुणीं इतक्या हेटाळणीनें बोललेलं मीं ऐकलं नव्हतं."

पेनी म्हणाला, "बरं—बरं! मी कबूल करतों कीं कुत्रा दिसायला बरा आहे. पाहिल्याबरोबर कुणालाही घ्यावासा वाटेल. पण त्याचा सौदा करण्याचे विचार छान वा डोक्यांत भरवून द्यावेत अशी माझी मुळींच इच्छा नाहीं. हो! तुम्हीच लेला नाम्माल अन् गंडवले जाल!"

घाल [illegible] रत जातांना शिकार करण्याचा बेत आहे, काय?"

[illegible] म्हणजे काय? शिकारीचा बेत माणसाच्या मनांत नेहमींच असतो."

ओरडलें. पण [illegible] आम्हांला एका गोष्टीचा मात्र फारच चमत्कार वाटतो! जें कुत्रं

"[illegible]कामाचं वाटतं त्याला एवढं कडेवर घेऊन तुम्ही इथें कशाला आलांत?"

"चल, [illegible]स्टर मंडळी एकमेकांकडे पाहूं लागली. सर्व शांत बसलीं होतीं. त्यांचे

[illegible]ळे मात्र कुत्र्यावर खिळले होते.

"कुत्रा कुचकामाचा आहे हें तर झालंच. पण माझी ही जुनी शॉटगनही कुचकामाची झाली आहे." पेनी म्हणाला. "मोठ्या पेचांत सांपडलों आहें मी."

ते काळेभोर डोळे आतां भिंतींवर लटकत असलेल्या शस्त्रांकडे वळले. फॉरेस्टर मंडळींच्या या शस्त्रसंग्रहानें एक दुकान सहज भरेल, असें ज्योडीच्या मनांत आलें. फॉरेस्टर मंडळी घोड्याच्या व्यापारांत, तसेंच हरणाचें मांस विकून चांगले पैसे मिळवीत आणि थाटामाटानें राहत. दुसरीं माणसें बाजारांत कॉफी नि आटा विकत घेत तसे हे बंदुका घेत.

"तुम्हांला कधीं शिकार मिळायची चुकली आहे असं आजपर्यंत मीं ऐकलेलं नाहीं." लेम म्हणाला.

"काल चुकली कीं. बंदूक उडेच ना मुळीं. आणि शेवटीं उडाली ती काय— बॅकफायर झाली!"

"कशाची शिकार करीत होतां?"

"स्लूफूट बाबाची!"

हें ऐकून खोलींत एकदम प्रचंड हशा उसळला.

" कुठें चरतोय् बावा हल्लीं ? आला कुठच्या बाजूनें ? गेला कुठें ? "

पा फॉरेस्टरनीं आपली काठी जमिनीवर आपटली.

" गप्प बसा रे सगळे जण ! पेनीला सांगू द्या त्याच्या शब्दांत. तुम्हीं सारे बैलासारख्या डरकाळ्या फोडायला लागलांत तर त्यानें बोलावं कसं ? "

## — ७ —

ज्योडीला वाटलें, आपल्या बाबांनीं सांगितलेली कहाणी त्यांन्थिन्य्यांत शिकारीपेक्षांही बहारदार आहे ! आपल्या बाबांबद्दलच्या अभिमानानें ...ळ्या फुटायलाच आली होती. पेनी बॅक्स्टर एवढा किरकोळ दिसायचा, ...ाले समजूं उत्तमोत्तम माणसांपेक्षां तो शिकारींत वरचढ होता. आणि एवढेंच ...ांगा सतरा जागीं बसून तो जें रहस्याचें नि जादूचें जाळें विणायचा तें कांहींहोती ...ी त्याची त्यानें तसेंच चालवलें होतें आणि तीं अजस्त्र केसाळ माणसें मं... आणि श्वास रोखून घेऊन त्याचें बोलणें ऐकत होतीं.

आपण काल कशी लढाई दिली त्याचें पेनीनें केलेलें वर्णन महाकाव्यच होतें ! बंदूक ' बॅक फायर ' झाली आणि स्लूफूट बाबानें ज्यूलियाला उचलून छातीशीं कवटाळलें हें ऐकून गॅबीनें तोंडांतला तंबाखू गपकन् गिळला आणि मग घुसमटल्यासारखें होऊन थुंकी टाकीत त्यानें शेकोटीकडे धाव घेतली. फॉरेस्टर मंडळींनीं आपल्या मुठी वळल्या आणि आपल्या बैठकीच्या अगदीं कांठावर कसें बसें बसून, तोंडें वासून त्यांनीं पेनीची हकीकत ऐकून घेतली.

" वाः ! " बकनें श्वास मोकळा सोडला. " मी तिथें असतों तर काय मजा वाटली असती ! "

" आणि हा स्लूफूट गेला कुठें आतां ? " गॅबीनें विचारलें.

" तें कुणालाच माहीत नाहीं " पेनीनें उत्तर दिलें.

कांहीं वेळ तिथें निस्तब्धता होती. शेवटीं लेम म्हणाला, " पण या सगळ्या इतिहासांत या कुत्र्याचं नांव तुम्हीं कुठेंच घेतलं नाहीं ? "

" मला आणखी गळ घालूं नका " पेनी म्हणाला, " सांगितलं ना तुम्हांला हें अगदीं रद्दी कुत्रं आहे म्हणून ? "

" पण या सगळ्या मारामारींतून तें तर चांगलं सहीसलामत सुटलेलं दिसतंय्. त्याच्या अंगावर एकसुद्धा खूण नाहीं. आहे ? "

" नाहीं. त्याच्या अंगावर मुळींच खूण नाहीं. "

" म्हणजे चांगलंच हुशार कुत्रं असलं पाहिजे. अस्वलाशीं झुंजून पुन्हां अंगावर एकही ओरखडा नाहीं ! "

पेनीनें आपल्या पाईपचे झुरके घेतले.

लेम उठला आणि त्याच्याजवळ गेला. त्याच्यापेक्षां किती उंच दिसत पाहिल.

छान दा ड. आपल्या बोटांचीं पेरें मोडलीं. त्याला खूप घाम सुटला होता.

लेला नाम्राल दोन गोष्टी हव्या आहेत, " तो घोगऱ्या आवाजांत म्हणाला. " या घाल रत ला मरण आलेलं मला प्रत्यक्ष बघायचं आहे. आणि तो कुत्रा कु म्हण ",

ओरडले. ण भलतंच ! " पेनी सौम्य स्वरांत म्हणाला. " हें कुत्रं तुला " त्व फसवणूक करण्याची माझी इच्छा नाहीं. "

" चल, त्यरें हो बोलायचं काम नाहीं. बोल ! — त्या कुत्र्याबद्दल काय हवंय् ? "

" त्यापेक्षां आमचा रिप देऊं का ? "

" एखाद्या कोल्ह्याचा आव आणूं नकोस. रिपपेक्षां चांगले कुत्रे आत्तां माझ्यापाशीं आहेत. "

लेम भिंतीजवळ गेला आणि खुंटीवरची एक बंदूक त्यानें खालीं काढली. ती लंडनच्या बनावटीची 'फाईन ट्विस्ट' बंदूक होती. तिची दुहेरी नळी चमचम करीत होती. दस्ता अक्रोडाच्या लाकडाचा होता – उबदार, चकचकीत. तिचे दोन्ही दट्टे दिसायला ऐटबाज होते. त्यांच्या वेगवेगळ्या भागांना आटे पाडलेले असून एकंदर रचना मोठी गुंतागुंतीची होती. लेमनें ती आपल्या खांद्यावर धरली, नेम धरून पाहिलें. मग त्यानें बंदूक पेनीच्या हातांत दिली.

" थेट इंग्लंडहून आणलेली आहे. नळींतून गोळ्या भरण्याची आतां जरूर नाहीं. हिच्यांत छरे भरणं म्हणजे अगदीं सोपं काम. गोळ्या भरायच्या, बंदूक मोडायची, ताठ करून नेम धरायचा... बॅम्–बॅम्! दोन बार उडवायचे ! गोळ्या अशा सुटतात कीं जशी गरुडाची झेप. सौदा पटतोय् ? "

"छे छे!" पेनी म्हणाला. "कांहीं तरीच! ही बंदूक किती मौल्यवान आहे."

"होय-पण अशा आणखी बंदुका आहेत त्याच भिंतीवर! बाबा रे! माझ्याशीं वाद घालत बसूं नकोस. मला कुत्रा हवा आहे. त्याच्या बदलीं मुकाट्यानें ही बंदूक घे. नाहीं तर येऊन कुत्रं चोरून नेईन."

"ठीक आहे, बाबा —" पेनी म्हणाला. "पण या साक्षीदारांच्या देखत एवढं कबूल कर-या कुत्र्याबरोबर शिकार करण्याचा एकदा अनुभव आल माझं कांडात काढायचं नाहीं!"

"शेक--" एक केसाळ हात पुढें झाला आणि त्यानें अन्यथांत गळ्या पकडला. "यू... पोरा, यू!"

लेमनें शीळ घालून कुत्र्याला जवळ बोलावलें. त्याची नें आले समजूं सांगा सतरा त्याला उचललें आणि बाहेर नेलें. जणूं कांहीं अजूनदेखील हुं होती ही त्याची जाईल अशी त्याला भीति वाटत होती!

पेनीनें खुर्चीतल्या खुर्चीत सरकल्यासारखें केलें. बंदूक गुडघ्यावर बेदरकारपणें आडवी ठेवली. किती उत्कृष्ट होती पण! तर तिच्यावरून ढळेना. आपल्या बाबांनीं एका फॉरेस्टरवर मात के... केवढा दरारा त्याला वाटत होता! पण त्याला शंका वाटत होती--लेम आपलें वचन पाळील का? व्यापारांतल्या भानगडींबद्दल त्यानें ऐकलेलें होतें; पण निव्वळ खरें बोलण्याची सोपी युक्ति लढवून व्यापारांत दुसऱ्याला जिंकतां येत असेल अशी त्याला कधीं कल्पनाच झाली नव्हती.

दुपार झाली तरी मंडळींच्या गप्पा चालूच होत्या. बकनें पेनीची जुनी शॉटगन घट्ट करून आपल्या मतें तिची कामचलाऊ दुरुस्ती केली.

फॉरेस्टर मंडळींना कशाचीही घाई नव्हती. कसलाही उद्योग नव्हता. स्लूफूट बाबाच्या चपळपणाबद्दल अनेक आख्यायिका सांगण्यांत आल्या. त्याच्या पूर्वीच्या कांहीं अस्वलांच्याही गोष्टी निघाल्या. पण त्यांत स्लूफूटसारखा हुशार, म्हणे, कुणीही नव्हता. अस्वलाच्या पाठलागाचीं तपशीलवार वर्णनें करून झालीं. ज्यांना मरून आतां वीस वर्षें लोटलीं होतीं अशा कुत्र्यांचीं नांवें निघालीं; त्यांच्या कामगिरीचा उल्लेख झाला. फॉडरविंगला तें सर्व ऐकून कंटाळा आला. तळ्याकडे जाऊन मासळी पकडण्याची त्याला हुरहुर लागली. पण या जुन्या कहाण्या ऐकण्याचें

सोडून ज्योडीला तिथून जाववेना. शेवटीं एकदाचे पेनीनें हातपाय ताणले आणि तो उठला.

तो म्हणाला, "इतकी चांगली संगत सोडून जायचं म्हणजे माझ्या जिवावर येतंय्!"

"रात्रीं राहा ना!—आपण कोल्ह्याची शिकार करूं."

"थँक् यू! पण घरीं कुणी पुरुष माणूस नसतांना दूर राहणं मला बरोबर गटत नाहीं."

पाहिल्फॉडरविंगनें त्याची बाही पकडली.

छान द्या डोडीला राहूं द्या ना माझ्याजवळ. त्यानें अजून माझ्या सगळ्या जमती लेला नासालहींत."

घालायचां परत्ला, "खरंच, पेनी. त्याला राहूं दे. मला उद्यां व्हॉल्यूशियाला

रक्र म्हण हां जातांना घोड्यावरून पोचवीन त्याला तुमच्या घरीं."

ओरडलें. रण ठआई ओरडेल कीं!"

"त्वर्थ कामच आहे तें. हो कीं नाहीं, ज्योडी?"

"चल, त्यरे मला राहायला फार आवडेल. मला कित्ती दिवस खेळायला ...हीं."

"कित्ती दिवस म्हणजे परवांपासून, होय ना? अच्छा! राहा तूं. या मंडळींना हवा असशील तर राहा. लेम, संभाळ हो! पोराला घेऊन बक आमच्या घरीं येण्याच्या आधीं तूं या कुत्र्याची परीक्षा पाहशील अन् मग रागावून या पोरालाच ठार मारशील! तसं कांहीं करूं नकोस हो."

हें ऐकून सर्व मंडळी खो खो हसली. पेनीनें आपली जुनी नि नवी अशा दोन्ही बंदुका खांद्याला लटकावल्या आणि तो आपल्या घोड्याजवळ गेला. ज्योडी त्याच्या पाठोपाठ आला. बंदुक किती गुळगुळीत आहे हें त्यानें चाचपून पाहिलें.

"लेमच्या जागीं दुसरं कोणी जरी असतं –" पेनी हळूच म्हणाला, "तरी ही बंदुक घरीं न्यायला मला लाज वाटली असती. लेमनें माझं नांव पाडलन् तेव्हांपासून त्याचा सूड उगवायचं ठरवलं होतं मीं."

"पा! तुम्हीं त्याला खरं तेंच सांगितलंत."

"बेटा, माझे शब्द सरळ होते. पण माझे हेतु ओक्लाहावा नदीसारखे वाकडे वाकडे होते."

" त्याला खरी गोष्ट कळली म्हणजे तो काय करील हो ? "

" पहिल्यानें त्याला वाटेल या माणसाला खाऊं का गिळूं ? पण मग तो नुसता हसेल ! – बरंय्, पोरा. उद्यां भेटूं आपण. नीट वाग, बरं का ? "

त्याच्या मागोमाग फॉरेस्टर मंडळी निरोप द्यायला आली. ज्योडीला एकलेपणाची नवीनच भावना झाली आणि तशा स्थितींत त्यानें बाबांना हात हालवून निरोप दिला. त्यांना परत बोलावून घ्यावें असा क्षणभर त्याला मोह झाला. धांवत त्यांच्या मागें जावें, त्यांच्यापुढें खोगिरावर चढून बसावें आणि बखळींतल्या आपल्या निवाऱ्याकडे वळावें असें क्षणमात्र त्याला वाटलें.

फॉडरविंगनें हाक मारली, " ज्योडी ! रकून बघ, डबक्यांत मासे धरतंय् ! लवकर ये बघायला. "

तो धावतच रकूनला बघायला गेला. पाण्याच्या लहानशा डबक्यांत तें पंजे फिरवीत होतें. माणसासारख्या आपल्या हातांनीं तें कांहींतरी चाचपडून पाहत होतें. केवळ उपजत बुद्धीनें त्याला सांगितलें होतें, कीं इथें कांहींतरी आहे. मग ज्योडीनें उरलेली दुपार फॉडरविंगशीं नि रकूनशीं खेळण्यांत घालवली. खारीचें खोकें धुवायला त्यानें मदत केली. एका पांगळ्या लाल पक्ष्यासाठीं पिंजरा तयार करायला त्यानें हातभार लावला. पुन्हा एकदा ज्योडीला मघासारखी हुरहुर वाटली— आपल्या स्वतःचें हक्काचें कांहींतरी असावें असें त्याला वाटूं लागलें. ती काळ्या .. तोंडाची खार त्याला द्यायला फॉडरविंग तयार होता. पण मागच्या अनुभवावरून तो धडा शिकला होता. घरांत आणखी एक जीव पोसायला आणून – मग तो कितीही लहान असेना – आईला दुःख देण्यांत अर्थ नाहीं हें त्याला माहीत होतें.

दोघे पुन्हा खोपटाकडे वळले. फॉरेस्टरांची जमीन विखुरलेली होती. ज्या बाजूला जेव्हां मोर्चा वळेल तेव्हां तो तो जमिनीचा तुकडा त्यांनीं स्वस्थपणें, आरामांत खरेदी केला होता. या ठिकाणीं स्वास्थ्य होतें, विपुलता होती – आणि अत्याचारही होता. कामें करायला घरांत माणसें कितीतरी होतीं. जवळ जवळ त्यांच्याच जागेएवढ्या मोठ्या बखळींतलें काम पेनी बॅक्स्टर एकट्यानें करायचा. शेतांतले किती वाफे उकरायचे तसेच टाकून आपण आलों आहों याची आठवण होऊन ज्योडीला अपराध्यासारखें वाटलें. पण तें काम आपले बाबा खुपीनें पुरें करतील हें त्याला माहीत होतें.

सूर्य पश्चिमेला तांबडालाल दिसत होता. काळोख फार झपाट्यानें पडूं

लागला. बॅक्स्टरच्या बखळींत अजून लख्ख ऊन असेल; पण या ठिकाणीं ऊन अडवायला उंच उंच ओक झाडें होतीं. एकामागून एक सर्व भावांची फरड खोपटांत शिरली.

रात्रीच्या जेवणानंतर फॉरेस्टर मंडळी धूम्रपान करीत बसली; घोड्यांबद्दल गप्पा मारूं लागली. ज्योडी नि फॉडरविंग यांना त्या बोलण्यांत रस वाटेनासा झाला. तेव्हां एका कोपऱ्यांत जाऊन ते 'मंब्ल-डी-पेग *' खेळूं लागले. मा बॅक्स्टरनें आपल्या स्वच्छ गुळगुळीत जमिनींत चाकू रोवायला कधींही परवानगी दिली नसती. पण यांच्याकडे तसें नव्हतें. एखाद दुसरी चिरफळी कमी जास्त झाली तर मोठंसें लक्षांत येण्यासारखें नव्हतें. खेळ झाल्यावर ज्योडी ताठ उभा राहिला.

"मी पैज मारून सांगतों—तुला माहीत नसलेली एक गोष्ट मला माहीत आहे!"

"ती कोणती?"

"आमच्या फाटकाच्या अगदीं पुढच्या बाजूनें स्पॅनियर्ड जात असत."

"अं:! तें तर मला माहीत आहे." कुबडा फॉडरविंग अगदीं जवळ येऊन त्याला चिकटला आणि हळूच म्हणाला, "मीं त्यांना पाहिलंय्!"

ज्योडीनें डोळे ताणून त्याच्याकडे बघितलें.

"कुणाला पाह्यलं आहेस तूं?"

"स्पॅनियर्डना पाह्यलंय्. उंच नि काळे असतात ते. डोक्यावर चकचकीत हेल्मेटं घालतात आणि काळ्या घोड्यांवर बसतात."

"तूं त्यांना पाहणं शक्यच नाहीं. स्पॅनिश लोक आतां शिल्लकच नाहींत. ते इथून निघून गेले—इंजन गेले ना, तसेच."

फॉडरविंगनें आपल्याला सर्व समजतें असें दाखवण्यासाठीं एक डोळा मिटला.

"तसं लोकं सांगतात तुला. तूं माझं ऐक. तुमचं तें पाण्याचं विवर आहे ना, त्याच्या पश्चिम बाजूला तूं जेव्हां पुन्हा जाशील तेव्हां—तुला तें मॅग्नोलियाचं मोठं झाड माहीत आहे ना? भोवतीं सगळीकडे डॉगवुडचं रान उगवलं आहे, तें

* चाकूचा खेळ. या खेळांत बंद मुठीवर चाकू ठेवून तो कौशल्यानें पाडून जमिनींत रुपेल असें करायचें असतें.

झाड! त्या झाडाच्या मागें बघ नीट. तिथून नेहमींच एखादा स्पॅनियर्ड जातांना दिसतो – काळ्या घोड्यावर स्वार होऊन!"

ज्योडीच्या मानेवरचे केस ताठ झाले. फॉडरविंगच्या मनच्या गोष्टींतलीच ही एक असणार! एवढ्यासाठींच तर आपले बाबा नि आई बजावत असतात, कीं फॉडरविंग चक्रम आहे. पण ज्योडीला मात्र या गोष्टीवर विश्वास ठेवावा असें मनापासून वाटत होतें. निदान त्या मॅग्नोलियाच्या मागें एकदा निरीक्षण करण्यानें कांहींच बिघडणार नव्हतें.

फॉरेस्टर मंडळींनीं हातपाय ताणले, पाईप झटकले, तोंडांतला तंबाखू थुंकून टाकला. मग ते आपापल्या झोपायच्या खोल्यांत गेले. त्यांनीं विजारीचे पट्टे सोडले, विजारी सैल केल्या. फॉडरविंगनें ज्योडीला स्वतःच्या बिछान्याकडे नेलें. सैंपाकघराच्या वळचणीखालीं पोटमाळ्यासारखी एक खोली होती, ती त्याची झोपायची खोली.

"उशी, वाटलं तर तुला घे" त्यानें ज्योडीला सांगितलें.

ज्योडी आपल्याशींच नवल करीत होता — 'पाय धुतलेस का?' म्हणून आई विचारील का याची? ही फॉरेस्टर मंडळी किती मोकळेपणीं राहायची! — पाय न धुतांच अंथरुणांत पडायचं. फॉडरविंगनें एक टोलेजंगी गोष्ट सांगायला सुरवात केली — जगाच्या अंताची गोष्ट होती ती! तो म्हणाला, "त्या वेळीं किनई, सगळं पोकळ पोकळ असेल — आणि नुसता अंधार – अंधार! नुसतें ढग असतील; त्यांच्यावर स्वार होऊन जायचं!" पहिल्या पहिल्यानें ज्योडी या गोष्टींत रंगला. मग त्याला वाटलें, गोष्टीला फारच फाटे फुटताहेत आणि ती रुक्षच बनते आहे,

आणि मग त्याला एकदम डुलकी लागली. झोपेंत त्यानें स्वप्नें पाहिलीं तीं पण स्पॅनियर्ड लोकांचीं. मात्र घोड्यांऐवजीं ते ढगांवर स्वार झाले होते!

## — ८ —

ज्योडीला एका गोष्टीचा नेहमीं चमत्कार वाटे. ती ही कीं आपण जेव्हां जेव्हां बखळ सोडून दूर जातों तेव्हां, परत आल्यावर पूर्वी लक्षांत न आलेल्या कांहीं गोष्टी आपल्याला तिथें आढळतात. खरें म्हणजे त्या पूर्वींदेखील सदोदित

तिथें असायच्याच. आत्तांच पाहा ना — तुतीच्या फांद्यांना कोंवळ्या फळांचे पुंजके चिकटलेले दिसत होते. पण फॉरेस्टरांच्या घरीं जाण्यापूर्वी ज्योडीच्या ते नजरेला सुद्धा पडले नव्हते. त्याच्या आईचे कुणी आप्त कॅरोलिनांत असत; त्यांनीं पाठविलेली ती स्कपरनॉंगची वेल — तिला प्रथमच मोहर आला होता. किती नाजूक आणि लेसीसारखा! रानांतल्या सोनेरी मधमाशांना त्याच्या सुगंधाचा सुगावा लागला होता; आणि आतां त्यांतला मध चोखून घेण्यासाठीं त्या आपले हात टेकून उभ्या राहिल्या होत्या.

सर्पणाचें खोकें रिकामें होत आलें होतें; तें भरावें म्हणून ज्योडी रेंगाळतच बाहेर गेला. कांहींतरी काम करण्याच्या मनःस्थितींत तो होता. पण तें काम सौम्य नि सावकाश करण्याजोगें असावें असें त्याला वाटत होतें. खोक्यांत लाकडें टाकण्यासाठीं अशाच धीरे धीरे दोन खेपा त्यानें केल्या. म्हातारी ज्यूलिया पेनीच्या शोधार्थ इतस्तः खुरडत चालली होती. तिचें डोकें थोपटण्यासाठीं ज्योडी खालीं वाकला. या ब्खळींत जी एक प्रकारची समाधानाची – सुब्त्तेची – भावना भरून राहिली होती तिच्यांत ज्यूलियाही जणूं वांटेकरी असावी! किंवा कदाचित् तिला असें वाटत असावें कीं इथल्या दलदलींतून, गवताच्या रानांतून अन् पाणथळ भागांतून आपल्याला धावायला मिळावें म्हणूनच देवानें आपलें आयुष्य थोडें वाढवलें! ज्योडीनें थोपटलें तेव्हां आपली लांबलचक शेपटी हलवीत ती निमूटपणें उभी राहिली. ज्योडीनें पाहिलें तों त्याचे वडील कोठारांच्या नि गोठ्याच्या बाजूनें रस्त्यावरून घराकडे येत होते. त्यांनीं हातांत कांहींतरी चमत्कारिक वस्तु लोंबकळत धरली होती. त्यांनीं ज्योडीला हाक मारली.

"ओः! काय असेल बरं तें? मला अशी उत्सुकता लागली आहे किनई!"

ज्योडी धावत वडिलांजवळ गेला. ती मलूल वस्तु म्हणजे एक प्राणीच होता. म्हटलें तर अनोळखी, म्हटलें तर चांगलाच ओळखीचा. रकून होतें तें! पण नेहमींप्रमाणें कबऱ्या लोखंडी वर्णाचें नव्हतें. चांगलें सायीसारखें पांढरें होतें. ज्योडीचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना.

"हें पांढरं कसं काय हो, पा? म्हातारं आजोबा–कून आहे कीं काय?"

"तेंच तर मला विचित्र वाटतंय्. पांढऱ्या डोक्याचं रकून कधीच नसतं. अं हं! मी सांगूं का? हा तो क्वचित् मिळणारा प्राणी आहे – पुस्तकांत त्याचं

नांव आल्त्रिनो म्हणून दिलेलं असतं बघ! जन्मतःच पांढरं. त्याच्या शेपटावरचीं हीं वळीं पाहिलींस? तीं आतां काळीं पडत चाललीं आहेत."

दोघे वाळूंत बसले आणि त्यांनीं रकूनची तपासणी चालवली.

"हें सांपळयांत सांपडलं का हो, पा?"

"हो—सांपळयांत. खूप लागलं होतं त्याला; पण मेलेलं नव्हतं. तुला खरं सांगतों, याला मारायचं जिवावर आलं माझ्या."

ज्योडीला कांहीं तरी गमावल्याचें दुःख झालें. जिवंत आल्त्रिनो आपल्याला बघायला मिळालें नाहीं याचें त्याला वाईट वाटलें.

"मी उचलतों त्याला, पा."

तो मेलेला प्राणी त्यानें आपल्या दोन हातांची झोळी करून उचलला. त्याची फिकट रंगाची लोकर विशेष मऊ लागत होती. पोटावरची लोकर तर, अंड्यांतून बाहेर पडलेल्या कोंबडीच्या पिल्लांची लव असते ना, तशी मऊ होती. ज्योडीनें हळुवारपणें त्याला गोंजारलें.

"पा! हें लहान असतांनाच त्याला पकडून पाळतां आलं असतं तर मला मजा वाटली असती."

"पाळीव प्राणी म्हणून तें सुरेख दिसलं असतं, बाळ. पण शेवटीं बहुतकरून जातीवर गेलं असतं, कूनची जातच नीच."

फाटकांतून आंत शिरून त्यांनीं घराला वळसा घातला आणि सैंपाकघर ज्या बाजूला होतें तिकडे गेले.

"फॉडरविंगनें तर मला सांगितलं कीं त्याच्या रकूनपैकीं एकही कून मोठंसं नीच बीच नाहीं."

"होय, पण फॉरेस्टर मंडळींचं निराळं आहे. त्यांच्यापैकीं कुणाला कून चावलं तर कदाचित् लक्षांतही यायचं नाहीं."

"फॉरेस्टर उलट चावेल असाच संभव जास्त, होय ना पा?"

यावर दोघेही एकदम हसले. आपल्या शेजाऱ्यांचें चित्र त्यांच्या डोळयांपुढें उभें राहिलें होतें.

मा बॅक्स्टर त्यांना दारांत भेटली. तो मेलेला प्राणी पाहून तिचा चेहरा एकदम उजळला.

" सांपडला का तुम्हांला ? बरं झालं ! हाच नेहमीं माझीं कोंबडीं पळवीत असायचा."

" पण मा — " ज्योडी तिला विरोध करीत म्हणाला, " याच्याकडे बघ तरी. हें पांढरं आहे. असलं कून पाहायला मिळत नाहीं."

पण मा बेफिकीरपणें म्हणाली, " चोरच कांहीं झालं तरी ! — कातड्यांत तरी नेहमींपेक्षां कांहीं विशेष आहे का ? "

ज्योडीनें बाबांकडे पाहिलें. पेनी कट्ट्याजवळ उभा होता आणि पाण्याच्या घमेल्यांत त्यानें डोकें घातलें होतें. साबणाच्या फेसाआडून त्यानें मुलाकडे पाहून एक डोळा मिचकावला.

" एक निकेलचं नाणंही मिळायचं नाहीं बहुतकरून " तो बेफिकीरपणें म्हणाला. " पण ज्योडीला एक लहानशी पिशवी हवी आहे. तेव्हां त्यालाच वापरूं द्यावं चामडं. "

असो. जिवंत ' आल्बिनो रकून ' नाहीं तर नाहीं. त्याच्या त्या विलक्षण मऊ लोकरीची पिशवी मिळालेली त्याच्या खालोखाल चांगलीच. ज्योडीला आतां तोच ध्यास लागला. त्याला न्याहारी पण सुचेना. आपल्याला वाटणारी कृतज्ञता त्याला कुठून तरी व्यक्त करायची होती.

" पा ! मी पाण्याची डोणी साफ करतों. "

पेनीनें मानेनें रुकार दिला.

" मी आपला दर वर्षीं विचार करतोंय् कीं एखाद्या वसंत ऋतूंत आपल्यासाठीं माणसं लावून विहीरं खोदवून घेईन. तेवढं एकदा केलं कीं या पाण्याच्या हौदांत खुशाल केर भरायला हरकत नाहीं. पण विटा फार महाग आहेत रे ! "

" पाणी वाटेल तसं वापरणं मला जमेल तरी कीं नाहीं, कुणास ठाऊक ! आज वीस वर्षं मी पाण्याला जपतें आहें ! " मा बॅक्स्टर म्हणाली.

" जरा धीर धर, मा " पेनी तिला म्हणाला.

त्याच्या चेहऱ्यावर रेखा उमटल्या. पाणी भरपूर नसल्यामुळें आपल्या बाबांना किती त्रास सोसावा लागतो तें ज्योडीला माहीत होतें. आईपेक्षां नि मुलापेक्षां वडिलांनाच त्या बाबतींत जास्त कष्ट पडत. ज्योडीवर सर्पणाचें काम सोंपवलेलें होतें; पण बैलाचें जूं आपल्या काटकोळ्या खांद्यावर टाकणें, त्याच्या दोन्ही टोकांना सायप्रेसच्या लाकडाचीं तीं भलींमोठीं बकेटें अडकवणें आणि मग

खळीपासून रेताड रस्त्यावरून थेट पाण्याच्या विवरापर्यंत जाणें, तिथें नुसत्या झिरपत्या पाण्यानेंच जे डोह तयार झालेले असत त्यांतलें — शेवाळानें पिवळ-सर झालेलें पण रेतीमुळें गाळून स्वच्छ बनलेलें — पाणी भरून आणणें, हीं सर्व कामें पेनीला स्वतःलाच करावीं लागत. आणि हे सर्व श्रम तो करी ते जणूं क्षमायाचनेच्या भावनेनें. कांहीं थोडेसेच मैल अंतरावर ओढे, नद्या नि चांगल्या-पैकीं विहिरी असतांना असल्या खरखीत जागेंत आपण आपल्या कुटुंबाला आणलें या कृत्याची पेनी जणूं फेड करीत होता! बाबांनीं ही जागा कशासाठीं निवडली असें नवल ज्योडीला आयुष्यांत प्रथमच वाटूं लागलें. त्या विवराची एक बाजू फारच उभी नि अवघड होती; ती उतरून जावें तेव्हां डोह लागत. हें मनांत येऊन त्याला क्षणमात्र असें वाटलें कीं, 'खरंच! आपण नदीच्या कांठींच कां राहिलों नाहीं?' इतकें असूनही ही खळ — देवदार वृक्षांचें हें बेट म्हणजे त्याची दुनिया होती. दुसऱ्या ठिकाणचें जीवन म्हणजे त्याच्या दृष्टीनें, सांगायच्या नि ऐकायच्या गोष्टी. ऑलिव्हर हटो नाहीं, आफ्रिकेच्या, चीनच्या नि कनेक्टि-कटच्या गोष्टी सांगे? तशाच.

ज्योडी उठला आणि आस्ते आस्ते दाराकडे गेला.

पेनी म्हणाला, "बेटा, तूं जा पाहूं पुढें पाण्याकडे. मी तुझ्या या कूनचं कातडं सोलून आलोंच."

त्या दिवशीं चांगलें ऊन्ह पडलें होतें आणि वारा वाहत होता. ज्योडीनें परसांतल्या शेडमधून एक खोरें आणलें आणि रस्ता धरला.

'जगाचा अंत या पाण्याच्या विवरासारखाच असेल' ज्योडीच्या मनांत विचार आला. 'फॉडरविंगनें सांगितलन् कीं प्रलयकाळीं सगळीकडे पोकळी नि अंधार असेल. फक्त ढग असतील, वर स्वार होण्यासाठीं. पण खरं खोटं कुणा-लाच माहीत नाहीं. एवढं खरं कीं तो प्रलय जवळ आला म्हणजे या विवराच्या कांठाजवळ आल्यावर जसं वाटतं तसं वाटेल. त्या जगाच्या अंताचा शोध सर्वांत आधीं मला लागेल का?'

ज्योडीच्या पायाशीं एक छोटेंसें जग होतें — खोल, वक्राकार, एखाद्या मोठ्या वाडग्यासारखें. कधी कधीं हीं विवरें थोडेसेच फूट खोल अन् अरुंद असत. बॅक्स्टरचें हें विवर मात्र साठ फूट खोल होतें; आणि रुंद तर इतकें होतें कीं त्याच्या एका कांठावर बसलेली खार पेनीला आपल्या जुन्या बंदुकीनें मारतां

येत नसे. या विवरांत ज्योडी वाकून डोळे ताणून जेव्हां पाहूं लागला तेव्हां त्याला वाटलें, फॉडरविंगनें सांगितलेल्या गोष्टींपेक्षांही चमत्कृतिपूर्ण अशी या विवराची रचना दिसते !

त्या विवरांत ज्योडीला एक मोठें द्रोणाकृति उद्यान दिसत होतें. हिरव्यागार पनांची मऊ लव त्याच्यावर होती – थंडगार, आर्द्र नि रहस्यमय.

विवराच्या तळाशीं उतरायची पाऊलवाट पश्चिमेच्या कांठावरून होती. हीच वाट तुडवीत आपलीं गुरें घेऊन पेनी वर्षानुवर्षें खालीं उतरला होता. त्यामुळें रेतींत अन् चुनखडींत ती चांगली खोल खोदल्यासारखी दिसत होती. हवा कितीही रखरखीत असली तरी या विवराच्या कडांमधून पाण्याची संततधार झिरपत असे. तळाशीं पाण्याचा एक उथळ डोह तयार झाला होता. हें पाणी सांचलेलें खराब पाणी होतें. तहान भागवण्यासाठीं तिथें जा ये करणाऱ्या प्राण्यांनीं तें गढूळ केलेलें होतें. पेनीकडचीं डुकरेंच तेवढीं हें पाणी पिण्यासाठीं नि डुंबण्यासाठीं वापरीत. इतर जनावरांकरतां आणि आपल्या कुटुंबाकरतां पेनीनें शक्कल लढवून एक व्यवस्था केली होती. विवराच्या पूर्व बाजुला, म्हणजे उतरायची वाट होती त्याच्या विरुद्ध दिशेला चुनखडीच्या कपारी फोडून त्यानें कांहीं डोणी तयार केल्या होत्या. त्यांत झिरपलेलें पाणी सांठत असे. त्यांतली सर्वांत खालच्या अंगाची डोणसुद्धा विवराच्या तळापासून खांद्याइतक्या उंचीवर होती. आपल्या गाईला, वासरांना नि घोड्याला तो या डोणींतलें पाणी पाजी. आपल्या ऐन तारुण्यांत त्यानें ज्या दुधाळ रंगाच्या बैलांच्या जोडीवर जूं चढवून आपली जमीन साफ केली होती तिला त्यानें पाणी पाजण्यासाठीं याच ठिकाणीं आणलें होतें. आणखी थोडे यार्ड वरच्या अंगाला त्यानें दोन जास्त खोल डोणी खोदल्या होत्या. या डोणींवर त्याची बायको आपला लाकडी पाटा नि धोपटणें आणून कपडे धूत असे.

जनावरांच्या नि कपडे धुण्याच्या या डोणी टाकून आणखी वर गेलें कीं शेवटची चिंचोळी पण खोल डोण होती. तिच्यांत सांचणारें पाणी फक्त पिण्याच्या नि सैंपाकाच्या कामासाठीं वापरलें जाई. याच्या वर विवराचा कांठ इतका उभट नि अवघड होता कीं या ठिकाणचें पाणी खराब करायला कोणतेंही श्वापद जाईल हें शक्य नव्हतें.

• • •

विवरांतल्या वाटेवर गचके खात ज्योडी आंत उतरला. उतरण अगदींच उभट असल्यामुळें त्याला हातांतल्या खोऱ्याचा आधार घ्यावा लागत होता. आंत उतरतांना त्याला नेहमींच मोठी मजा वाटत असे. तो एकेक पायरी खालीं उतरत गेला तसे विवराचे कांठ वर चढत असलेले त्याला दिसले. पायरी मागून पायरी उतरत असतांना झाडांचे शेंडे एकामागून एक मागें पडत होते. वाऱ्याची एक झुळुक आली आणि त्या हिरव्या 'द्रोणां'त भोंवऱ्यासारखी फिरली. तिनें गारव्याच्या लहरी उत्पन्न केल्या. पानांनीं आपले चिमुकले हात 'फलक् फलक्' हालवले. रीप क्षणमात्र मिटून भुईसपाट झाली. एक लालपक्षी विवराच्या या कडेपासून त्या कडेपर्यंत कमान करून उडाला. मग त्यानें एक वळण घेतलें आणि डोहाजवळ येऊन आपटला — एखादें चकचकीत पान तुटून पडावें तसा. ज्योडी दिसल्या-बरोबर तो भुर्रकन् वर उडाला आणि दिसेनासा झाला. डोहाजवळ येऊन ज्योडीनें गुडघे टेकले.

एक प्रकारच्या एकांताच्या भावनेनें त्याला घेरलें. पण त्याला एकटें मात्र वाटत नव्हतें. त्यानें ठरविलें कीं आपण मोठे झालों म्हणजे या डोहाजवळ स्वतः-साठीं एक लहानसें घर बांधूं. प्राण्यांनाही त्याची संवय होईल आणि मग चांदण्या रात्रीं ते डोहावर पाणी पीत असलेले आपण घराच्या खिडकींतून पाहूं.

विवरांतल्या सपाट भुईवरुन तो पलीकडे गेला आणि कांहीं फूट वर चढून त्यानें ती गुरांसाठीं केलेली डोण गाठली. खोरें खांद्यावर टाकून डोणीपर्यंत चढणें म्हणजे मुष्किलीचेंच काम होतें. त्यानें खोरें टाकून दिलें आणि दोन्ही हातांनीं कामाला लागला. पानें आणि वाळू सांचून त्यांचा जाड थर बनला होता. तो त्यानें जोरजोरानें उकरला. तेव्हां एकदांची चुनखडींतली पांढरी शुभ्र आणि स्वच्छ डोण त्याला दिसूं लागली. त्याचें समाधान झालें आणि तो आणखी वर चढायला लागला; कारण पाण्याच्या त्या दुसऱ्या मोठ्या डोणी साफ करण्याचें जास्त कष्टाचें काम त्याला आतां पार पाडायचें होतें.

सर्वांत वरच्या, म्हणजे प्यायच्या पाण्याच्या डोणीजवळ तो पोंचला तेव्हां दमून गेला होता. या ठिकाणची चढण इतकी सरळ होती कीं, डोणीच्या कांठाला आपलें पोट टेकून नुसतें आंत डोकें वांकवण्याचा अवकाश, त्याला एखाद्या हरणा-प्रमाणें पाणी पितां आलें. सबंध डोणीभर त्यानें आपली जीभ फिरवली; आपलें तोंड पाण्यांत पूर्णपणें बुडवलें, एकदा या बाजूला नि एकदां त्या बाजूला तोंड

हालवलें; त्यामुळें त्याचा आधी हा गाल नि मग तो गाल धुतला गेला आणि त्याला थंडगार वाटलें. खालीं डोकें करून आणि दोन्ही हातांवर आपलें वजन पेलीत तो डोणींत उलटा उभा राहिला. आपल्याला श्वास किती वेळ रोखून धरतां येतो हें त्यानें पाहिलें; पाण्यांत बुडबुडे काढले. तेवढ्यांत विवराच्या तळाकडून त्याच्या बाबांचा आवाज त्याला ऐकूं आला.

"काय रे बेटा, एवढी का तुला पाण्याची गंमत वाटते आहे ? हेंच पाणी घरीं नेऊन हात धुवायच्या भांड्यांत ठेवलें कीं लगेच कसं तुला तें घाण वाटायला लागतं नाहीं ?"

तो मागें वळला. पाण्यानें नुसता थबथबत होता.

"पा ! तुम्ही केव्हां आलांत तें मला कळलंच नाहीं."

पेनी चढण चढून वर आला. आणि त्यानें खालच्या डोणी तपासल्या. त्यानें मान डोलावली. धुणी धुवायच्या डोणीच्या कांठाला टेकून तो आंत वाकला आणि दांतांनीं एक काडी कुरतडायला लागला.

"मी खरंच सांगतों." तो म्हणाला, "तुझी मा जेव्हां, 'वीस वर्षं' म्हणाली ना, तेव्हां मला चांगला धसका बसला. इतका काळ गेला असेल असं माझ्या कधीं हिशेबींच नव्हतं. एक एक करतांना माझीं किती वर्षं निघून गेलीं — मला त्यांचा पत्ताही नाहीं किंवा हिशोबही नाहीं. प्रत्येक वसंत ऋतूंत मी आपला ठरवायचा कीं तुझ्या मासाठीं एक विहीर खणूं. आणि मग दुसरंच कांहींतरी निघायचं. आज काय, बैल घ्यायला हवाय्, उद्या काय, गाय चिखलांत रुतली अन् मेली. किंवा पोरांपैकीं एखादं आजारी पडलं अन् मेलं. विहिरी खणायला मग मला कुठला उत्साह राहणार ? औषधांचे पैसे भरतांनाच पुरेवाट व्हायची. विटा किती भयंकर महाग ! — आणि एकदा मी खणायला लागलों, आणि तीस फूट खोल खणून सुद्धा जेव्हां पाणी लागलं नाहीं, तेव्हां मी समजून चुकलों, कीं हें सगळं फुकट आहे. पण वीस वर्षंपर्यंत एखाद्या बाईला डोंगरांतल्या झऱ्यावर कपडे धुवायला पाठवायचं म्हणजे काय रे !"

ज्योडी गंभीरपणें ऐकत होता.

तो म्हणाला, "पा ! आपण कांहीं झालं तरी एक दिवस तिला विहीर बांधून देणारच."

"वीस वर्षं —" पेनी पुन्हा आपल्याच नादांत उद्गारला. "पण सारख्या

मुळीं कांहींतरी अडचणी यायच्या! आणि मग तें युद्ध — आणि मग पुन्हां एकदा जमिनीची पहिल्यापासून सफाई!"

तो डोणीला टेकून उभा राहिला. गत वर्षांचें तो जणू सिंहावलोकन करीत होता.

"मी पहिल्यानें जेव्हां इथें आलों," तो म्हणाला, "सुरवातीला जेव्हां ही जागा मीं निवडली आणि इथें आलों, तेव्हां माझं मन आशेनें भरलेलं होतं—"

सकाळचा प्रश्न पुन्हा ज्योडीच्या मनांत डोकावूं लागला.

"ही जागा तुम्हीं कशी निवडलीत हो, पा?"

"अं — मीं ही जागा निवडली कारण --" त्याचें मुख आक्रसल्यासारखें झालें. त्याचें मन शब्द शोधीत होते. "मला मनःशांति हवी होती, एवढंच"

— ९ —

हरिणींना पिलें होत होतीं. त्यांच्या चिमुकल्या टोकदार खुरांनीं रानांत उमटवलेली नाजुक नक्षी पाहून ज्योडीनें हें ओळखलें. तो कुठेंही गेला — विवराकडे असो, गोठ्याच्या दक्षिणेकडे जी देवदारांची झाडी होती तिथें लाकूडफाटा आणायला गेलेला असो, किंवा त्रासदायक प्राण्यांना पकडण्यासाठीं नाइलाज म्हणून त्याचे बाबा जे सापळे लावीत तिकडे गेलेला असो, तो नेहमीं जमिनीवर दृष्टि लावून चालायचा. हरणाचीं पोरें कुठून आलीं, कुठें गेलीं याच्या खुणा शोधायचा. सर्वांत पुढें बहुधा हरिणींचे खूर उमटलेले असत. पण त्या मोठ्या सावधान असायच्या. पुष्कळदा हरिणी जिथें एकटी चरलेली असे त्या जागीं, अगदीं एकीकडे, तिची पावलें उमटलेलीं असत; तर पाडसाच्या खुरांच्या अस्ताव्यस्त खुणा दूर कुठेंतरी उमटलेल्या असत. कारण एखादें भक्कम आसऱ्याचें ठिकाण शोधून तिथें आईनें बाळाला सुरक्षित ठेवलेलें असे. कधीं कधीं जुळीं पाडसें असत. ज्योडीनें जेव्हां अशा दुहेरी खुणा पाहिल्या तेव्हां त्याचा आनंद पोटांत मावेनासा झाला.

आणि मग त्याला एकसारखें वाटूं लागलें, "यांतलं एक पाडस द्यावं आईला, आणि एक घ्यावं आपण."

एक दिवस संध्याकाळीं त्यानें आईजवळ हा विषय काढला.

" मा, आपल्याकडे दूध भरपूर आहे. मीं एखादं छोटं हरणाचं पिल्लूं बाळगलं तर ? ठिपक्याठिपक्यांचं हरीण ग, मा ! चालेल आणलं तर ? "

" संपशेल नाहीं; म्हणे दूध भरपूर आहे ! दिवसाकांठीं एक थेंब तरी शिल्लक राहतो का ? "

" मग माझ्या वांट्याचं दूध त्याला देऊं ! "

" हो तर ! आणि कुठच्या त्या भिकार हरणाला पोसा ! आणि तुम्ही व्हा हाडकुळे ! आपल्याला आधींच कामं थोडीं आहेत, म्हणून हें काढलंस वाटतं ? करायचंय काय तें रात्रंदिवस बें बें करून डोकं उठवणारं हरीण घेऊन ! "

" मला कांहींतरी एक पाहिजेच ! मला कून हवंय; पण मला माहीत आहे कीं तें खोड्या करतं ! अस्वलाचं पिल्लूं आणलं तर मला आवडेल, पण मला माहीत आहे कीं अस्वलं पुष्कळदा नीचपणा करतात. मला माझं स्वतःचं असं कांहींतरी पाहिजे आहे ! माझ्यामागें येईल आणि अगदीं माझं असेल असं ! " बिचाऱ्याची शब्दांसाठीं धडपड चालली होती. " मला असं कांहींतरी हवंय कीं जें अवलंबून राहील. "

त्याच्या आईनें नाक फेंदारलें.

" हं ! तसलं कांहीं तुला कुठेंही सांपडायचं नाहीं, प्राण्यांच्या जगांतही नाहीं. हें बघ ज्योडी, मला उगाच त्रास देऊं नकोस. आतां पुन्हा जर ' हरीण ' किंवा ' कून ' किंवा ' अस्वलाचं पिल्लूं ' असले शब्द उच्चारलेस तर माझ्या हातचा मार खाशील ! "

तिकडे पेनी कोपऱ्यांत बसून शांतपणें हें ऐकत होता.

सकाळीं उठल्यावर तो म्हणाला, " आज किनई ज्योडी, आपण काळवीट मारायला जाऊं या. कदाचित् आपल्याला पाडसही सांपडेल ! हें बघ ज्योडी — पाळलेल्या हरणापासून जितका आनंद होतो, तितकाच त्याला जंगलांत पाहूनही होतो, बरं ? "

पेनीनें शीळ घालून, रिपला नि म्हाताऱ्या ज्यूलियाला बोलावलें आणि मग तो, मुलगा नि कुत्रे सर्वजण भर सकाळचे शिकारीला निघाले. मे महिन्यांतला तो दिवस उकाड्याचा नि कुंद असा वाटत होता. सूर्याचीं किरणें रानांत शिरून ताप देत होतीं. रानांतल्या ओक वृक्षांचीं लहानगीं कठीण पानें म्हणजे जणूं ऊन्ह आडवणाऱ्या चपट्या परातीच होत्या. ज्योडीच्या पायांत गाईच्या कातड्याचे बूट

होते. पण त्यांतूनसुद्धा रस्त्यांतल्या रेतीमुळें त्याचे पाय भाजत होते. एवढें ऊन्ह असूनही पेनी भराभर चालत होता. ज्योडी मोठ्या मुष्किलीनें त्याच्या मागून चालला होता. ज्यूलिया सर्वांत पुढें उड्या मारीत चालली होती. अजून कसलाही वास येत नव्हता. पेनी मध्येंच थांबला आणि त्यानें क्षितिजाकडे टक लावली.

ज्योडीनें विचारलें, "पा, काय दिसतें तुम्हांला ?"

"कांहीं नाहीं बाळ. अगदीं कांहीं नाहीं !"

बखळीच्या पूर्व बाजूला मैलभर चालून गेल्यावर त्यानें आपली दिशा बदलली. एकाएकी हरणाच्या पावलांच्या कितीतरी खुणा दिसायला लागल्या. पेनीनें लक्षपूर्वक त्या तपासून पाहिल्या आणि त्यावरून आकार, लिंग आणि वयाचें कोवळेंपण याबद्दलचे आपले आडाखे बसवले.

शेवटीं तो म्हणाला, "हें बघ, इथून दोन मोठीं हरणं बरोबर गेलेलीं दिसतात. तीं या वाटेनें परवां आलेलीं असणार !"

"पावलांच्या खुणांवरून इतकं बरोबर तुम्ही कसं सांगतां हो, पा ?"

"मला संवय झालीय् म्हणून, दुसरं कांहीं नाहीं !"

खुद्द ज्योडीला या खुणा आणि पावलांच्या दुसऱ्या खुणा यांत कांहींच फरक दिसत नव्हता. पेनी खालीं वाकला आणि त्यानें आपलें बोट त्या ठशांवरून फिरवलें.

"काळवीट आणि हरिणी यांच्या खुणांमधला फरक कसा ओळखायचा तें कळलं ? हरिणीचे खूर टोकदार आणि नाजूक उमटलेले दिसतात, आणि पावलांचे ठसे ताजे कितपत आहेत हें सांगणं कुणालाही कठीण नाहीं; कारण ठसे जुनें झालेले असले तर त्यांत वाळू उडून पडलेली असते आणि नीट लक्ष दिलंस तर आणखी एक गोष्ट तुझ्या ध्यानांत येईल — हरीण धावत असलं कीं त्याचीं बोटं फाकलेलीं असतात. चालत असलं कीं जवळ जवळ असतात !" पेनीनें जमिनीवरच्या ताज्या खुणा कुत्रीला दाखवल्या, "बघ, बघ, ज्यूलिया ! काढ शोधून याला !"

ज्यूलिया आपलें लांब नाक जमिनीला लावून माग काढीत चालली. लवकरच रानांतून बाहेर पडून चपट्या आलबेरीनीं भरलेल्या खुल्या मैदानांतून त्यांचा मार्ग पुढें सुरू झाला. आलबेरींचें कुरणही संपलें आणि मग कांहीं देवदार वृक्ष लागले तेव्हां या शिकाऱ्यांना जरा बरें वाटलें.

दोन्ही हरणें एकमेकांच्या अगदीं जवळून जात असावींत असें खुणांवरून

दिसत होतें. ज्योडीला वाटलें फक्त वसंत ऋतूंत आणि उन्हाळ्यांत काळवीट एकमेकांशीं दोस्तीनें वागतात, हें एक आश्चर्यच आहे! पुढें त्यांना शिंगें फुटलीं म्हणजे ते हरिणींबरोबर धावत सुटतात. आणि मग हरिणींपाशीं असलेल्या पाडसांना हाकलून देतात आणि किती त्वेषानें एकमेकांशीं लढतात! ज्या काळविटांच्या मागावर तो चालला होता त्यांतला एक दुसऱ्यापेक्षां मोठा असावा.

पेनी म्हणाला, "यांतला तो काळवीट चांगला पाठीवर स्वार होण्यासारखा धिप्पाड असला पाहिजे!"

देवदार वृक्षांच्या दोन वनांना जोडणारी एक लहानशी पाणथळ दरड त्यांना लागली. या ठिकाणीं डॉगवेनचें रान दाटीवाटीनें उगवलें होतें. त्याचीं घंटेच्या आकाराचीं पिवळीं फुलें वर डोकीं काढीत होतीं. पावलांच्या खुणांची इथें जी गर्दी उडाली होती तिची पेनीनें नीट पाहणी केली. एक रानटी द्राक्षवेल त्यानें बाजूला ओढली.

बिलकुल आगाऊ सूचना न देतां द्राक्षवेलीच्या खालून एका सापानें त्याला डंख मारला. ज्योडीच्या डोळ्यांसमोर लखकन् वीज चमकली अन् मग ती सावली-सारखी पुसट बनली. त्या प्रहारांत मार्टिन पक्ष्यावर ताण करणारी द्रुतगति होती, अस्वलाच्या पंज्यापेक्षां जबरदस्त अशी शक्ति होती. त्या तडाख्यामुळें आपले बाबा कोलमडत मागें झालेले ज्योडीनें पाहिले. त्यांनीं किंकाळी फोडलेली ज्योडीनें ऐकली. त्याला वाटलें, आपणही मागें हटावें. वाटलें, सर्व आवाज एकटून ओरडावें. पण तो पायाखालच्या रेतीला खिळल्यासारखा उभा राहिला. त्याच्या तोंडांतून आवाजही फुटेना.

पेनी ओरडला; "मागें हो! कुत्र्यांना धरून ठेव."

हा आवाज कानांवर पडला आणि त्याचा आतांपर्यंतचा कोंडमारा संपला. तो पटकन् मागें झाला आणि त्यानें कुत्र्यांचीं मानगुटें पकडलीं. अंगाकर ठिपके असलेल्या त्या काळ्या छायेसारख्या आकृतीनें आपलें चपटें मस्तक गुडघ्याएवढ्या उंचीवर उचललें आहे आणि बाबांच्या प्रत्येक मंद हालचालीवर लक्ष ठेवून तो दोन्ही बाजूंना डुलतो आहे असें दृश्य ज्योडीला दिसलें. सापाचे मणके खळखळलेले त्याला ऐकूं आले. कुत्र्यांनींही ते ऐकले. त्यांनीं वास घेतला. त्यांच्या अंगावरचे केस ताठ उभे राहिले. म्हाताऱ्या ज्यूलियानें कुरकुरल्यासारखें केलें आणि ओढाताण करून त्याच्या हातांतून ती निसटली. तिनें एक वळसा घेतला आणि खालीं

वाकून माग काढीत ती चालली. रिप मागच्या पायांवर उभा राहिला नि भुंकायला लागला.

स्वप्न पाहात असल्यासारखा, पेनी हळुहळू मागें झाला. मणक्यांची खळखळ झाली. पेनीनें बंदूक उचलून खांद्यावर धरली आणि झाडली. ज्योडी थरथर कांपूं लागला. सापानें वेटोळें घातलें आणि तो वेदनांनीं तडफडूं लागला. पेनी मागें वळला आणि विस्फारलेल्या डोळ्यांनीं त्यानें मुलाकडे पाहिलें.

"तरी त्यानें डाव साधलाच!" तो म्हणाला.

उजवा दंड त्यानें वर उचलला आणि आ वासून तिकडे पाहिलें. शुष्क ओठ दांतांपासून विलग झाले. घशाची हालचाल झाली. दंडाला दोन सूक्ष्म छिद्रें पडलीं होतीं तिकडे त्यानें विमनस्कपणें पाहिलें. दोन्ही छिद्रांवर रक्तबिंदु सांचले होते.

पेनी म्हणाला, "चांगलाच मोठा होता."

इतका वेळ तो टक लावून पाहात होता. आतां त्यानें मान वळवली. त्याचा चेहरा राखेसारखा पांढरा पडला होता.

तो म्हणाला, "बापरे! अजूनही मृत्यु माझा बळी घेतो कीं काय, समजत नाहीं."

तो एकदम झटदिशीं वळला आणि रान बाजूला करीत बखळीच्या रोखानें निघाला. आंधळ्यासारखा थेट नाकासमोर तो चालला होता. रानांतले ठेंगणे ओक वृक्ष, गालबेरी आणि लहान लहान पामेटो—तालवृक्ष—बेधडक बाजूला सारीत तो चालला होता. ज्योडी त्याच्यामागें धापा टाकीत निघाला. गर्द झाडी अकस्मात् संपली आणि उंच ओकवृक्षांची सावली असलेली एक बखळ लागली.

पेनी थबकला. त्याच्या पुढ्यांत कांहींतरी खसबस झाली होती. एक हरिणी ताडकन् उठून उभी राहिली. पेनीनें दीर्घ श्वास घेतला. जणूं कांहीं श्वासोच्छ्वास घेणें आतां एकदम सोपें बनलें होतें. आपली शॉटगन उचलून त्यानें हरिणीच्या डोक्यावर नेम धरला. ज्योडीच्या मनांत एकदम विचार चमकला — आपल्या बाबांना वेड तर लागलें नाहीं? मुद्दाम थांबून शिकार करण्याची का ही वेळ होती? पेनीनें बंदूक झाडली. हरिणीनें एक कोलांटी उडी मारली आणि ती एकदम वाळूंत धाडकन् पडली. तिनें जरा हातपाय झाडले. आणि मग तिची हालचाल बंद झाली. पेनी धावत तिच्या मृतदेहाजवळ गेला. त्यानें आपला चाकू म्यानांतून काढला. आतां मात्र ज्योडीची खात्री झाली, कीं आपल्या बाबांचें डोकें फिरलें

आहे! पेनीनें हरिणीचा गळा कापला नाहीं; त्यानें तिची पोटाची बाजू वरपासून खालपर्यंत फाडली. तिच्या काळजाचें अजूनही स्पंदन होत होतें. पेनीनें तिचें यकृत फाडून हातांत घेतलें. मग गुडघे टेकून त्यानें चाकू डाव्या हातांत धरला. उजवा दंड वर करून तो पुन्हा त्या रक्तबिंदूंकडे डोळे फाडून पाहूं लागला. दंशानें केलेलीं छिद्रें आतां मिटलीं होतीं. कोपरापासून पुढचा हात सुजून जाडजूड झाला होता. आणि काळा पडत होता. त्याच्या कपाळावर घामाचे थेंब उभे राहिले. जखमेच्या ठिकाणीं त्यानें चाकूनें झट्कन् एक चीर पाडली. लगेच काळें रक्त बाहेर आलें. तेव्हां डाव्या हातांत तें ऊन ऊन यकृत् घेऊन त्यानें तें त्या रक्तबंबाळ चिरेवर दाबलें.

हळू आवाजांत तो म्हणाला, " रक्त ओढलं जातंय! मला त्याची भावना होत आहे!"

त्यानें जखम आणखी दाबली; मग हातांतला तो मांसाचा तुकडा ओढून घेऊन त्यानें त्याकडे पाहिलें. विषयुक्त हिरवा रंग त्याच्यावर चढला होता. उलटा करून पुन्हा त्यानें तो तुकडा आपल्या जखमेवर दाबला.

तो म्हणाला, " मला काळजाचा एक तुकडा कापून दे बरं!"

ज्योडी आतांपर्यंत हतबुद्ध झाल्यासारखा बसला होता. तो एकदम ताडकन् उठला. त्यानें कसाबसा चाकू हातांत धरला आणि हरिणीचें काळीज तोडलें.

पेनी म्हणाला, " आणखी एक!"

जखमेंतलें रक्त शोषून घेण्यासाठीं तो प्रत्येक वेळीं मांसाचा ताजा तुकडा घेत होता.

तो म्हणाला, " चाकू दे माझ्याजवळ!"

हातावर ज्या ठिकाणीं काळी सूज सर्वांत जास्त वाटत होती, तिथें त्यानें विशेष खोल चीर पाडली. ज्योडी ओरडला, " पा, रक्त वाहून वाहून मराल ना तुम्ही!"

" बाबारे, या विषानें अंग सुजवून घेण्यापेक्षां रक्त वाहून मी मेलों तरी चालेल! विषबाधेनें मेलेला माणूस मीं पाहिला आहे!"

आतां जेव्हां त्यानें मांसाचा तुकडा जखमेवरून काढून घेतला तेव्हां तो मघासारखा हिरवा दिसला नाहीं. हरिणीच्या रक्तांतली ऊब आणि चेतना संपून मृत्यूनंतर येणारा दाठरपणा त्याला येत होता. पेनी उठून उभा राहिला.

तो शांतपणें म्हणाला, " आणखी कांहींच करणं माझ्या हातांत नाहीं; मी घरीं जातों. तूं फॉरेस्टरांकडे जा. डॉ. विल्सनना बोलवायला कुणाला तरी पाठवा असं सांग ! "

तो मागें वळला आणि पुन्हा नेहमींची पायाखालची वाट चालूं लागला. पाठीमागें किंचित् खसखस झाल्याचा आवाज त्याच्या कानांवर पडला. त्यानें वळून पाहिलें. अंगावर ठिपके असलेलें एक हरणाचें पाडस त्या छोट्या बखळीच्या कडेला जी झाडी होती तिच्यांतून हळूच डोकावून पाहात होतें. त्याच्या चिमुकल्या पायांना नीट उभेंसुद्धा राहतां येत नव्हतें. त्याच्या काळ्याभोर विस्फारलेल्या डोळ्यांना कसलें तरी नवल वाटत होतें जणूं !

ज्योडीनें हाक मारली, " पा, हरिणीला पिल्लूं पण आहे एक ! "

" असूं दे बाळ ! माझा कांहीं इलाज नाहीं. चल लवकर ! "

त्या कोंवळ्या पाडसाबद्दल कसल्यातरी आर्त भावनेनें ज्योडीचें हृदय भरून तो किंचित् घुटमळला. पाडसानें आपलें लहानसें डोकें हालवलें. आणि तें गोंधळ-ल्यासारखें पाहूं लागलें. कशींबशीं पावलें टाकीत तें हरिणीच्या मृतदेहाजवळ आलें. आणि खालीं वाकून त्यानें हुंगल्यासारखें केलें. त्याच्या तोंडांतून आवाज बाहेर पडला ' बें—बें ! '

पेनी ओरडला, " चल रे बाबा पुढें ! "

त्याला गांठण्यासाठीं ज्योडी धावत आला. पेनी क्षणभर रस्त्यांत उभा राहिला.

" आपल्या घराकडे जाणारा हा रस्ता लक्षांत ठेव. आणि कोणालातरी सांग; मला घरापर्यंत जातां आलं नाहीं तर इथें उचलायला या म्हणून — हं ! चल पळ ! "

सर्वांग सुजलेल्या स्थितींत आपले बाबा रस्त्यांत पडलेले आहेत असें भीतिदायक दृश्य ज्योडीच्या मनाला भेडसावूं लागलें. तो धावत सुटला. त्याचे बाबा निराश, असहाय्य स्थितींत बॅक्स्टर बेटाच्या दिशेनें पावलें टाकण्याचा खड-तर प्रयत्न करूं लागले.

• • •

ज्योडी मुख्य रस्त्यावरून धावत धावत फॉरेस्टर बेटाकडे निघाला. त्याचे पाय हालत होते खरे पण वरचा देह आणि मन हीं जणूं निस्तब्ध होतीं. गाडीचीं चाकें फिरत असावींत आणि गाडींत रिकामी पेटी असावी तसें कांहींसें होतें हें ! त्याच्या पायांखालचा रस्ता म्हणजे जणूं कांही एक चक्की होती. त्याचे पाय वर

खालीं वर खालीं होत होते. पण त्याला असा भास होत होता, कीं आपल्या डोळ्यांपुढून तींच तींच झाडें नि झुडपें पुन्हा पुन्हा जात आहेत.

बेटावरच्या उंच झाडांजवळ तो येऊन पोचला. तीं झाडें पाहून त्याला एकदम दचकल्यासारखें झालें. कारण आपण ठिकाणाच्या अगदीं जवळ येऊन पोचलों याची त्याला अकस्मात् जाणीव झाली होती. मन ताळ्यावर येतांच त्याला भीति वाटूं लागली. पण त्याच्या मनांत आलें, आपण भ्यालों असलों तरी आपल्या मित्राला — फॉडरविंगला — आपण हाक मारूं शकतों. आपला मित्र आपली हाक ऐकेल आणि येईल. आणि आपल्या दुःखामुळें त्याचे डोळे कसे मृदु बनतील, तें मनांत येऊन ज्योडीला जरा बरें वाटलें. त्यानें एक दीर्घ श्वास ओढून घेतला. आणि ओकवृक्षांखालच्या त्या रस्त्यावरून तो वेड्यासारखा धावत सुटला.

" फॉडरविंग ! फॉडरविंग ! मी — ज्योडी आलोंय् ! "

त्याला वाटलें क्षणार्धांत आपला मित्र आपल्याकडे येईल. घराच्या मोडकळीला आलेल्या पायऱ्या उतरतांना तो पायांप्रमाणेंच हातांचाही आधार घेऊन खुरडत येईल. घाईत असला कीं त्याला नेहमींच असेंच करावें लागे. किंवा कदाचित् बाजूच्या झुडपांमधून बाहेर पडेल अन् त्याच्या मागून त्याचें रकून येईल.

" फॉडरविंग ! — मी आ...लों ! "

पण त्याला उत्तर मिळालें नाहीं.

ज्योडी आंगणांत शिरला. वाळू पसरलेलें तें आंगण नुकतेंच साफ केलेलें दिसत होतें.

" फॉडरविंग ! "

इतक्या लवकरची वेळ असूनही घरांत दिवा पेटलेला होता. धुराची एक नागमोडी रेषा धुराड्यांतून निघून वर गेली होती. डांसांविरुद्ध आणि रात्रीविरुद्ध संरक्षण म्हणून दारें खिडक्या बंद केलेलीं होतीं. दरवाजा एकदम उघडला गेला. आंतल्या प्रकाशांत त्याला दिसलें कीं फॉरेस्टर मंडळी एकामागून एक उठताहेत जणूं कांहीं अरण्यांतले मोठमोठे वृक्ष मुळांसकट उखडून आपल्या बाजूला सरकत आहेत ! ज्योडी थबकला. लेम फॉरेस्टर पायऱ्यांपर्यंत आला होता.

" त्याला भेटतां येणार नाहीं तुला. "

ज्योडीला वाटलें, आतां मात्र कळस झाला. त्याला एकदम रडूं कोसळलें. हामसाहामशीं रडत तो म्हणाला, " पा – त्यांना – त्यांना साप चावलाय् ! "

दुसरे फॉरेस्टरही पायऱ्या उतरून खालीं आले आणि त्यांनीं ज्योडीला घेरलें. तो हुंदके देत मोठमोठ्यानें रडायला लागला. त्याला रडूं फुटायला किती कारणें होतीं! स्वतःबद्दल अन् वडिलांबद्दल त्याला वाटणारी कींव – इथें आपण येऊन पोचलों, जें करायला निघालों होतों तें एकदाचें पार पाडलें याची जाणीव –

• • •

बॅक्स्टर मंडळींच्या घरांत मेणबत्त्यांचा उज्ज्वल प्रकाश पसरला होता. पण कुणालाही कांहीं प्रश्न करण्याचें धाडस ज्योडीला झालें नाहीं. बाबांच्या झोपायच्या खोलींत त्यानें प्रवेश केला. त्याची आई खाटेच्या एका कडेला बसली होती, डॉक्टर विल्सन दुसऱ्या कडेला. पेनीचा चेहरा काळा सुजलेला दिसत होता. त्याना श्वासोच्छ्वास जड वाटत होता. ज्योडीला वाटलें, आतां इथें जागता पाहरा करण्याचें काम आपलें आहे. आपल्या बाबांना झोप घ्यायला किती क्लेश पडत असतील! त्यांच्याबरोबर आपण जागे राहिलों, त्यांना श्वास घ्यायला किती त्रास पडतो आहे याची जाणीव ठेवली ... बाबांच्या श्वासांत श्वास मिसळून आपण बाबांसाठीं श्वसन करीत राहिलों ... तर आपण त्यांना जिवंत ठेवूं शकूं. त्याचे बाबा जसा खोल श्वास घेत होते तसा एक खोल श्वास त्यानें घेतला. पण त्यामुळें त्याला भोवळ आल्यासारखें वाटलें. त्याचें डोकें हलकें झालेलें होतें, पोट रिकामें होतें. आपण कांहींतरी खाल्लें तर आपल्याला बरें वाटेल हें त्याला कळत होतें; पण घशाखालीं अन्न उतरणें शक्य नव्हतें.

त्यानें जमिनीवर फतकल मारली आणि खाटेला डोकें टेकलें. त्या दिवशींच्या घटनांचा तो विचार करूं लागला — जसा कांहीं रस्त्यावरून मागें मागें जात होता तो! त्याला वाटलें, इथें — आपल्या बाबांच्या सान्निध्यांत आपण जास्त सुखरूप आहों हें तर नक्कीच. कितीतरी गोष्टी एकट्यानें सोसणें आपल्याला भयंकर गेलें असतें. बाबा जवळ आहेत म्हणूनच त्या भयंकर वाटत नाहींत हें त्याच्या लक्षांत आलें. पण एका वस्तूनें मात्र आपला सारा भयंकरपणा टिकवला होता. ती वस्तु म्हणजे मण्यारी साप!

त्याला सापाचें तें त्रिकोणी डोकें आठवलें, लखकन् विजेसारखें चमकून त्यानें जो प्रहार केला तो आठवला, सापानें घातलेलीं वेटोळीं आठवलीं. त्याच्या शरीराला कंप सुटला. त्याला भीति पडली कीं या जंगलांत पुन्हा कधीं आपल्याला रक्षित वाटणार नाहीं! आपल्या बाबांनीं किती थंड वृत्तीनें गोळी झाडली तें

त्याला आठवलें. त्याला हरिणी आठवली. तिचें ऊन ऊन मांस आपल्या बाबांच्या जखमेला लुबकलेलें पाहून आपल्याला कसें भय वाटलें — शिसारी आली, तें त्याला आठवलें. त्याला पाडसाची आठवण झाली.

एकदम तो ताठ बसला. आपल्याला कसें एकटें वाटत होतें — तसेंच तें पाडस रात्रीचें एकटें पडलें असेल. जी भीषण आपत्ति आपल्या बाबांना ओढून नेणार होती तिनेंच त्याला पोरकें केलें — त्याची आई त्याच्यापासून हिरावून घेतली. आणि आतां त्याला भूक लागली असेल — आईच्या उध्वस्त शरीराला चिकटून तें बुजल्यासारखें बसलें असेल. हा ताठरलेला देह कधीं उठून बसेल, कधीं ऊब देईल, अन्न देईल, विरंगुळा देईल, म्हणून वाट बघत असेल. खाटे-खालीं लोंबणाऱ्या चादरीच्या पदरांत तोंड लपवून तो ओक्साबोक्शीं रडूं लागला. सगळ्या सगळ्या मृत्यूबद्दल त्याला तिटकारा वाटूं लागला. साऱ्या साऱ्या एकले-पणाबद्दल करुणेनें त्याचें हृदय भरलें.

बाबा जवळच झोपलेले होते, पण इकडे हा जणूं मण्यारी सापांच्या भेंडोळ्याशीं लढत होता! त्याच्या पायांवर ते चढत होते, त्यांच्या मणक्यांची बारीक खळखळ होत होती. नंतर हें भेंडोळें उलगडलें आणि तो एकच प्रचंड सर्प असल्याचें दिसूं लागलें. तो सर्प वर चढत होता ... ज्योडीच्या अगदीं तोंडाजवळ आला तो. तो पाहा, त्यानें एक फटका दिलान्! ज्योडीनें ओरडण्याचा प्रयत्न केला, पण शब्द फुटेना. त्यानें बाबांकडे पाहिलें. ते खालीं पडले होते, सर्प त्याच्या अंगावर होता. त्यांचे डोळे ताठ उघडे होते. काळ्याकभिन्न आकाशाकडे लागले होते. त्यांचें शरीर सुजून अस्वलाएवढें झालें होतें. मृत्यूनें त्यांना केव्हांच गांठलें होतें. ज्योडी त्या सापाजवळून मागें सरकूं लागला. एक एक पाऊल मागें घेतांना त्याला कोण यातना होत होत्या! त्याचे पाय जसे कांहीं जमिनीला खिळले होते. मग साप एकाएकीं दिसेनासा झाला आणि त्याला असें भासलें कीं आपण एका खूप विस्तृत जागेंत उभे आहों. वारा खूप सुटलेला आहे. आपण दोन्ही हातांत हरिणीचें पाडस उचलून धरलें आहे. बाबा मात्र गेले आपल्याला सोडून! दुःखाच्या जाणिवेनें त्याचें अंतःकरण भरून आलें; आणि तें फुटतें कीं काय अशी त्याला भीति वाटली.

हुंदके देत देत ज्योडी जागा झाला.

टणक फळीच्या जमिनीवर तो उठून बसला. बखळींत त्यावेळीं पहाटेचा

संधिप्रकाश दिसूं लागला होता. देवदार वृक्षांच्या पलीकडे फिकट प्रकाशाच्या रेखा दिसत होत्या. ज्योडी गडबडीनें उभा राहिला आणि त्यानें आपल्या बाबांकडे पाहिलें.

पेनीला आतां श्वास घ्यायला पहिल्यासारखी अडचण पडत नव्हती. अजूनही सूज कायम होती, तापही होता. पण आतां त्याची अवस्था तितकी वाईट नव्हती. रानटी मधमाशा चावल्या कीं त्याची जी स्थिति व्हायची तितपतच आतां दिसत होती. मा बॅक्स्टर आपल्या झुलत्या खुर्चीत, मान पार मागें टाकून झोपीं गेलेली होती. म्हातारे डॉक्टरसाहेब बिछान्याच्या पायथ्याशीं आडवे झालेले होते.

ज्योडी हळूच म्हणाला, " डॉक् ! "

डॉक्टरांनीं घशांतल्या घशांत कांहीं आवाज काढला आणि मान वर केली.

" काय झालं ? — काय झालं ? "

" डॉक् ! बाबांच्याकडे पाहा तरी ! "

डॉक्टरांनीं आपला देह हालवला. एक कोपर टेकून ते जरा नीट बसले. त्यांनीं डोळयांची मिचमिच केली, डोळे चोळले. पेनीच्या अंगावर ते ओणवे झाले.

" ओ हो ! हा पार पडला कीं ! "

मा बॅक्स्टर म्हणाली, " आं ? "

ती एकदम उठून बसली.

" सारं संपलं म्हणतां, डॉक्टर ? "

" संपलं ?... हः ! पेनी चांगला जिवंत आहे ! "

माला एकदम रडूं कोसळलें.

डॉक्टर म्हणाले, " हें ग काय बये ? तुला तर दुःख झाल्यासारखं दिसतंय् ! "

ती म्हणाली, " डॉक्टर ! काय सांगूं नि कसं सांगूं तुम्हांला ? पेनी आम्हांला इथें सोडून गेला असता तर काय झालं असतं आमचं ? — तुम्हांला कल्पना नाहीं ! "

आपली आई इतक्या मृदुपणें कधीं बोलल्याचें ज्योडीला आठवत नव्हतें.

डॉक्टर म्हणाले, " पण तुझ्या घरांत आणखी एक पुरुषमनुष्य आहे कीं. ज्योडीकडे बघ. तो आतां मोठा झालाय. नांगरणी, कापणी, शिकार सगळं करूं शकेल तो. "

मा म्हणाली, " ज्योडी ठीक आहे हो. पण तो किती झालं तरी मुलगा. त्याचं सगळं लक्ष भटकण्यांत अन् खेळण्यांत ! "





ज्योडीनें मान खालीं घातली. मा सांगत होती तें अगदीं खरें होतें.

ती म्हणाली, " आणि त्याचे पा त्याला सारखे उत्तेजन देत असतात !"

डॉक्टर म्हणाले, " वा वा ! बेटा, तुला उत्तेजन मिळतं यांत समाधान मान ! आपल्यापैकीं बहुतेकांना आयुष्यभर कुणीं उत्तेजन देत नाहीं.— बरं आहे. बाई, आतां असं करायचं — हा जागा झाला कीं थोडं दूध त्याच्या घशाखालीं उतरवलंच पाहिजे, बरं का ?"

ज्योडी उत्सुकतेनें म्हणाला, " मा ! मी काढतों जाऊन दूध."

तो पुढच्या खोलींतून बाहेर निघाला. तिथें बक फॉरेस्टर खालीं जमिनीवर बसला होता. झोप अजून उडालेली नव्हती, म्हणून तो डोकें चोळत होता. मिलव्हील मात्र अद्याप गाढ झोपेंत होता.

ज्योडी म्हणाला, " डॉक् म्हणतात कीं पा आतां पार पडले !"

" काय म्हणतोस ? मोठी खैरच म्हणायची ! मी आत्तां उठलों तो सगळा ग्रंथ आटोपला याच समजुतीनें. तुझ्या बाबांच्या स्मशानयात्रेची तयारी मी माझ्या मनानें केली होती."

घराला वळसा घालून ज्योडी मागच्या बाजूला गेला आणि भिंतीला टांगलेला दुधाचा भोपळा त्यानें काढून घेतला. त्याला आतां इतकें मोकळें वाटत होतें कीं, क्षणभर त्याला वाटलें, आपण हात पसरले तर फाटकावरून पिसाटासारखे उडत जाऊं ! सकाळ झालेली होती; पण अजून निस्तब्ध होतें. उंच देवदार वृक्षांच्या शेंड्यांमधून वाऱ्याची एखादी झुळूक भुरुभुरु जात होती तेवढाच आवाज. सूर्योदय नुकताच झाला होता आणि सूर्यकिरणें लांबलांब बोटांसारखीं बखळीला स्पर्श करीत होती. गोठ्याच्या दाराचा खटका त्यानें उघडला तेव्हां देवदारांवर बसलेलीं कबुतरें पंखांचा मंजुळ ध्वनि करून उडालीं.

ज्योडीनें त्यांना उल्हसितपणें पुकारलें, " ए कबुतरांनो !"

त्याची चाहूल लागतांच ट्रिक्सी गाय हंबरली. तिच्यासाठीं कडबा काढायला तो माळ्यावर चढला. त्याला वाटलें, ट्रिक्सी बिचारी किती सोशीक आहे ! तिला आपण एवढेंसें खायला देतों तरी ती आपल्याला दूध देते. त्याला पुन्हा पाडसाची आठवण झाली. आज सकाळीं तर बिचारें भुकेनें किती कासावीस झालें असेल ! त्याच्या मनांत आलें, आपल्या आईचीं थंड पडलेलीं आचळें तें चोखून पाहील का ? मेलेल्या हरणाचें उघडें मांस ! लांडग्यांनीं केव्हांच तिकडे धाव घेतली असेल.

आणि — आणि कदाचित् तिथें बसलेलें पाडसही त्यांना सांपडलें असेल आणि त्याच्या लुसलुशीत शरीराच्या त्यांनीं चिंधड्या केल्या असतील !

आपले बाबा जिवंत आहेत या विचारानें त्याला सकाळपासून जो आनंद झाला होता त्यावर एकदम काळोखी पसरली.

आईनें दुधाचा भोपळा त्याच्या हातांतून घेतला. तिनें दूध गाळलें आणि त्यांतलें पेलाभर दूध घेऊन ती आजाऱ्याच्या खोलींत गेली. ज्योडी तिच्या मागून गेला. पेनी उठला होता. तो निःशक्तपणें हसला.

हळू, दाटलेल्या आवाजांत तो म्हणाला, " हं ! मृत्यूला माझ्यासाठीं आतां थांबावं लागणार असं दिसतंय् ?"

डॉक्टर म्हणाले, " तूं त्या मण्यारी सापाच्याच जातीचा दिसतोस ! तूं कसा यांतून पार पडलास हें मला तरी कांहीं समजत नाहीं !"

बक् आणि मिलव्हील खोलींत आले. त्यांनीं दांत दाखवले.

बक् म्हणाला, " पेनी ! तूं अगदीं झकास दिसतो आहेस असं नाहीं म्हणतां येणार. पण जिवंत आहेस !"

डॉक्टरांनीं दुधाचा पेला पेनीच्या ओठांजवळ धरला. त्यानें गपकन् दूध गिळलें, एवढी त्याला तहान लागली होती.

डॉक्टर म्हणाले, " तुला वांचवल्याचं फारसं श्रेय मी घेऊं शकत नाहीं. तुझी वेळ आलेली नव्हती म्हणून तूं जगलास, एवढंच !"

पेनीनें डोळे मिटले.

तो म्हणाला, " मला वाटतं, एक आठवडाभर मी झोपूं शकेन."

डॉक्टर म्हणाले, " मी तुला तेंच करायला सांगणार आहें. आणखी काय करणार मी तुझ्यासाठीं ?"

ते उठून उभे राहिले आणि त्यांनीं आपले पाय ताणले.

मा म्हणाली, " हे झोपून राहणार. अन् मग शेतांतलं काम कुणीं करायचं ?"

बक म्हणाला, " काय काय कामं करायचीं आहेत ? सांगा."

" मुख्य म्हणजे मक्याचा आणखी एक वाफा करायला हवाय् – सांठवणीसाठीं बटाटे उकरून काढायचे आहेत. पण ज्योडी तें काम करण्यांत पटाईत आहे. चिकाटीनें केलंन् तर अर्थात् !"

" मी चिकाटीनें करीन मा !"

बक म्हणाला, "मग मी राहतों. मक्याबिक्याचीं कामं असतील तीं मी करीन."

मा बॅक्स्टरची मुद्रा आरक्त झाली.

ती ताठरपणें म्हणाली, "तुमचं ऋण घ्यावं हें मला बरोबर वाटत नाहीं."

"हें पहा मा, या रानांत कशीबशीं जिवंत राहण्याकरतां धडपडणारीं आपण कितीशीं माणसं आहोंत? त्यांत आणखी एकमेकांना वेळप्रसंगीं आपण उपयोगी पडलों नाहीं तर झालंच! नाहीं राहिलों मी तर माझी मलाच लाज वाटेल!"

ती दीन सुरांत म्हणाली, "उपकार झाले तुमचे! हें मक्याचं पीक जर उभं राहिलं नाहीं तर पंचाईत आहे. त्यापेक्षां आम्ही तिघंही साप चावून मेलों तरी कांहीं वाईट नाहीं!"

त्या दिवशीं न्याहारीला केलेल्या पदार्थांचा ज्योडीला मोठा अभिमान वाटला. फॉरेस्टर मंडळींकडे असत, तसे तऱ्हेतऱ्हेचे पुष्कळ पदार्थ होते असें नाहीं, पण प्रत्येक पदार्थ भरपूर केलेला होता. पुरुष अधाशासारखे खात होते. ज्योडीनें पुन्हा आपल्या विचारांचें गाडें त्या पाडसाकडे वळवलें. कांहीं केल्या तें पाडस त्याच्या चित्तापुढून हालेना. आपल्या स्वप्नांत त्यानें त्याला जसें हातांत घट्ट धरून ठेवलें होतें; तसेंच जणूं काहीं तें त्याच्या मनाच्या एका मागच्या कप्प्यांत चिपकून बसलें होतें. तो टेबलाजवळून उठला आणि आपल्या बाबांच्या बिछान्याजवळ गेला. पेनी विश्रांति घेत पडला होता. त्याचे डोळे उघडे होते आणि स्वच्छ दिसत होते.

ज्योडी म्हणाला, "पा, कसं वाटतय् तुम्हांला आतां?"

"छान् वाटतंय्! बाळ मला तुझा फार अभिमान वाटतो. तूं आपलं डोकं शांत ठेवलंस आणि जें करणं जरूर होतं तें केलंस!"

"पा!—"

"काय, बाळ?"

"पा, तुम्हांला ती हरिणी अन् पाडस आठवतं?"

"बाळ, मी त्यांना कधींच विसरूं शकणार नांहीं! त्या बिचाऱ्या हरिणीनेंच माझे प्राण वांचवले हें तर नक्कीच!"

" पा, तें पाडस अजून तिथें असेल; त्याला भूक लागली असेल; आणि किती भ्यालं असेल तें ! ! "

" मलाही तसंच वाटतं ! "

" पा, मी आतां मोठा झालों आहें, मला कांहीं दुधाची जरूर नाहीं ! मी जर गेलों आणि त्या पाडसाचा शोध केला तर ? "

" आणि तें इकडे आणणार म्हणतोस ? "

" आणणार अन् वाढवणार ! "

पेनी शांत पडून राहिला, त्याचे डोळे छताकडे लागले होते.

" पा, त्याला पोसायला फारसा खर्च येणार नाहीं, थोड्याच दिवसांनीं तें आपल्या आपण पानं अन् फळं शोधायला जाऊं लागेल ! आपण त्याची आई हिरावून घेतली, त्यानें बिचाऱ्यानें काय गुन्हा केला आहे ? "

" खरंच ! त्याला तसंच उपाशीं टाकणं कृतघ्नपणाचं होईल, नाहीं का ? बाळ तुला नाहीं म्हणायला माझं मन घेत नाहीं; मला कधीं ही पहाट दिसेल, असं सुद्धा वाटलं नव्हतं !

" तुझ्या आईला सांग, बाबांनीं मला जायला सांगितलंय् ! "

ज्योडी पुन्हा टेबलाजवळ जाऊन बसला. त्याची आई सर्वांसाठीं कॉफी ओतीत होती.

ज्योडी म्हणाला, " मा, पा मला म्हणतात कीं तूं जा अन् तें पाडस घेऊन ये ! "

मानें हातांनली किटली तशीच हवेंत धरली. ती थबकून म्हणाली, " कुठचं पाडस ? "

" आम्हीं ती हरिणी मारली ना ? — पांना वांचवण्यासाठीं तिचं काळीज फाडून काढलं ना ? —— तिचं पाडस ! "

माच्या मुखांतून एक अस्फुट उद्गार निघाला.

" म्हणतोस तरी काय तूं ? "

" पा म्हणतात, त्याला उपाशीं मरूं देणं कृतघ्नपणाचं होईल. "

डॉ. विल्सन म्हणाले, " तें खरं आहे, बाई ! जगांत पूर्णपणें स्वतंत्र राहणारं असं कुणीच नसतं. ज्योडी सांगतोय् तें खरं आहे. त्याच्या डॅडीचंही म्हणणं खरं आहे ! "

मानें असहायपणें किटली खालीं ठेवली.

"ठीक आहे! तूं जर आपल्या वांटचं दूध त्याला देणार असशील— त्याला घालायला आपल्याकडे दुसरं कांहीं नाहीं!"

"तें तर मीं ठरवलेंच आहे! थोड्याशाच दिवसांची गोष्ट आहे. मग पुढें त्याला कांहींसुद्धा लागणार नाहीं!"

पुरुष मंडळी टेबलाजवळून उठली.

डॉक्टर म्हणाले, "याची प्रकृति सुधारणार याबद्दल मला पक्की खात्री वाटते. तरी पण एखादवेळेस कांहीं बिघाड झाला तर माझा पत्ता तुम्हांला माहीत आहेच!"

मा म्हणाली "हं, पण आम्हीं तुम्हाला काय द्यायचं डॉक्टर? आत्तां द्यायला तर पैसे नाहींत, पण एकदा पिकं निघालीं म्हणजे—"

"पैसे? कशाचे पैसे? मीं कांहींसुद्धा केलेलं नाहीं! मी इथें पोचण्या-पूर्वींच त्याच्यावरचं संकट टळलेलं होतं. मला रात्रभर इथें राहायला मिळालं. झकास न्याहारी मिळाली! असं करा—तुमच्या उसाचा रस काढलात म्हणजे माझ्यासाठीं थोडी काकवी पाठवून द्या!"

"डॉक्टर तुम्ही किती चांगले आहांत? आमची रोज इतकी धडपड चाल-लेली असते; इतकीं चांगलीं लोकं असूं शकतात हें मला माहीतसुद्धा नव्हतं!"

"शूः! कांहींतरी बोलूं नकोस, बाई! एवढा चांगला नवरा तुला मिळा-लेला आहे. त्याच्याशीं लोकं चांगलं वागतील नाहींतर काय? पेनीला पिववेल तितकं दूध देत जा. मग पुढें ताज्या भाज्या अन् ताजं मांस तुम्हांला मिळूं शकलं तर तें देत जा."

बक् म्हणाला, "मी आणि ज्योडी त्याची काळजी घेऊं!"

मिल्व्हील म्हणाला, "चल! आपल्याला घोड्यावर बसून जायचंय!"

मा बॅक्स्टर सचिंतपणें म्हणाली, "किती वेळ बाहेर राहणार आहेस तूं?"

ज्योडी म्हणाला, "जेवणाच्या वेळेपर्यंत नक्की परत येईन!"

मा म्हणाली, "जेवणाची वेळ असते म्हणून बरं आहे. नाहीं तर तूं कधींच परत आला नसतास!"

डॉक्टर म्हणाले, "चाललंच आहे, बाई! हा पुरुषांचा स्वभावच आहे.

तीन गोष्टींसाठीं पुरुष घरीं परतत असतात—आपलं आंथरूण, आपली बायको आणि आपलं जेवण!"

बक् आणि मिल्व्हील खो खो करून हसले. डॉक्टरांची दृष्टि एकदम रकून चामड्याच्या त्या पांढऱ्या रंगाच्या पिशवीवर गेली.

"काय सुंदर वस्तु आहे! माझीं औषधं न्यायला अशीच पिशवी मला हवी आहे."

ज्योडीजवळ आतांपर्यंत देणगी म्हणून देण्यासारखी अशी एकही वस्तु नव्हती. त्यानें खिळ्याला लावलेली ती पिशवी काढली आणि डॉक्टरांच्या हातांत ठेवली.

"माझीच आहे ती!" ज्योडी म्हणाला, "तुम्ही घ्या!"

"वा रे पोरा! तुला लुबाडायची माझी इच्छा नाहीं!"

"मला तिचा कांहींच उपयोग नाहीं!" ज्योडी मोठेपणाचा आव आणून म्हणाला, "आणि मला वाटलं तर मी दुसरी आणीन."

"बरं, थँक् यू! आतां मी कुठेंही कोणा रोग्याकडे गेलों, कीं प्रत्येक वेळीं माझ्या मनांत हे शब्द उभे राहतील—'थँक् यू, ज्योडी बॅक्स्टर'!"

वृद्ध डॉक्टरबाबांना झालेला आनंद पाहून ज्योडीला धन्य वाटलें. घोड्यांना पाणी पाजण्यासाठीं आणि गोठ्यांत जो थोडासा कडबा होता त्यांतला थोडा त्यांच्यापुढें टाकण्यासाठीं ती मंडळीं बाहेर गेली.

बकनें ज्योडीला म्हटलें, "तुम्हां बॅक्स्टर मंडळींचं जेमतेमच चाललेलं दिसतंय्, खरं ना?"

डॉक्टर म्हणाले, "बॅक्स्टरला एकट्यालाच काम करायला लागायचं! हा मुलगा जरा मोठा झाला, म्हणजे त्यांचं झकास चालेल."

मिल्व्हील आपल्या घोड्यावर बसला आणि त्यानें ज्योडीला ओढून घेऊन आपल्यामागें बसवलें. डॉक्टरही घोड्यावर स्वार झाले आणि विरुद्ध दिशेला निघाले. ज्योडीनें त्यांना हात हालवून निरोप दिला. त्याचें हृदय आतां किती हलकें झालें होतें!

तो मिल्व्हीलला म्हणाला, "तुला काय वाटतं? हरिणीचा तो बाळ अजून तिथें असेल? त्याला शोधून काढायला तूं मला मदत करशील?"

"तो जिवंत असेल तर आपण त्याला नक्कीच शोधून काढूं! पण काय रे, तें पाडस 'तो' आहे हें तुला कसं कळलं?"

"त्याच्या अंगावरचे ठिपके एका रेषेंत होतें. पा म्हणतात कीं हरिणींचे ठिपकें वाटेल तसे विखुरलेले असतात."

"बायकांचं तसंच!"

"म्हणजे काय?"

"अरे, बायकांचं सगळं अस्ताव्यस्त बेभरवशाचं काम असतं!"

मिल्व्हीलनें घोड्याच्या मानेवर थापटी मारली आणि मग त्यांचा घोडा चौखूर उड्या मारीत निघाला.

"ज्योडी म्हणाला, "मला फॉडरविंगबद्दल सांग. तो खरोखरच आजारी आहे का?"

"चांगलाच आजारी आहे. आपल्यासारखं नाहीं त्याचं. कोणासारखंच नाहीं! एखाद्याला वाटेल, हा पाण्याऐवजीं हवा पितो कीं काय? आणि बेकनऐवजीं हे रानटी प्राणी खातात तसलं कांहीं भक्ष्य खातो कीं काय?"

"त्याला म्हणे, काय काय दिसत असतं, होय ना रे? स्पॅनिश लोक वगैरे वगैरे—"

"होय, पण कधीं कधीं तर तो आपल्याला असं वाटायला लावतो कीं खरोखरच याला असलं कांहीं दिसत असेल कीं काय? — हं, सांग आतां कोणत्या बाजूला जायचं त्या हरणाला शोधायला? या वाटेला तर आणखी आणखी दाट झाडी लागते आहे."

एकाएकीं ज्योडीला असें वाटूं लागलें कीं मिल्व्हील आपल्याबरोबर न आला तर बरं होईल. समजा, तें छोटें हरीण मेलेलं असलं किंवा सांपडलंच नाहीं, तर आपली जी निराशा होईल ती याला दिसायला नको! आणि हरीण सांपडलं समजा, तर आपली दोघांची ती गुप्त अन् सुरेख भेट तिसऱ्या कुणाच्या डोळ्यांना दिसावी ही कल्पनाही ज्योडीच्या मनाला सहन होणारी नव्हती.

तो म्हणाला, "आतां फारसं दूर नाहीं. पण झाडी फार आहे त्यामुळें घोड्यावर बसून जाणं कठीण दिसतं. मी पायीं पायींच जातो ना पुढें!"

"पण तुला एकटं सोडायची मला भीति वाटते. तूं वाट चुकलास किंवा एखादा साप तुला चावला तर?"

" नाहीं. मी अगदीं जपून जाईन. हरीण शोधून काढायला मला कदाचित् वेळही लागेल — समजा, तें भटकत दूर गेलं असलं तर? मिल्व्हील! मला इथेंच सोड तूं. तुझे उपकार होतील."

मिल्व्हीलच्या घोड्याच्या टापा ऐकूं येईनाशा होईपर्यंत ज्योडीनें वाट पाहिली. मग तो झाडींतून उजवीकडे वळला. रान निस्तब्ध होतें. पायांखालच्या पाचोळयाचा आवाज होत होता तेवढाच. एक क्षणभरच त्याला असें वाटलें कीं आपण दिशा तर चुकलों नाहीं? इतक्यांत त्याच्या समोरच एका गिधाडानें पंख फडफडावून हवेंत उड्डाण केलें. दुसऱ्याच क्षणीं ओक वृक्षाच्या राईतल्या त्या मोकळ्या जागेंत ज्योडीनें प्रवेश केला. तिथें हरिणीच्या मृतदेहाभोंवतीं वर्तुळ करून कांहीं गिधाडें बसलीं होतीं. आपल्या हाडकुळ्या सोलवटलेल्या मानांवरचीं डोकीं वळवून त्यांनीं ज्योडीकडे पाहिलें आणि 'फिस्स्' असा आवाज काढला. त्यानें हातांतली डहाळी त्यांच्या अंगावर फेकली. त्याबरोबर सर्व गिधाडें उडून जवळच्या एका झाडावर बसलीं.

हरिणीच्या प्रेताला वळण देऊन ज्योडी पलीकडे गेला आणि ज्या ठिकाणीं पाडस दिसल्याचें त्याला आठवत होतें तिथलें गवत त्यानें दोन्ही हातांनीं बाजूला केलें. कालच का आपण इथें आलों होतों? त्याला खरेंसुद्धा वाटेना! आज तिथें पाडस नव्हतं. त्यानें बखळीभोंवतीं एक फेरी मारली. कसलाही आवाज नाहीं, चिन्ह नाहीं! गिधाडांनीं आपले पंख हापटले. अर्धवट टाकलेली कामगिरी पुरी करायला केव्हां जातों असें त्यांना झालें होतें. एका लहानशा पामेटोच्या झाडाखालीं त्याला खूर उमटलेले दिसले — इतके नाजुक अन् टोकदार, कीं जशीं कांहीं कबुतराचीं पावलें! पामेटो मागें टाकून तो गवतांतून लपत छपत पुढें गेला.

त्याच्या अगदीं पुढ्यांत कांहींतरी हालचाल झाली. तो इतका दचकला कीं अडखळून मागच्यामागेंच पडला. हरीणबाळानें आपलें मुख वर करून त्याच्याकडे पाहिलें. एवढीशी हालचाल, पण किती डोकें वळवलेंन् त्यानें! केवढें कुतूहल त्याच्या नेत्रांत भरलें होतें! त्याची नितळ भेदक नजर जेव्हां ज्योडीवर लागली तेव्हां त्याच्या अंगावर कसे थरथरून रोमांच उभे राहिले!

हरीणही जागच्या जागीं थरथर कांपत होतें. त्यानें उठायचा किंवा पळायचा प्रयत्न केला नाहीं. पुढें पाऊल टाकायला ज्योडीला धीर होईना.

तो आंतल्या आवाजांत पुटपुटला, " ए! — मी आहें, मी."

पाडसानें आपलें नाक वर करून त्याचा वास घेतला. ज्योडीनें एक हात पुढें केला, त्याच्या मऊ मऊ मानेवर ठेवला. त्या स्पर्शानें त्याला बेभान केलें. हात टाकून रांगत रांगत तो हलकेंच त्याच्याजवळ गेला; अगदीं त्याच्याजवळ गेला. आपले दोन्ही हात त्यानें पाडसाभोंवतीं टाकले. त्याचें शरीर किंचित् कंपायमान झालें, पण त्यानें जरासुद्धा हालचाल केली नाहीं. ज्योडीनें हळुवारपणें त्याला गोंजारलें. जणूं कांहीं अशी भीति वाटत होती कीं, हा चिनी मातीचा प्राणी आहे आणि जरा धक्का लावला तर फुटेल बिटेल. रकूनच्या त्या पिशवीपेक्षांही मृदु अशी त्याची त्वचा होती. हरीणबाळ गोंडस अन् स्वच्छ होतें आणि त्याच्या अंगाला गवताचा गोड गंध येत होता. ज्योडी हळूच उठला. पाडसाला त्यानें भुईवरून हलकेच उचललें. म्हाताऱ्या ज्यूलियापेक्षां कांहीं तें जड नव्हतें. त्याच्या तंगड्या मल्लूलपणें लोंबत होत्या. त्या इतक्या लांब कशा याचें ज्योडीला नवल वाटलें. त्या तंगड्यामुळें ज्योडीला पाडस काखेंत किती उंच धरावें लागत होतें!

याला आई दिसली किंवा तिचा वास आला तर हा लाथा झाडील, टाहो फोडील, असें एक भय त्याला वाटत होतें. बखळींत न शिरतां एक चक्कर घेऊन तो झाडींतच घुसला. पाडसाचे पाय सारखे झुडपांत अडकूं लागले आणि स्वतःचे पाय उचलतांनाही त्याला अडचण होऊं लागली. द्राक्षवेलीचे कांटे हरणाच्या तोंडाला बोचूं नयेत म्हणून आडोसा करण्याचा त्याचा प्रयत्न चालला होता. त्याच्या चालण्याबरोबर हरणाचें डोकें डुगुडुगु हालत होतें. या प्राण्यानें आपला स्वीकार केला याचें त्याला केवढें आश्चर्य वाटत होतें! त्या आश्चर्यानें अजून त्याची छाती उडत होती.

ज्योडी पाऊलवाटेवर पोचला आणि मग घराचा रस्ता जिथून फुटायचा ती जागा त्यानें शक्य तेवढ्या भराभर चालत जाऊन गांठली. विसावा घेण्यासाठीं तो थोडा थांबला. हरणाचे लोंबते पाय त्यानें जमिनीला टेकवले. तें कसेंबसें डगमगत उभें राहिलें. ज्योडीकडे पाहून त्यानें 'बेंऽ' केलें.

ज्योडी मंत्रमुग्ध होऊन म्हणाला, "मी किनई तुला उचलीन हं — थोडा दम खाऊन झाला म्हणजे!"

'हरिणीचें पाडस एकदा उचलून घेतलें कीं मग तें खालीं ठेवलें तरी आपल्या मागून येतें' असें बाबा एकदा बोलले होते तें त्याला आठवलें. तो हळूच त्याच्यापासून दूर झाला. पाडस नुसतें डोळे फाडून त्याच्याकडे पाहात

राहिलें. ज्योडी परत त्याच्याजवळ आला, त्यानें त्याला गोंजारलें आणि पुन्हा दूर जायला निघाला. पाडसानें धडपडत त्याच्या दिशेनें कांहीं पावलें टाकलीं आणि तें करुण वाणीनें ओरडलें.

ज्योडीला वाटलें, ओहो! तें आपल्यामागें खुषीनें येतंय् कीं! तें आतां आपलंच झालं — खास आपलं! त्याला वाटलें, आतां यापुढें आपल्याला कध्धीं कध्धीं एकलकोंडं वाटणं शक्य नाहीं.

## — १० —

जुलै महिन्यांतल्या उन्हानें जमीन उचली होती. रताळ्याचें पीक चिकार आलें होतें. त्यांचें शेत कसलें - रताळ्याचा अनंत सागर पसरला होता. ज्योडीनें मागें वळून पाहिलें. त्यानें आतांपर्यंत उकरलेल्या रताळ्यांचा आतां बराच पसारा जमला होता. पण त्यानें न उकरलेले वाफे कांहीं थोडे नव्हते. त्यांच्या रांगा क्षितिजापर्यंत पसरल्यासारख्या वाटत. त्यानें आपली ताडपत्री हॅट मागें सारली आणि बाहीनें आपलें तोंड पुसलें. सूर्याच्या दिशेवरून आतां जवळ जवळ दहा वाजले असावेत असा तर्क केला. बाबांनीं त्याला सांगितलें होतें कीं 'बारा वाजेपर्यंत जर रताळीं उकरून झालीं तर तूं दुपारीं फॉडरविंगकडे जाऊं शकतोस! पाडसाला नांव काय ठेवायचें हें मग तूं त्याला खुशाल विचार!'

कुंपणाला लागून एल्डरबेरीचें एक झुडूप होतें. त्याच्या सावलींत छोटें हरीण बसून राहिलें होतें. ज्योडीनें कामाला सुरवात केल्यापासून त्यानें चांगलाच त्रास दिला होता. रताळ्याच्या वाफ्यांत धुडगूस घालून, वेली पायाखालीं तुडवून आणि वाफ्यांचे बांध ढासळून झाल्यावर आतां तें स्वस्थ पडलें होतें. तो उकरत असतांना सरळ त्याच्या वाटेंत तें उभें राहिलें, आणि कांहीं केल्या जागचें हालेना. ज्योडीला आपल्याबरोबर खेळायला लावण्यासाठीं त्याचा प्रयत्न चालला होता. ज्योडीकडे तें राहायला आल्यावर पहिले कांहीं आठवडे त्याची भांबावल्यासारखी नवलोत्सुक नजर असे, ती जाऊन तें आतां चांगलें चलाख आणि जाणतें बनलें होतें. अगदीं म्हाताऱ्या ज्यूलियाइतकी शहाणी मुद्रा दिसत होती त्याची! त्याला परत नेऊन गोठ्यांत कोंडून ठेवलेलेंच चांगलें असा ज्योडीनें आपल्या मनाशीं बेत

जवळ जवळ नक्की केला; पण तेवढ्यांत तें आपण होऊनच सावलींत जाऊन स्वस्थ बसलें.

हरिण जवळ असतांना काम करायला ज्योडीला किती आवडत होतें! त्यामुळें त्याला जी एक प्रकारची समाधानाची भावना होत होती तिचा अनुभव नुसन्या कुदळ खोऱ्याच्या सहवासांत त्याला पूर्वी केव्हां आलेला नव्हता. पुन्हा पुन्हा त्यानें कुदळीचे जोरजोरांत घाव घातले. आणि आपलें काम छान होत आहे या विचारानें तो स्वतःवर खूष झाला. त्याच्या मागच्या बाजूला उकरलेल्या बटाट्यांच्या रांगा लागत होत्या. ज्योडी आपल्याशींच वेडीवाकडी शीळ वाजवायला लागला.

हरिण बाळासाठीं त्याला अनेक नांवें सुचलीं होतीं. त्या प्रत्येक नांवानें त्यानें त्याला हाकही मारून पाहिली होती; पण त्यांतलें एकही नांव त्याला पसंत पडलें नाहीं. या बाबतींत त्याचा सारा भरवसा फॉडरविंगवर होता. तो चुकणार नाहीं अशी ज्योडीला खात्री होती. आपण पाळलेल्या प्राण्यांना योग्य नांवें देण्याची एक निसर्गदत्त लकबच त्याच्याजवळ होती. रकूनला 'रॅकेट', पोसुमला 'पुश्', खारीला 'स्क्वीक' आणि त्या लंगड्या लाल पक्षाला 'प्रीचर'—कारण तो आपल्या दांडीवर बसून सारखा 'प्रीचर, प्रीचर, प्रीचर' म्हणून गायचा— अशीं तऱ्हेतऱ्हेचीं नांवें त्यानें शोधून काढलीं होतीं.

बक् घरीं गेल्यानंतर गेले दोन आठवडे ज्योडीनें केवढेंतरी काम केलें होतें. पेनीच्या अंगांत आतां पुन्हा शक्ति येऊं लागली होती; पण मध्येंच केव्हां-तरी त्याला भोवळ येई; मूर्च्छा आल्यासारखें वाटे. त्याला श्रम पडूं नयेत याचें स्मरण ठेवून ज्योडी वागत होता. हरीण मिळाल्यापासून त्याला किती छान वाटत होतें! पूर्वी त्याला एकलकोंडें वाटे आणि पुष्कळदा उद्वेगानें घेरल्यासारखें होई. त्यांतून तो आतां मुक्त झाला होता. आईनें आपल्याला हरीण ठेवूं दिलें याबद्दल त्याचें हृदय कृतज्ञतेनें भरलेलें होतें. त्याला दूध पुष्कळ लागायचें याबद्दल शंकाच नव्हती. आईच्या कामांत तें पुष्कळदा लुडबूड करी याबद्दल संशय नव्हता. एक दिवस तर असें झालें कीं, ही स्वारी बाहेरून घरांत आली आणि केक भाजण्या-साठीं कालवलेल्या पिठाचें भांडें त्याच्या नजरेला पडलें; लगेच स्वारीनें तें चाटून पुसून साफ केलें. त्यानंतर किती गोष्टी त्यानें स्वाहा केल्या होत्या—भाजीपाला, भिजवलेलें पीठ, बिस्किटाचे तुकडे, काय वाटेल तें! बॅक्स्टर मंडळी जेवायला बसली कीं त्याला गोठ्यांत कोंडूनच ठेवावें लागे. नाहींतर, मध्येंच डोकें घालणें,

बें बें ओरडणें आणि त्यांच्या हातांतल्या ताटल्या खालीं पाडणें हे प्रकार त्यानें केलेच म्हणून समजावें! ज्योडी आणि पेनी जेव्हां त्याच्या खोड्यांना हसत, तेव्हां जणूं कांहीं आपल्याला सर्व समजतें आहे अशा तऱ्हेनें तें मान हालवायचें. कुत्रीं पहिल्या पहिल्यानें त्याच्या फार पाठीस लागत, पण आतां तीं बरीच सहिष्णु बनलीं होतीं. मा बॅक्स्टर पण सर्व सहन करायची; पण तिला त्याच्या खोड्यांमुळें गंमत मात्र कधींच वाटली नाहीं! त्याच्या अंगीं किती लोभस गुण आहेत तें ज्योडी मारे तिला पुन्हा पुन्हा दाखवून द्यायचा!

"मा, त्याचे डोळे किती सुरेख आहेत, नाहीं?"

"हो तर! बऱ्याच लांबचं आख्याचं भांडं त्याला दिसतं!"

"हं! पण मा, त्याची शेपूट कशीतरीच मजेदार दिसते नाहीं?"

"सगळ्या हरणांचीं शेपटं सारखींच दिसतात!"

"पण मा, तें दिसतं किती छान आणि वेडपट, नाहीं का?"

"वेडपट आहे हें अगदीं खरं!"

सूर्य डोक्यावर येत होता. हरीण उठलें आणि रताळ्यांच्या राशींत आलें. कांहीं कोवळ्या वेली त्यानें कुरतडल्या आणि मग पुन्हा कुंपणापाशीं गेलें. आपलें किती काम झालें आहे त्याचा ज्योडीनें एकदा अंदाज घेतला. अजून एक सबंध नि एक अर्धी रांग उकरायची होती. पाणी पिण्यासाठीं एकदा घरांत जावें असें त्याला फार वाटत होतें. पण तसें केलें असतें तर त्याला मिळालेल्या वेळांतला बराच वेळ त्यांत खर्ची पडला असता. जेवायलाही कदाचित् उशीर झाला असता. वेलींना धक्का न लावतां, मारतां येईल तेवढ्या भराभर कुदळ चालवून त्यानें रताळीं उकरलीं. सूर्य जेव्हां डोक्यावर आला, तेव्हां अर्धी रांग तेवढी उकरून झाली होती आणि सबंध रांग मात्र अजून तशीच, जणूं कांहीं त्याला वाकुल्या दाखवीत पडली होती. आणखी क्षणभरांत सैंपाकघराच्या दाराशीं टांगलेल्या चाकावर आई टोले देईल आणि आपल्याला काम थांबवावं लागेल. दिलेल्या मुदतींत जराही फेरफार होणार नाहीं असें पेनीनें स्वच्छ बजावलें होतें. जेवणाच्या वेळेपर्यंत जर शेत उकरून झालें नाहीं तर फॉडरविंगकडे जाणें शक्यच नाहीं.— इतक्यांत कुंपणाच्या पलीकडे कुणाचीं तरी पावलें वाजलीं. पेनीच तिथें उभा होता आणि त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहत होता.

"रताळ्यांचा बराच ढीग निघाला, नाहीं?"

"पाहा ना पा — केवढा डोंगर आहे तो !"

"पुढच्या वर्षीं मात्र या वेळेला एकही रताळं शिल्लक रहणार नाहीं, असं सांगितलं तर तुला खरं वाटेल ? त्या चेरीच्या झाडाखालीं तुझं तें बछडं बसलंय् ना, तें आपला वांटा घेणारच काढून ! तुला आठवतं ? दोन वर्षांपूर्वी हरणांना दूर ठेवण्यासाठीं आपल्याला केवढी यातायात पडली ती ?"

"पा, मला कळतच नाहीं ! मी सकाळभर सारखा काम करतोंय् ; जराही थांबलों नाहीं आणि तरीही एक रांग अजून शिल्लकच !"

"बरं बरं ! हें बघ तुला एक सांगतों. तुला तसा सोडायचा माझा मुळींच विचार नाहीं; कारण मीं तुला आधींच बजावलं होतं ! पण तुझ्याशीं सौदा करायला मी तयार आहें. आत्तांच्या आतां जा, आणि आपल्या मासाठीं विवरांतलं ताजं पाणी भरून आण. रताळ्यांचं काम मी संध्याकाळीं पुरं करीन. त्या विवराच्या कांठावरून चढून जाणं मला नीट जमत नाहीं; हा सौदा बरोबर वाटतो कीं नाहीं तुला ?"

ज्योडीनें कुदळ खालीं टाकली आणि तो पाण्याची बकेटें आणण्यासाठीं घराकडे धावत निघाला.

पेनीनें ओरडून त्याला सांगितलें, "वरपर्यंत भरून आणूं नकोस, बरं का !" मोठ्या हरणाची ताकद पाडसांत नसते."

नुसतीं बकेटेंच किती जड लागत होतीं ! सायप्रेसचें लाकूड हातांनीं पोखरून तीं बनवलेलीं होतीं, आणि ज्या जोखडाच्या दोन टोकांना तीं अडकवलेलीं होतीं, तें पांढऱ्या ओक लाकडाचें होतें. ज्योडीनें कावड खांद्यावर घेतली आणि तो रस्त्यावरून तुरू तुरू निघाला. त्याच्या मागें हरिण उड्या मारीत निघालें. विवरांत अंधार होता, निःस्तब्धता होती. तिथें मध्यान्हांपेक्षां पहाटेच्या वेळीं जास्त सूर्यप्रकाश असायचा. कारण पानांच्या गर्दीमुळें डोक्यावरच्या सूर्याचीं किरणें अडवलीं जात. त्या प्रचंड द्रोणाकृति हिरव्यागार तळाशीं उतरतांना उभट उतारावरून फार धावत जाणें तर शक्य नव्हतें. पाडस त्याच्या मागोमाग आलें आणि दोघे मिळून डोहांतलें पाणी तुडवीत पलीकडे गेले. पाडसानें पाणी पिण्यासाठीं मान वाकवली. हेंच स्वप्न ज्योडीनें पूर्वी आपल्या मनाशीं रंगविलें होतें !

तो हरणाला म्हणाला, "केव्हांतरी एक दिवस मी इथं घर बांधणार आहें

आणि मी तुला एक हरिणी आणून देईन आणि आपण सगळीं मिळून या तळ्याजवळ राहूं, हं?"

एक बेडूक एकदम उडी मारून आला आणि हरीण एकदम दचकून मागें झालें. ज्योडी हसला; पाणी पिण्याच्या डोणीकडे तो धावत निघाला. डोणीच्या कांठाला एक भोपळा बांधलेला होता. त्याच्या साह्यानें ज्योडीनें बकेटें भरून घेतलीं. बाबांनीं बजावलें असूनही त्यानें तीं जवळ जवळ पूर्ण भरलीं. मग तो खालीं वाकला आणि त्यानें कावड खांद्यावर घेतली. पुन्हा जेव्हां तो ताठ झाला तेव्हां एवढें वजन पेलून त्याला उभें राहतां येईना. त्यानें थोडें पाणी ओतून टाकलें, तेव्हां त्याला उभें राहतां आलें. मग उरलेली चढण चढून तो वर गेला. लाकडी जूं त्याच्या काटकोळया खांद्यांत रुतूं लागलें, त्याची पाठ दुखायला लागली. घरीं जातांना अर्ध्या वाटेवरच थांबणें त्याला भाग पडलें. त्यानें बकेटें खालीं टेकलीं आणि आणखी थोडें पाणी ओतून दिलें.

तो घरीं पोचला तेव्हां आईबाबा जेवायला बसलीं होतीं. त्यानें बकेटें उचलून पाण्याच्या कट्ट्यावर ठेवलीं. आणि हरणाला गोठ्यांत कोंडलें. पिण्याच्या सुरईत त्यानें ताजें पाणी भरून घेतलें आणि आंत जेवणाच्या टेबलापाशीं आणलें. आज त्यानें इतकें काम केलें होतें, तो इतका घामाघूम झाला होता आणि थकला होता, कीं त्याला फारशी भूकही नव्हती. पालेभाजी खाऊनच त्याचें पोट भरलें आणि मग आपल्या वाटचें मक्याचें पोन व दूध त्यानें हरणासाठीं राखून ठेवलें.

त्याला खाऊं घालून झाल्यावर ज्योडी नि पाडस दोघे निघाले. पाडस मधून मधून त्याच्यामागें पडत होतें तर मधूनच पुढें धावत होतें. मध्येंच बाजूच्या झाडींत घुसून संशोधन करून तें पटकन् बाहेर येई. कधीं कधीं तें त्याच्या बरोबर चाले; आणि ज्योडीच्या मतें त्यानें तसें केलेलेंच बरें होतें! पाडस असें चालायला लागलें म्हणजे ज्योडी हलकेच त्याच्या मानेवर हात ठेवी, आणि त्याच्या चार पायांच्या गतीबरोबर आपल्या दोन पायांची गति जुळवून घेण्याचा प्रयत्न करी. रस्त्याच्या कडेला रॅबिट पी नांवाची एक वेल फुलली होती. त्यानें तिची एक लांबलचक डहाळी तोडून घेतली आणि दोरीसारखी हरणाच्या गळयाभोंवतीं बांधली. वेलीवरच्या गुलाबी फुलांमुळें हरीण इतकें सुरेख दिसूं लागलें, कीं त्याला वाटलें आपल्या आईलासुद्धा तें आवडल्याशिवाय राहणार नाहीं.

ज्योडी फॉरेस्टरांच्या रस्त्याकडे वळला. आपल्या मित्राला पाडस दाखविण्याची

त्याला इतकी उत्सुकता लागली होती कीं तो आतां धावत चालला होता. त्याला वाटलें कीं फॉडरविंगला चकित करून सोडूं. तो रानांत हिंडत असेल किंवा परसांत आपल्या लाडक्या प्राण्यांजवळ असेल किंवा अजून आजारीच असला तर बिछान्यांत असेल. कुठेंही असला तरी आपण जेव्हां त्याच्याजवळ जाऊं, तेव्हां हरीण आपल्याबरोबर चालत येईल. फॉडरविंगचा चेहरा चमकायला लागेल. त्याच्या चेहऱ्यावर कधींकधीं दिसणारी ती विलक्षण लकाकी आपल्याला बघायला मिळेल, आपलें कुबडें आंग कष्टानें जवळ आणून तो आपल्या वेड्यावाकड्या पण मृदु हातांनीं हरणाला स्पर्श करील. आपलें मन तृप्त झालें आहे, हें त्याला बरोबर कळेल आणि तो आपल्याकडे पाहून स्मित करील,

फॉरेस्टर मंडळींच्या जमिनीवर ज्योडी जाऊन पोचला आणि वृक्षांखालून आंगणाकडे धावत निघाला. घर जणूं कांहीं निद्राधीन झालें होतें. धुराड्यांतून धूम्रवलय निघत नव्हतें. पिछाडीला जें कुत्र्यांचें घर होतें त्यांतून एकाच शिकारी कुत्र्याचें ओरडणें ऐकूं येत होतें. बाकीचीं कुत्रीं कुठें दृष्टीला पडलीं नाहींत. ज्योडी थांबला आणि त्यानें हाक मारली; "फॉडरविंग! मी ज्योडी आलोंय!"

मघाचा कुत्रा किंचाळायला लागला. घरांत लांकडी भुईवरून खुर्ची ओढल्याचा आवाज झाला. बक् दरवाजाजवळ आला. खालीं उभा असलेल्या ज्योडीकडे त्यानें पाहिलें आणि आपल्या तोंडावरून हात फिरवला. त्याची दृष्टि शून्य वाटत होती. ज्योडीला वाटलें कीं दारू झोकलेली असावी.

ज्योडी अडखळत म्हणाला, "मी — फॉडरविंगला भेटायला आलों आहें. त्याला माझं हरीण दाखवायला आलों आहें!"

बकनें आपली मान हालवली. जणूं कांहीं डोक्याभोंवतीं घोंगावणाऱ्या भुंग्याला तो घालवून लावीत होता! — कीं आपल्या मनांतल्या विचारांना? पुन्हा त्यानें आपलें तोंड पुसल्यासारखें केलें.

ज्योडी म्हणाला, "मी मुद्दाम आलोंय!"

बक् म्हणाला, 'तो ...... तो गेला रे! आम्हांला सोडून गेला. वारला!"

काय अर्थ होता त्या शब्दांना? कांहीं नाहीं! जणूं कांहीं वाळलेलीं पानें वाऱ्यावर उडून ज्योडीजवळ आलीं होतीं, आणि पुढें निघून गेलीं होतीं. पण तीं उडून गेलीं आणि मागें एकदम गारठा राहिला. ज्योडीचें सर्वांग बधिर झालें. तो गोंधळून गेला.

त्यानें पुन्हां एकदा म्हटलें, "मी त्याला भेटायला आलों आहें!"

"फार उशिरां आलास! वेळच नव्हता रे! नाहीं तर मी तुला बोलवायला आलों असतों. डॉक्टर बाबांना बोलावण्यापुरतासुद्धा वेळ सांपडला नाहीं. या मिनिटाला त्याचा श्वास चांगला चालला होता, तर दुसऱ्या मिनिटाला सगळं बंद! आपण फुंकर मारून मेणबत्ती विझवतों ना? तसं झालं! ये तुला पाह्यचं असेल तर चल."

ज्योडी एकेक पाय मोठ्या कष्टानें उचलून पायऱ्या चढून वर आला. बकच्या मागून तो घरांत शिरला. सर्व फॉरेस्टर पुरुष मंडळी एकत्र बसली होती – निश्चल आणि भाराक्रांत! ज्योडीला असा भास झाला कीं फॉडरविंगच्या भोवतीं त्यांनीं जणूं एक भिंत बांधली होती. आणि त्या भिंतीवरून ते त्याच्याकडे जणूं डोकावून पाहात होते. बकनें त्याचा हात धरण्यासाठीं चांचपल्यासारखें केलें. मग त्याला घेऊन तो झोपायच्या मोठ्या खोलींत गेला.

• • •

फॉडरविंग डोळे मिटून पडला होता. त्या एवढ्या मोठ्या पलंगाच्या मध्य-भागीं तो केवढासा लहान आणि लुप्त झाल्यासारखा वाटत होता. त्याचें गळ्या-पर्यंतचें अंग चादरीखालीं झाकलें होतें. हात चादरीच्या बाहेर असून छातीवर त्यांची घडी केलेली होती. मा फॉरेस्टर बिछान्याजवळ बसली होती. तिनें एप्रननें आपलें डोकें झाकलें होतें आणि ती मागेंपुढें रेलत होती. तिनें झटक्यासरशीं एप्रन खालीं सोडलें.

ती म्हणाली, "गेला रे माझा बाळ! माझा गरीब बिचारा वाकड्या अंगाचा पोर!"

ज्योडीला वाटलें, इथून पळत निघून जावें. उशीवर टेकलेला तो हाडकुळा चेहरा पाहून त्याला भीति वाटली. फॉडरविंगच होता तो. पण – पण फॉडरविंग नव्हताही! बकनें त्याला पलंगाजवळ ओढलें.

"त्याला ऐकूं जायचं नाहीं. पण बोल त्याच्याशीं!"

ज्योडीच्या घशाची हालचाल झाली, पण शब्द फुटेना. त्याला वाटलें, हा फॉडरविंग मेणाचा केलेला आहे — मेणबत्तीसारखा!

तो हळूच म्हणाला, "ए!"





आतांपर्यंत त्याला जी बधिरता आली होती ती या उच्चारामुळें भंग पावली. त्याला कंठ आवळल्याचा भास झाला. वाटलें, कोणीतरी आपल्या गळ्याभोंवतीं फास बांधतंय्! फॉडरविंगचें मौन त्याला असह्य झालें. पण त्याचा अर्थ आतां त्याला समजला. मरण, मरण म्हणतात तें हें. मरण म्हणजे मौन! मरण कुणाला उत्तर देत नाहीं. फॉडरविंग आपल्याशीं पुन्हा कधींही बोलायचा नाहीं. ज्योडी मागें वळला आणि बकच्या कुशींत त्यानें आपलें तोंड खुपसलें. बकच्या दणकट हातांनीं त्याला गच्च आवळून धरलें. कितीतरी वेळ ज्योडी तसाच उभा होता.

बक् म्हणाला, "मला वाटलंच होतं, कीं तुला या प्रसंगानें कसंसंच होईल!"

दोघे खोलीबाहेर पडले. पा फॉरेस्टरनीं त्याला खुणेनें जवळ बोलावलें. तो त्यांच्या जवळ गेला. म्हातारेबुवांनीं त्याचा हात धरून गोंजारल्यासारखें केलें. मग चिंतामग्न बसलेल्या त्या पुरुषांकडे त्यांनीं हात केला.

ते म्हणाले, "चमत्कारिक वाटतं, नाहीं? पण खरं आहे. एक वेळ यांच्यापैकीं कोणीही एक गेला असता तरी आम्हांला चाललं असतं. जो मुळींच कधीं जाऊं नये असं वाटत होतं तोच गेला!" त्यांची चर्या एकदम उजळ दिसूं लागली. आणि ते पुढें म्हणाले, "आणि – इतकं असून किती वेडावाकडा, विद्रूप, कुचकामाचा —"

म्हातारेबुवा आपल्या झुलत्या खुर्चीत मागें टेकले आणि या विरोधाभासावर स्वतःशींच विचार करूं लागले.

ज्योडीनें आपल्या आगमनानें त्या सर्वांना जणूं विव्हल केलें होतें. तो तसाच रेंगाळत आंगणांत गेला. हिंडत हिंडत घराच्या पिछाडीला गेला. त्या ठिकाणीं फॉडरविंगचे आवडते प्राणी आपापल्या पिंजऱ्यांत विसरल्यागत पडले होते. ज्योडीनें त्यांना खायला घातलें, पाणी पाजलें. त्यांच्या मालकाकडून आतां त्यांना जें सुख कधींही मिळण्यासारखें नव्हतें, तें कांहीं काळ का होईना, त्यांना द्यायला मिळालें, त्यांची काळजी घ्यायला मिळाली, एवढ्यानेंच ज्योडीला किती मोकळें वाटलें!

दुपार संपतां संपेना. फॉरेस्टर मंडळींचें त्याच्याकडे लक्षही नव्हतें आणि काय असेल तें असो, ज्योडीला वाटत होतें – आपण राहावें अशीच त्यांची अपेक्षा असणार. आपण जावें असें त्यांना वाटलें असतें तर बकनें मघाशींच बोलतांना निरोप दिला असता. अखेरीस ओकवृक्षांच्या पलीकडे सूर्य क्षितिजाकडे कलूं

लागला. ज्योडीला वाटलें, आपली आई आतां नक्की रागावणार आणि तरी तो अजून कसलीतरी वाट पाहत थांबला होता. या मंडळींनीं आपली ओळखण करण्याचें कांहीं तरी चिन्ह दाखवावें असें त्याला वाटत होतें.

रात्रीच्या जेवणाच्या वेळीं कोणी कांहीं बोललें नाहीं. थट्टाविनोद झाला नाहीं. नेहमींसारखी टेबलावर हात आपटून कोणी गडबड केली नाहीं. फॉरेस्टर मंडळींची फलटण टेबलाजवळ आली तीच मुळीं जशी स्वप्नांत असल्यासारखी. ज्योडी मा फॉरेस्टरच्या शेजारीं बसला. तिनें सर्वांच्या ताटल्यांत शिजवलेलें मांस वाढलें. आणि मग ती एकदम रडायला लागली.

"मीं त्याचं पण पान धरलं—नेहमींसारखं!" ती रडत म्हणाली, "देवा, देवा!"

बक् म्हणाला, "बरं, मा! असू दे आतां! त्याच्या वाटचं ज्योडी खाईल, आणि मग माझ्यासारखा मोठा होईल; होय कीं नाहीं, ज्योडी?"

सर्वजण धीर करून जेवायला लागले. कांहीं मिनिटें त्यांनीं भूक लागल्यासारखें खाल्लें. मग मात्र आपल्या ताटल्या ढकलून दिल्या.

मा फॉरेस्टर म्हणाली, "आज रात्रीं हीं उष्टीं आवरायला माझं मनच घेत नाहीं. तुमचंही चित्त लागणं शक्य नाहीं! तेव्हां आज ताटल्या तशाच रचून ठेवा. उद्यां सकाळीं पाहतां येईल."

ज्योडीला वाटलें, म्हणजे उद्यां सकाळीं जास्त मोकळें वाटणार आहे कीं काय? मा फॉरेस्टरनें ज्योडीच्या ताटलीकडे पाहिलें.

ती म्हणाली, "काय रे बेटा, तूं आपलं बिस्कीट खाल्लं नाहींस. दूध पण प्याला नाहींस. काय झालं रे तुला?"

"तें माझ्या हरणासाठीं आहे! मी नेहमीं माझ्या जेवणांतलं त्याच्यासाठीं राखून ठेवतों."

ती म्हणाली, "बिचारा!" आणि तिनें पुन्हां रडायला सुरवात केली, "माझा बाळ असता तर तुझं हरीण पाहून त्याला किती आनंद झाला असतां रे! तो येतांजातां तुझ्या हरणाबद्दलच बोलत असे. तो म्हणायचा, ज्योडीला आतां एक भाऊ मिळाला आहे."

ज्योडीचा कंठ दाटून येऊन त्याला कसेसेंच वाटलें. त्यानें एक आवंढा गिळला.

तो म्हणाला, "तेवढ्याचसाठीं तर आज मी आलों! माझ्या हरणासाठीं नांव सुचवायला मी फॉडरविंगला सांगणार होतों."

"अरे!" ती म्हणाली, "त्यानें त्याला केव्हांच नांव दिलंय! तो शेवटच्या वेळीं जेव्हां हरणाबद्दल बोलला ना, तेव्हांच त्यानें त्याला नांव देऊन टाकलंन्! तो म्हणाला, 'हरणाचं पाडस आपला बावटा कसा मजेत हालवत असतं. त्याची शेपटी म्हणजे त्याचा छोटासा पांढरा मजेदार बावटाच! माझ्याजवळ जर एखादं पाडस असतं तर मी त्याचं नांव 'फ्लॅग' ठेवलं असतं!"

ज्योडीनें तें नांव उच्चारलें, "फ्लॅग!" त्याला वाटलें, आपलें हृदय फुटतें कीं फॉकाय? डरविंग आपल्याबद्दल बोलला होता, आणि आपल्या हरणाला त्यानें नांवही दिलें होतें!" त्याच्या दुःखांत हें नवें सुख मिसळलें. त्यामुळें त्याला बरें वाटलें; पण तो भावनावेग त्याला असह्यही झाला.

तो म्हणाला, "त्याला खायला घालून येतों मी! फ्लॅगला खायला घालतों!"

आपल्या खुर्चीतून घसरून तो खालीं उतरला आणि दुधाचें भांडें नि बिस्किटें घेऊन बाहेर गेला.

त्यानें हाक मारली, "“फ्लॅग–! इकडे ये!"

पाडस लगेच त्याच्याजवळ आलें. ज्योडी आपल्याशींच म्हणाला, "याला आपलं नांव माहीत आहे, बरं का? कदाचित् त्याला पहिल्या प्रथमच माहीत असेल!" त्यानें बिस्किटें दुधांत भिजवलीं आणि हरणाला खायला दिलीं. ज्योडीच्या हाताला त्याचें नाक किती मऊ नि ओलें लागलें! तो पुन्हा घरांत गेला, आणि पाडसही त्याच्या मागोमाग आंत शिरलें.

तो म्हणाला, "फ्लॅग आंत आला तर चालेल का?"

"आण, आण! खुशाल आंत आण त्याला! अगदीं थेटपर्यंत."

कोपऱ्यांत फॉडरविंगचें तिपाई स्टूल होतें, त्यावर ज्योडी ताठ बसला.

मा फॉरेस्टर म्हणाली, "आज तूं इथें रात्रभर त्याच्याजवळ राहिलास तर त्याला बरं वाटेल!"

हं! म्हणजे आपण राहावें अशी यांची अपेक्षा आहे तर!

"आणि सकाळीं, जेव्हां त्याचं दफन करायचं त्यावेळीं तूं तिथें नसणं बरं नाहीं, होय कीं नाहीं? तुझ्याशिवाय त्याला दुसरा कोणी मित्र नव्हता!"

ज्योडीला आईबाबांची जी काळजी वाटत होती, ती त्यानें आतां एकदम झुगारून दिली — शर्ट फार फाटला म्हणजे आपण जसा फेकून देतों तशी! एवढ्या गंभीर घटना घडल्या असतांना त्या गोष्टीचें एवढें काय महत्त्व होतें? मा फॉरेस्टर झोपायच्या खोलींत गेली. फॉडरविंगच्या मृतदेहाजवळ पाहरा करण्याची पहिली पाळी तिची होती. हरीण खोलीभर वास घेत हिंडत होतें, एकदा या माणसाला हुंग, मग त्याला हुंग असें करीत तें शेवटीं ज्योडीजवळ येऊन खालीं बसलें.

नऊ वाजतां आंगणांत कोणीतरी घोड्यावरून आल्याचा आवाज झाला. बुढ्या सीझरवर बसून पेनीच आला होता. त्यानें लगाम घोड्याच्या मानेवर टाकला. आणि तो घरांत आला. घरचा प्रमुख या नात्यानें पा फॉरेस्टरांनीं उठून त्याचें स्वागत केलें. पेनीनें सर्वांच्या काळवंडलेल्या चेहऱ्यांवरून नजर फिरवली. आजाऱ्याच्या खोलीचें दार अर्धवट उघडें होतें तिकडे म्हातारेबुवांनीं बोट दाखवलें.

पेनी म्हणाला, "छोकरा का?"

पा फॉरेस्टरांनीं मानेनेंच होकार दिला.

"गेला? — कीं जातोय्?"

"गेला!"

"मला ती भीति वाटतच होती. ज्योडी जेव्हां अजून आला नाहीं, तेव्हां मला शंका आलीच!"

त्यानें म्हातारेबुवांच्या खांद्यावर हात ठेवला.

"मला तुमच्याबद्दल काय वाटतं, तें कसं सांगूं? पण — पण केव्हां घडलं हें?"

"आज, अगदी पहाटेच्या सुमाराला!" "तो थोडीशी न्याहारी खाईल का हें पाहण्यासाठीं मा खोलींत गेली!" "गेले एकदोन दिवस तो निजूनच आहे. आम्हीं डॉक्टरबाबांना बोलावणं धाडलं होतं, पण मग तब्येत सुधारते आहे असं वाटलं!"

एकामागून एक भराभर बोलून त्यांनीं पेनीला माहिती दिली. त्यांच्या मनांत आंतल्याआंत जी एक जखम झाली होती ती या शब्दांच्या प्रवाहामुळें धुवून निघाली, साफ झाली. तो गंभीरपणें ऐकूं लागला. मधून मधून मान हालवूं

लागला. जणूं कांहीं फॉरेस्टर मंडळींना तो एक लहानसा भक्कम खडक वाटत होता. आणि त्याच्यावर आपटून तरी आपल्या दुःखाच्या लाटा फुटतील अशी त्यांना आशा वाटत होती.

बक म्हणाला, "ज्योडीला कदाचित् थोडा वेळ त्याच्याजवळ एकटं जागत बसायची इच्छा असेल!"

ज्योडीला जेव्हां त्यांनीं खोलींत नेलें, आणि दार बंद करून घ्यायला ते मागें वळले तेव्हां ज्योडी बिचारा घाबरूनच गेला. त्याला एकदम वाटलें कीं खोलींत पलीकडच्या कोपऱ्यांत अंधारामध्यें कांहींतरी बसलेलें आहे. त्या दिवशीं रात्रीं झाडींतून सरपटत येऊन बाबांना जें चावलें तेंच तें!

तो म्हणाला, "मीं फ्लॅगला माझ्याबरोबर घेतलं तर चालेल का?"

फ्लॅगला आणायला हरकत नाहीं असें सर्वानुमतें ठरलें. आणि त्याला खोलींत ज्योडीच्या सोबतीला देण्यांत आलें. ज्योडी खुर्चीच्या अगदीं कांठावर बसला. उशीवरच्या त्या चेहऱ्याकडे त्यानें चोरून भीत भीत पाहिलें. उशाशीं एक मेज होतें आणि त्यावर मेणबत्ती जळत होती. तिच्या प्रकाशांत त्याला जो चेहरा दिसला, खोल गेलेले गाल दिसले, ते त्याला फॉडरविंगचे वाटले नाहींत. फॉडरविंग बाहेरच कुठेंतरी झाडींत कडमडत असणार! त्याचें रकून त्याच्यामागें भटकत असणार! नेहमींसारखा वाकून लंगडत लंगडत क्षणभरानेंच तो घरांत येईल पाहा, आणि मग त्याचा आवाजही आपल्याला ऐकूं येईल.

• • •

सकाळीं उजाडलें तेव्हां ज्योडी उठला. कांहींतरी ठोकल्याचा आवाज येत होता. तत्क्षणीं तो चांगला जागा झाला. पाहतो तों फॉडरविंग गेलेला. ज्योडी खाटेवरून खालीं उतरला आणि मोठ्या खोलींत शिरला. ती पण रिकामी होती. तो बाहेर गेला. देवदाराच्या ताज्या लाकडाची एक पेटी आंगणांत पडली होती, ज्योडीचे बाबा खिळे मारून तिचें झाकण बसवीत होते. फॉरेस्टर मंडळी जवळ उभी होती. मा फॉरेस्टर रडत होती. ज्योडीशीं कोणीं बोललें नाहीं. शेवटचा खिळा ठोकून पेनी उठला.

त्यानें विचारलें, "तयारी झाली?"

मंडळींनीं माना हालवून होकार दिला. बक्, मिलव्हील आणि लेम पुढें झाले.

बक् म्हणाला, "मी एकटा उचलूं शकेन!"

त्यानें पेटी उचलली आणि खांद्यावर घेतली. पा फॉरेस्टर आणि गॅबी हे कुठें दिसत नव्हते. दक्षिण बाजूच्या दरकीकडे बक निघाला. बाकीचीं माणसें त्याच्यामागून निघालीं. हळुहळू मंद गतीनें दरडीच्या दिशेनें ही यात्रा चालू झाली. जातां जातां ज्योडीला आठवलें — इथल्याच एका ओकवृक्षाच्या खालीं फॉडर-विंगनें स्वतःसाठीं द्राक्षवेलीचा एक झोंपाळा तयार केला होता. त्यानें पाहिलें तों पा फारेस्टर नेमके त्याच ठिकाणीं वाट पाहात उभे होते. मंडळींनीं आपल्याबरोबर फावडीं आणलीं होतीं. जमिनींत नुकताच पाडलेला एक खळगा दिसत होता. बकनें शवपेटिका खालीं ठेवली; आणि हळुवार हातांनीं ती त्या खळग्यांत बसवली. मग कांहीं पावलें मागें सरून तो उभा राहिला. फॉरेस्टर मंडळी घुटमळूं लागली.

पेनी म्हणाला, "बाबा, तुम्ही अगोदर!"

पा फॉरेस्टरांनीं आपलें फावडें उचललें आणि पेटीवर थोडी माती टाकली मग त्यांनीं फावडें बकच्या हातांत दिलें, बकनें थोडींशीं ढेकळें टाकलीं. एकाच्या हातांतून दुसऱ्याच्या हातांत याप्रमाणें फावडें देत सर्व भावांनीं माती टाकली. आतां थोडीशीच पेलाभर ओली माती शिल्लक राहिली होती. त्या वेळीं ज्योडीच्या हातांत फावडें आलें. त्यानें पटकन् माती उचलली आणि त्या ढिगावर टाकली. फॉरेस्टर मंडळींनीं एकमेकांकडे पाहिलें.

पा फॉरेस्टर म्हणाले, "पेनी, खिस्ती धर्माची शिकवण तुला मिळालेली आहे. तूं जर थोडंसं कांहीं बोललास, तर आम्हांला धन्य वाटेल."

पेनी पुढें झाला आणि थडग्याजवळ उभा राहिला. त्यानें आपले डोळे मिटले आणि वर सूर्यप्रकाशाकडे तोंड केलें. सर्व फॉरेस्टर मंडळी खालीं माना घालून उभीं राहिली.

"हे प्रभो, सर्वशक्तिमान् परमेश्वरा! योग्य काय आणि अयोग्य काय? हें सांगण्याचा आम्हां अजाण मर्त्य जीवांना अधिकार नाहीं! आमच्यापैकीं कुणाच्याही हातीं असतें तर या गरीब मुलाला अशा वक्रांग स्थितींत आम्हीं या जगांत आणलं नसतं. त्याच्या इतर भावांप्रमाणें तो ताठ, सरळ आणि उंच व्हावा, आणि त्याला नीटपणीं जगतां नि वागतां यावं, चार माणसांसारखीं कामं करतां यावींत अशी आम्हीं काळजी घेतली असती. पण एक प्रकारें असंच म्हटलं पाहिजे, कीं प्रभो, तूं त्याच्या दोषाची कांहीं प्रमाणांत भरपाई केलीस! रानांतल्या प्राण्यांशीं कसं

वागावं हें तूं त्याला शिकवलंस. तूं त्याला एक प्रकारचं शहाणपण दिलंस; त्याला समंजसपणा अन् सौम्य वृत्ति दिलीस. पक्षी त्याच्या जवळ येत, लहान प्राणी त्याच्या आवतींभोवतीं निर्भयपणें हिंडत आणि आम्हांला तर मुळींच शंका वाटत नाहीं कीं, एखादी रानमांजरी आली असती तरी त्यानें आपल्या दुबळ्या वेड्यावांकड्या हातांत तिला उचलून घेतलं असतं!

" आतां तुला योग्य वाटलं म्हणून तूं त्याला घेऊन गेलास – अशा ठिकाणीं घेऊन गेलास, कीं जिथें शरीर वक्र असो, मन वक्र असो; त्याची क्षिति नाहीं. पण हे प्रभो! त्याचे बिचाऱ्याचे वाकडे पाय अन् हात आणि कुबडी पाठ तूं आतां सरळ केली असशील या कल्पनेनेंच आम्हांला आनंद होत आहे. दुसऱ्या कोणाच्याही प्रमाणें तो आतां इकडे तिकडे फिरत असेल ही कल्पना आम्हांला आनंद देत आहे. प्रभो, आमचं एवढं मागणं आहे कीं, इथें त्याला ज्यांची संगत होती, ते लालपक्षी आणि जमलं तर एखादी खार, एखादं कून, आणि एखादं पोसम तं् त्याच्या सोबतीला तिथें पण दे! आमच्यापैकी प्रत्येकालाच एकलेपणाची भावना त्रस्त करीत असते आणि तूं जर त्याला ते लहानगे रानांतले प्राणी सोबतीला दिलेस तर त्याला एकटं वाटायचं नाही. स्वर्गांत असे गरीब रानटी प्राणी जवळपास असावेत, ही आम्हीं केलेली मागणी तुला भारी वाटणार नाहीं अशी आशा आहे. तुझ्या इच्छेप्रमाणेंच होवो. आमेन!"

सर्व फॉरेस्टर मंडळी पुटपुटली, " आमेन!" त्यांच्या चेहऱ्यावर घर्मबिंदु उभे राहिले होते. त्यांच्यापैकीं एकेकजण पुढें आला आणि पेनीचा हात त्यानें दाबला. फॉडरविंगचें आवडतें रकून धावत आलें आणि त्या ताज्या उकरलेल्या मातीवरून उड्या मारीत गेलें. मग त्यानें ओरडायला सुरवात केली. तेव्हां बकनें त्याला उचलून खांद्यावर घेतलें. फॉरेस्टर मंडळी माघारी वळून घराकडे आली. सीझरच्या पाठीवर त्यांनीं जीन चढवलें. पेनी घोड्यावर स्वार झाला. आणि त्यानें ज्योडीला उचलून मागें घेतलें. ज्योडीनें हरणाला हाक मारली; त्याबरोबर तें झुडपांतून बाहेर आलें.

सीझर आस्ते आस्ते घराकडे निघाला. वाटेंत कोणी कांही बोललें नाहीं. सूर्य आकाशांत वर चढला होता. लवकरच बॅक्स्टर मंडळींची बखळ दिसूं लागली. मा बॅक्स्टरनें घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकला होता. ती फाटकापाशींच उभी होती'

ती ओरडली, "एकाची काळजी होती तेवढी पुरेशी नाहीं झाली, म्हणून का दोघेही जाऊन तिकडे राहिलांत ?"

पेनी खालीं उतरला आणि ज्योडीही घसरत खालीं आला.

पेनी म्हणाला, "शांत हो मा ! राहणं आमचं कर्तव्य होतं ! गरीब बिच्चार, लहानगा फॉडरविंग वारला. त्याचं दफन करायला आज आम्ही राहिलों होतों !"

सीझरला त्यांनीं चरायला सोडलें आणि तो घरांत आला. न्याहारी तयार होती, पण आतां निवून थंड झाली होती.

पेनी म्हणाला, "हरकत नाहीं ! नुसती कॉफी गरम कर !"

तो विमनस्कपणें खात होता.

मध्येंच तो म्हणाला, "एखाद्या कुटुंबानें दुःख इतकं मनाला लावून घेतल्याचं मीं कधीं पाहिलं नव्हतं !"

ती म्हणाली, "काय सांगतांय् ? त्या आडदांड रासवट माणसांना इतकं दुःख जाणवलंय् ?"

पेनी म्हणाला, "एक दिवस असा येईल, कीं माणसाचं हृदय, कुठेंही झालं तरी सारखंच असतं हें तुला कळेल. दुःखाचा आघात कुणालाही झालं तरी जाणवणारच ! वेगवेगळ्या ठिकाणीं त्याचा ठसा वेगवेगळ्या प्रकारचा उमटतो एवढंच ! मला कधीं कधीं असं वाटतं तुझ्यावर मात्र त्यानें एकच परिणाम केला आहे – तुझ्या जिभेला धार चढवली आहे !"

ती एकदम खालीं बसली.

ती म्हणाली, "काय करूं ? दुःख सहन करायला कठोर बनणं, हा एकच मार्ग आहे अशी कांहींतरी माझी भावना झाली असावी."

पेनी मेजाजवळून उठला आणि तिच्याजवळ गेला. त्यानें तिच्या केसांवरून हात फिरवला.

"मला माहीत आहे ! एवढंच कर, दुसऱ्याशीं जरा सहानुभूतीनें वागत जा."

## – ११ –

ऑगस्ट महिन्यांतला निर्घृण उष्मा होत होता. पण एवढी कृपा होती कीं

आराम होता, काम फारसें नव्हतें. जें काय थोडें होतें तें करण्याची घाई नव्हती. पाऊस पडून गेला होता आणि मक्याचें पीक कापणीला आलें होतें. कणसांची ताटें सुकूं लागलीं होतीं; लवकरच तीं तोडायला हरकत नव्हती. यंदा पीक चांगलें मिळेल – एकरामागें दहा बुशेल तरी – असा पेनीनें अंदाज केला होता. रताळ्याच्या वेली दाट वाढल्या होत्या. 'काऊ-पी' वाटाणासुद्धा भरपूर होता. हीं धान्यें आणि त्याच्या जोडीला जवळ जवळ रोज शिकार करून आणलेल्या एखाद्या प्राण्याचें मांस हेंच तिथल्या लोकांचें नेहमींचें अन्न होतें. हिवाळ्याच्या काळांत उपयोगाला येईल असा 'काऊ – पी'चा चाराही चिकार होता. शरदृऋतु आणि त्यानंतर येणारा गारठा यांकडे बॅक्स्टर मंडळींचे डोळे लागलेले होते. रताळीं उकरण्याचे तेच दिवस. डुकरेंही तेव्हांच कापायचीं, मका दळून पीठ करायचें, ऊस पिळून त्याचा रस उकळून काकवी तयार करायची. घरांत आज जी खाण्याची जरा वाण आहे ती मग भरून निघेल. आज देखील – या आत्यंतिक टंचाईच्या काळांत – त्यांना पुरेसें मिळत नव्हतें असें नाहीं; पण त्या खाण्यांत विविधता नव्हती, भरघोस-पणा नव्हता, कोठींत राखीव सांठा भरपूर आहे अशी समाधानाची भावना नव्हती.

रानांत आणि बखळींत सूर्याचा ताप प्रखर भासत होता. मा बॅक्स्टरच्या लठ्ठ देहाला उष्णतेची पीडा होत होती. काटकोळया सडसडीत अंगाचे पेनी अन् ज्योडी – त्यांना इतका त्रास होत नव्हता. भराभर किंवा वारंवार हालचाल करायचा त्यांना आतां कंटाळा वाटत होता, एवढेंच. सकाळची धडपड दोघे बरोबरीनेंच करीत – गायीचें दूध काढीत, घोड्याला चारा घालीत, जळणासाठीं लाकडें तोडीत, विवरांतलें पाणी भरून आणीत – आणि मग संध्याकाळपर्यंत कांहींच करीत नसत.

फॉडरविंगची गैरहजिरी ज्योडीला जाणवत होती. तो जिवंत होता तेव्हां त्याचें प्रेमळ अस्तित्व ज्योडीच्या अन्तर्मनांत सदैव असायचें; अगदीं प्रत्यक्षांत जरी नाहीं तरी विचाररूपानें ज्योडी त्याच्याकडे केव्हांही वळूं शकत असे. आतां तें शक्य नव्हतें. पण फ्लॅग मात्र दिवसेंदिवस विलक्षण झपाट्यानें वाढत होता आणि तें समाधान त्याला पुरेसें होतें. ज्योडीची समजूत ही कीं फ्लॅगच्या अंगा-वरचे ठिपके मावळूं लागले आहेत — तें मोठें होत असल्याचें निश्चित चिन्ह दिसत आहे. पण पेनीला मात्र त्याच्यांत कांहीं फरक दिसत नव्हता. बुद्धीनें मात्र तें निःसंशय वाढत होतें. पेनी म्हणे कीं रानांतल्या सर्व प्राण्यांमध्यें अस्वलाचा मेंदू सर्वांत मोठा असतो, त्याच्या खालोखाल हरणाचा.

मा बॅक्स्टर म्हणाली, "फारच हुशार दिसतोय हा!" आणि पेनी म्हणाला "शीः शीः, मा! किती लाड करतेस त्याचे!" आणि ज्योडीकडे पाहून त्यानें डोळा मिचकावला.

घराच्या दरवाजाला बुटाच्या नाडीचा कोयंडा केलेला होता. फ्लॅगला जेव्हां कोंडलेलें नसे तेव्हां—मग रात्र असो, दिवस असो—तों केव्हांही तो कोयंडा उचलून घरांत यायला शिकला होता. ज्योडीच्या आंथरुणावरची पिसांची उशी त्यानें एकदा ढुशी मारून खालीं पाडली आणि साऱ्या घरभर उधळली. शेवटीं ती फाटली आणि मग तिच्यांतलीं पिसें कितीतरी दिवस घराच्या कोनाकोपऱ्यांत उडत काय जात होतीं, अन् पुडिंगच्या बशींत काय येऊन पडत होतीं! कुत्र्यांच्या-बरोबर तो हुंदडायला पण लागला. ज्यूलियाजवळ येऊन त्यानें आपल्या खुरानें तिला स्पर्श केला कीं ती म्हातारी प्रतिष्ठित कुत्री शेपूट हालवण्यापलीकडे कांहीं करीत नसे. पण रिप मात्र गुरगुरायचा, भोवतीं—भोवतीं फिरायचा आणि फ्लॅगवर झडप टाकण्याचा आव आणायचा आणि मग फ्लॅग दुगाण्या झाडून आपलें मजेदार शेपूट तुकूतुकू हालवायचा. फ्लॅगला सर्वांत जास्त खेळायला आवडत असेल तर तें ज्योडीबरोबर! ते दोघे एकमेकांशीं झोंबाझोंबी करायचे. भयंकर टकरा देण्याची चढाओढ लावायचे. आणि शर्यत खेळायचे. शेवटीं एक दिवस मा बॅक्स्टरनें तक्रार केली; कीं ज्योडी आणखी आणखी बारीक होत चाललाय्, काळ्या सापासारखा!

## —१२—

सप्टेंबरमधला पहिला आठवडा शुष्क नि रखरखीत गेला.—म्हाताऱ्या माणसांच्या हाडकांसारखा. रानांतलें गवत तेवढें वाढलें. पिकें तशींच राहिलीं. सर्वांत कडक उन्हाळा याच महिन्यांत भासला. आणि तरी पुढें जो बदल घडून येणार होता, त्याचीं पुसट चिन्हें दिसूं लागलीं,—जणूं कांहीं एक ऋतु संपून दुसरा येणार आहे. याची वनस्पतिसृष्टीला जाणीव झाली होती. सर्वच प्राण्यांची अन्नान्नदशा झाली आहे असें पेनीनें बोलूनही दाखवलें. वसंत ऋतूंतलीं आणि उन्हाळ्यांतलीं बारीक फळें—ब्रायरबेरी, हकलबेरी, ब्लूबेरी, चोकबेरी आणि रानटी गूजबेरी हीं फळें केव्हांच नाहींशीं झालीं होतीं. रानटी प्लम आणि

मेहॉ झाडांना कित्येक महिन्यांत फळ आलें नव्हतें. हीं फळें पक्ष्यांना नि पशूंना पण आवडतात. रकून आणि कोल्हे यांनीं रानटी द्राक्षवेली ओरपून साफ केल्या होत्या.

हिंवाळ्यांत ज्यांचा हंगाम होता, तीं पापॉ आणि गालबेरी आणि परसीमॉन् हीं फळें अजून पिकलीं नव्हतीं. देवदाराचीं, ओक वृक्षाचीं आणि पामेटोचीं फळें पहिल्या हिमवृष्टीपर्यंत पिकणार नव्हतीं. नुकतीच उगवलेली कोंवळी हिरवळ, वे आणि मर्टल् फुलांच्या गुळचट कळ्या, तारेसारख्या दिसणाऱ्या ब्रायरग्रासच्या काटक्या आणि तळ्यांत अन् कुरणांमधून आढळणारे आरारूटचे कोंब आणि लिलीच्या फुलांचीं रसाळ देठें नि पाकळ्या हें हरणांचें खाद्य बनलें होतें. त्यामुळें हरणें सखल ओलसर भागांत आणि दलदलींत, कुरणांत आणि बेवृक्षांच्या राईंतच जास्त जमलेलीं असत. बॅक्स्टर बेटाची हद्द ओलांडून तीं क्वचितच येत. दलदलीच्या भागांत त्यांची शिकार करणें कठीण जाई. सबंध महिनाभरांत पेनीला फक्त एक लहान हरीण मारायला मिळालें होतें.

सप्टेंबर महिन्यांत चंद्राची कोर वाढत चाललेली बॅक्स्टर मंडळींनीं सचिंतपणें पाहिली. पहिल्या आठवड्यांतच पेनीनें आपल्या बायकोला आणि मुलाला हाक मारली. चंद्रकोर जवळजवळ उभी दिसत होती. पेनीचा आनंद गगनांत मावेना.

"पाऊस नक्की लवकर येणार आहे." त्यानें सांगितलें, "चंद्रकोर जर आडवी असती तर ढगांतलं पाणी निघून गेलं असतं, आणि आपल्याला मुळींच पाऊस मिळाला नसता. पण आतां खैर झाली. दोरीवर कपडे नुसते टाकून ठेवले तरी देवाच्या दयेनें ते धुवून निघतील!"

पेनीचें भविष्य खरें ठरलें. तीन दिवसांनंतर पावसाचीं सर्व लक्षणें दिसूं लागलीं. तो आणि ज्योडी शिकार करून परत येत असतांना ज्यूनिपर झऱ्याजवळ त्यांना मगरी ओरडत असल्याचा आवाज ऐकूं आला. पांढऱ्या सागरी पक्षांच्या एका थव्यानें वरून उड्डाण केलें. ऊन्ह लागूं नये म्हणून डोळ्यांना हाताचा आडोसा करून पेनीनें त्यांच्याकडे चिंतातुर नजरेनें पाहिलें.

तो ज्योडीला म्हणाला, "हे समुद्रावरचे पक्षी आहेत. फ्लॉरिडा सोडून ते सहसा इकडे यायचे नाहींत. मला हें लक्षण बरं दिसत नाहीं. हीं वाईट हवेचीं चिन्हं आहेत आणि मी उगाच कांहींतरी बोलायचं म्हणून बोलत नाहीं.

ज्योडीचा उत्साह मात्र त्या सागरी पक्षांप्रमाणेंच वर उफाळून आला. त्याला वादळ अतिशय प्रिय. काय थाटामाटानें वादळाला सुरवात झाली. घरांत कोंडून घेऊन सर्व मंडळी आरामांत सुरक्षित बसली. काम करणें तर शक्यच नव्हतें. त्यामुळें सारींजणें एकत्र बसून राहिलीं. छपरावर पाऊस धबाधब पडत होता. त्याची आई खुषींत होती; तिनें त्याच्यासाठीं काकवीच्या वड्या केल्या आणि पेनीनें गोष्टी सांगितल्या.

ज्योडी म्हणाला, "चांगलं सपाटून मोठं वादळ होऊं दे."

पेनीनें वळून त्याच्याकडे तीव्र नजरेनें पाहिलें.

"असली भलतीसलती इच्छा करूं नकोस! तुझं सपाटून मोटं वादळ म्हणजे झंझावात, कसं असतं तें तुला माहीत आहे? पिकं तें भुईसपाट करून टाकतं. बिचाऱ्या खलाशी लोकांना पाण्यांत बुडवतं. झाडावरचीं सर्व मोसंबीं गळून पडतात, आणि तिकडे घरंच्या घरं त्यानें उखडलीं जातात, आणि असा गारठा पडतो कीं त्यामुळें माणसं मरतात."

ज्योडी नरमाईनें म्हणाला, "मग पुन्हा नाहीं मी अशी इच्छा करणार! पण वारा नि पाऊस तरी छान वाटतात."

"तें ठीक बोललास. वारा आणि पाऊस ही निराळी चीज आहे."

• • •

त्या दिवशीं संध्याकाळीं सूर्य फार विचित्र तऱ्हेनें मावळला. सूर्यास्ताची प्रभा लाल नव्हती; हिरवी होती. सूर्य मावळल्यानंतर पश्चिम क्षितिज कबऱ्या रंगाचें दिसूं लागलें. पूर्व दिशेला कोंवळ्या कणसांचा जसा रंग असतो तशी प्रभा पसरली. पेनीनें आपली मान हालविली.

"मला हें लक्षण बरं दिसत नाहीं! भयंकर धोका दिसतोय् मला!"

तरी पण सकाळ एकंदरींत स्वच्छ होती. पूर्व दिशा मात्र रक्तासारखी लाल दिसत होती. पेनीनें सकाळचा वेळ आंगणांतल्या कोठीचें छप्पर साफ करण्यांत घालविला. त्यानें पिण्याचें पाणी दोन वेळां विवरांतून भरून आणलें. मिळालीं तेवढीं बकेटें भरलीं. सकाळ सरायला आली तरी आकाश कबऱ्या रंगाचें बनलें आणि मग तसेंच राहिलें. हवेची बिलकूल हालचाल होत नव्हती.

ज्योडीनें विचारलें, "वादळ होणार काय?"

"मला नाहीं वाटत. पण कांहीं तरी होणार एवढं खरं! हें नेहमींसारखं नाहीं. विचित्र वाटतं!"

दोनप्रहरीं आकाश इतकें काळेंकुट्ट बनलें कीं, कोंबड्या घरांत जाऊन बसल्या. ज्योडीनें ट्रिक्सीला नि तिच्या वासराला हांकलून गोठ्यांत घातलें. पेनीनें रोजच्यापेक्षां लवकर धार काढली. म्हाताऱ्या सीझरला त्यानें तबेल्यांत घातलें, आणि एक फावडेंभर कडबा उरला होता तो त्याच्या गव्हाणींत टाकला.

पेनी म्हणाला, "खुराड्यांतून अंडीं घेऊन ये, जा. मी घरांत चाललों. चल, घाई कर, नाहींतर सांपडशील!"

कोंबड्यांचा अंडीं घालण्याचा हंगाम नव्हता. खुराड्यांत फक्त तीनच अंडीं होतीं. ज्योडी धान्याच्या अडणीवर चढला. तेथें बुड्ढी पट्ट्यापट्ट्याची पाणकोंबडी वरच्या बाजूला अंडीं घालीत होती. घरट्यांत दोन अंडीं होतीं. पांचही अंडीं त्यानें आपल्या शर्टाच्या आंत कोंबली आणि तो घराकडे निघाला. त्याच्या बाबांची एवढी गडबड उडाली होती पण त्याला मात्र तसें कांहीं वाटत नव्हतें. एकाएकी फसव्या संधिप्रकाशाच्या निस्तब्धतेंत त्याला भीतीचा धक्का बसला. दूर अंतरावर कसलीतरी प्रचंड गर्जना ऐकूं येत होती. वारा होता तो! ईशान्य दिशेकडून तो आपल्या जवळ जवळ येत आहे अशी स्पष्ट जाणीव त्याला झाली. जणूं कांहीं बदकांच्या पायांसारखे पडद्याचे पण प्रचंड पाय टाकीत तो झपाट्यानें येत होता आणि येतांना वाटेंतल्या वृक्षांचे शेंडे झाडीत चालला होता. मक्याच्या शेतावरून त्यानें जणूं कांहीं एका झपाट्यांत उडी मारली. अंगणांतल्या झाडांवर वारा सों सों करीत येऊन आदळला आणि मलबेरीच्या फांद्या खालीं वांकल्या तर चायनाबेरीच्या टणक फांद्या कडकड वाजल्या. वाऱ्याचा सोसाटा ज्योडीच्या अंगावरून पलीकडे निघून गेला तेव्हां, पुष्कळशीं बदकें कळप करून उंचावरून उडत असलीं म्हणजे जशी खसबस होते तशी झाली. देवदार वृक्षांनीं शीळ वाजवली. आणि मग पाऊस सुरू झाला.

वाऱ्याचा झोत खूप उंचावरून गेला होता. आतां आलेला पाऊस म्हणजे जणूं आभाळापासून जमिनीपर्यंत पसरलेली एक पक्की भिंत होती. ज्योडीचें शरीर जणूं त्या भिंतीसपाट आपटत होतें. जशी कांहीं फार उंचावरून येऊन त्यानें त्या भिंतीवर धडक मारली होती. आपल्या एका हाताचें ओंजळ करून त्यानें त्यांत अंडीं धरलीं आणि दुसरा हात तोंडावर धरून तो कसाबसा आंगणांत आला. हरीण त्याची

वाट पाहात होतें, थरथर कांपत होतें. त्याची शेपटी ओलीचिंब चप्पट होऊन लोंबत होती आणि कानही खालीं लोंबत होते. ज्योडीला पाहतांच त्यानें त्याच्याकडे धाव घेतली आणि त्याच्या पाठीशीं तें आसरा शोधूं लागलें. ज्योडी धावत घराच्या पिछाडीला मागच्या दाराकडे गेला. हरीणही उड्या मारीत त्याच्या मागोमाग गेलें. सैंपाकघराच्या दरवाजाला कडी होती. वारा नि पाऊस एवढ्या जोरानें दरवाजावर आदळत होता कीं ज्योडीला दार उघडतां येईना. दाराच्या जाड देवदारी फळ्यांवर त्यानें बुक्क्या मारल्या. एक क्षण त्याला असें वाटलें कीं या सर्व गडबडींत आपला आवाज आंत कुणाला ऐकूं गेला नसेल; आणि आतां आपल्यावर अन् हरणावर बाहेर राहण्याची पाळी येणार! पण तेवढ्यांत पेनीनें आंतून कडी उचलली आणि दार बाहेर ढकललें. बाहेर वादळाचा जोर होताच, ज्योडी नि फ्लॅग तीरासारखे आंत घुसले. ज्योडी धापा टाकीत उभा राहिला. डोळ्यावर सांचलेलें पाणी त्यानें पुसलें. हरणानें डोळ्यांची मिचमिच केली.

पेनी म्हणाला, "बोल आतां! कुणीं इच्छा केली होती, असं वादळ व्हावं म्हणून?"

ज्योडी म्हणाला, "माझ्या इच्छा इतक्या लवकर फळायला लागल्या तर मी खूप जपूनच इच्छा करत जाईन!"

मा बॅक्स्टर म्हणाली, "जा, आत्तांच्या आत्तां ते ओले कपडे बदल पाहूं! आणि आंत येण्यापूर्वी त्या हरणाला गोठ्यांत घालतां येत नव्हतं?"

"तेवढं करायला वेळच नव्हता, मा. फ्लॅग इतका भिजला होता अन् भ्याला होता!"

"ठीक आहे. इथें कांहीं वांडपणा केला नाहींन् म्हणजे झालं!"

छपरावर पाऊस आपटत होता. वळचणीखालीं वारा शीळ घालीत होता. म्हातारी ज्यूलिया हरणाच्या शेजारीं पाय ताणून पडली होती. वादळ अगदीं ज्योडीला हवें तसें मस्त होतें! त्यानें मनांतल्या मनांत ठरवून टाकलें होतें कीं आणखी एक दोन आठवड्यांत असंच दुसरं वादळ व्हावं म्हणून आपण इच्छा करणार! पेनी मधून मधून खिडकीच्या बाहेर अंधारांत डोकावून पाहत होता.

"पाऊस पण पाऊस आहे! वेटकुळ्या पण मरतील या पावसांत!" तो उद्गारला.

रात्रीचं जेवण झकास होतें. 'काऊ-पी'ची भाजी, हरणाच्या मांसाचा

धुपवलेला ' पाय ' आणि बिस्किटाचें पुडिंग. एखादी घटना विशेषप्रसंग आहे असा नुसता भास होण्याचा अवकाश, मा बॅक्स्टरला कांहीं तरी जास्ती सैंपाक करण्याची स्फूर्ति व्हायची. जणूं कांहीं पीठ, मोहन वगैरेंचा यथाशक्ति उपयोग केल्यानेंच तिच्या कल्पनेला वाचा फुटत असे. तिनें आपल्या बोटांनीं फ्लॅगला थोडें पुडिंग चाटायला दिलें. कृतज्ञतेच्या गुप्त भावनेनें ज्योडीनें तिला जेवणाचीं भांडीं विसळायला नि पुसायला मदत केली.

सकाळीं ज्योडीनें पाहिलें तों आपले बाबा ट्रिक्सीचें दूध काढण्यासाठीं वादळांतच बाहेर पडण्याच्या तयारींत आहेत. तातडीचें काम असें तूर्त तरी तेवढेंच होतें. पावसाची मुसळधार जरासुद्धा कमी झालेली नव्हती.

मा बॅक्स्टर म्हणाली, " चटकन् आटपून या घरांत बरं का ? नाहींतर निमोनिया होऊन मरायची पाळी येईल ! "

ज्योडी म्हणाला, " मा, मला जाऊं दे ना. "

पण त्यावर पेनीनें लगेच म्हटलें, " नको, पोरा ! तूं वाऱ्यानें उडून जाशील. "

त्या वादळी हवेला तोंड देत असलेली आपल्या बाबांची किरकोळ हाडकुळी आकृती पाहून ज्योडीच्या मनांत आलें, जाडेपणा नि काटकपणा या बाबतींत बाबांच्यांत नि आपल्यांत असा काय फरक आहे ? पेनी पुन्हा आंत आला— ओलाचिंब नि धापा टाकीत. भोपळ्याच्या भांड्यांतल्या दुधांत पावसाचे थेंब ठिपक्यांसारखे दिसत होते.

तो म्हणाला, " मीं कालच पाणी भरून ठेवलं हें बरं झालं. "

सुरवातीला जशी वादळी हवा होती तशीच त्याही दिवशीं कायम राहिली. पाऊस अखंड पडत होता. आणि वाऱ्याच्या जोरानें त्याचें पाणी वळचणीखालून आंत येत होतें. तें सांठवण्यासाठीं मानें भांडीं नि भोपळे यांची रांग लावली. दोन प्रहरीं पेनी ट्रिक्सीची धार काढायला, सीझरला नि कोंबड्यांना खाऊंपिऊं घालायला पुन्हा एकदां बाहेर पडला. कोंबडी बिचारीं घाबरून एकमेकांना चिकटून बसलीं होतीं. पेनी परत येतांच मानें त्याला कपडे बदलायला लावले. ओले कपडे शेकोटीजवळ सुकायला ठेवले. ते सुकत असतां त्यांतून वाफ निघूं लागली आणि ओल्या कपड्याचा गोड उबट वास सुटला.

त्या रात्रीं मात्र जेवायला फारसें केलेलें नव्हतें; आणि मंडळी लवकर झोंपीं गेली. भलत्या वेळीं अंधार पडला होता, त्यामुळें किती वाजले असतील

तें सांगणें अशक्य होतें. ज्योडी जागा झाला तेव्हां नेहमींच्या हिशेबानें, उजाडायला एक तास बाकी असावा. अजूनही सर्व अंधार होता आणि पाऊस धो धो पडतच होता. वाराही कमी झालेला नव्हता.

पेनी म्हणाला, " आज सकाळीं उघाडी येईल. हें नक्की ईशान्येचं तीन दिवस टिकणारं वादळ होतं. पण कसला पाऊस हा ! आतां एकदा सूर्यदर्शन झालं कीं धन्य वाटेल ! "

पण सूर्यदर्शन झालें नाहीं. सकाळीं तर उघाडी नाहींच आली; पण दुपारनंतर पाऊस पूर्वींपेक्षांही जोरजोरानें पडला. असा पाऊस पडला कीं जणूं कांहीं ज्यूनिपर नदी अन् सिल्व्हर ग्लेन ओढा अन् लेक जॉर्ज सरोवर नि सेंट जॉन्स नदी या सर्वांनीं मिळून आपलें पाणी जंगलावर उपडें केलें होतें. वारा पूर्वींपेक्षां जास्त भयंकर वाटला असें नाहीं; पण सोसाट्याचा होता. वारा नि पाऊस यांचें सों–सों धो–धो, सों–सों धो–धो सारखें आपलें चालूच होतें.

पेनी सैंपाकघरांत येरझारा घालीत होता. तो म्हणाला, " माझे बाबा सांगायचे कीं १८५० च्या सुमाराला जीं वादळं होत तीं विलक्षण असत. पण असलं भयंकर वादळ फ्लॉरिडाच्या इतिहासांत कधीं झालं असेल असं मला वाटत नाहीं."

असेच दिवस निघून गेले. हवेंत कांहीं बदल झाला नाहीं. पांचव्या दिवशीं पेनी आणि ज्योडी धावत काऊपीच्या शेतांत गेले. एकदोन जेवणांपुरती तरी भाजी तोडायला हवी होती. रोपें अगदीं भुईसपाट झालीं होतीं. त्यांनीं वाऱ्याकडे नि पावसाकडे पाठ करून आणि खूप जोर करून वेली मुळांसकट उपटल्या. परत येतांना ते आंगणांतल्या कोठी*पाशीं थांबले आणि तिथून खारावलेल्या मांसाचा एक तुकडा त्यांनीं बरोबर घेतला. काऊपीच्या शेंगांवर बाहेरच्या बाजूनें बुरशी चढूं लागली होती; पण आंतले दाणे अजून घट्ट नि चांगले होते. पुन्हा एकदा रात्रीचें जेवण म्हणजे बॅक्स्टर मंडळींना मेजवानी वाटली,

सहाव्या दिवसाची सकाळ पण हुबेहुब अशीच गेली. एवींतेवीं आपण भिजणारच, म्हणून पेनी आणि ज्योडी यांनीं सदरे काढून टाकले आणि ते पोतीं

* ही कोठी म्हणजे ' स्मोक हाऊस '. मांसमासळी शेकून किंवा धुरकटून साफ करण्यासाठीं घरापासून दूर हीं स्वतंत्र खोली केलेली असे. तिच्यांतच सांठवणीचे पदार्थ ठेवलेले असत. —अनु०

घेऊन शेतांत गेले. मग मध्यान्हापर्यंत भर पावसांत खपून त्यांनीं काऊपीच्या बुळबुळीत शेंगा वेलींपासून उपटून काढल्या. मग घरांत येऊन त्यांनीं घाईघाईनें जेवण केलें आणि कपडे बदलण्याच्या भानगडींत न पडतां ते पुन्हा शेतावर गेले. बहुतेक सगळें शेत त्यांनीं ओरपून काढलें. पेनी म्हणाला, “ पाला तर सगळा फुकटच गेलाय्. पण शेंगा कितपत वांचवतां येतात तें पाहूं या.”

सातव्या दिवसाची सकाळ म्हणजे पहिल्या दिवशींच्या सकाळचाच नमुना होता. न्याहारीनंतर पेनीनें ज्योडीला मक्याच्या शेतावर नेलें. वादळाच्या मारामुळें कणसांचे गोटे तुटले होते आणि ताटें झोडपलीं जाऊन जमिनीलगत पडलीं होतीं. पण कणसांच्या दाण्यांना मात्र अजून इजा झाली नव्हती. त्यांनीं कणसें गोळा करून सैंपाकघराच्या कोरड्या नि ऊबदार निवाऱ्याच्या जागीं नेलीं.

मा बॅक्स्टर म्हणाली, “ अजून काऊपीचे दाणेसुद्धा माझे वाळवून झाले नाहींत. हे सगळे मीं कसे वाळवावेत ? ”

पेनीनें उत्तर दिलें नाहीं. पण तो पुढच्या खोलींत गेला आणि त्यानें शेकोटींत विस्तव पेटवला. ज्योडी आणखी लाकडें आणण्यासाठीं बाहेर गेला. लाकडें पार ओलींचिंब झालीं होतीं; पण त्यामधलीं तेलकस लाकडें होतीं तीं थोडा वेळ तापविल्यानंतर चांगलीं जळण्यासारखीं होतीं. पेनीनें मक्याचीं कणसें जमिनीवर पसरून ठेवलीं.

तो ज्योडीला म्हणाला, “ आतां तुझं काम हें कीं हीं कणसं मधून मधून उलटायचीं. म्हणजे सगळ्या बाजूंनीं त्यांना शेक मिळेल. ”

मा बॅक्स्टर म्हणाली, “ उसाची काय स्थिति आहे ? ”

“ भुईसपाट झालाय्. ”

“ अन् रताळ्यांचं काय झालं असेलसं वाटतं तुम्हांला ? ”

पेनीनें आपली मान हालवली. दोन प्रहरीं तो रताळ्यांच्या शेतांत गेला आणि रात्रींच्या जेवणापुरतीं रताळीं त्यानें उकरून काढलीं. तीं नासायला सुरवात झाली होती. नासलेला भाग कापून टाकून त्यांतलीं कांहीं वापरण्यासारखीं झालीं. पुन्हा एकदा रताळ्यांमुळें रात्रीच्या जेवणाला मजा आली.

पेनी म्हणाला, “ उद्यां सकाळपर्यंत जर हवा बदलली नाहीं, तर आपण झगडण्याचं सोडून द्यावं नि स्वस्थ पडून मरणाची वाट पाहावी हें चांगलं. ”

आपल्या बाबांना इतक्या निराशेनें बोलतांना ज्योडीनं कधीं ऐकलं नव्हतें

त्याला त्यामुळें थिजल्यासारखें झालें. अपुरें खाणें मिळाल्यामुळें पाडसावरही परिणाम झाला होता. पाठीचें हाड नि बरगड्या दिसूं लागल्या होत्या. तें कितीदा तरी 'बें बें' करीत होतें.

मध्यरात्रीं ज्योडी उठला. आपले बाबा उठून कांहींतरी करताहेत असें आवाजावरून त्याला वाटलें. पावसाचा जोर कमी झाल्यासारखा वाटला. पण खात्री होण्यापूर्वीच त्याला पुन्हा झोप लागली.

आठव्या दिवशीं सकाळीं तो उठला तेव्हां कांहींतरी वेगळें वाटत होतें. रोजच्या धूमधडाक्याऐवजीं शांतता होती. पाऊस थांबला होता. इतके दिवस सतत वाहणारे वारे स्थिरावले होते. कबऱ्या, चिंब वातावरणांतून कसलीतरी प्रभा पसरत असल्यासारखें वाटत होतें. डाळिंबाच्या फुलांसारखा तिचा रंग होता. पेनीनें सर्व दारें नि खिडक्या सताड उघडून टाकल्या.

"बाहेर मोटंसं हिंडायूजोगतं जग उरलंय् असं नाहीं," तो म्हणाला, "पण जग उरलंय् याबद्दलच आपण उपकार मानले पाहिजेत."

कुत्रीं त्याच्या अंगाला घसटून एकदमच उड्या मारीत बाहेर पडलीं. पेनी हसला.

"प्रलयानंतर नोआच्या आर्कमधून बाहेर उतरण्यासारखं वाटतंय्" तो म्हणाला, "ए ओरी! चल माझ्याबरोबर बाहेर." ज्योडीही उड्या मारायला लागला. हरणाबरोबर उड्या टाकीत तो पायऱ्या उतरला.

"आम्ही दोन हरणं आहोंत!" तो ओरडला.

मा बॅक्स्टरनें शेताच्या पार एकदा नजर टाकली आणि पुन्हा रडायला आरंभ केला. पण ज्योडीला वाटलें, हवा किती गार, गोड अन् झकास आहे! हरणालाही तसेंच वाटत असावें. कारण आंगणाच्या फाटकावरून त्यानें किती सफाईनें उडी मारली! त्याचे खूर निमिषार्धांत कसे चमकले! पुरानें जग उध्वस्त झालं होतें आणि पेनी आपल्या बायकोला या गोष्टीची पुन्हा पुन्हा आठवण करून देत होता.

## — १३ —

उध्वस्त झालेल्या पिकांतून शक्य तेवढें वांचवण्याचें काम पेनी दोन आठवडे करीत होता . राताळीं नासूं लागलीं होतीं आणि तीं तावडतोब उकरली नसतीं तर

सर्वच फुकट गेलीं असतीं. त्या कामांत ज्योडी तास न् तास गुंतून गेला. खुरप्यानें चागलें खोल तर उकरायला पाहिजेच होतें; पण त्याचबरोबर वाफ्याच्या मध्य-भागाला धक्का लावून चाललें नसतें. आणि मग, फार काळजीपूर्वक उकरून त्यानें कांहीं रताळीं बाहेर काढलीं. सगळीं उकरून झाल्यावर मा बॅक्स्टरनें तीं स्मशाच्या देवडींत सुकायला नि शक्य तेवढीं सुधारायला ठेवलीं. त्यांतही मग निवड करून निम्मीं टाकून द्यावीं लागलीं. त्यांचीं नासत चाललेलीं टोकें नि डेखें कापून टाकून तीं डुकरांसाठीं बाजूला ठेवण्यांत आलीं.

काऊपीचा पाला तर पार नष्ट झाला होता. आधींच चांगला पिकायला आलेला होता; आतां आठवडाभराच्या पाण्यानें त्याचा ओलाचिंब बुरसट लगदा होऊन जमिनीवर पडला होता. बॅक्स्टर मंडळींनीं दाणे वांचवले होते तेवढेच मिळाले.

पूर ओसरून तीन आठवडे लोटल्यावर, इतक्या दिवसांचें ऊन्ह मिळाल्या-नंतर, पेनी आपला विळा घेऊन कुरणाकडे गेला. या कुरणाला त्यानें आतां ‘ मलेट प्रेअरी ’ असें नांव दिलें होतें. तिथलें चिखलांतलें गवत त्यानें तोडलें आणि सुकत घातलें.

“ अशा आपत्तीच्या काळांत हा चारा कांहीं वाईट नाहीं ” तो म्हणाला.

## — १४ —

येत्या हिंवाळ्यांत आपल्या पुढ्यांत काय वाढून ठेवलें आहे,—शिकारीचें सावज आणि सतावणारे प्राणी या दोन्ही बाबतींत — याची कल्पना बॅक्स्टर मंडळींना नोव्हेंबरच्या सुमारास आली. नेहमींच्या मानानें फारच थोडीं हरणें शिल्लक राहिलीं होतीं. पूर्वीं जिथें बखळीच्या शिवेवरून डझनावारी हरणांचा कळप चरत आंत यायचा तिथें आतां एखादाच काळवीट किंवा हरिणी कुंपणा-वरून काऊपीच्या शेतांत दुसऱ्याच्या मालकीचें अन्न हिरावून घ्यायला, उडी मारतांना दिसे. पण हीं हरणं आतां चांगलीं धीट झालीं, आणि रताळ्याच्या वाफ्यांत कांहीं बुडखे शिल्लक राहिलेत का म्हणून हुंगूं लागलीं.

खाण्याजोगते सर्व प्राणी — हरणें, तुर्की कोंबड्या, खारी आणि पोसम हीं आतां इतकीं विरळ झालीं होतीं, कीं कधीं कधीं दिवसभर शिकार करून सुद्धां

कांहीं पदरांत पडत नसे. शत्रुवत् वागणाऱ्या प्राण्यांची सुद्धा फार प्राणहानी झाली होती. पहिल्यानें पेनीला वाटलें, कीं ही गोष्ट आपल्या फायद्याचीच ठरेल. पण लवकरच असें दिसून आलें कीं शिल्लक राहिलेलीं श्वापदें जास्तच भुकेलीं आणि कासावीस बनलीं आहेत; कारण त्यांचा स्वतःचा अन्नसांठा कमी झाला आहे. यामुळें आपल्या घरच्या डुकरांच्या जिवाची पेनीला काळजी वाटूं लागली. आणि आतां जास्त वाट पाहण्यापेक्षां डुकरें सध्याच मारलेलीं बरीं, असें मा बॅक्स्टरचेंही मत पडलें. एकंदर आठ डुकरांची कत्तल करण्यांत आली. त्या रात्रींचें जेवण म्हणजे तर मेजवानी होतीच; पण त्यानंतरही बरेच दिवस सुग्रास भोजन मिळत होतें. परसांतल्या बागेंत लवकरच कॉलर्डचीं रोपें उगवतील आणि सबंध खळभर रानटी मोहरीचा पाला उगवेल अशी अपेक्षा होती. या भाज्यांबरोबरच शिजवायला आतां बेकन मिळणार होतें आणि काऊपीचे भाजलेले दाणेही त्याच्या जोडीला होतेच. डुकराच्या कातडीचे भाजलेले तुकडे भाकऱ्यांसाठीं कित्येक महिने पुरण्यासारखे होते. एकंदरींत हिंवाळ्याला तोंड देण्याची बॅक्स्टर मंडळींची तयारी होती. आंगणांतली कोठी भरलेली असल्यामुळें, शिकार मिळाली नाहीं तरी मोठेंसें काळजीचें कारण नव्हतें.

मक्याचें फारसें नुकसान झालेलें नव्हतें. भर पावसांत जीं कणसें शेतांत ताठ उभीं होतीं त्यांनासुद्धा फारशी इजा पोचलेली नव्हती. ज्योडी रोज बरेच तास चक्कीवर बसायचा, तिचा दांडा तासन्तास डोक्यावरून गोल फिरवणें म्हणजे ठरीव ठशाचें काम होतें खरें, पण त्रासदायक होतें असें नाहीं. ज्योडीनें एक मोठा झाडाचा बुंधा ओढत तिथें आणून ठेवला होता. आणि पाठ दुखायला लागली किंवा कंटाळा आला म्हणजे तो त्या बुंध्यावर बसून विसांवा घेई.

तो वडिलांना म्हणाला, "माझा गणिताचा बहुतेक अभ्यास मी इथेंच करतों."

पेनी म्हणाला, "भरपूर करतोस ना पण? कारण तुला जे मास्तर मिळणार होते ते आतां या पुरामुळें मिळणं शक्य नाहीं. फॉरेस्टर मंडळींनीं आणि मीं आपसांत असं ठरवलं होतं कीं या हिंवाळ्यांत तुला नि फॉडरविंगला मिळून घरीं मास्तर ठेवायचा! फॉडरविंग तर वारलाच. पण मीं अजून असं ठरवलं होतं कीं सांपळ्यांत थोडीफार शिकार पकडून एकट्यालाच कांहीं पैसे उभे करतां आले तर पाहावं. पण आतां जनावरं मिळताहेत कुठं? आणि एखादं मिळालं तरी त्याचं कातडं इतकं भिकार असतं कीं त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं."

[library stamp] हरिण बालक ... ८३९५



ज्योडी सांत्वनाच्या स्वरांत म्हणाला, "कांहीं हरकत नाहीं. मला आतां पुष्कळ कळायला लागलंय्!"

"यावरूनच तुझं अज्ञान किती आहे तें दिसतं! तूं नुसतं वयानं वाढावंस आणि तुला शिक्षण मात्र मुळींच मिळूं नये, हें मला अगदीं आवडत नाहीं. असो, यंदा तरी मी स्वतः जें कांहीं थोडंसं शिकवीन तेवढ्यावरच तुला भागवलं पाहिजे!"

ज्योडीला ही योजना एकदम पसंत पडली. पेनीनें त्याला एक धडा वाचायला शिकवायचा किंवा त्याचें गणित घ्यायचें, आणि मग दोघांच्याही लक्षांत येण्यापूर्वींच पेनी आपला एखादी गोष्ट सांगायला लागायचा! ज्योडी आपलें चक्की पिसण्याचें काम हसत खेळत करीत होता. मध्येंच फ्लॅगची स्वारी तिथें यायची आणि मग ज्योडी आपली चक्की थांबवायचा आणि चक्कीच्या भोकांतून वाया गेलेलें जें पीठ पडलेलें असें तें त्याला चाटायला द्यायचा.

फ्लॅग जास्त जास्त धीट बनत होता. कधींकधीं तो झाडींत जायचा, तो तासभर परत यायचाच नाहीं. त्याला आतां गोठ्यांत ठेवणें शक्य नव्हतें. गोठ्याच्या ढिल्या झालेल्या लाकडी फळ्या लाथ मारून पाडायला तो शिकला होता. "हें हरिण आतां जंगली बनत चाललं आहे, आणि शेवटीं एक दिवस नाहींसं होईल." असें मा बॅक्स्टर बोलून दाखवी. वास्तविक तिला मनांतून तशी 'आशा' वाटत होती म्हणूनच तिचें हें मत बनलें होतें! ज्योडीला मात्र अशा बोलण्याचें आतां कांहीं वाटत नसे. त्याला माहीत होतें कीं आपल्याला जसा अस्वस्थपणा वाटत असतो तसाच या पाडसालाही वाटतो. जरा पाय ताणावे आणि आपल्याबरोबर जग शोधीत हिंडावें, एवढीच फ्लॅगची इच्छा असणार! त्या दोघांना एकमेकांचीं मनें बरोबर कळत होतीं. ज्योडीला हेंही माहीत होतें, कीं फ्लॅग जेव्हां दूर भटकत जातो तेव्हां तो नुसता गोल फेऱ्या मारीत असतो. आणि आपण केव्हांही हाक मारली तरी ती त्याला ऐकूं गेल्याशिवाय राहत नाहीं.

## — १५ —

थंडीचा पहिला तडाखा नोव्हेंबरच्या अखेरीस पडला. बखळीच्या उत्तर टोकाला जो मोठा हिकरीचा वृक्ष होता. त्याचीं पानें लोण्यासारखीं पिवळीं दिसूं

लागलीं; गोड गोंदाचीं झाडें पिवळीं नि लाल बनलीं, आणि घराजवळच्या रस्त्यापलीकडचें काळ्या देवदारांचें जंगल लालभडक दिसूं लागलें. जणूं कांहीं तिथें एखादी शेकोटीच पेटली होती! दिवसाची सुरवात थंड नि आल्हाददायक वाटायची. दुपारीं मजेशीर ऊब नि सुस्ती वाटायची आणि मग संध्याकाळीं पुन्हा गारठा पडायचा. बॅक्स्टर मंडळींनीं शेकोटी पेटवायला नुकतीच सुरवात केली होती. संध्याकाळच्या वेळीं सर्वजण बाहेरच्या खोलींत विस्तवाजवळ बसून राहत.

मा बॅक्स्टर म्हणाली, "पुन्हा शेकोटीचे दिवस आपल्या वाट्याला आले ही घटना कधीं कधीं शक्य कोटींतलीच वाटत नाहीं.

ज्योडी पोटावर आडवा पडला होता आणि ज्वाळांकडे टक लावून पाहत होता. याच ठिकाणीं त्याला पुष्कळदा फॉडरविंगचा तो स्पॅनिश माणूस दिसत असे. डोळे बारीक केले आणि जाळ जरासा बाजूला होत एखाद्या विवक्षित ओंडक्याला स्पर्शून वर जाण्याची वाट पाहिली कीं त्याला विनासायास तो स्पॅनिश घोडेस्वार दिसायचा. त्यानें अंगांत लाल आंगरखा नि डोक्याला चकचकीत शिरस्त्राण घातलेलें असें. हें चित्र फार वेळ टिकत नसे. कारण मध्येंच लाकडें हालायचीं, ओंडके ढासळून पडायचे, आणि घोडेस्वार पुन्हा पसार व्हायचे.

ज्योडीनें विचारलें, "स्पॅनिश लोकांचे लाल आंगरखे असत?"

पेनी म्हणाला, "मला माहीत नाहीं, बाळ! आतां कळलं ना तुला, मास्तर किती उद्योगी असतो तें?"

मा बॅक्स्टर कुतूहलानें म्हणाली, "असली कल्पना कुणीं बरं भरवली असेल याच्या डोक्यांत?"

ज्योडी कुशीवर वळला आणि एक हात त्यानें फ्लॅगच्या अंगावर टाकला. हरीण झोपलेलें होतें. त्यानें आपले पाय वासराप्रमाणें पोटाखालीं घेतलेले होते. त्याची पांढरी शेपूट झोपेंत मध्येंच एकदम हलायची. संध्याकाळच्या जेवणानंतर तें घरांत राहिलें तर मा बॅक्स्टरची हरकत नसे. कधीं कधीं तर ज्योडीच्या खोलींत हरीण झोपलें तर ती मुद्दाम तिकडे कानाडोळा करी. कारण तिला वाटे, आतां तरी तें खोड्या करणार नाहीं. कुत्र्यांबद्दल तिचा आक्षेप असूनही ती जशी त्यांच्याकडे दुर्लक्ष करी त्याप्रमाणेंच हरणाचें अस्तित्व ती चालवून घेत होती. कुत्रीं बाहेर घराच्या वळचणीखालीं झोपलीं होतीं. रात्र फार खराब असली म्हणजे पेनी

त्यांनाही घरांत आणी. तशी जरूर होती असें नाही. पण, पेनीचा नेहमीं आपल्या सुखांत दुसऱ्याला वांटेकरी करण्यांत मोठा आनंद वाटे.

मा बॅक्स्टर म्हणाली, "शेकोटींत एखादी काटकी फेक बरं! मला शिवण-काम करायला नीट दिसत नाहीं."

पेनीची हिंवाळ्यांत घालायची एक पाटलोण होती. ती ज्योडीच्या बेताची करावी म्हणून मानें फाडली होती.

ती म्हणाली, "या वसंत ऋतूंत तूं जसा अंगानें वाढलास तसाच आणखी वाढायचा तुझा बेत असेल तर मात्र तुझीच पाटलोण मला फाडावी लागेल अन् तुझ्या बाबांसाटीं शिवावी लागेल!"

ज्योडी खूप मोठ्यानें हसला आणि पेनीनें आपला अपमान झाल्याचा आव आणला. मग जाळाच्या उजेडांत त्याचे डोळे चमकले आणि त्याचे काटकोळे खांदे गदगदा हालले. मा बॅक्स्टर आपल्याशींच खूष होऊन खुर्चीत झुलायला लागली. तिनें कधीं विनोद केला कीं सर्वचजण नेहमीं खूष होत. संध्याकाळच्या गारठ्याच्या त्या वेळीं, शेकोटींतल्या जाळामुळें एकदम जो फरक घडून आला, तसाच फरक बॅक्स्टर मंडळींच्या घरांत माच्या सुस्वभावामुळें घडून यायचा.

पेनी म्हणाला, "ज्योडी, तुझं तें व्याकरणाचं पुस्तक काढून आपल्याला बसलं पाहिजे आतां!"

"पण पा, तें कदाचित् झुरळांनीं खालं असेल." ("Mebbe the roaches has ate it.")

मा बॅक्स्टरनें आपल्या हातांतली सुई हवेंत त्याच्यावर रोखून धरली. ती म्हणाली, "व्याकरण शीक जरा. The roaches has eat it असं म्हणायचं."

पुन्हा स्वस्थ चित्तानें ती खुर्चीत झुलूं लागली.

पेनी म्हणाला, "या हिंवाळ्यांत थंडीचा फार कडाका पडेलसं मला वाटत नाहीं."

ज्योडी म्हणाला, "मला बुवा थंडी आवडते! बाहेरून लाकडं आंत आणायचाच तेवढा त्रास असतो."

"खरोखरच, मला असं वाटतंय् कीं हा हिवाळा चांगला जाणार! पिकाच्या आणि मांसाच्या बाबतींत माझा अंदाज होता, तेवढं कांहीं नुकसान झालं नाहीं. आतां कदाचित् उसंत मिळूं शकेल!"

मा बॅक्स्टर म्हणाली, "आणि मिळाली तर हवीच आहे आतां!"

"खरंच सांगतों; उपासमारीचं भूत आतां आपल्या मानेवर बसत नाहीं एवढं नक्की. दुसरीकडे कुठें तरी आपला बळी शोधायला तें गेलंय्!"

यानंतर आणखी बोलणें न होतां ती संध्याकाळ निघून गेली. शेकोटींतल्या विस्तवाचा मंद जळण्याचा आवाज, पेनीच्या पाईपचे झुरके आणि मा बॅक्स्टरच्या झुलत्या खुर्चीचा लाकडी जमिनीवर होणारा, 'कर्रर्र् कट्टट्ट कर्रर्र् कट्टट्ट' असा आवाज याशिवाय सर्व शांत होतें. एकदा मात्र घराच्या छपरावरून सूं सूं असा शीळ घातल्याचा मोठा आवाज—देवदार वृक्षांच्या फांद्यांची वाऱ्याच्या झोतानें सळसळ होते तसा—ऐकूं आला. बदकें दक्षिणेकडे उडत चाललीं होतीं. ज्योडीनें आपल्या बाबांकडे पाहिलें. पेनीनें आपल्या पाईपचें टोक वर केलें आणि मान डोलावली. ज्योडी आरामांत पडलेला होता म्हणून; नाहीं तर ते कोणते पक्षी आहेत आणि कुठें जात आहेत अशी चौकशी त्यानें केली असती. आपल्या बाबांना माहीत आहेत तशा गोष्टी जर आपल्याला कळायला लागल्या तर गणित अन् स्पेलिंग यांवांचून कांहीं अडणार नाहीं असें त्याला वाटे. वाचन त्याला आवडत असे; त्या वाचनांत बहुतेक गोष्टीच जास्त,—बाबा सांगत तितक्या चांगल्या नाहींत, तितक्या चांगल्या कोणत्याही असणं शक्य नाहीं!—पण तरी असत त्या गोष्टीच असत.

## —१६—

* कर्लू पक्षांचे थवे येऊं लागले होते. प्रत्येक हिंवाळ्यांत ते जॉर्जियांतून इकडे येत. त्यांच्यांतले मोठे पक्षी पांढरे असत आणि त्यांना लांब वाकड्या चोंची असत. वसंत ऋतूंतच अंड्यांबाहेर पडलेलीं त्यांचीं लहान पिलें करड्या पिंगट रंगाचीं दिसत. कोंवळे कर्लू पक्षी खायला सुंदर लागत. ताज्या मांसाचा तुटवडा पडला; किंवा खारी खाण्याचा कंटाळा आला म्हणजे पेनी आणि ज्योडी म्हाताऱ्या सीझरच्या पाठीवर बसून मलेट प्रेअरीवर जात आणि पांच सहा पक्षी मारून आणीत. मा बॅक्स्टर त्यांचें मांस तुर्की कोंबड्यांसारखें शिजवी. आणि पेनी म्हणे, "मी शपथेवर सांगतों, टर्कीपेक्षांही याची चव गोड लागते.

* दलदलीच्या प्रदेशांतली लांब पायांच्या व लांब चोंचीच्या एका पक्ष्याची जात.

काम फार थोडें होतें, आणि ज्योडी तासन्‌तास फ्लॅगच्या संगतींत घालवीत होता. हरीण सपाट्यानें वाढत होतें. त्याच्या तंगड्या लांब आणि चातीसारख्या दिसूं लागल्या होत्या. ज्योडीला एक दिवस असें आढळून आलें कीं त्याच्या पाठीवरची कोंवळेपणाची खूण, — ते फिकट रंगाचे ठिपके नाहींसे झाले आहेत. लगेच त्यानें फ्लॅगचें गुळगुळीत टणक डोकें नीट चाचपून पाहिलें — शिंगांचीं चिन्हें दिसतात का, म्हणून. हें तो करीत असतांना पेनीनें त्याला पाहिलें, आणि मग त्याला हसूं आल्याशिवाय राहिलें नाहीं.

"वा बेटा! तुझी अपेक्षा तरी काय आहे? एकदम चमत्कार घडून यावेत अशी? फ्लॅगचं डोकं उन्हाळ्यापर्यंत असंच राहणार. एक वर्षाचा होईतां त्याला शिंगं फुटायचीं नाहींत, आणि मग खिळ्यासारखीं टोकेरीं लहानशीं शिंगं येतील!"

ज्योडीला एक प्रकारची समाधानाची भावना झाली. कसलीतरी ऊबदार आणि सुस्त अशी नवलाई त्याला वाटूं लागली. मग तो जवळजवळ दररोज आपली बंदूक नि छऱ्यांची पिशवी घेऊन, फ्लॅगला बरोबर घेऊन रानांत जायला लागला. काळ्या कुळकुळीत ओक वृक्षांचीं पानें आतां लाल दिसत नव्हतीं. त्यांना भडक पिंगट छटा आलेली होती. रोज सकाळीं रानांत दहिंवर दिसूं लागलें होतें.

## — १७ —

जानेवारीच्या अखेरीला हवा पुन्हा बेतावर आली. अजून सुद्धां कदाचित् पुन्हा दहिंवर पडेल आणि खराखुरा वसंत ऋतू सुरू होण्यापूर्वी पुन्हा एखादी थंडीची लाट येईल, असा संभव होता. पण सध्याचे निवळलेले दिवस म्हणजे एक सुचिन्ह होतें. शेतांत नेहमींपेक्षां लवकर पीक येण्याचीं लक्षणें असल्यामुळें पेनीनें नांगरणीला सुरवात केली. साप चावल्यानंतर उद्‌भवलेल्या त्याच्या आजारांत बकनें त्याची नवी जमीन जी साफसूफ केली होती ती पेनीनें आतां नांगरली. उत्पन्नाचें पीक म्हणून थोडासा कापूस लावण्याचें त्यानें आतां ठरविलें होतें. उत्तरेकडच्या दरडींतली सखल जमीन आतां तंबाखूसाठीं वापरायची असा त्याचा बेत होता. आपलें घर आणि द्राक्षांचा मळा यांच्या दरम्यान त्यानें नवीन

बियाणाचे वाफे केले. पाळीव प्राण्यांपैकीं फक्त म्हातारा सीझर आणि ट्रिक्सी गाय हीं दोनच शिल्लक असल्यामुळें काऊपीचीं रोपें फार कमी प्रमाणांत लावायचीं आणि धान्यासाटीं जास्त जमिनीचा उपयोग करायचा असें त्यानें ठरवलें. कितीही पेरलें तरी पुरें पडणार नाहीं, असें त्याला वाटत होतें. कोंबड्यांना अन्न पुरत नव्हतें; डुकरें व्हावीं तशीं लठ्ठ होत नव्हतीं, इतकेंच नव्हे तर उन्हाळ्याच्या अखेरीला खुद्द बॅक्स्टर मंडळींना सुद्धा भरपूर जेवण मिळेनासें झालें. कारण पुरेसें धान्यच नव्हतें. बखळीवर सर्वांत महत्वाची गोष्ट कोणती असेल तर ती मका. हिंवाळ्यांत तयार केलेलें मिश्र खत गोठ्यांत ठेवलेलें होतें. तें तिथून आणून रेताड वावरांत पसरून द्यायला ज्योडीनें आपल्या बाबांना मदत केली. मार्च महिन्याच्या आरंभीं व्हिप् – पूर – विलची किरकीर सुरूं होण्याच्या सुमाराला जमिनींत रोपें लावतां यावींत अशा बेतानें तिची मशागत करायची, वाफे पाडायचे, असा त्याचा विचार होता.

मा बॅक्स्टरची नेहमींची एक तक्रार असायची. ती म्हणे, "एका वाफ्यांत आलं लावावं असं मला फार वाटतं! सगळयांच्या घरीं आल्याचा वाफा असतो. नदीकांठच्या दुकानदाराच्या बायकोनें मला आल्याचे कांदे द्यायचं कबूल केलंय्; मीं तिच्याकडे मागण्याचीच खोटी आहे।"

पेनी आणि ज्योडी यांनीं आतां एक वाफा तयार केला. त्यांनीं घराला लागून एका बाजूला चार फूट खोल खणलें आणि त्यांत सायप्रेस लाकडाचा एक फळा टाकला. नंतर आग्नेय बाजूच्या जमिनींतून त्यांनीं मऊ माती खणून आणली आणि त्या फळ्यावर वरपर्यंत भरली. आपण आतां जेव्हां बाजारासाटीं नदीकडे जाऊं तेव्हां आल्याचे कांदे निश्चित आणूं असें पेनीनें कबूल केलें.

## — १८ —

फेब्रुवारी महिन्यांत पेनीचे संधिवाताचें दुखणें बळावून कांहीं दिवस तो अगदींच पंगू बनला. गेलीं कित्येक वर्षें त्याला या दुखण्याचा थंडीच्या नि पावसाच्या दिवसांत त्रास होत असे. उघड्यावर हिंडणें, मनाला येईल तें किंवा आवश्यक वाटेल तें करणें या बाबतींत तो नेहमींच निष्काळजी असे. हवेची तो कधीं पर्वा

करीत नसे, किंवा स्वतःच्या प्रकृतीला जपून कधीं वागत नसे. मा बॅक्स्टर म्हणाली, "यापूर्वीच हे बिछान्याला खिळले नाहींत हें नवल!"

ज्योडीचे बाबा अशा रीतीनें स्वस्थ पडून होते; त्या वेळीं ज्योडी लहान-सहान कामें करीत होता आणि लाकूडफांटा आणून देत होता. एक प्रकारें काम झपाझप उरकण्याची त्याला तळमळच असायची. कारण काम आटोपल्यावर त्याला फ्लॅगबरोबर भटकायला मिळे! पेनीनें त्याला आपल्याबरोबर शॉटगनसुद्धा नेण्याची परवानगी दिली होती. बाबांची संगत नाहीं म्हणून त्याला चुकल्यासारखें वाटे; तरी पण एकट्यानें शिकार करणेंही त्याला आवडत होतें. तो आणि फ्लॅग एकमेकां-बरोबर स्वैरसंचार करीत. विवराच्या बाजूला जायला त्यांना सर्वांत जास्त आवडे. एक दिवस ज्योडी प्यायचें पाणी आणायला तिकडे गेला असतां फ्लॅग त्याच्या बरोबर होता. त्यावेळीं अकस्मात् त्यांना एका नव्या खेळाची कल्पना सुचली. हा खेळ म्हणजे, त्या प्रचंड द्रोणाकृति खड्ड्याच्या उभट उतारावरून वेड्यासारखें वरखालीं धावत जाणें आणि एकमेकांना शिवणें. या शिवाशिवींत आपण ज्योडीच्या हातीं सांपडत नाहीं असें जेव्हां हरणानें पाहिलें, तेव्हा तो दुहेरी डाव खेळूं लागला. कांहीं वेळ तो ज्योडीला पाय दुखेपर्यंत पळायला लावी आणि चिडवी आणि मग एकदम त्याच्या हातांत मुद्दाम सांपडून त्याला खूष करी.

फेब्रुवारीच्या मध्याच्या सुमारास एक दिवस ऊन्ह चांगलें पडलें होतें. ज्योडी विवराच्या तळाशीं गेलेला होता. तिथून त्यानें वर पाहिलें. फ्लॅगच्या सावलीसारखी काळी आकृति विवराच्या कांठावर उभी असलेली त्याला दिसली. एक क्षणभरच त्याला दचकल्यासारखें वाटलें; कारण त्याला वाटलें हें दुसरेंच हरीण आहे! फ्लॅग किती मोठा दिसत होता — तो किती झपाट्यानें वाढत होता हें त्याच्या लक्षांत आलें नव्हतें. वर्षावर्षाचीं पाडसें अन्नासाठीं मारलीं जात, तीं फ्लॅगएवढींच असत. ज्योडी घरीं बाबांकडे गेला; तो क्षुब्ध मनस्थितींत. पेनी सैंपाकघरांतल्या शेकोटीजवळ बसला होता. त्या दिवशीं हवेंत गारठा नसूनही त्यानें अंगाभोवतीं पांघरुणें गुंडाळून घेतलीं होतीं.

ज्योडी एकदम उद्गारला, " पा, तुम्हांला काय वाटतं ? फ्लॅग आतां वर्षाचा होत आला ? "

पेनीनें त्याच्याकडे कुतूहलानें पाहिलें.

" मलाही अलीकडे तसंच वाटतंय्! आणखी एक महिना लोटला म्हणजे, मला वाटतं तो वर्षाचा होईल!"

" मग तो वेगळा दिसेल का?"

" अं ...... हो! तो मग रानांत जास्त वेळ राहत जाईल. अंगानेंही बराच मोठा होईल. म्हणजे त्याची मधली अवस्था सुरू होईल असं म्हण पाहिजे तर! एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत जाणारा माणूस सीमेवर उभा असावा, असंच कांहींसं, पाडस मागें पडलेलं असेल आणि काळवीट अजून तयार व्हायचा असेल अशा मधल्या अवस्थेला फ्लॅग पोचेल.

ज्योडीची नजर कुठेंतरी शून्याकडे लागली होती.

" त्याला शिंगं फुटतील का?"

" जुलै महिन्यापर्यंत बहुतकरून शिंगांचं चिन्ह दिसणार नाहीं. काळविटांची शिंगं या ऋतूंत गळून पडायला सुरवात झाली आहे. सबंध वसंत ऋतूभर त्यांचीं डोकीं बिनशिंगांचींच राहणार! मग उन्हाळयांत शिंगांचीं टोकं दिसूं लागतील. आणि मग पुढच्या हंगामांत त्यांना पुन्हा पूर्ण शिंगं फुटतील."

ज्योडीनें फ्लॅगचें डोकें नीट तपासून पाहिलें. त्याच्या कपाळाचा कठीण लागणारा कांठ त्यानें चाचपून पाहिला. इतक्यांत मा बॅक्स्टर हातांत एक भांडें घेऊन तिथून गेली.

" ए मा, फ्लॅग आतां लवकरच वर्षाचा होणार! किती सुरेख दिसेल नाहीं तो? छोटीं छोटीं शिंगं येतील त्याला, त्याचीं शिंगं छान दिसतील, नाहीं का मा?"

" त्यानें डोक्यावर मुकुट घातलान् तरी मला तो छान दिसणार नाहीं! किंवा देवदूतासारखे त्याला पंख फुटले तरी!"

ज्योडीनें जास्त आग्रह धरला नाहीं. खरें सांगायचें म्हणजे, फ्लॅग अलीकडे जास्त जास्त बदनाम होत चालला होता. गळयांत अडकवलेल्या दोरीमधून निसटून जायला तो शिकला होता. त्याला सुटतां येऊं नये म्हणून दोरी जास्त घट्ट आवळली तर गाईचें वासरूं करतें तसाच प्रकार तो करायचा! तो इतकी ओढ घ्यायचा कीं त्याचे डोळे बाहेर लोंबायचे आणि श्वास कोंडायचा. असें झालें कीं त्याचा तो विकृत वेडपट जीव वांचवण्यासाठीं त्याची सुटका करणें भागच पडायचें. एकदा मोकळा सुटला कीं तो अगदीं गोंधळ घालायचा. त्याला गोठ्यांत ठेवणें

शक्यच नव्हतें. त्यानें गोटा जमीनदोस्त केला असता. अगदींच जंगली आणि उद्दाम बनला होता तो! त्याला संभाळण्यासाठीं ज्योडी जवळपास असेल तरच त्याला आतां घरांत यायला मिळे. तासन्तास झोपून राहण्याची पाडसाची संवयही फ्लॅग विसरला होता. रात्रींच्या वेळी तो जास्त जास्त अस्वस्थ बनूं लागला. कितीदा तरी मध्येंच उठून ज्योडीच्या खोलींत किंवा पुढच्या खोलींत धडपडतांना आपण त्याला ऐकलें आहे अशी मा बॅक्स्टरनें तक्रार चालवली होती. यावर ज्योडीनें डोकें लढवून, "छपरांतल्या उंदरांचा आवाज असेल" अशी बतावणी केली होती. पण आईला तें खरें वाटलें नव्हतें. कदाचित् त्या दिवशीं दुपारीं फ्लॅगनें रानांत कुठेंतरी झोप घेतलेली असावी; कारण रात्रीं आपला गवती बिछाना सोडून त्यानें ज्योडीच्या झोपायच्या खोलीचें खिळखिळें दार ढकलून उघडलें आणि मग तो घरभर भटकायला लागला. आईनें एक कर्कश किंकाळी फोडलेली ऐकून ज्योडी जागा झाला. फ्लॅगनें तिच्या तोंडाला आपलें ओलें नाक लावून तिला झोपेंतून उठवलें होतें, आईनें रागावून त्याचा पुरता समाचार घेण्यापूर्वीच पुढचें दार उघडून ज्योडीनें त्याला बाहेर सोडून दिलें.

"बस्स् झालं आतां!" ती रागारागनें ओरडली. "हा प्राणी मला रात्रंदिवस स्वस्थता मिळूं देत नाहीं. आतां पुन्हा म्हणून कधींही केव्हांही त्याला या घरांत यायला मिळायचं नाहीं!"

पेनी या वादापासून दूर राहिला होता. आतां मात्र तो आपल्या बिछान्यांतूनच म्हणाला, "तुझी मा म्हणते तें खरं आहे, बाळ! तो आतां फार मोठा अन् अस्वस्थ बनलेला आहे. त्याला घरांत ठेवून उपयोगाचं नाहीं!"

ज्योडी आपल्या आंथरुणाकडे वळला. उरलेली रात्र त्यानें जागून काढली. त्याला वाटलें, फ्लॅगला थंडी तर वाजत नसेल? हरणाच्या स्वच्छ मऊ मऊ नाकाच्या स्पर्शाला आईनें एवढी हरकत कां घ्यावी हेंच त्याला समजेना! त्यानें उशी कवटाळून धरली. जणूं कांहीं तो फ्लॅगच आहे अशी कल्पना केली आणि तो झोपीं गेला.

सकाळी पेनीला पुष्कळच बरें वाटलें. त्यानें कपडे घातले आणि काठी टेकीत टेकीत तो सवलींत इकडे तिकडे हिंडला. सगळ्याभर एकदां फेरी मारली, आणि मग तो घराच्या पिछाडीला आला. त्याचा चेहरा गंभीर बनला होता. त्यानें ज्योडीला आपल्या जवळ बोलावलें. तंबाखूचें बीं जिथें लावलें होतें त्या

वाफ्यांत साऱ्याभर तुडवून फ्लॅगनें नासाडी केली होती. बियांना कोंब फुटून रोपें तयार होण्याच्या बेतांत होतीं: पण त्यांतलीं जवळ जवळ निम्मीं त्यानें नष्ट करून टाकलीं होतीं! पेनीच्या स्वतःच्या उपयोगाला पुरेल एवढीं, म्हणजे नेहमीं-इतकी तंबाखू शिल्लक होती. पण यंदा व्हॉल्यूशियाच्या दुकानदाराला - बॉइल्सला कांहीं तंबाखू विकून पैसा मिळवावा असा पेनीनें बेत केला होता. पण आतां विकायला तंबाखूच नव्हती.

तो म्हणाला, "फ्लॅगनें हें मुद्दाम दुष्टपणानें केलं असेल असं मला वाटत नाहीं; तो आपला मागें पुढें धावत होता आणि कशावर तरी उड्या मारायच्या त्या त्यानें इथं मारल्या! आतां तूं असं कर, वाफ्यांत जिथें जिथें रोपं आहेत तिथं तिथं काठ्या उभ्या कर आणि सबंध वाफ्याभोंवतीं पण काठ्यांचं कुंपण कर. म्हणजे बाकीच्या रोपांना तरी तो अपाय करणार नाहीं. मीं हें आधींच करायला हवं होतं, पण खरं म्हणशील तर नेमका याच जागेवर तो धुडगूस घालील अशी मला कल्पना नव्हती!"

आईच्या संतापामुळें ज्योडीचा जेवढा निरुत्साह झाला नव्हता, तेवढा पेनीच्या या समंजस नि प्रेमळ बोलण्यामुळें झाला. बाबांनीं सांगितलेलें काम करण्यासाठीं तो नाखुशीनें निघाला.

पेनी म्हणाला, "हा प्रकार चुकून घडला आहे असंच आपण धरून चालूं! तुझ्या माला कांहीं सांगणार नाहीं मीं. तिला कळलं तर आपली भरलीच!"

काम करतां करतां ज्योडी असा विचार करूं लागला, 'काय करून फ्लॅगला असल्या खोड्यांपासून परावृत्त करावं?' त्याच्या बहुतेक सर्व खोड्या ज्योडीला नुसत्या हुशारीच्या वाटत असत, पण वाफा उध्वस्त करणें हा मात्र गंभीर मामला होता. अशी गोष्ट पुन्हा घडतां कामा नये हें ज्योडी पुरतें जाणून होता.

## — १९ —

मार्च महिन्याच्या प्रारंभीं हवेंत गारवा होता आणि ऊन्ह झक पडलें होतें. पिवळीं जेसामिनचीं फुलें उशिरा फुललीं होतीं, त्यांनीं कुंपण आच्छादून गेलें होतें. आणि त्यांच्या गोड वासानें अंगळ भरून गेली होती. पीच वृक्षांना आणि रानटी प्लम झाडांना मोहोर आला होता. लालपक्षी दिवसभर गात होते. आणि संध्याकाळीं

त्यांचें गाणें संपल्यावर त्यांना वेडावणारे दुसरे पक्षी त्यांची री ओढीत होते. जमिनीवरचीं कबुतरें घरट्यांत गेलीं होतीं आणि एकमेकांशीं कू कू करून बोलत होतीं, किंवा बखळींतल्या रेतीवर तरळ छायांप्रमाणें इतस्ततः फिरत होतीं.

पेनी म्हणाला, "आजचा दिवस इतका छान आहे, कीं मी मेलेला असतों तरी हें दृश्य पाहायला उठून बसावंसं मला वाटलं असतं!"

रात्रीं पावसाची एक लहानशी सर येऊन गेली होती. आणि सूर्य उगवतांना जो धूसर प्रकाश दिसत होता त्यावरून रात्र पडण्यापूर्वी आणखी एखादी सर येईल अशीं चिन्हें होतीं. पण मग सकाळ मात्र लख्ख प्रकाशाची गेली.

"मक्याला अगदीं हेंच हवंय्!" पेनी म्हणाला. "कापसाला अगदीं हेंच हवंय्! अन् तंबाखूलाही हेंच हवंय!"

सबंध आठवडाभर रोपें लावण्याचें काम चालू होतें. मका आणि कापूस झाल्यानंतर काऊपीची लावणी झाली. त्यानंतर राताळीं. परसांतल्या भाजीच्या जागेंत कांदे नि सलगम लावण्यांत आले. कारण कृष्णपक्षाचे दिवस होते. आणि कंदमुळें लावायला तेच दिवस चांगले असतात. पेनी रोज सकाळीं लवकर उठायचा आणि संध्याकाळीं उशिरापर्यंत काम करायचा. स्वतःची यत्किंचित् दयामाया न ठेवतां तो खपत होता. रोपें लावून झालीं; पण तेवढ्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. वसंत ऋतूंतलीं हीं कामें तो अगदी उन्माद चढल्यासारखा करीत होता; कारण हवामान अनुकूल होतें. आणि आत्तां झटपट जें फळ मिळेल, त्यावर सबंध वर्षाचें जीवन अवलंबून होतें. पाण्यानें भरलेलीं तीं जड बकेटें तो पुन्हा पुन्हा विवराकडून आणीत होता आणि तंबाखूच्या रोपांना आणि बागेला पाणी घालीत होता.

नवीन केलेल्या जमिनींत जिथें कापूस लावला होता; तिथें बक फॉरेस्टरनें झाडाचा एक बुंधा तसाच कुजत टाकला होता. पेनीला त्याचा फार त्रास वाटला. त्यानें चहूंबाजूंनीं तो उकरला, त्याच्यावर कुऱ्हाडीचे घाव घातले. आणि मग त्याला लगामाच्या दोऱ्या बांधून सीझरला तो बुंधा ओढायला लावला. बिचाऱ्या म्हाताऱ्या घोड्यानें खूप ओढाताण केली. त्याचें अंग थरथरा हालायला लागलें. पेनीनें त्या बुंध्यावर दोरीचा एक फटका मारला. सीझरला उद्देशून 'हैक, हैक' केलें आणि तो स्वतःही त्याच्या बरोबर ओढूं लागला. ज्योडीनें पाहिलें आपल्या

बाबांचा चेहरा पांढरा फटक पडला आहे. पेनीनें एकदम आपली कंबर धरली आणि तो धाडदिशीं गुडघ्यांवर पडला. ज्योडी धावत त्याच्याजवळ गेला.

" ठीक आहे, ठीक आहे! एका मिनिटांत मला बरं वाटेल — एकदम जास्त ताण पडल्यासारखा वाटतो ! "

पेनी वाकून ओणवा झाला होता. त्याला सरळ होतां येत नव्हतें, दुखत होतें. ज्योडीनें त्याला धरून बुंध्याजवळ नेलें, बुंध्यावर चढून तो कसाबसा सीझरच्या पाठीवर चढूं शकला. पुढें वाकून त्यानें सीझरच्या मानेवर आपलें डोकें टेकलें आणि त्याची आयाळ पकडली. ज्योडीनें लगाम सोडवून घेतला आणि घोड्याला शेतांतून फाटकाकडे आणि मग फाटकांतून आंगणांत नेलें. पेनीनें उतरण्यासाठीं कांहींच हालचाल केली नाहीं. त्याला विनासायास उतरतां यावें म्हणून ज्योडीनें एक खुर्ची आणून त्याच्या पायाखालीं ठेवली. पेनीनें घसरून खुर्चीवर पाय टेकले. तो जमिनीवर उतरला; आणि रांगतच घरांत गेला. मा बॅक्स्टर सैंपाकघरांतल्या मेजाशीं काम करीत होती; तिनें वळून पाहिलें. तिच्या हातांतलें भांडें खळकन खालीं पडलें.

" मला वाटलंच ! तुम्हीं दुखवून घेतलंत स्वतःला ! काम करायचं केव्हां थांबावं हें सुद्धा तुम्हांला समजत नाहीं."

तो तसाच धडपडत आपल्या बिछान्याकडे गेला, आणि गादीवर पालथा पडला. त्याच्या मागोमाग मा बॅक्स्टरही खोलींत गेली. तिनें त्याला उताणें केलें आणि त्याच्या डोक्याखालीं उशी घातली. त्याचे बूट तिनें काढून टाकले आणि एक हलकें पांघरूण त्याच्या अंगावर घातलें. पेनीनें आपले पाय ताणले. त्याला पुष्कळच मोकळें वाटूं लागलें होतें. त्यानें डोळे मिटून घेतले होते.

" हं! हें ठीक आहे! — ओरी, हें ठीक आहे? मला आतां एक मिनिटांत बरं वाटेल. कुठेंतरी लचकलें असावं ! "

पण पेनीला बरें वाटलें नाहीं. त्याला दुखण्याचा फार त्रास होऊं लागला. मा बॅक्स्टर म्हणत होती, कीं ज्योडीनें घोड्यावर बसून डॉ. विल्सनला बोलवायला जावें. पण पेनी मुळींच संमती देईना.

" त्यानें आधींच माझ्यासाठीं केलंय् तें पुष्कळ झालं!" तो म्हणाला, " मला आत्तां बरं वाटेल ! "

ज्योडीला फार अस्वस्थ वाटूं लागलें. पण बाबांना नेहमींच असे किरकोळ

अपघात होत असतात; कारण आपलें लहानसें काटक शरीर राबवून दहा माणसांचें काम एकट्यानें करण्याची त्यांची धडपड असते, हें त्याला माहीत होतें. पेनीला दीर्घकाळपर्यंत दुखावील अशी कोणतीच गोष्ट नव्हती; सापाकडून सुद्धा बाबा ठार होणें शक्य नव्हतें. असे विचार मनांत येऊन त्याला फार बरें वाटलें.

पेनी आजारी पडल्यानंतर थोड्याच दिवसांनीं ज्योडी घरांत आला, आणि त्यानें बातमी दिली कीं मक्याचें पीक फार झक्क उभें राहिलें आहे.

" वा ! एवढा तूं कर्तबगार आहेस कीं काय ? "

उशीवर टेकलेला तो पांढराफटक चेहरा एकदम चकाकूं लागला होता.

" मी जर बिछान्यालाच खिळून राहिलों, तर शेत नांगरायचं काम तूं उत्तम करशील यांत शंका नाहीं ! " पेनीच्या कपाळावर आठ्यांचें जाळें पसरलें होतें. तो म्हणाला, " बेटा, माझ्याइतकंच तुलाही हें पक्कं माहीत आहे कीं, त्या हरणाच्या पाडसाला, काय वाटेल तें करून शेतांत जाऊं देतां कामा नये ! "

" मी ठेवीन त्याला अडवून ! त्यानें तसा कांहीं खूप त्रास दिलाय् असं नाहीं ! "

" ठीक आहे, उत्तम आहे ! पण तूं त्याला खरंच दूर ठेव, हं ! ठेवशील ना ? "

रात्रीं पावसाची झिमझिम चालू होती. सकाळीं पेनीनें सांगितल्यावरून ज्योडी मक्याच्या शेतांत गेला, आणि त्यानें, पावसामुळें पिकाला धक्का पोचला आहे कीं काय ? तसेंच त्यांत अळ्या वगैरे झाल्या आहेत कीं काय हें पाहिलें. वाफ्या-भोवतीं केलेल्या कुंपणावरून त्यानें उडी मारली, आणि तो शेतांतून निघाला. थोडे यार्ड पुढें जातो तोंच, त्याच्या एकदम मनांत आलें; कीं मक्याचे कोंवळे हिरवे कोंब एकदा बघायला पाहिजेत ! पण कोंब फुटलेलेच नव्हते. तो बुचकळ्यांत पडला; आणखी पुढें गेला; पण कुठेंही मक्याचे कोंब दिसेनात. शेताच्या अगदीं पार टोकाला पोचल्यावर मग कुठें त्याला, – ती नाजुक कोंवळी पालवी दिसूं लागली. तो पुन्हा वाफ्यामधून चालत चालत अलीकडे आला. फ्लॅगच्या पावलांचे ठसे चांगले उमटलेले त्याला दिसले. भल्या पहाटे येऊन त्यानें अगदीं हातानें ओढल्या-गत मक्याचे कोंब उपटून काढले होते !

ज्योडी घाबरला. कांहीं वेळ तो शेतांतून तसाच रेंगाळत चालला होता. जणूं कांहीं आपण पाठ वळवली कीं कांहींतरी चमत्कार घडून शेतांत पुन्हा पीक उगवेल; अशी त्याला आशा वाटत होती ! ' तो तसाच जड पावलांनीं हळुहळू घराकडे गेला. पेनीनें त्याला हाक मारली. तो त्याच्या खोलींत गेला.

"काय बेटा, कशीं काय आहेत पिकं?"

"कापूस उभा राह्यलाय्! मला तर तो ठीक दिसतोय्, नाहीं का?" त्याचा उत्साह वरवरचा होता. "काउपींची रोपं पण जमिनींतून वर यायला लागलीं आहेत!"

"आणि मक्याचं कसं काय, ज्योडी?"

गुणगुणणाऱ्या पक्ष्याचे पंख जसे भराभर हालतात तसें त्याच्या हृदयाचें स्पंदन होत होतें. त्यानें एक आवंढा गिळला, आणि मग बोलून टाकलें—

"त्यांतला बहुतेक सगळा कुणींतरी खाऊन टाकलाय्!"

पेनी गप्प पडला होता. त्याचें तें मौन सुद्धा ज्योडीला भीतिदायक वाटत होतें. शेवटीं एकदाचे पेनीच्या तोंडांतून शब्द बाहेर पडले.

"कुणीं खाल्लं असेल? तुला सांगतां येणार नाहीं का?"

ज्योडीनें आपल्या बाबांकडे पाहिलें. त्याचे डोळे व्याकूळ अन् केविलवाणे बनले होते.

पेनी म्हणाला, "कांहीं हरकत नाहीं; मी तुझ्या आईला सांगतों जाऊन पाह्यला! ती बरोबर सांगूं शकेल."

"नाहीं, नाहीं, पा! माला नका तिकडे पाठवूं!"

"कां बरं? तिला कळायला पाहिजेच!—फ्लॅगनें केलंन् ना?"

ज्योडीचे ओंठ कंप पावले.

"अं ... ... अं ... म ... मला तसंच वाटतं, पा!"

पेनीनें त्याच्याकडे करुण दृष्टीनें पाहिलें.

"बेटा, मला फार वाईट वाटतं! तो हें करणार अशी मला जवळ जवळ खात्रीच होती. पण तूं जा आतां जरा खेळायला. तुझ्या माला इकडे यायला सांग!"

"तिला सांगूं नका, पा! नका ना हो सांगूं तिला!"

"ज्योडी कांहीं झालं तरी तिला हें कळलंच पाहिजे! हं! पळ आतां! तुझ्यासाठीं जितकं चांगलं करतां येईल तितकं मी करतों!"

ज्योडी, धडपडत स्वैंपाकघरांत गेला.

"तुला बोलावताहेत ग, मा!"

• • •

तो घराच्या बाहेर गेला. कांपऱ्या आवाजांत त्यानें फ्लॅगला हाक मारली. देवदारांच्या झाडींतून हरीण त्याच्याकडे धावत आलें. त्याच्या पाठीवर हात ठेवून ज्योडी रस्त्यावरून पुढें गेला. फ्लॅगनें पातक केलें होतें आणि त्या पातकी अवस्थेंत ज्योडीला त्याच्याबद्दल जास्तच प्रेम वाटत होतें. फ्लॅगनें दुगाण्या झाडल्या आणि ज्योडीला उड्या मारायला आवाहन केलें. त्याचें खेळण्यामध्यें मुळींच चित्त नव्हतें. विवरापर्यंत तो हळुहळू चालत गेला. त्या ठिकाणीं जणूं कांहीं वसंत ऋतूं-तला फुलबाग फुलला होता. डॉगवुडचा बहर अजून ओसरला नव्हता. स्वीटगम आणि हिकरी वृक्षांच्या फिकट हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर डॉगवुडचा अखेरचा मोहर पांढराशुभ्र दिसत होता. पण त्याला एक फेरी मारावी असेंसुद्धा ज्योडीला वाटलें नाहीं. तो घराकडे माघारा वळला आणि आंत गेला. त्याचीं आईबाबा अजूनही बोलत होतीं. पेनीनें त्याला हाक मारून खोलींत आपल्या बिछान्याजवळ बोलावलें. मा बॅक्स्टरचा चेहरा आरक्त दिसत होता. आपला पराभव झाल्यामुळें ती भडकली होती. ओठ घट्ट दाबल्यामुळें तिच्या तोंडाची सरळ रेषा झाली होती. पेनीनें शांतपणें सांगितलें, " ज्योडी, आम्हीं एक ठराव केलाय्! जें काय झालं तें अतिशय वाईट झालं, पण कांहींतरी उपाय करण्याचा आपण प्रयत्न करूं या! सर्व गोष्टी पुन्हा सुरळीत व्हाव्यात म्हणून तूं जास्त मेहनत करायला तयार आहेस का ? "

" पा, मी काय वाटेल तें करायला तयार आहें! पिकं काढून होईपर्यंत फ्लॅगला मी कोंडून ठेवतों — "

" असल्या जंगली प्राण्याला कोंडून ठेवण्यासारखी जागा आपल्याकडे आहे कुठें ? तूं माझं ऐक! कोठींत जा अन् धान्य घेऊन ये. सर्वांत उत्तम कणसं निवडून आण. तुझी मा तुला दाणे काढायला मदत करील. मग ते दाणे घे आणि जिथें पहिल्या खेपेला आपण मका लावला होता, बरोबर त्याच ठिकाणीं पुन्हा ते पेर! मीं जशीं जमिनींत भोकं केलीं होतीं, तशीं आधीं भोकं करून घे अन् रांगेनें दाणे टाकीत जा. मग त्यावर माती टाक. "

" मला तें बरोबर माहीत आहे, पा! "

" माहीत आहे तर आतां ताबडतोब करायला हवं! उद्यां सकाळीं असं कर : सीझरला गाडीला जोड अन् पलीकडे फॉरेस्टरांच्या वाटेवर जी जुनी बखळ आहे — जिथून रस्ता वळतो — तिकडे जा. त्या ठिकाणीं जें जुनं कुंपण आहे, तें

मोड आणि त्याचे वासे गाडींत घालून इकडे आण, जितके हेलपाटे घालावे लागतील तितके घाल. आपल्या या कुंपणाला जोड म्हणून त्यांतलीं जेवढीं लाकडं रचतां येतील तेवढीं रच. पहिले भारे आणशील ते शेताच्या दक्षिण बाजूला आणि पूर्वेकडे जिथें घराचं आंगण येतं तिथें टाक. आणि मग कुंपण बांधायला सुरवात कर. आतां सांगितलेल्या दोन बाजूंचं काम अगोदर कर. मिळतील तेवढे वासे घेऊन जितकं उंच बांधतां येईल तितकं बांध! तुझं हरीण नेहमीं याच बाजूनें आंत शिरतं असं मीं पाहिलंयू! तेव्हां या बाजूनें जर त्याला आंत जाऊं दिलं नाहीं, तर बाकीचं कुंपण बांधून होईपर्यंत, तो कदाचित् तिकडे फिरकायचाही नाहीं."

ज्योडीला असें वाटलें कीं आतांपर्यंत जणू कांहीं आपण एका लहानशा काळ्या पेटींत कोंडलेले होतों, आणि आतां झाकण एकदम उघडलें गेलें आहे; आणि ऊन्ह, प्रकाश अन् हवा आंत आलीं असून आपण मोकळे झालों आहोंत. तो शीळ घालीत कोठीकडे गेला आणि सर्वांत टपोऱ्या दाण्यांचीं कणसें त्यानें निवडून घेतलीं. तीं एका पिशवींत भरून त्यानें मागच्या दारीं नेलीं आली ओसरी-वर बसून तो दाणे काढूं लागला. त्याची आई येऊन त्याच्याजवळ बसली. तिचा चेहरा विकारशून्य दिसत होता. तिनें एक कणीस उचललें आणि कामाला सुरवात केली.

कुंपणाचीं लाकडें उचलून घराकडे आणायला ज्योडीला अपेक्षेहून फारच जास्त वेळ लागला. काम अर्धें मुर्धें पुरें झाल्यावर त्याला असें वाटलें कीं हें कधीं संपणारच नाहीं. त्यानें अगदीं आशाच सोडली. आपण कुंपण बांधायला सुरवात करण्यापूर्वींच मक्याचें पीक उभें राहील अशी त्याला भीति वाटूं लागली. रोज सकाळीं तो भीतभीत शेताकडे पाह्यचा! पांढरे फटक कोंब दिसूं लागले आहेत कीं नाहीं, हें बघायचा, आणि ते दिसले नाहींत कीं रोज त्याला बरें वाटायचें! रोज पहाट होण्यापूर्वींच, काळोख असतांना तो कामाला लागायचा! संध्याकाळीं सूर्य मावळेपर्यंत काम करायचा! पुरेशी झोप न मिळाल्यामुळें त्याच्या डोळ्यांखालीं काळीं वर्तुळें दिसूं लागलीं. पेनीला त्याचे केस कातरायलाही वेळ मिळाला नव्हता. त्यामुळें त्याच्या डोळ्यांवर ते वेडवपणें लोंबूं लागले होते. रात्रीच्या जेवणानंतर आईनें जर लाकडें आंत आणायला सांगितलीं तर तो मुळींच कुरकूर करीत नसे. खरें म्हणजे त्याच्या डोळ्यांच्या पापण्या मिटूं लागलेल्या असत आणि लाकडें

दिवसभरांत केव्हांही आई सहज आणूं शकली असती. पेनी त्याची ही अवस्था पाही तेव्हां त्याला जें दुःख होई तें त्याच्या कंबरेच्या दुखण्यापेक्षांही तीव्र असे. एका रात्रीं पेनीनें त्याला आपल्या बिछान्याजवळ बोलावलें:

"बेटा, तूं हे जे श्रम करतो आहेस ते पाहून मला धन्य वाटतं! पण खरं म्हणशील तर तें हरीण तुला कितीही आवडत असलं तरी त्याच्यासाठीं जीव टाकण्याचं एवढं कारण नाहीं!"

ज्योडी हट्टीपणानें म्हणाला, "मी मुळींच जीव टाकत नाहींय्! माझे स्नायु बघा वाटलं तर. केवढा ताकद्वान् होत चाललोंय् मी!"

पेनीनें त्याचा हाडकुळा घट्ट हात चाचपून पाहिला. ज्योडी म्हणाला तें अगदीं खरें होतें. नित्य नियमानें जड लाकडें उचलून आणण्यामुळे त्याचे दंड, पाठ आणि खांदे यांची चांगलीच वाढ होत होती.

चौथ्या दिवशीं सकाळीं कुंपणाच्या ज्या बाजूनें फ्लॅग आंत शिरला होता त्या बाजूला ज्योडीनें कामाला सुरवात केली. त्याला वाटलें आतां कुंपणाचें काम पुरें होण्यापूर्वींच जर पीक उभें राहिलें, तर फ्लॅगचा हल्ला निदान अकल्पित तरी होणार नाहीं. इतकेंच काय; तशीच जरूर पडली तर आपण त्याला दिवसरात्र एखाद्या झाडाशीं पाय बांधून अडकवून टाकूं! काय लाथा मारणार असेल नि उड्या मारणार असेल त्या मारूं दे! त्याचें काम जेव्हां झपाट्यानें पुरें होऊं लागलें, तेव्हां त्याला समाधान वाटलें. दोन दिवसांत त्यानें दक्षिण व पूर्व बाजूचें कुंपण पांच फूट उंच चढवलें होतें. अशक्य वाटणारी गोष्ट जेव्हां प्रत्यक्षांत उतरलेली दिसली; तेव्हां मा बॅक्स्टरही जरा मृदु बनली. सहाव्या दिवशीं सकाळीं ती म्हणाली, "आज मला दुसरं कांहीं करायचं नाहीं आहे. त्या बाजूचं कुंपण आणखी एक फूट उंच चढवायला मी तुला आज मदत करतें!"

"मा! तूं किती चांगली आहेस, मा!"

"काय मला त्रास पडणार असेल तो पडूं दे! तूं अशा प्रकारें काम करूं शकशील असं मला मुळींच वाटलं नव्हतं!"

माला दम फार लवकर लागायचा. पण खुद्द काम जरी कष्टाचें असलें तरी भारी जड होतें असें नाहीं. वाशाच्या प्रत्येक टोकाला दोन दोन हात लावले, कीं तो उचलायला हलका वाटे. हरणाला रोखण्याच्या दृष्टीनें सहा फूट उंचीचें कुंपण

पुरेसें होईल असें पेनीनें सांगितलें होतें. आणि तेवढें कुंपण बांधायला पुरतील, एवढ्या वाशांचा ढीग कोपऱ्यांत पडला होता.

त्या रात्रीं मक्याला कोंब फुटत असल्याचें ज्योडीला आढळून आलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं फ्लॅगच्या पायांना खोडा घालण्याचा ज्योडीनें प्रयत्न केला. त्यानें त्याच्या मागच्या पायांना दोरी बांधली. फक्त एक फूट जागेची मोकळीक ठेवली. फ्लॅगनें खूप ओढाताण केली. दुगाण्या झाडल्या आणि पिसाटासारखें अंग जमिनीवर टाकलें. त्यानें अडखळत गुडघे टेकले. आणि इतक्या बेगुमानपणें झटापट केली कीं याला सोडलें नाहीं तर हा तंगडी मोडून घेईल असें ज्योडीला स्पष्ट दिसूं लागलें. त्यानें दोरी तोडली आणि त्याला जाऊं दिलें. तो लांब लांब उड्या मारीत जंगलांत निघून गेला आणि मग दिवसभर परत आला नाहीं. ज्योडीनें पश्चिमेकडचें कुंपण बांधायला जोरानें सुरुवात केली, 'कारण दक्षिण व पश्चिम बाजू बंद झाल्यानंतर फ्लॅगची स्वारी या बाजूला आधीं वळणार असा त्यानें तर्क केला होता. दुपारीं मा बॅक्स्टरनें दोन तीन तास त्याला मदत केली. त्यानें पश्चिम नि उत्तर बाजूला जे वासे आणून टाकले होते त्या सगळ्यांचा त्यानें उपयोग केला.

पावसाच्या दोन सरी येऊन पिकाला आणखी जोर मिळाला. एक इंच उंच रोपें वाढलीं. आणखी वासे आणण्यासाठीं पुन्हा जुन्या बखळीकडे जाण्याची ज्योडीनें ज्या दिवशीं तयारी केली त्या दिवशीं हें नवीन उंच कुंपण एकदा नजरेखालून घालण्यासाठीं तो त्याच्यावर वरपर्यंत चढला आणि त्यानें शेतावरून एकदा नजर फिरवली. उत्तर बाजूच्या पिकावर फ्लॅग ताव मारीत असलेला त्याला दिसला. त्यानें खालीं उडी टाकली आणि आईला हाक मारली.

"मा, मला वासे उचलायला मदत करतेस? मला घाई करायला हवी! तो बघ उत्तर बाजूनें फ्लॅग आंत आलाय्!"

मा त्याच्याबरोबर धावतच तिथें आली आणि कुंपणावर थोडेसें चढून तिनें आंत पाहिलें.

"उत्तर बाजू कसली!" ती म्हणाली, "या कोपऱ्यांत इथें, कुंपण सर्वांत उंच बांधलेलं आहे, तिथूनच नेमकी त्यानें उडी मारली!"

ती बोटानें दाखवीत होती तिकडे ज्योडीनें पाहिलें. जमिनीवर फ्लॅगचीं

ठळक पावलें उमटलीं होतीं आणि आंतल्या बाजूला शेतांत आणखी खुणा दिसत होत्या.

" झालं! म्हणजे हेंही पीक त्यानें फस्त केलंन्!" ती म्हणाली.

ज्योडी डोळे फाडून पाहूं लागला. खरोखरच, रोपें पुन्हा मुळापासून उपटलीं गेलीं होतीं. या बाजूच्या सगळ्या रांगा रिकाम्या पडल्या होत्या. त्यांच्यामधून हरणाची स्वारी वर खालीं हिंडली असल्याच्या स्पष्ट खुणा दिसत होत्या.

" तरीपण तो फार लांब गेलेला नाहीं, मा! तो बघ. पलीकडचा मका अजून चांगला आहे. फ्लॅगनें थोडंसंच खाल्लेलं दिसतंय्!"

" हो तर! आणि बाकीचं खायला त्याला कोण आडकाठी करणार आहे?"

मा कुंपणावरून खालीं उतरली आणि कांहींतरी दृढनिश्चय करून परत घरांत गेली.

" आतां मात्र ठरलं!" ती म्हणाली, " यापूर्वी मीं गय केली, तोच माझा मूर्खपणा झाला."

ज्योडी कुंपणाला बिलगून उभा राहिला, त्याचें आंग बधिर झालें होतें. कसलीही भावना, कसलाही विचार त्याच्या मनाला शिवत नव्हता. फ्लॅगनें दुरून त्याला हुंगलें, आपली मान वर केली आणि उड्या मारीत तो ज्योडीजवळ आला. ज्योडी कुंपणावरून आंगणांत उतरला. फ्लॅग त्याला डोळ्यासमोरही नको होता. तो तिथें उभा असतांनाच, जें उंच कुंपण बांधण्यासाठीं त्यानें एवढी मेहनत घेतली होती त्या कुंपणावरून फ्लॅगनें एकदम सफाईनें उडी मारली — इतक्या सहजगत्या, कीं एखादा पक्षीच जणूं ज्योडीला वेडावीत उड्डाण करीत होता! ज्योडीनें त्याच्याकडे पाठ वळवली आणि तो घरांत शिरला. आपल्या खोलींत जाऊन त्यानें खाटेवर आंग टाकलें आणि उशींत डोकें खुपसून तो रडूं लागला.

बाबा आतां हांक मारणार अशी आपल्या मनाची त्यानें तयारी केली होतीच. या खेपेस, पेनी आणि मा बॅक्स्टर यांच्यांत झालेली चर्चा फार लांबली नाहीं. गेले कित्येक दिवस ज्योडीला जें कांहींतरी अशुभ वाटत होतें त्याला तोंड देण्याची त्यानें आतां तयारी केली. पण अशक्य कोटींतलें कांहीं घडेल याला मात्र त्याची तयारी नव्हती. बाबांनीं जे शब्द उच्चारले तें ऐकायला त्याचें मन तयार झालेलें नव्हतें.

पेनी म्हणाला, " ज्योडी, जें शक्य होतं, तें सगळं करून झालं! मला

फार दुःख वाटतं! किती दुःख वाटतं तें तुला कसं सांगूं? पण आपली वर्षांची पिकं नष्ट झालेलीं आपण उघड्या डोळ्यांनीं कशीं पाहणार? आपल्याला सर्वांना उपासमारीनें मरायचंय् का? — जा, हरणाला रानांत ने, झाडाला बांध आणि त्याला गोळी घाल!"

## — २१ —

ज्योडी भटकत भटकत पश्चिम दिशेला गेला. फ्लॅग त्याच्या जवळून चालत होता. पेनीची शॉटगन ज्योडीनें खांद्यावर धरली होती. त्याच्या हृदयांत खळबळ माजली होती. मध्येंच धडधड व्हायची, मध्येंच थांबायची मग पुन्हा धडधड!

रुद्ध कंठानें तो आपल्याशींच म्हणाला, "मी असलं कांहीं करणार नाहीं. करणार नाहीं, बस्स्! वाटलं तर मला मारा म्हणावं; ठार मारा! पण मी करणार नाहीं!"

आपल्या आईवडिलांबरोबर तो कल्पनेंतलीं संभाषणें करीत होता. दोघांनाही तो सांगत होता कीं, मला तुमचा तिरस्कार वाटतो! त्याची आई खूप आरडाओरडा करीत होती. पण पेनी शांत होता, मनांतल्यामनांत ज्योडीनें त्या दोघांशीं खूप झुंज दिली. शेवटीं तो थकून गेला. त्या जुन्या सोडून दिलेल्या बखळीशीं आल्यावर तो थांबला. बहुतेक कुंपण त्यानें मोडून काढलें होतें, तरी थोडा भाग अजून शिल्लक होता. एका जुन्या चायनाबेरीच्या झाडाखालीं गवतावर त्यानें आंग टाकून दिलें. आणि तो हुंदके देऊन रडूं लागला. शेवटीं हुंदके सुद्धां बाहेर पडेनात. फ्लॅगनें त्याच्या अंगाला नाक घासलें आणि ज्योडीनें त्याला कवटाळून धरलें. तो तसाच उसासे टाकीत पडून राहिला.

तो म्हणाला, "मी करणार नाहीं — करणार नाहीं, बस्स्!"

तो उठून उभा राहिला. तेव्हां त्याला गरगरत होतें. चायनाबेरीच्या ओबडधोबड खोडाला त्यानें आंग टेकलें. झाडाला बहर आलेला होता. फुलांवरून मधमाशा गुँ गुँ करीत हिंडत होत्या. वसंत ऋतूंतल्या वाऱ्याच्या झुळकेबरोबर वाहत येणारा सुगंध फार गोड वाटत होता. आपण रडण्यांत वेळ घालवला याची त्याला आतां लाज वाटूं लागली. ही रडायची वेळ नव्हती, विचार

करायला हवा होता. यांतून आपल्याला विचारपूर्वक मार्ग काढायला हवा. संकट आलें म्हणजे आपले बाबा कसे मार्ग काढतात, तसेंच !

त्याला ऑलिव्हर हटोची आठवण झाली. ऑलिव्हरनें या वेळीं मदत केली असती. पण ऑलिव्हर गेला होता चिनी समुद्रावर ! फॉरेस्टर मंडळींची त्याला आठवण झाली. बकनें त्याला मदत केली असती; पण बक् तरी काय करूं शकणार होता ? एकाएकीं एक विचार तीव्रपणें त्याच्या मनांत आला. त्याला असें वाटलें, कीं जगांत कुठें तरी फ्लॅग जिवंत आहे अशी आपली खात्री पटणार असेल तर त्याचा वियोग सुद्धा आपण सहन करूं. फ्लॅग जिवंत आहे, खोड्या करतो आहे, आपले बावट्यासारखें शेपूट वर करून मजेंत फिरतो आहे, असें त्याचें चित्र आपण डोळ्यांपुढें रेखाटूं शकूं. आपण असें केलें तर ? बककडे जाऊं आणि त्याच्या हातांपायां पडूं. बकला फॉडरविंगबद्दल इतकें बोलूं कीं बकचा कंठ दाटून येईल. मग त्याला आपण विनंती करूं कीं फ्लॅगला गाडींत घालून जॅक्सनव्हिलला घेऊन जा. तिथें जी मोठी बाग आहे, त्या बागेंत फ्लॅगला नेऊन सोडतां येईल. किती तरी लोक तिथें प्राणी पाहायला येत असतात. तिथें फ्लॅग खूप उड्या मारील, त्याला खायलाही भरपूर मिळेल आणि सोबतीला हरिणी मिळेल. आणि जो येईल तो फ्लॅगची स्तुति करील. इकडे, आपण स्वतःचीं पिकें लावून पैसा उभा करूं आणि वर्षांतून एकदा फ्लॅगला भेटायला जात जाऊं. पैसा सांठवून झाल्यावर आपण स्वतःच्या खर्चानें एक जागा घेऊं. आणि मग फ्लॅगला विकत आणून तो नि आपण एकत्र राहूं.

त्याच्या मनांत विचारांचें नुसतें वादळ माजलें होतें. बखळींतून निघून फॉरेस्टर मंडळींच्या रस्त्याला तो वळला. त्याची आशा पुन्हा ताजीतवानी झाली. आणि थोड्या वेळानें जेव्हां ओक वृक्षाखालून जाणाऱ्या त्या फॉरेस्टर मंडळींच्या रस्त्याला तो लागला, तेव्हां त्याला पुन्हा ठीक वाटायला लागलें. त्यांच्या घराकडे धावतच जाऊन तो पायऱ्या चढला. दरवाजा उघडाच होता. त्यावर खडखडावून त्यानें आंत पाऊल टाकलें. खोलींत पा आणि मा फॉरेस्टर यांच्याखेरीज दुसरें कोणी नव्हतें. दोघेंही आपल्या खुर्च्यांवर निश्चल बसलीं होतीं.

ज्योडीचा श्वास कोंडल्यासारखा झाला होता. तो म्हणाला, "कसं काय ! बक कुठें आहे ?

पा फॉरेस्टरांनीं आपलें डोकें हळुहळू वळवून त्याचेकडे पाहिलें. त्यांची मान सुरकुतलेली होती – कासवासारखी.

"काय रे! बऱ्याच दिवसांनीं येतो आहेस!" ते म्हणाले.

"बक् कुठें आहे हो, बाबा?"

"बक्? अं -- बक् अन् घरचीं सगळींचजणं गाडींतून केंटकीला गेलीं आहेत, घोड्यांच्या बाजाराला!"

"या पेरणीच्या दिवसांत?"

"अरे, पेरणीचे दिवस हेच बाजाराचेही दिवस असतात. आणि त्यांना शेत नांगरत बसण्यापेक्षां व्यापार करणं बरं वाटतं त्याला काय करणार? त्यांनीं असा हिशेब केला कीं बाजारांत सौदा करून खाण्याचे जिन्नस घेण्यापुरता पैसा आपण मिळवूं शकूं!" हें बोलतां बोलतां म्हातारा थुंकला. "आणि शक्य आहे. ते मिळवतीलही! घरीं खाण्यापुरते पदार्थ त्यांनीं ठेवले आहेत. लाकडंही फोडून ठेवलीं आहेत. त्यांच्यांतले कांहींजण एप्रिलमध्यें परत येतील, तोंपर्यंत आम्हांला कशाची जरूरी पडायची नाहीं!"

"एप्रिल —"

ज्योडीचें मन सुन्न, बधिर झालें. तो तसाच दारापासून मागें वळला.

"ये रे बेटा! बैस इथें, आमच्याजवळ. तुझ्यासाठीं चांगलं झकास जेवण बनवतें. मनुकांचं पुडिंग आवडतं ना तुला? तुला नि फॉडरविंगला दोघांनाही माझं मनुकांचं पुडिंग फार आवडायचं, हो कीं नाहीं!"

"मला गेलं पाहिजे!" तो म्हणाला, "पण – पण थँक् यू मा!"

तो मागें वळला. आणि त्याच्या तोंडांतून एकाएकीं उद्विग्नपणें शब्द बाहेर पडले, "तुम्ही काय केलं असतंत, सांगा! तुमच्या घरीं असं हरीण असतं आणि त्यानें पिकं खाल्लीं असतीं अन् – अन् कांहींही करून त्याला तुम्ही रोखूं शकलां नसतांत अन् तुमच्या पांनीं तुम्हांला सांगितलं असतं, कीं घेऊन जा त्याला नि गोळी घाल! तर काय केलं असतंत तुम्हीं?"

तीं दोघें किलकिल्या डोळ्यांनीं ज्योडीकडे पाहूं लागलीं. मा फॉरेस्टर गालांतल्या गालांत हसली. पा फॉरेस्टर म्हणाले, "का बरं? मी गेलों असतों अन् गोळी घातली असती!"

ज्योडीच्या लक्षांत आलें कीं, आपण विषय चांगला स्पष्ट केला नाहीं.

तो म्हणाला, " समजा तें हरीण म्हणजे तुमचं आवडतं पाडस असतं — तुमचं सर्वांचं फॉडरविंगवर जसं प्रेम होतं तसं त्याच्यावर असतं — तर ?"

पा फॉरेस्टर म्हणाले, "बाबा रे! प्रेमाचा पिकाशीं कांहींसुद्धा संबंध नाहीं. पिकं खायला येणाऱ्याचे लाड कोणीही करणार नाहीं. माझ्या मुलांपुढें उपजीविकेचे दुसरे मार्ग तरी खुले आहेत. तुमच्यापुढें तेंही नाहीं!"

मा फॉरेस्टरनें विचारलें, "फॉडरविंगनें नांव सुचवावं म्हणून गेल्या उन्हाळ्यांत तूं इथें आणलं होतंस तेंच का तें पाडस ?"

"होय, तेंच! फ्लॅग!" ज्योडी म्हणाला, "तुम्ही सर्वजण त्याला घेणार नाहीं का ? फॉडरविंग असता तर त्यानें घेतलं असतं!"

"अरे, पण त्याला अडवून ठेवायला तुमच्यापेक्षां कांहीं वेगळीं साधनं आमच्याकडे आहेत असं थोडंच आहे! आणि तो इथें राहायचाही नाहीं. त्याच्या एवढ्या हरणाला चार मैलांचं अंतर म्हणजे कांहींच नाहीं."

झालें! ज्योडीला वाटलें – म्हणजे इथेंही भिंतीवरच डोकें आपटलें आपण!

तो म्हणाला, "बरं आहे, येतों मी!" आणि तो निघून गेला.

त्यानें ठरवलें, आपण स्वतःच जॅक्सनव्हिलला जाऊं. फ्लॅगला घेऊन चालत चालत जाऊं. त्याच्या गळ्यांत अडकवण्यासाठीं कांहीं आहे का म्हणून त्यानें इकडेतिकडे पाहिलें. एक द्राक्षवेल दिसली, ती त्यानें खिशांतल्या चाकूनें मोठ्या मेहनतीनें तोडली. तिचें एक टोक फ्लॅगच्या गळ्याभोवतीं बांधून आणि दुसरें हातांत धरून तो ईशान्य दिशेला निघाला. कांहीं वेळपर्यंत फ्लॅगनें गळ्यांतलें बंधन शांतपणें सहन केलें. मग स्वारी उतावीळ झाली आणि ओढाताण करूं लागली.

त्याची समजूत घालून त्याला राजीखुषीनें बरोबर न्यायचें म्हणजे मोठ्या जिकिरीचें काम होतें. ज्योडीचा जीव अगदीं उबून गेला. शेवटीं त्यानें तो नाद सोडून दिला आणि त्याच्या गळ्याभोवतीं बांधलेला फास काढून घेतला. आपण हट्टीपणानें जिंकली या समाधानानेंच कीं काय फ्लॅग नजरेच्या टप्प्यांत राहून चालूं लागला. दुपारीं ज्योडीला भुकेनें कावल्यासारखें झालें आणि अंगांत त्राण राहिलें नाहीं. सकाळीं न्याहारी न करतांच त्यानें घर सोडलें होतें. मनांत इच्छा एवढीच होती, कीं घर सोडून दूर पळून जावें. आतां भूक, मनाच्या यातना आणि मार्च महिन्यांतल्या उन्हाचा ताप, या सर्वांनीं त्याचें डोकें घेरल्यासारखें झालें. त्याला झोप लागली. जागा झाल्याबरोबर पाहतो तों फ्लॅग पळालेला. दुपारभर त्यानें

त्याच्या पावलांचा मागोवा घेतला. पावलांच्या खुणा मध्येंच झाडांत शिरल्या होत्या. मध्येंच बाहेर आल्या होत्या आणि मग रस्त्याकडे वळून सरळ घराच्या दिशेनें गेल्या होत्या.

त्या खुणांमागून जाण्याखेरीज दुसरें कांहीं करण्यासारखें नव्हतें. त्याच्या थकल्याभागल्या मनाला आणखी कांहीं विचार सुचणेंही शक्य नव्हतें. तो तसाच चालायला लागला आणि अंधार पडल्यानंतर बॅक्स्टर बेटांत पोचला. सैंपाकघरांत एक मेणबत्ती जळत होती. त्याचे कुत्रे धावतच त्याच्याकडे आले. त्यांनीं आवाज करूं नये म्हणून त्यानें त्यांना थोपटलें. तो स्वतः मुळींच आवाज न करतां घराजवळ गेला आणि त्यानें आंत डोकावून पाहिलें. रात्रीचें जेवण उरकलेलें होतें. त्याची आई आपले कधीं न संपणारें शिवणकाम घेऊन मेणबत्तीजवळ बसली होती. आपण घरांत जावें असा विचार करीत तो उभा होता, इतक्यांत फ्लॅगनें आंगणांतून ताडकन् उडी मारली. तत्क्षणीं आईनें मान वर केली आणि ती कान देऊन ऐकूं लागली.

तो तसाच घाईघाईनें तिथून दूर झाला. आंगणांतल्या कोठीच्या पलीकडे गेला आणि फ्लॅगला त्यानें हळू आवाजांत हाक मारली. हरीण धावतच त्याच्याजवळ आलें. कोपऱ्याशीं तो खालीं वाकून आंग चोरून उभा राहिला. आईनें येऊन सैंपाकघराचें दार उघडलें. आंगणांतल्या रेतीवर प्रकाशाचा एक पट्टा दिसूं लागला. दार पुन्हा बंद झालें. त्यानंतर बराच वेळ त्यानें वाट पाहिली. शेवटीं सैंपाकघरांतला उजेड मालवला गेला. तरीपण आईनें बिछाना गांठून ती चांगली झोपेपर्यंत थांबावें म्हणून त्यानें वाट पाहिली. मग चोरपावलांनीं तो कोठींत गेला. अस्वलाच्या शेकलेल्या मांसापैकीं कांहीं अजून शिल्लक होतें. त्याचा एक तुकडा तोडून त्यानें घेतला. तो कडक आणि सुका होता. पण त्यानें तसाच तो चावून खाल्ला. सैंपाकघरांत थंड झालेलें पण शिजलेलें अन्न असेल तें त्याच्या आसुसलेल्या मनाला दिसूं लागलें. पण तें घेण्यासाठीं आंत जाण्याचें धाडस त्याला करवेना. आपण इथें अनोळखी आहोंत, चोर आहोंत असें त्याला वाटूं लागलें. कुरणांतल्या गवतापैकीं थोडेसें गोठ्यांत अजून शिल्लक होतें. त्यांतलें हातांत घेतां येईल तेवढें घेऊन त्याचा त्यानें बिछाना बनवला आणि फ्लॅगला जवळ घेऊन तो झोपला. अर्थात् त्याला मोठेंसें ऊबदार वाटलें असें नाहीं; कारण मार्च महिन्यांतली ती रात्र खूप गारठ्याची होती.

सूर्योदयानंतर तो उठला, तेव्हां त्याचें अंग ताठर झालें होतें. आणि त्याला अगदीं उद्विग्न वाटत होतें. फ्लॅग पुन्हा पसार झाला होता. ज्योडी मनांत नसतां-नाही सक्तीनें ओढल्यासारखा घराकडे गेला. फाटकाजवळ त्याला आईचा आवाज ऐकूं आला. ती क्रुद्ध होऊन तुफानासारखी गर्जत होती. कोठीला टेकून, ज्योडीनें शॉटगन् ठेवली होती; ती तिला सांपडली होती. फ्लॅगही तिला दिसला होता. तिला आणखी असाही शोध लागला होता, कीं पहाटेची वेळ साधून फ्लॅगनें मोड आलेल्या मक्यावरच नाहीं तर काऊपीच्या एका रुंद पट्ट्यावर चांगला ताव मारला होता. बिचारा ज्योडी आईच्या संतापाला तोंड द्यायची तयारी करून असहायपणें तिच्याजवळ गेला. खालीं मान घालून तो उभा राहिला, आणि आईनें एकामागून एक सोडलेले वाग्बाण त्यानें मुकाट्यानें सोसले.

ज्योडीची चांगली हजेरी घेऊन झाल्यावर शेवटीं ती म्हणाली, " जा आतां तुझ्या पांकडे ! निदान या वेळीं तरी ते माझ्या बाजूचे आहेत."

ज्योडी झोपायच्या खोलींत गेला. त्याच्या बाबांचा चेहरा ओढल्यासारखा दिसत होता.

पेनी सौम्य स्वरांत म्हणाला, " मीं तुला सांगितलं होतं; तें तूं केलं नाहींस. कां बरं ? "

" पा, मला तें करतांच येईना. मी कधीं तसं करणं शक्य नाहीं ! "

पेनीनें आपलें डोकें मागें उशीवर टेकलें. तो म्हणाला, " बाळ, जरा असा माझ्या जवळ ये. हें बघ, तुझं छोटं हरीण तुझ्यासाठीं राखून ठेवावं म्हणून मला शक्य तें सर्व मीं केलं ! खरं ना ? "

" होय ! "

" तुला माहीत आहे, कीं हें धान्य म्हणजे आपलं जीवन आहे ! "

" होय ! "

" तुला हेंही माहीत आहे, कीं त्या उंडारलेल्या हरणाला आटोक्यांत आणायचा एकच उपाय आहे. आणि तो म्हणजे त्याचा नाश करणं ! "

" होय ! "

" मग मीं तुला सांगितलं होतं तें तूं कां केलं नाहींस ? "

" मला करणं शक्य नाहीं ! "

पेनी स्वस्थ पडून राहिला.

"तुझ्या माला सांग इकडे यायला. आपल्या खोलींत जा अन् दार लावून घे!"

"होय!"

अशा साध्या सरळ आज्ञा द्या म्हणावं! त्या मानणं किती सोपं असतं.

"पा म्हणताहेत — त्यांनीं तुला बोलावलंय्!"

तो आपल्या खोलींत गेला आणि त्यानें दार बंद करून घेतलें. खाटेच्या कांठावर बसून तो आपले हात चोळूं लागला. हळू आवाजांत कोणी बोलल्याचें त्याला ऐकूं आलें. त्याला पावलें ऐकूं आलीं. मग 'फट्ट' असा बंदुकीचा आवाज झालेला त्यानें ऐकला. तो धावत खोलीबाहेर पडला आणि सैंपाकघराच्या दाराकडे पळाला. त्याची आई ओसरीवर हातांत बंदूक घेऊन उभी होती. बंदुकींतून धूर निघत होता. पलीकडे कुंपणाजवळ फ्लॅग तडफडत पडला होता.

ज्योडी धावतच फ्लॅगकडे गेला. हरीण धडपडत उठलें. त्याचे तीन पाय अजून चांगले होते. तें आडखळत ज्योडीपासून दूर जाऊं लागलें. जणूं कांहीं हा मुलगाच आपला शत्रु आहे असें त्याला वाटत होतें. त्याचा पुढचा डावा पाय फाटून रक्तबंबाळ झाला होता.

पेनीनें कसेंबसें आपलें आंग बिछान्यांतून खालीं ओढलें आणि तो दारापाशीं आला. पण दारांतच एका गुडघ्यावर पडून त्यानें आधारासाठीं दार घट्ट धरलें.

त्यानें ओरडून सांगितलें, "मला करतां येत असतं तर मीं केलं असतं. पण मला मुळीं उभंही राहतां येत नाहीं – ज्योडी, जा, जा! त्याचा निकाल लाव! त्याच्या यातनांचा लवकर शेवट कर!"

ज्योडी धावत परत आला. आणि आईच्या हातांतली बंदूक त्यानें हिसकावून घेतली.

"तूं मुद्दाम केलंस हें!" तो किंचाळला. "मला माहीत आहे, तूं त्याचा द्वेष करीत होतीस!"

त्यानें बाबांकडे वळून पाहिलें.

"तुम्हीं मला दिलेला शब्द मोडलात, तुम्हीं तिला हें करायला सांगितलंत! मला तुमचा तिरस्कार वाटतो. मला आशा आहे कीं तुम्ही एकदाचे मराल! तुमचं पुन्हा मला दर्शनसुद्धा नको!"

तो धावतच फ्लॅगकडे गेला. धावतांधावतां तो सारखा हामसाहामशीं रडत होता.

तिकडे पेनीनें हाक मारली, "ओरी, मला धरायला ये. मला उठवत नाहीं —"

वेदनांनीं विव्हळ झालेला आणि घाबरलेला फ्लॅग तीन पायावर लंगडत पळत होता. दोन वेळा तो पडला. आणि मग ज्योडीनें त्याला गांठलें.

तो ओरडला, "अरे, मी आहें फ्लॅग, मी आलोंय्! मी!"

फ्लॅग तंगड्या झाडून पुन्हा उठला आणि पळायला लागला. रक्ताची संतत धार सुरू झाली. फ्लॅगनें धावत धावत विवराचा कांठ गांठला. तिथें क्षणभरच तो घुटमळला. आणि मग आंत कोलमडला. तो उतारावरून आंत गडगडत गेला. ज्योडी त्याच्यामागें धावला; तेव्हां विवराच्या तळाशीं डोहाजवळ पडलेला फ्लॅग त्याला आढळला. त्यानें आपले मोठाले आर्द्र डोळे उघडले. आणि आपल्या बालमित्रावर लावले. किती थंड नजर होती ती! आणि किती नवल त्यांत भरलेलें होतें! त्याच्या गोमट्या मानेवर मागच्या बाजूला ज्योडीनें बंदुकीची नळी टेकली आणि चाप ओढला. एक क्षणभर फ्लॅगचें शरीर हाललें आणि मग कायमचें स्वस्थ झालें.

## — २२ —

फोर्ट गेट्स् रस्त्यावरून ज्योडी उत्तरेकडे गेला. त्याचें चालणें म्हणजे एखादा ओंडका हलावा तसें होतें. जणू कांहीं त्याच्या पायांशिवाय कोणत्याही अवयवांत जीव राहिला नव्हता. हरणाचें प्रेत तसेंच टाकून तो निघाला होता. त्याच्याकडे पुन्हा दृष्टिक्षेप करण्याचें धाडस सुद्धा त्याला झालें नाहीं. आतां पळून जायचें तेवढें बाकी राहिलें होतें. दुसऱ्या कशाला जणूं अर्थच नव्हता. आणि जायचें तरी कुठें? जायला जागा नव्हती. पण त्याला तरी कुठें अर्थ होता? त्याची तरी ज्योडीला कुठें पर्वा होती? फोर्टगेट्स्च्या वरच्या बाजूनें गेलें कीं, होडींतून नदी ओलांडायची. हं! आतां पुढचे बेत स्पष्ट होऊं लागले. जॅक्सनव्हिलला जायचें हें ठरलेंच. तिथें जाऊन दर्यावर्दी बनायचें. ऑलिव्हर हटो कसा, दर्यापार गेला होता? तसेंच आपणही जायचें!

जॅक्सनव्हिलला जायचा सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे होडीचा होता. आपण असें करूं—अगोदर नदीच गांठूं ! होडीची गरज होतीच. पण तेवढ्यांत ज्योडीला आठवलें. सॉल्ट स्प्रिंग्‌चा फाटा ओलांडण्यासाठीं आपल्या बाबांनीं आणि आपण एकदां एक होडी वापरली होती. झाड पोखरून तयार केलेलें तें कामचलाऊ होडकें अजून तिथेंच पडलेलें असेल. बाबांची आठवण होतांच आपल्या थंड बधिर काळजांत कोणीतरी तीक्ष्ण चाकू खुपसल्याचा त्याला क्षणमात्र भास झाला. मग पुन्हा जखम भरून आली, गोठली. त्यानें ठरवलें, आपण ओढ्याच्या कांठानें जॉर्ज सरोवरापर्यंत जायचें आणि मग मोठ्या नदींतून उत्तरेकडचा प्रवास करायचा.

सॉल्ट स्प्रिंग्‌जवळ तो पोंचला. त्याला तहान लागली होती. तिथल्या उथळ पाण्यांत शिरून तो खालीं वाकला आणि बुदबुद वाहणाऱ्या झऱ्याचें पाणी पिऊं लागला. जवळच एका मलेटनें उडी मारली. आणि निळे खेकडे कुठेंतरी खुरडत गेले. झऱ्याच्या खालच्या अंगाला त्याला ती जुनी होडी सांपडली.

त्यानें ती ओढून वर जमिनीवर घेतली आणि सरळ केली. फार काळ पाण्यांत बुडालेली असल्यामुळें ती फुगली होती, आणि तिचा तळ कडक बनला होता. पुढच्या कांठांना चिरा गेल्या होत्या, त्यांतून पाणी आंत येत होतें. ज्योडीनें चटकन् आपल्या शर्टाच्या बाह्या फाडल्या आणि त्यांच्या चिंध्या करून त्या फटींमध्यें कोंबल्या. मग तो जवळच्या एका देवदारापाशीं गेला आणि खिशांतल्या चाकूनें झाडाचा चीक खरवडून काढून तो त्यानें बाहेरच्या बाजूनें फांसला. मग वाहत्या प्रवाहांत होडी ढकलून तिचें मोडकें वल्हें हातांत घेऊन तो आंत बसला आणि प्रवाहाबरोबर होडी वल्हवूं लागला. पहिल्यानें त्याला तें नीट जमेना आणि प्रवाहाचा जोर त्याला एकदा या कांठाकडे तर एकदां त्या कांठाकडे नेऊं लागला.

या फाट्याच्या शेवटाला तो आला तेव्हां सूर्य पश्चिमेकडे बराच कललेला होता. भल्यामोठ्या जॉर्ज सरोवराच्या एका विस्तीर्ण विभागांत या ओढ्याचें पाणी ओतलें जात होतें दक्षिणेकडे थोड्याशा अंतरावर कोरड्या जमिनीचा एक तुकडा दिसत होता. ज्योडीनें आपली होडी तिकडे नेली. कांठावर उडी टाकली आणि होडी वर ओढून घेतली. मग एका ओक वृक्षाखालीं बसून त्यानें खोडाला अंग टेकलें आणि समोर पसरलेल्या पाण्याकडे तो पाहूं लागला. त्याला अशी आशा

वाटत होती, कीं या ठिकाणीं आपल्याला एखादी नदींतून जाणारी नौका दिसेल. आणि खरोखरच दक्षिणेकडे जाणारी एक नौका त्याला दिसली सुद्धा. पण ती सरोवरांत फार दूर अंतरावर होती.

सूर्यबिंब झाडाच्या शेंड्यांमागें उतरलें. आतां रात्र पडण्यापूर्वी एखाद्या जहाजाचें लक्ष आपण वेधूं शकूं ही आशा त्याला सोडावी लागली. पाण्याकांठचें गवत गोळा करून त्यानें ओकवृक्षाखालीं आपलें अंथरूण तयार केलें. जमिनीवर आणि पाण्यावर जिकडे तिकडे काळोखाचें साम्राज्य पसरूं लागलें. त्याच्या जवळच्याच दाट झाडींतून घुबडाचा घूत्कार ऐकूं आला. ज्योडीच्या अंगावर रोमांच उभे राहिले. रात्रीच्या वाऱ्याचे तरंग मधून मधून येत, ते किती थंडगार असत! शेकोटी पेटवतां आली असती तर किती बरें झालें असतें. आपले बाबा चकमकीचें शिंग जवळ नसलें तरी विस्तव पेटवतात – इंडियन लोकांप्रमाणें. पण आपल्याला मात्र तें कधींच जमलेलें नाहीं. बाबा इथें असते तर केवढा मोठा जाळ पेटला असता, अंगांत किती ऊब आली असती, खायलाही मिळालें असतें, आराम मिळाला असता – पण नाहीं ज्योडीचें मन मुळींच भीत नाहीं. फक्त त्याला रुक्ष, एकलकोंडें वाटत होतें. तो रड रड रडला. आणि रडतच झोंपला.

सूर्यानें त्याला उठवलें– सूर्यानें आणि पाण्यांतल्या गवतांत किलबिल करणाऱ्या त्या लाल पंखांच्या काळ्या पक्ष्यांनीं. ज्योडी उठून उभा राहिला. त्याला अशक्त वाटत होतें. भोंवळ आल्यासारखें वाटत होतें. आतां विश्रांति घेऊन झाली, तेव्हां आपल्याला भूक लागली असल्याचें त्याच्या लक्षांत आलें. अन्नाचा विचार सुद्धा त्याला किती क्लेशदायक वाटला. त्याच्या पोटाला भुकेमुळें चिमटे बसूं लागले. जणूं लहान लहान तापलेल्या सुऱ्याच त्याच्या आंतड्यांत कोणी खुपशीत होतें. बॅक्स्टर मंडळींच्या जेवणाचें नेहमींचें एक दृश्य त्याच्या तप्त, क्षुधार्त डोळ्यांपुढें दिसूं लागलें. वाफाळलेले, लालसर रंगाचे आणि आपल्याच रसानें थबथबलेले हॅमचे तुकडे त्याला दिसले. त्याचा मधुर स्वाद त्याच्या नाकांत भरला. गुलाबी रंगाचीं बिस्किटें, काळ्या पापुद्र्याचा मक्याचा पाव आणि पांढऱ्या बेकनचे तुकडे आंत तरंगत असलेलें काऊपीच्या कांजीचें वाडगें, हें सगळें त्याला दिसलें. खारीचें मांस तळून बनवलेलें तें पक्वान्न –– त्याचा वास तर इतक्या निश्चितपणें त्याच्या नाकांत भरला, कीं त्याच्या तोंडाला खरोखरच पाणी सुटलें. ट्रिक्सीच्या दुधावर आलेला कोंबट फेस —तो तर त्यानें कल्पनेंत चाखला सुद्धा. कुत्र्यांसाठीं

मांसांतले चरबीसारखे टाकाऊ अंश बाजूला काढलेले असत. ते खाण्याकरतां सुद्धा ज्योडी आज कुत्र्यांशीं झगडला असता.

'भूक' 'भूक' म्हणतात ती अशी असते एकंदरींत. आपली आई म्हणाली होती कीं भुकेनें आपली उपासमार होईल. त्याचा अर्थ हा म्हणायचा! त्या वेळीं आपण हसलों होतों, कारण आपल्याला असें वाटत होतें कीं, भूक म्हणजे काय तें आपल्याला माहीत आहे. तिचें स्वरूप थोडेंसें आनंदाचेंच असतें! पण आतां मात्र आपल्याला कळलें. ती पूर्वीची, आपल्याला वाटणारी भूक नव्हतीच मुळीं. ती होती अन्नाची वासना! आणि ही, जी आज आपल्याला भोंवते आहे ती अगदीच वेगळी गोष्ट आहे. भीतिदायक गोष्ट आहे. ह्या भुकेची मिठी जबरदस्त आहे. तिचीं नखें आपल्या आंतड्यांचे वाभाडे काढीत आहेत.

या नव्याच भयाचा पगडा ज्योडीवर बसूं लागला तेव्हां त्यानें त्याचा प्रतिकार करण्याचें ठरवलें. त्यानें स्वतःला बजावलें — हें बघ, आपल्याला लवकरच एखादं झोपडं दिसेल. किंवा एखाद्या कोळ्याची मुक्कामाची जागा आढळेल. तिथें आपण जाऊं आणि निर्लज्जपणें भीक मागूं. त्याशिवाय आपल्याला पुढें जातां येणार नाहीं. आणि कोणी माणूस भुकेल्याला अन्न नाकारीत नाहीं.

सरोवराच्या कांठाकांठानें तो दिवसभर उत्तरेकडे चालला होता। दुपार उलटल्यानंतर त्याला समोरच्या झाडांच्या गर्दींत एक लाकडी खोपट दिसूं लागलें. तो मोठ्या आशेनें तिथपर्यंत गेला. पण घर रिकामें होतें. त्यानें आंत डोकावून पाहिलें. हळूंच आंत शिरलाही — भुकेनें कावलेलें एखादें रकून किंवा पोसम जसें घरांत शिरतें तसा. धुळीनें माखलेल्या एका फळीवर कांहीं डबे होते. पण ते सर्व रिकामे होते. एका बरणींत त्याला वाटीभर शिळें, खराब झालेलें पीठ सांपडलें. त्यानें तें पाण्यांत मिसळलें आणि त्याचा लगदा करून खाल्ला. त्याच्या भुकेल्या तोंडालासुद्धा हें पक्वान्न बेचव लागलें. पण तेवढ्यानें त्याची पोटांतली तिडीक तरी थांबली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्याला गेल्या वर्षीचीं कांहीं ओकफळें सांपडलीं. खारींनीं तीं जमिनींत पुरून ठेवलीं होतीं. ज्योडीनें तीं उकरून काढून आधाशासारखीं खाल्लीं. आंगांत सुस्ती आल्यासारखें त्याला वाटूं लागलें. तो पुन्हा होडींत जाऊन बसला, तेव्हां त्याला वल्हेंसुद्धा उचलेना.

प्रवाह अनुकूल होता म्हणून बरें; नाहींतर आपण पुढें जाऊंच शकलों

नसतो. हें ज्योडीला कळत होतें. सकाळच्या वेळांत त्यानें फारच थोडें अंतर तोडलें. दुपारीं बारानंतर प्रवाहाच्या मध्यभागांतून तीन जहाजें जात असलेलीं त्याला दिसलीं. तो होडींत उभा राहिला आणि आपले हात हालवून ओरडला. त्याच्या ओरडण्याकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. तीं जहाजें दिसेनाशीं झालीं मात्र, इच्छा नसतांनाही त्याला रडूं कोसळलें. आतां कांठाकांठानें जाण्यांत अर्थ नाहीं, आपण आणखी खोल पाण्यांत होडी नेऊन पुढचें जहाज अडवावें, असें त्यानें ठरवलें. वारा पडला होता, पाणी शांत होतें. दुपारचें कडक ऊन्ह पाण्यांतून प्रतिबिंबित होऊन त्याच्या तोंडाला, मानेला आणि उघड्या हातांना चटके देत होतें. उन्हानें आंग पोळून निघत होतें. त्याचा मेंदू जणूं थाडथाड उडत होता. डोळ्यांपुढें मध्येंच काळे ठिपके दिसत होते; तर मध्येंच सोनेरी पुंज दिसत होते. गुं गुं असा सूक्ष्म गुंजारव त्याच्या कानांत होत होता. त्याची तार एकदम कशीतरी तुटली.

ज्योडीनें डोळे उघडले तेव्हां त्याला एवढेंच कळलें, कीं भोवतालीं सर्वत्र अंधार आहे. आणि आपल्याला कोणीतरी वर उचलतें आहे.

कुणातरी पुरुषाचा आवाज त्याला ऐकूं आला, " तिथेंच झोळींत निजवा त्याला. आजारी दिसतोय् ! त्याचं होडकं आपल्या बोटीच्या मागें बांधा ! "

ज्योडीनें डोळे ताणून पाहिलें. बोटीवर झोंपण्यासाठीं झोळ्या ताणलेल्या असतात, तशा एका झोळींत आपण झोपलों आहों असें त्याला आढळलें. ती टपालबोट असावी असा त्यानें तर्क केला. भिंतीवर टांगलेला दिवा मिणमिण करीत होता. एक मनुष्य ज्योडीजवळ येऊन ओणवा झाला.

" काय रे पोरा, काय झालं ? आम्हीं तर तुला जवळ जवळ टक्कर दिली अंधारांत ! "

ज्योडीनें उत्तर देण्याचा प्रयत्न केला पण त्याचे ओठ सुजले होते.

वरतून कुणाचातरी आवाज आला, " त्याला कांहींतरी खायला देऊन पाहा."

" काय रे बाळ, भूक लागलीय् तुला ? "

ज्योडीनें मानेनेंच होकार दिला. आगबोट आतां चालू झाली होती. केबिन-मधला मनुष्य शेगडीपाशीं कांहींतरी खुडबूड करीत होता. ज्योडीनें पाहिलें तों एक जाडजूड कप त्याच्या पुढ्यांत आलेला. त्यानें मान वर उचलली आणि कप कडला. त्यांत थंडगार दाट नि मसालेदार सांबार होतें. एकदोन घोट घेईपर्यंत

त्याला कांहींच चव लागली नाहीं. मग त्याच्या तोंडांत लाळ फिरूं लागली आणि त्याचें सर्वांग जणूं त्या पदार्थासाठीं आसुसल्यासारखें झालें. लगेच त्यानें तें असें अधाशासारखें घटाघट गिळलें, कीं त्यांतले कांहीं मांसाचे नि बटाट्याचे तुकडे त्याच्या घशांत अडकले.

सैंपाक करणाऱ्या माणसानें कुतूहलानें विचारलें, “ याच्या आधीं केव्हां खाल्लं होतंस ? ”

“ मला माहीत नाहीं. ”

“ अहो कॅप्टनसाहेब, या पोराला आपण पूर्वी केव्हां खाल्लं होतं हेंही माहीत नाहीं ! ”

“ त्याला भरपूर खायला द्या ! पण सावकाश घाला. एकदम जास्त देऊं नका. नाहींतर माझ्या बिछान्यांत ओकून ठेवील. ”

पुन्हा एक सांबाराचा कप आला. त्याच्याबरोबर बिस्किटेंही आलीं. ज्योडीनें संयम ठेवण्याचा प्रयत्न केला. पण खायला घालणारा माणूस मध्यें जास्त वेळ थांबला, कीं इकडे त्याचा थरकांप व्हायचा. पहिल्या दोन्ही कपांपेक्षां तिसरा कप कितीतरी छान वाटला आणि मग एकदम त्याला ग्लानी वाटूं लागली. त्यानें दीर्घ श्वास घेतला. भिंतीशीं टांगलेला दिवा मागेपुढे हालत होता, त्याच्या गतीबरोबर त्याचे डोळेही हलूं लागले. आणि मग त्यानें ते मिटून घेतले.

• • •

ती छोटी आगबोट एकदम उभी राहिली तेव्हां त्या आवाजानें ज्योडी जागा झाला. क्षणभर त्याला वाटलें कीं, आपण होडींतच आहोंत आणि प्रवाहाबरोबर वाहत जात आहोंत. तो खालीं उतरून उभा राहिला आणि त्यानें आपले डोळे चोळले. बोटींतल्या त्या स्टोव्हकडे त्यानें पाहिलें आणि त्याला सांबराची नि बिस्किटांची आठवण झाली. त्याच्या पोटांतल्या कळा केव्हांच थांबल्या होत्या. जिन्याच्या थोड्याच पायऱ्या होत्या; त्या चढून तो मोकळ्या डेकवर आला. त्या वेळीं नुकतेंच उजाडत होतें. टपालाची थैली धक्क्यावर उतरवली जात होती. ज्योडीनें व्हॉल्यूशिया बंदर ओळखलें. कॅप्टन त्याच्याकडे वळून म्हणाला, “ पोरा, तूं अगदीं थोडक्यांत वांचलास बघ ! तूं राहतोस कुठें ? ”

“ बॅक्स्टर बेटांत ! ”

“ या नदीवर बॅक्स्टर बेट कुठें असलेलं आमच्या तर ऐकिवांत नाहीं. ”

कप्तानाचा दुय्यम पुढें होऊन म्हणाला, " कॅप्टनसाहेब, तें कांहीं खरंखुरं बेट नाहीं. गवताच्या झाडींतली ती एक जागा आहे. इथून रस्त्यानें गेलं तर पंधरा एक मैलांवर असेल. "

" तर मग पोरा, तुला इथें उतरायला हवं. घरीं माणसं आहेत ना तुझीं ? "

ज्योडीनें मानेनें होकार दिला.

" तूं कुठें आहेस तें त्यांना माहीत आहे ? "

ज्योडीनें नकारार्थी मान हालवली.

" पळून चालला आहेस, होय ? अस्सं, अस्सं ! तुझ्या जागीं मी असतों — तुझ्यासारखा फाटक्या अंगाचा अन् भोंकर डोळ्यांचा — तर आपला घरीं बसलों असतों. अरे बाबा, तुझ्यासारखं चिंध्यांचं बाहुलं कोण जवळ करील ? घरचीं माणसंच तेवढं करणार — ज्यो ! याला खालीं उतरवून घे ! "

मांसल पिळदार हातांनीं ज्योडीला उचलून धक्क्यावर घेतलें.

" त्याची होडी मोकळी करा. पकड रे पोरा, घट्ट धर. आम्हाला जाऊं दे ! "

शिट्टी वाजली. बाजूच्या चाकांनीं पाणी घुसळायला सुरवात केली. टपाल-बोट पाण्यांतून खळखळ आवाज करीत प्रवाहाच्या उलट चालूं लागली. लाटांमुळें ज्योडीचें होडकें डचमळूं लागलें. त्याचे कांठ पकडून ज्योडीचा हात दुखायला लागला. ज्या अनोळखी माणसानें त्याला उतरवून घेतलें होतें. तोही निघून गेला. त्याच्या पावलांचा आवाज रस्त्यावर दूरदूर ऐकूं येईनासा झाला. आतां जायला दुसरें ठिकाणच नव्हतें. बॅक्स्टर बेट हें एकच ठिकाण.

तो पश्चिमेकडे चालला होता. मनांत कांहीं योजना होती असें मुळींच नाहीं. जाण्यासारखी दुसरी दिशाच नव्हती म्हणून पश्चिमेला चालला होता एवढेंच. बॅक्स्टर बेट त्याला लोहचुंबकासारखें ओढून नेत होतें. एकच सत्य त्याला दिसत होतें. तें म्हणजे आपली बखळ. धडपडत, अडखळत तो आपला चालला होता. मनाशीं नवल करीत होता कीं, घरीं जायचें धाडस आपल्याला होईल का ? घरच्या माणसांना आपण बहुतेक नकोच असणार. त्यांना केवढातरी त्रास दिला होता आपण ! कदाचित् — कदाचित् आपण सैंपाकघरांत गेलों तर आई आपल्याला हाकलून सुद्धा देईल. फ्लॅगला नव्हतं हाकललं तिनें ? तसं ! आपण असेच. कुणाच्याही कधीं उपयोगाचे नाहीं. नुसतं इकडेतिकडे भटक, खेळ अन् बकाबका

खा. एवढंच आपण आजपर्यंत केलं! आपला उर्मटपणा अन् आपली ही वख-वख बिचाऱ्यांनीं किती सहन केली! आणि फ्लॅगनें तर वर्षाचं सगळं खाणं — बहुतेक सगळं — उध्वस्त करून टाकलं! असला मुलगा नसलेलाच बरा, असं आपल्या आईबाबांना वाटत असेल यांत काय शंका आहे? कोण आपल्याला ये म्हणणार आहे आतां?

रस्त्यावरून तो कसातरी भरकटत चालला होता. ऊन्ह कडाक्याचें होतें. हिंवाळा संपलेला होता. त्याच्या मनांत असा पुसट विचार आला, कीं आतां एप्रिल सुरू झाला असावा. रानावनांवर वसंत ऋतूनें आपला अंमल बसवला होता. ठिकठिकाणीं झाडाझुडपांत पक्ष्यांच्या जोड्या दिसत होत्या. गाण्याची किल-बिल चालू होती. मुख्य रस्ता आणि उत्तरेकडची वाट यांच्या नाक्यावर तो अर्धी सकाळ झाल्यानंतर पोचला. आणि तिथें विश्रांति घ्यायला थांबला. या ठिकाणीं जें खुरटें रान उगवलें होतें, त्यावर कडक ऊन्ह पडलें होतें. ज्योडीचें डोकें दुखा-वयाला लागलें. तो उठला आणि उत्तरेकडे सिल्व्हर ग्लेनच्या दिशेनें चालू लागला. तो स्वतःला पुन्हा पुन्हां बजावीत होता, कीं आपण कांहीं झालें तरी घरीं जाणार नाहीं; आपण नुसते झऱ्यावर जाऊं आणि तिथल्या थंडगार काळोखी किनाऱ्या-पाशीं वाहत्या पाण्यांत जरा वेळ पडून राहूं.

जसजसा तो पूर्वेकडे जाऊं लागला तसतसे आणखी दाट रान त्याला लागलें. जवळपास पाणी होतें हें नक्की! सिल्व्हर ग्लेनच्या वाटेला त्याचे पाय वळले. त्याला तहान इतकी लागली होती, कीं त्याची जीभ टाळ्याला चिकटली होती. तसाच धडपडत तो खालीं किनाऱ्याकडे गेला आणि कांठावर पालथा पडून झऱ्याचें थंडगार उथळ पाणी मनमुराद प्याला. त्याच्या ओठांभोवतीं आणि नाका-भोवतीं पाण्याचे बुडबुडे उठले. ओठ फुगेपर्यंत तो पाणी प्याला. शेवटीं त्याला कसेसेंच झालें आणि पाठीवर वळून तो उताणा झाला. त्यानें आपले डोळे मिटून घेतले. अति थकव्यामुळें त्याला ग्लानि आली होती. त्याला पुढेंही जाणें शक्य नव्हतें, मागें फिरणेंही शक्य नव्हतें. कांहींतरी संपलें, खलास झालें. प्रारंभ कशाचाच होईना.

दुपारीं बऱ्याच उशिरानें तो जागा झाला, उठून बसला. वर डोक्यावरतीच त्याला मेणासारखा शुभ्र फुलोरा दिसला. मॅग्नोलियाच्या एका झाडाला फार लवकर आलेला तो मोहर होता.

ज्योडी आपल्याशींच म्हणाला, "एप्रिल, बरं का ? एप्रिल!"

कोणत्यातरी स्मृतीचे तरंग त्याच्या मनांत उठले. एक वर्षापूर्वींच आपण इथें आलों होतों. दिवस फार शांत, नाजुक असा होता. ओढ्याच्या पाण्यांत आपण डुंबलों होतों आणि आत्तांसारखेच गवतांत नि शेवाळांत पडून राहिलों होतों. कांहींतरी छान होतं त्या वेळीं — सुंदर होतं! आपण स्वतःसाठीं पाणचक्की तयार केली होती. ज्योडी एकदम उठला. त्याच्या नाडीचे ठोके भराभर पडूं लागले. तो त्या पूर्वींच्या जागेकडे गेला. काय असेल तें असो; त्याला असें वाटलें, कीं ती पाणचक्की सांपडली तर दुसरेंही जें जें कांहीं आपण गमावलें आहे तें आपणांला सांपडेल. पण पाणचक्की जागेवर नव्हती. पुरानें ती वाहून नेली होती. तिचें तें मजेनें गरगर फिरणें आतां कायमचें दृष्टीआड झालें होतें.

ज्योडी हट्टीपणें आपल्याशींच म्हणाला, "दुसरी बनवीन मी!"

पाणचक्कीच्या खांबासाठीं त्यानें काटक्या तोडून घेतल्या आणि उन्माद आल्याप्रमाणें भराभरा त्या तासल्या. पामेटोचीं पानें कापून त्यानें पंख्याच्या फळ्या तयार केल्या. खांब त्यानें ओढ्याच्या पात्रांत उभे रोंवले. आणि मग पंख लावून ते पाण्याच्या प्रवाहावर चालू केले. वरखालीं वरखालीं, पाणचक्की फिरत राहिली. रुपेरी पाणी खालीं ओघळूं लागलें. पण यांत काय गंमत ? पामेटोच्या झावळ्या पाणी झटकीत होत्या एवढंच! या गतीमध्यें ती पूर्वींची जादू नव्हती. पाणचक्कीनें मनाला जें समाधान मिळत होतें तें मिळेना.

ज्योडी तुच्छतेनें म्हणाला, "कसला पोरींचा खेळ!"

त्यानें पायाच्या ठोकरीनें पाणचक्की लथाडून दिली. तिचे तुकडे ओढ्यांतून वाहत गेले. ज्योडीनें पुन्हा जमिनीवर अंग टाकलें आणि तो स्फुंदस्फुंदून रडूं लागला. त्याच्या मनाला कुठें समाधान मिळेना.

ज्योडीला बाबांची आठवण झाली. त्याला एकाएकीं घराची तीव्र ओढ लागली. बाबांची भेट न घेणें म्हणजे असह्य दुःख आहे असें त्याला वाटलें. तो उठून उभा राहिला. वर चढून गेला आणि रस्त्यावरून खलीकडे धावत सुटला. धावतां धावतां रडत होता — कदाचित् बाबा नसतीलही घरांत, कदाचित् ते मेलेही असतील. पिकांचा नाश झालेला, मुलगा पळून गेलेला. अशा स्थितींत वैतागून त्यांनीं गाशा गुंडाळला असेल आणि आतां ते आपल्याला दिसणारही नाहींत!

ज्योडी हुंदके देत देत म्हणाला, " बाबा ! माझ्यासाठीं थांबा ना."

• • •

ज्योडी घरापासून अर्ध्या मैलावर पोचला तेव्हां काळोखानें त्याला घेरलें. त्यावेळच्या धूसर प्रकाशांत सुद्धा नेहमींच्या परिचित वस्तु ज्योडीला ओळखतां आल्या. बखळींतले उंच देवदार वृक्ष तर रात्रीच्या आगमनाबरोबर आणखीच काळे दिसत होते. ज्योडीनें फाटक उघडलें आणि तो आंगणांत गेला. घराला वळसा देऊन पिछाडीला गेला. सैंपाकघराच्या खिडकीशीं जाऊन पायांचा बिलकुल आवाज न करतां तो वर चढला आणि त्यानें आंत डोकावून पाहिलें.

शेकोटींतला विस्तव मंद जळत होता. पेनी तिथेंच जवळ अंगाभोवतीं पांघरुणें लपेटून, आंगाचें मुटकुळें करून बसला होता. एका हातानें त्यानें डोळे झाकून घेतले होते. ज्योडी दाराशीं गेला आणि दार उघडून त्यानें आंत पाऊल टाकलें. पेनीनें मान वर केली.

" ओरी ? "

" नाहीं, नाहीं ! मी आहे ! "

पेनीनें मान वळवून त्याच्याकडे आश्चर्यानें पाहिलें. तो म्हणाला, " ज्योडी ! "

तो आपल्या बाबांजवळ गेला आणि त्यांच्या शेजारीं उभा राहिला. पेनीनें त्याचा हात पकडण्यासाठीं चांचपडल्यासारखें केलें. आणि मग त्याचा हात आपल्या हातांत धरून पेनी तो हळूहळू चोळूं लागला.

" बेटा — मीं जवळ जवळ तुझी आशा सोडली होती. तूं बरा आहेस ना ? "

ज्योडीनें मानेनें होकार दिला.

" तूं बरा आहेस — मेला नाहींस किंवा निघूनही गेला नाहींस. तूं बरा आहेस. " पेनीच्या चेहऱ्यावर एक उज्ज्वल तेज दिसूं लागलें. तो म्हणाला, " प्रभूची कृपा ! "

ज्योडीला वाटलें, काय आश्चर्याची अविश्वसनीय गोष्ट ही ! आपण खरोखर या लोकांना हवे आहोंत !

तो म्हणाला, " मला घरीं यावंच लागलं. "

" हो ना ! बरोबर आहे. यावं लागणारच. "

"मीं जें म्हणालों त्याला कांहीं अर्थ नव्हता. तुमचा द्वेष —"

ज्योडीला चिरपरिचित असलेलें तें हास्य आणखी सतेज दिसूं लागलं.

"अगदीं बरोबर आहे. त्याला कसला आलाय अर्थ? When I was a child, I spake like a child — हें बघ, कपाटांत खायचे पदार्थ आहेत. तुला भूक लागली असेल ना?"

"मीं फक्त एकदाच खाल्लेलं आहे. काल रात्रीं."

"काय म्हणतोस? एकदाच! मग तुला कळलं असेल, उपासमार म्हणजे काय तें." त्याचे डोळे शेकोटीच्या उजेडांत चमकले. ज्योडीनें आपल्या मनांत अगदीं असेंच दृश्य रेखाटलें होतें. "उपासमारीचा राक्षस – त्याचा चेहरा म्हणजे आपल्या त्या स्लूफूटसारखाच असतो, नाहीं का?"

"फारच भयंकर असतो."

"तीं बघ, तिथें बिस्किटें आहेत. मधाची बरणी उघड. भोपळयाच्या भांड्यांत दूध सुद्धा असेल."

ज्योडी भांडीं चांचपडूं लागला. त्यानें उभ्याउभ्यानं अन्न खाल्लें, लांडग्यासारखें बका बका खाल्लें. काऊपीचें एक शिजवलेलें पक्वान्न होतें. त्यांत बोटें बुडवून तो भराभरा तीं ओरपूं लागला. पेनी डोळे फाडून त्याच्याकडे पाहत होता.

तो म्हणाला, "तुला अशा रीतीनें ही गोष्ट शिकावी लागली याचं मला दुःखं होतं."

"मा कुठें आहे हो, पा?"

"ती गाडी घेऊन फॉरेस्टरांकडे गेली आहे. धान्याचं बीं आणणार आहे. कांहीं थोडं पीक तरी पुन्हा लावायचं असा तिनें बेत केला आहे. विकण्यासाटीं बरोबर कोंबड्या घेऊन गेली आहे. तिचा स्वाभिमान इतका दुखावला म्हणतोस पण तिला जाणं भागच होतं."

ज्योडीनें फडताळाचें दार बंद केलें.

पेनी म्हणाला, "तूं कुठें गेला होतास तें सांगशील तर मला फार बरं वाटेल."

"नदीवर गेलों होतों मी. दर्यापार जायचा माझा बेत होता!"

"असं!"

पेनी पांघरुणांत किती लहानसा आणि खुरटल्यासारखा दिसत होता !

ज्योडी म्हणाला, " तुमचं कसं आहे, पा ? आतां बरं वाटतंय् ना ! "

पेनीनें बराच वेळपर्यंत शेकोटींतल्या निखाऱ्यांकडे टक लावून पाहिलें.

तो म्हणाला, " तुला खरी गोष्ट कळावी हेंच रास्त आहे. माझ्यांत आतां कांहीं अर्थ राहिलेला नाहीं. "

ज्योडी म्हणाला, " इथलीं माझीं कामं आटोपलीं कीं, मला तुम्ही डॉक्टर-बाबांकडे पाठवा. मी त्यांना घेऊन येईन. "

पेनी किती तरी वेळ मुलाच्या चेहऱ्याकडे निरखून पाहात होता.

तो म्हणाला, "तूं फारच वेगळा बनून परत आला आहेस ! शिक्षा भोगून परत आल्यासारखा दिसतोस. आतां तूं पाडस राहिला नाहींस. ज्योडी — "

" काय, पा ? "

" मी तुझ्याशीं आतां बरोबरीच्या नात्यानें बोलणार आहें. पुरुषानें पुरुषाशीं बोलावं तसं ! तूं अशी कल्पना करून घेतलीस कीं मीं तुझा विश्वासघात केला. एक सत्य असं आहे कीं प्रत्येक माणसानें तें समजून घेतलंच पाहिजे. कदाचित् आतां तुला तें समजलं असेल. प्रश्न माझा एकट्याचा नव्हता. तुझं लाडकं पाडस ठार करणं एवढीच समस्या नव्हती. बाबा रे, जीवन प्रत्येक वेळीं तुला, मला सर्वांना धक्के देत असतं. "

ज्योडीनें आपल्या बाबांकडे पाहिलें आणि मान डोलावली.

पेनी म्हणाला, " माणसांच्या जगांत काय प्रकार घडत असतात तें तूं पाहिलंस. माणसं किती संकुचित, नीच वृत्तीचीं असूं शकतात तें तुला कळलं. मृत्यूचे चाळे तूं पाहिलेस. उपासमारीच्या राक्षसाचं तूं दर्शन घेतलंस. प्रत्येक माणसाला वाटत असतं कीं, जीवन सुंदर अन् सुरळीत असावं. बेटा, जीवन सुंदर आहे, फारच सुंदर आहे पण तें सुरळीत मात्र नाहीं. जीवन माणसाला पदोपदीं ठोकर देतं. तो खालीं पडतो, उठतो आणि जीवन पुन्हा त्याला ठोकर देतं. तुझं जीवित सुरळीत असावं अशी माझी केवढी इच्छा ! निदान मी राहिलों त्यापेक्षां तुला जास्त सुखानें राहायला मिळावं असं मला किती वाटत असे ! आपल्या पोटच्या पोरांना जगाला तोंड देण्याचा प्रसंग यावा हें पाहून कुणाही माणसाचं काळीज किती तुटत असतं ! तुझ्या वांट्याला तो त्रास येऊं नये म्हणून शक्य तेवढा प्रयत्न मीं केला. मला वाटे, त्या हरणाच्या पाडसाबरोबर तूं मनसोक्त हुंडडावंस. तुला पूर्वी किती एकटं

वाटत असे, पण त्या हरणानें तुला कशी सोबत केली तें सगळं मला कळत होतं. पण बाळ, प्रत्येक माणूस – तसं म्हणशील तर, एकटाच आहे. मग त्यानें करायचं काय? धक्के खावे लागले, ठोकर बसली, म्हणजे त्यानें करायचं काय? त्यानें काय करायचं हें उघडच आहे. आपला दुःखाचा वांटा मुकाट्यानें उचलायचा आणि जीवन जगायचं!"

ज्योडी म्हणाला, "पा, मी पळून गेलों याची मला आतां लाज वाटते."

पेनी उठून ताठ बसला. तो म्हणाला, "तूं आतां मोठा झाला आहेस. आपल्या मनाप्रमाणें तूं वागूं शकतोस. तुला ऑलिव्हर हटोप्रमाणें खलाशी व्हायचं असेल तर त्यांत कांहीं वाईट नाहीं. कांहीं माणसं जमिनीवर राह्यला पात्र असतात, तर कांहीं समुद्रावर! पण मला अजूनहीं असं वाटतं कीं तूं इथें राहून शेती करायची असं ठरवलंस तर जास्त चांगलं. जेव्हां कधींकाळीं तूं इथें विहीर खोदून तयार करशील तेव्हां मला किती आनंद होईल म्हणून सांगूं! म्हणजे मग आपल्याकडच्या कुणाही बाईला टेकडींतल्या झऱ्यावर जाऊन कपडे धुवावे लागणार नाहींत. आहे का तुझी तयारी?"

"माझी तयारी आहे, पा!"

पेनीनें ज्योडीशीं हस्तांदोलन केलें. मग त्यानें आपले डोळे मिटून घेतले. शेकोटींतले निखारे रसरसून पेटले होते. ते सकाळपर्यंत राहावेत म्हणून ज्योडीनें त्यांच्यावर राख पसरली.

पेनी म्हणाला, "आतां बिछान्यापर्यंत जायचं म्हणजे मला तुझी मदत लागेल. मा आजची रात्र तिथेंच राहणार असं दिसतंय्."

ज्योडीनें आपला खांदा बाबांच्या खांद्याखालीं दिला. पेनीनें सर्व भार त्याच्यावर टाकला आणि तो लंगडत लंगडत आपल्या खाटेकडे गेला. बिछान्यांत निजल्यावर ज्योडीनें त्याच्या अंगावर पांघरूण घातलें.

"बाळ, तूं परत आलास. आमचं गेलेलं अन्नपाणी आम्हांला परत मिळालं. आतां झोप, जा. विश्रांति घे. गुडनाईट!"

त्या शब्दांनीं ज्योडीच्या मनाला केवढी ऊब वाटली!"

"गुड नाईट, पा!"

तो आपल्या खोलींत गेला आणि त्यानें दार लावून घेतलें. आपला फाटका शर्ट आणि विजार त्यानें काढून टाकली आणि खाटेवर चढून ऊबदार पांघरुणानें

त्यानें आपलें आंग लपेटून घेतलें. कितीतरी वेळ तो असा मजेंत पडला होता, पाय ताणत होता! त्याच्या मनांत आलें आपल्याला सकाळीं लवकर उठायचें आहे, गाईचें दूध काढायचें आहे, सर्पण आणायचें आहे, शेतकाम करायचें आहे. हीं कामें आपण करूं. पण तीं केल्यावर आपल्याशीं खेळायला फ्लॅग नसणार! आपल्या बाबांना आतां जास्त जड कामें झेपायचीं नाहींत. पण कांहीं हरकत नाहीं. आपण एकट्यानेंच तीं पार पाडूं."

एकाएकीं तो कान देऊन ऐकूं लागला. काय ऐकायला त्याचे कान आतुर झाले होते? आपल्या हरणाचा आवाज, घरभर धावणाऱ्या किंवा याच बिछान्याच्या खोलींत कोपऱ्यांतल्या आपल्या गवताच्या आंथरुणावर खसबस करणाऱ्या हरणाचा आवाज—छे! तो आवाज आपल्याला पुन्हा कधींही ऐकूं येणार नाहीं! त्याच्या मनांत आलें—फ्लॅगच्या प्रेताचं काय झालं असेल? आईनें त्याच्यावर माती टाकली असेल का? कीं गिधाडांनीं त्याचा फन्ना उडवला असेल? फ्लॅग! ज्योडीला वाटलें आपण त्या हरिण बाळावर जेवढें प्रेम केलें तेवढें पुन्हा कधीं कुण्णावर अन् कश्श्यावरही करणार नाहीं. पुरुषावर नाहीं, स्त्रीवर नाहीं, अगदीं आपल्या पोटच्या पोरावरही नाहीं. आतां आयुष्यभर आपण एकलकोंडेच राहणार. पण—पण चाललंच आहे! प्रत्येक मनुष्यानें आपला दुःखाचा वांटा उचलला पाहिजे आणि जीवन जगलें पाहिजे!

निद्रेचा अंमल ज्योडीवर पसरत चालला आणि त्यानें एकदम रुद्ध कंठानें हाक मारली, "फ्लॅग!"

ज्योडीचाच होता का तो आवाज? नाहीं. तो या ज्योडीचा आवाज नव्हता. तो एका लहान मुलाचा आवाज होता. दूर विवरापाशीं, मॅग्नोलियाच्या झाडाजवळून, ओकवृक्षांच्या छायेंतून, एक छोटा मुलगा आणि एक हरणाचें पाडस, दोघें बरोबरीनें धावत होतीं. धावतां धावतां तीं दोघेंहीं कुठेंतरी कायमचीं दिसेनाशीं झालीं.

समाप्त

अनुक्रम ........
विभाग ........
क्रमांक ........
नों. दि. ........


अनुक्रम २९५५९
बालवाङ्मय
१५३९
क्रमांक
नों. दि. २।५।५१

# हरिण बालक

## – टीपा –

[ पुस्तकांतील कांहीं वृक्ष व पशु यांच्यासंबंधीं ]

**पाईन :** किंवा देवदार या वृक्षाच्या कितीतरी जाती आहेत. कांहींचें लाकूड पांढरें, कांहींचें काळें. फ्लॉरिडांत लांब पानांच्या देवदाराचीं दाट अरण्यें आहेत. लाकूड घरांसाठीं व जहाजांसाठीं उत्तम. शिवाय त्याच्या चिकापासून – 'रेझिन' पासून – टर्पेंटाइन बनवतात.



**ओक :** या वृक्षाच्या अनेक जाती आहेत. या पुस्तकांत वर्णन केलेली जात म्हणजे 'लाइव्ह ओक'. या झाडाचें लाकूड विशेष भक्कम असल्यामुळें जहाजांसाठीं त्याची मुद्दाम निवड करतात. व्हर्जिनिया व फ्लॉरिडांत वाढणारीं हीं झाडें ५० व कधीं कधीं ७५ फूट उंचीचीं असतात. आणि त्यांच्या पर्णराजींचा विस्तार कधीं कधीं १५० फुटांपर्यंत असतो.




**स्वीट गम :** या झाडाला 'रेड गम'ही म्हणतात. त्याचा चिकट सुका गोंद मुलें 'च्यूइंग गम' सारखा चघळतात. या झाडाला लांब देठाचीं फळें येतात. झाड कधीं कधीं १३० फूट उंच वाढतें. मिसूरी, फ्लॉरिडा, टेक्सास या राज्यांत, विशेषतः दलदलींत हीं झाडें सांपडतात आणि त्याचें लाकूड फर्निचर तयार करण्यासाठीं फार उपयोगी पडतें. पानें एरंडासारखीं असतात.




**शुगर मेपल :** शर्करा वृक्ष. 'मेपल' वृक्षाच्या अनेक जाती आहेत. त्यांपैकीं या जातीचा कादंबरींत उल्लेख आहे. ८० ते ११० फूट उंच वाढणाऱ्या या झाडाचींही पानें एरंडासारखीं असतात. वसंत ऋतूच्या प्रारंभीं या झाडांतून जो रस निघतो त्यापासून साखर, काकवी वगैरे तयार करतां येते म्हणून याला 'शुगर मेपल' नांव पडलें.




**डॉगवुड :** पिंगट खोडाचें १५ ते ३० फूट उंचीचें हें एक लहान झाड आहे. आपल्या सदाफुलीसारखीं त्याला पांढरीं फुलें येतात. दुसऱ्या झाडांच्या सावलींत हीं फुलझाडें वाढतात.



**हरीण :** फताड्या शिंगांच्या 'कॅरिबू' आणि 'वापिटी' या सांबरांपासून 'काळ्या शेपटांच्या' व 'पांढऱ्या शेपटांच्या' लहान हरणांपर्यंत अनेक जाती अमेरिकेंत आढळतात. अमेरिकेंत नवीनच वस्ती करायला गेलेल्या, लोकांचे अन्नाच्या अभावीं हाल होऊं लागले तेव्हां याच हरणांनीं त्यांना पोसलें आहे ! पुढें हरणांची शिकार फार होऊं लागली आणि हे प्राणी नष्ट होणार असा रंग दिसूं लागला तेव्हां त्यांच्या शिकारीवर कायद्याचीं व शिष्टाचाराचीं बंधनें घालण्यांत आलीं. उदाहरणार्थ, आतां कांहीं राज्यांत शिंगें न फुटलेल्या हरणांना मारण्याची बंदी आहे. तसेंच कोणताही सभ्य माणूस 'हरिणी'ची हत्या करीत नाहीं — मग कायद्यानें त्याची परवानगी असो वा नसो !



**अस्वल :** उत्तर ध्रुव प्रदेशांतल्या पांढऱ्या अस्वलांपासून ते ब्रिटिश कोलंबियांतल्या राठ केसांच्या – ग्रिझली अस्वलांपर्यंत अनेक जाती आहेत. अमेरिकेंतलीं अस्वलें काळ्या रंगाचीं असतात.



**कून :** मूळ शब्द 'रकून' ( Racoon ). अमेरिकेंतल्या रानांतून वावरणारा हा साधारणपणें कुत्र्याएवढा प्राणी सपाट पायांचा व मांसाहारी असल्यामुळें त्याची अस्वलाच्या जातींत गणना होते. अंगावरील लोंकरीसाठीं या प्राण्यांची फार मोठ्या प्रमाणावर धरपकड झालेली




आहे; तरी त्याची पैदास कमी होत नाहीं. सदा आनंदी असें रकून अमेरिकन मुलांना पाळायला आवडतें.

**पोसम :** मूळ शब्द 'ओपोसम' ( Opossum ). कांगारूप्रमाणें पोटाला पिशवी असलेला अमेरिकेंतला एकुलता एक प्राणी. पोसमच्या पिशवींत पिल्लें राहतात व तिथेंच आईचें दूध पितात. दिसायला उंदरासारखा दिसतो. याच्याही कातडीला थोडीशी किंमत येते. पोसमचें वैशिष्ट्य म्हणजे मेल्याचें सोंग घेऊन पडण्यांत तो वस्ताद असतो.



**मलेट :** ही एक माशाची जात आहे. दोन प्रकारचे 'मलेट' मासे असतात; तांबडे आणि कबरे.

**रॅटलस्नेक :** 'खडखड्या साप'. फ्लॉरिडाच्या रानांत ही विषारी सापाची जात फार सांपडते. त्याच्या शेपटीच्या भागांत जे मणके असतात ते खडखड वाजतात, त्यामुळें त्याच्या आगमनाची सूचना मिळते. साप कांत टाकतो त्याप्रमाणें हे मणके तो ठराविक ऋतूंत टाकीत असतो. खडखड्या साप नुसता चावत नाहीं, डंख मारतो, तडाखा देतो.



ग्रंथ संग्रहालय
IRBK-0106397
IRBK-0106397